
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू-प्रवास
क्र. ५४५
५४५

# मी पाहिलेला सिलोन

ज. पां. देशमुख




REFBK-0019003
REFBK-0019003

संदर्भ
प्रवार-५३४५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

21 MAR 1976
4 SEP 1977
28 DEC 1977

[ कृ. मा. प. ]

संदर्भ
भू प्रवास-५४५
८०४२२
२२।७।७३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
८०४२२ वि: भू.प्रवास
५४५
२२।७।७३

# मी पाहिलेला सिलोन

ज. पां. देशमुख

REFBK-0019003

REFBK-0019003

मिनिमित्र प्रकाशन पुणे १

*क्षण सोबती ... सदैव साथी*

मुखपृष्ठ : श्री. एम. एस. क्षीरसागर


किंमत : सहा रुपये पन्नास पैसे

© मिनिमित्र प्रकाशन

प्रकाशक : लीला परुळेकर, मिनिमित्र प्रकाशन, ४ ए क्वीन्स गार्डन, पुणे १
मुद्रक : सकाळ प्रेस, बुधवार पुणे २

**अर्पण**

ज्यांच्या सहवासात
मी माझे वृत्तपत्रीय शिक्षणाचे
पहिले धडे घेतले,
गेली अडतीस वर्षे या व्यवसायाची ज्यांनी सेवा केली.
डॉ. ना. भि. परुळेकर, संपादक **सकाळ,**
यांना
प्रेमादर पूर्वक



राष्ट्राध्यक्ष श्री. विल्यम गोपाल्लवं



पंतप्रधान श्रीमती सिरिमाओ बंदारनायकं

# निवेदन

रामायणकालापासून भारतीयांशी संबंध असलेली श्रीलंका व आजची श्रीलंका यांचा संबंध काय या विषयी संशोधकांनी कोणताच निर्णय दिलेला नाही. पण आजच्या श्रीलंकेचा आमच्या संस्कृतीशी असलेला संबंध लक्षात घेता हा देश पहावा, ही माझी फार जुनी इच्छा, सिलोनचे वृत्तपत्रीय जीवनाशी निगडीत संबंध असलेले श्री. सी. ई. एल. विक्रमसिंह यांच्या निमंत्रणामुळे मी पुरी करू शकलो, या बद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. हिंदी पत्रकाराचे दृष्टीकोनातून मला तेथे ज काही दिसले ते 'मी पाहिलेला सिलोन' या पुस्तकरूपाने मी आज वाचकांपुढे ठेवीत आहे.

गेली अडतीस वर्षे वृत्तपत्रीय व्यवसायात जे काही बरेवाईट अनुभव आले, अभ्यास करण्याची व परदेश प्रवासाची संधी मिळाली, त्याचा फायदा घेऊन रशिया, पाकिस्तान, व सिलोन या तीन देशासंबंधी पुस्तके मी लिहू शकलो. माझे रशियासंबंधीचे पुस्तकास १९६७ चे नेहरू पारितोषिक मिळण्याचा योग आला, तर पाकिस्तानविषयीच्या पुस्तकाला पुणे विद्यापीठाने पारितोषिक देऊन गौरविले. या उत्साहजनक पाठिंब्यामुळेच सिलोन संबंधीचे हे पुस्तक मी मराठी वाचकांना सादर करण्याचे धैर्य करीत आहे.

माझे महायुद्धासंबंधीच्या पहिल्या पुस्तकाचे प्रकाशन **'सकाळ प्रकाशन'** संस्थेने केले व त्यानंतर गेल्या चोवीस वर्षांतील माझे हे सातवे पुस्तक, 'मिनिमित्र प्रकाशन'तर्फे प्रसिद्ध होत आहे.

डॉ. ना. भि. परुळेकर व माझे **'सकाळ'** कचेरीतील सहकारी यांच्या साहाय्यानेच माझे हे व्यावसायिक जीवन घडले आहे व त्यामुळेच हे अल्पसे कार्य माझ्या हातून होत आहे, ही गोष्ट मान्य करणे आवश्यक आहे.

ग. म. देशपांडे

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| परकीयांना आकर्षित करणारे बेट | १ |
| सुंदर रत्नांची जन्मदात्री | १४ |
| ब्रिटिशांनी सत्ता कशी मिळविली | २४ |
| ब्रिटिश राजसत्तेला विरोध | ३४ |
| सिलोनचे नवे राजकीय जीवन | ४४ |
| सुधारणांबरोबर विरोध वाढला | ५२ |
| स्वातंत्र्यापूर्वीचे सिलोन | ५९ |
| पहिले संयुक्त मंत्रिमंडळ | ६८ |
| शेती उत्पादनाचा बिकट प्रश्न | ७५ |
| हिंदी मजुरांचा प्रश्न | ८४ |
| यू. एन्. पी. पक्षाचा धुव्वा ! | ९१ |
| कम्युनिस्ट सरकारला तडाखा | ९८ |
| सत्तेने अस्थिरता कायम | १०८ |
| सिलोन मधील कांही सुधारणा | ११४ |
| १९७१ मधील सिलोन | १२६ |
| सिलोन प्रवासात काय पहाल? | १३२ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 98003.
शाखा

# परकीयांना आकर्षित करणारे बेट

हिंदुस्थानइतकाच जुना इतिहास असलेले एक महत्त्वाचे बेट म्हणजे सिलोन होय.आज आमचे दक्षिण टोकाला असलेले हे छोटे स्वतंत्र राष्ट्र आमचा एक नजीकचा शेजारी म्हणून त्याकडे पाहावयाचे म्हटले तर डोळ्यांसमोर या प्रदेशाचे महत्त्व चटकन् उभे राहते. त्याच्या इतिहासाचा अभ्यास आमचे देशा-इतकाच आकर्षक व मनोरंजक आहे.आमचे सारखेच स्वातंत्र्य हा देश अनुभवीत आहे. लोकशाही तत्त्वानुसार स्वतःचे पायावर उभे राहून आपले जीवन जगत आहे. त्याची नीट ओळख करून घेणे शेजारी म्हणूनच नव्हे तर आशियातील दक्षिणेकडील एक महत्त्वाचे मोर्चाचे ठिकाण म्हणून आवश्यक आहे.

एका बाजूला अरबी समुद्र तर दुसऱ्या बाजूला बंगालचा उप-सागर, अशा दोन्ही समुद्राच्या किनाऱ्याशी भारताप्रमाणे संलग्न असणारे हे बेट आकाराने एखाद्या कोंबडीच्या मोठ्या अंड्याप्रमाणे दिसते. २७० मैल लांबीचा हा भूप्रदेश मध्यंतरी फार तर १४० मैल रुंद असेल व उत्तरेकडे पुन्हा निमुळता होत गेला आहे. मध्यभागी सह्याद्रीसारख्या डोंगराच्या रांगा व त्यावरून धावत येणाऱ्या सर्व देशभर पसरलेल्या छोट्या मोठ्या नद्या हे या भूप्रदेशाचे वैशिष्टच असल्यामुळे सर्वच प्रदेश सुपीक बनला आहे. वर्षातून दोन वेळा पडणारा पाऊस बेटाची सर्वच राने नेहमी हिरवीगार राखतो, तर नद्या रोडावल्याप्रमाणे दिसण्याचे प्रसंग या देशात कधीच येत नाहीत. २५३३२ चौरस मैलांचे या प्रदेशातील जवळ जवळ एक अष्टमांश भाग–३३५ चौरस

मैलांचा–प्रदेश पर्वतावरून वाहात येणाऱ्या नद्या व त्या समुद्राला मिळताना बनलेल्या खाड्या यांनी व्यापलेला आहे. या खाड्या व नद्यांचे काठी या देशा–तील जवळ जवळ बावीस मोठी शहरे वसलेली असून, त्या प्रत्येकाचे सौंदर्य या नद्या व खाड्यांनी विशेष उठून दिसते. मध्यभागी सुळक्यासारख्या वर आलेल्या पर्वतश्रेणीत १६ छोटी मोठी शिखरे असून त्यात सर्वात मोठे शिखर पिदुरूतलगलं हे ८२८१ फूट उंचीचे आहे. या शिखराच्या तळाशी ८८००० फूट उंचीवर न्युरेल्या (Newara Eliya) हे सिलोनमधील महत्त्वाचे थंड हवेचे ठिकाण असून याच शहराचे एका टोकाला रामायणातील अशोकवन–ज्या ठिकाणी सीता कारावासात होती–ते ठिकाण होते असे सांगतात. त्याचे नांव 'सीतावकं' होय. या अशोकवनाचे पायथ्याशी एक सुंदर बाग आज सिलोन सरकारने तयार केली आहे. या बागेचा उपयोग अरण्यशास्त्रा–संबंधीचे संशोधनासाठी आज बराच केला जातो. याच अशोकवनाचे मार्गावर एक सीता मंदिर ओढ्याचे काठी दाखविले जाते. तेथे राम-लक्ष्मण-सीतेच्या दगडातील कोरीव मूर्ती आहेत. या मंदिराच्या शेजारी वाहणाऱ्या झऱ्यावर सीतामुक्तीनंतर तिचेसमवेत राम–लक्ष्मणांनी अंघोळ केली त्याची आठवण म्हणून हे मंदिर उभारण्यात आले, अशी हकिकत येथील तामीळ पुजारी सांगतो. पण अशोकवन अगर सीतेचे मंदिर या दोन्ही ठिकाणांना सिलोनच्या इतिहासात कोठलाच आधार नाही. उलट रामायणकालीन कोणत्याही गोष्टीची आठवण देणारे मंदिर अगर इतर कोणतीही वास्तू मला सिलोनचे प्रवासात पाहावयास मिळाली नाही. बुद्धकालातील अनेक अवशेष येथे ठिक–ठिकाणी आढळतात व त्याविषयी बहुतेक सिलोनी ग्रंथातून भरपूर आधार सापडतात.

सिलोनचे सर्वात जुने नांव म्हणजे सिंहालादीप हे होय. सुवर्णाची भूमी म्हणून अजून त्याचा उल्लेख होतो. पण या सुवर्णाचा अर्थ फक्त भूगर्भ व शेतीचे दृष्टीने सधन देश असाच आता लावावा लागेल. महाराष्ट्राच्या एक-चतुर्थांश लोकसंख्येच्या या बेटाची विभागणी राज्यकारभारासाठी बावीस जिल्ह्यात करण्यात आली असून यातील क्षेत्रफळाचे दृष्टीने सर्वात मोठा जिल्हा अनुराधपुरं (२८०९ चौरस मैल) हा आहे. इतर जिल्ह्यात पंचवीसशे चौरस

मैलांचेवर सिलोनमधील दुसरा कोणताच जिल्हा नाही. कलंबो ही खरी या छोटया राष्ट्राची राजधानी. पण त्या जिल्ह्याचा व्यापही ८०८ चौरस मैलांचेवर नाही. या एवढ्या व्याप्तीचे शहरात आज २२ लक्ष ७ हजार लोक राहतात. मुंबईसारख्या महाराष्ट्राच्या राजधानीचे क्षेत्रफळ १२० चौरस मैल आहे व या विभागात राहणाऱ्या लोकांची संख्या ५० लाखांवर गेली आहे. कलंबोची मुंबईशी तुलना करता मुंबईपेक्षा सहापट मोठ्या शहरात आज मुंबईच्या निम्म्याने लोक राहात आहेत. यावरून या राजधानीतील विरळ सुखासीन ऐश्वर्याची व बांधणीची कल्पना येण्यासारखी आहे. मुंबईप्रमाणे कलंबोच्या उपनगराचा व्याप फार मोठा असून या उपनगराची लोकसंख्या सतरा लाख आहे. पग प्रत्यक्ष कलंबो नगरपालिकेच्या हद्दीत पाच लक्ष अकरा हजार लोक राहतात. म्हणजे हे शहर लोकसंख्येच्या दृष्टीने पाहता पुणे कॉर्पो-रेशनचे लोकसंख्येच्या मानाने लहान आहे. सिलोनमधील सर्व शहरांचे वैशिष्टय हे असेच आहे. प्रत्यक्ष नगरपालिकेच्या हद्दीत राहण्यापेक्षा शहराच्या जवळ–पास समुद्रकिनाऱ्यावर जाऊन उपनगरात घरे बांधावी व घरासभोवार नार-ळाच्या बागांच्या गार छायेत राहण्यात सिलोनचा नागरिक मोठा उत्सुक असतो. अनुराधपुरं या सर्वांत मोठ्या क्षेत्रफळाचे जिल्ह्यात शहरात फार तर २९ हजार लोक राहतात. यावरून प्रत्यक्ष मोठ्या शहरांत राहण्यापेक्षा उपनगरात अगर जिल्ह्याचे छोटया छोटया गावी राहून आपली शेती अगर सर्वत्र पसर-लेले उद्योगधंदे सांभाळण्याकडे या नागरिकांची प्रवृत्ती कशी आहे हे स्पष्ट होते. कलंबोच्या खालोखाल जास्त लोकसंख्येचे मोठे शहर म्हणजे देहिवलं हे होय. माऊन्ट लव्हीन्या या छोटयाशा टेकडयाचे रांगात हे शहर वसले असून तेथील शहराची लोकसंख्या फक्त १ लक्ष ११ हजार आहे. याशिवाय पाऊण लाख लोकवस्तीचे मोराटुवा, ६८ हजार लोकवस्तीचे कॅन्डी शहर व सिलोनचे दक्षिण टोक म्हणून गाजलेले गॉल हे शहर ६५हजार लोकवस्तीचे आहे. सिलो-नची जिल्ह्याची ठाणी व मोठी म्हणून गाजलेली सर्व शहरे ४७ हजारपासून पाच हजार लोकवस्तीचे आतबाहेरच आहेत. या शहराचा व सर्व जिल्ह्यांचा संबंध निकटचा राहावा म्हणून कलंबोसारख्या शहरात दुमजली बसेस फार पद्धतशीरपणे चालविल्या जातात. कोणत्याही बस स्टँडवर मोठी खोळंबून बसलेली रांग मला कधीच दिसली नाही. पण सर्व वाहतूक साधनांवर होणारा

तोटा दिवसेंदिवस वाढत असून तो भरून काढण्यासाठी सरकार आता दरात वाढ करण्याचा विचार करीत आहे. प्रवाशांचे हाल न करता व मैलामागे त्यांच्याकडून अवघा चार पैसे दर घेऊन सरकारी पैशाच्या साहाय्याने करण्यात येणारी ही वाहतूक पाहण्यासारखी आहे. परदेशाचे प्रवाशांसाठी सुखसोयीनीयुक्त अशा गाड्या कशा मिळवाव्या, हे सिलोनी अधिकाऱ्यांना चांगले कळते. लोकसंख्या व वाहतुकीची त्यांची साधने त्यांनी एवढी कौशल्याने वापरली आहेत की कलंबोच्या परिसरात धावणाऱ्या तीन प्रकारच्या रेल्वे गाड्या त्यांनी चालू ठेवल्या आहेत व त्या रेल्वे इंजिने, डिझेल तेल व कोळसा या तिन्ही प्रकारच्या जळणावर चालतात. मुंबईहून कल्याणकडे जाणाऱ्या लोकलमध्ये ज्या स्वरूपाची गर्दी आढळते, तशी गर्दी यात कधीच आढळत नाही. बाकावर आरामशीर बसून नोकरी धंद्याहून परतणारे प्रवासी सुखाने प्रवास करीत असतात व यामुळे उपनगरात राहून कलंबोला वेळेवर कामावर येणाऱ्या नोकरवर्गाची संख्या एवढी मोठी आहे की सर्वसाधारणपणे स्टेट बसेसने येणारा प्रत्येक उपनगरातील प्रवासी रोज पाच मैलांचा प्रवास करीत असतो. सिलोनी माणसांनी आरामशीर व सुखसोयींनी युक्त अशा प्रकारचा प्रवास करण्याची आवड ब्रिटिशांकडून शिकून घेतली आहे व त्या प्रकारच्या सुखसोयींनी युक्त अशा गाड्या ब्रिटिशांच्या नंतरही सुसज्ज ठेवल्या आहेत.

सिलोनच्या २५ हजार चौरस मैलांचे प्रदेशात १२३२६ मैल लांबीचे उत्तम डांबरी रस्ते आहेत. युरोपातील कोणत्याही देशातील रस्त्यांशी तुलना करता येतील इतके ते उत्तम राखले जातात. रेल्वेरस्त्यांची लांबी ९२२ मैलांपर्यंत आहे. त्यातले ८३५ मैल ब्रॉडगेज व अवघे ८७ मैल मिटरगेज आहेत. रेल्वेरस्त्यांची व रेल्वेची सर्व मालकी सरकारची असून या रेल्वेच्या तिकिटांचे उत्पन्न ८८ कोटी ७७ लक्षांचे घरात आहे, तर रोज जाणाऱ्या येणाऱ्या माण– सांचे सीझन तिकिटांचे वार्षिक उत्पन्न ६१ कोटी पाच लाखांचे घरात आहे. या रस्त्यावरून नेण्यात येणाऱ्या मालवाहतुकीचे वार्षिक उत्पन्न ९ कोटी ७२ लक्ष आहे, रेल्वेपासून २४ कोटी ६२ लक्ष रुपये फायदा सिलोन सरकार मिळविते व सुखसोयींनी युक्त अशा गाड्या भरपूर प्रमाणात देऊनही खर्च १२ कोटी ४८ लक्ष करते. म्हणजे रेल्वे वाहतुकीतून वर्षाकाठी निदान १०–१२

कोटींचा फायदा हे सरकार सहज मिळविते. वर्षाकाठी तूट आल्यामुळे दरवाढ करण्याची पाळी स्वातंत्र्य मिळाल्यापासून सिलोनवर एकदाही आलेली नाही.


या रेल्वेगाडयांना सिलॉन गव्हर्मेंट रेल्वे (सी. जी. आर.) या नांवाने संबोधिले जाते. सिलोनच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्याभोवतीच हे रेल्वेचे जाळे पसरले असून कलंबो ही राजधानी दक्षिणेकडे गॉल व मातर उत्तरेकडे निगम्बो, चिलाव, मध्य सिलोनमधील कॅन्डी, हॅटन्, बंदारावाला, बादुला, अनुराधपुरं व पूर्व किनाऱ्यावरील ट्रिंकमली, बॅटिकलोअ व उत्तरेकडील टोक जाफना शहर ही शहरे रेल्वे रस्त्यांनी जोडलेली आहेत. आपल्याप्रमाणे सर्व लांब लांब जाणाऱ्या गाडयातून दुसरा व तिसरा वर्ग असून दुसऱ्या व पहिल्या वर्गाला झोपण्यासाठी बर्थ पद्धती आहे पण पहिल्या वर्गाला अगर दुसऱ्या वर्गाला बर्थ रिझर्व्हेशनची सोय आपल्यासारखी तेथे नुसती चार रुपये देऊन होत नाही. तर पहिल्या वर्गाला आठ रुपये व दुसऱ्या वर्गाला चार रुपये दर राखीव जागा ठेवण्यासाठी भरावा लागतो. पैसे देऊ शकणाऱ्या माणसांना सुखसोयी ज्या रेल्वेत उपलब्ध आहेत, पण त्या जादा पैसे देऊनच विकत घ्याव्या लागतात व यांचा फायदा टुरिस्ट व सिलोन पाहावयास आलेल्या सुखवस्तूंना चांगला होतो.

सिलोन पाहावयास येणारा सुखवस्तूंचा वर्ग फार मोठा आहे, यांचे भरपूर पैसे सिलोनमध्ये या ना त्या प्रकाराने खर्ची पडतातच, पण त्याबरोबर त्यांना द्यावयाच्या वाहतुकीचे सुखसोयीकडे भरपूर लक्ष दिले जाते. यासाठी सिलोन सरकारने स्वतःची विमान–वाहतूक एवढयाशा छोटया देशात ठेवली आहे. तिचे दर कोणत्याही देशातील विमानवाहतुकीचे दरापेक्षा इतके दिवस कमी होते. आता ते नुकतेच वाढविण्यात आले आहेत. बॅटिकलोअ, अनुराधपुरं, ट्रिंकमली व शहराकडे जाणाऱ्या विमानांचा प्रवास फार तर एक तासाचे वर नसतो. मी प्रवास केला तेव्हा सिलोन मधील वेगवेगळया छोटया-मोठया जोडणाऱ्या हवाई मार्गांचे जाळे सिलोनमध्ये अव्हरो सारख्या विमानांनी विणलेले दिसले. या सर्व सोयीबरोबर या प्रेक्षणीय शहरातून युरोपच्या तोडीची आधुनिक सुखसोयींनीयुक्त अशी होटेलेही असल्यामुळे परदेशीय प्रवाशी सिलोनकडे प्रथम आकर्षित होतो. यापूर्वी स्थानिक नागरिकांस अशा होटेलसमधून योग्य दर लावण्यात येत व परदेशी पाहुण्यांना त्यापेक्षा जास्त म्हणजे जवळ

जवळ दुप्पट दर द्यावे लागत असत. आता ही परिस्थिती पूर्ण बदललेली आहे. स्थानिक वा परदेशीय कोणीही असला तरी त्यांस एकच दर सध्या तेथे आहे. सिलोनचा उत्तम चवदार चहा व शोभिवंत हिरे, माणिक, नीलमणी आणि जरा कमी प्रतीचे शोभिवंत खडे हें त्यांचे मुख्य आकर्षण बनतात. युरोप–अमेरिकेचे प्रवासी येथे अधिकाधिक कसे रमतील याचा विचारपूर्वक अभ्यास सिलोनी राज्यकर्त्यांनी आमच्यापेक्षा अधिक तत्परतेने केला ही गोष्ट मान्य केली पाहिजे. याचे एक उदाहरण म्हणून एक गोष्ट प्रामुख्याने सांगता येईल. सर्व जगात होटेल चालविण्यात अग्रगण्य ठरलेल्या 'हिल्टन' या प्रमुख हॉटेल कंपनीची १९६८ चे सुरवातीस इमारत बांधणे सिलोनला सुरूही झाले होते तर हिंदमध्ये त्यांचेविषयी करार कसे करावे, या–बद्दलची बोलणी वर्षभर सुरू होती. कलंबो सारख्या शहरात २३ ते २५ मजल्यांच्या इमारती आठ वर्षांपूर्वीच झाल्या आहेत व त्यात फिरत्या जिन्यांची सोय ( एस्कलेटर ) तर तेथे पूर्वीपासून आहेत. हिंदमध्ये जे मोठ्या शहरातून अजूनही नाही ते कलंबोसारख्या शहरात पाहावयास मिळते. मोठमोठाले डिपार्टमेंटल स्टोअर्स व त्याचे जोडीला आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कंपन्यांच्या कचेऱ्या कलंबोत दिल्ली अगर मुंबईप्रमाणेच आढळ–तात. तेथे परदेशीयांना व्यापारासाठी मिळणाऱ्या सवलती व सिलोनी नागरिकांचे पाश्चिमात्य जीवन जगण्याची हौस हे त्यांचे प्रमुख कारण असावे असे निश्चित वाटते. येथील स्टोअर्स वा कंपन्यांची नावे परकीय वाटली तरी त्यांची मालकी सिलोनी लोकांकडेच आहे.

हवामानाच्या दृष्टीने सिलोन मोठा वैशिष्टचपूर्ण देश आहे. पावसाळा, हिवाळा अगर उन्हाळा असे तिन्ही ऋतू तेथे आहेत असे म्हणता येत नाही. दोन्ही बाजूला समुद्र व मध्ये पर्वतांची रांग या भौगोलिक वैशिष्टचामुळे नारळाच्या झाडीत दडलेल्या या बेटातल्या कोणत्याही शहरात कधीही ९५ अंश फॅरेनहाईटचेवर उष्णतामान कधीच नसते. अवघ्या २७० मैल लांबीच्या या बेटात एकाच दिवशी उत्तरेकडून दक्षिणेकडे मोटारने जावयाचे म्हटले तर एकाच तऱ्हेचे कपडे घालून चालणार नाही. उत्तरेकडील जाफना शहरात आपण मुंबईत वापरतो तसे सूट बाहेर काढावे लागतील. कारण तेथे सदैव ८५ अंशा–पासून ९५ अंशापर्यंत उष्णतामान असते व जसजसा प्रवासी कॅन्डी, न्युरेल्या या

मध्य भागाकडील डोंगराळ शहराकडे येऊ लागेल तसतसे गरम कपडे अंगावर चढवावे लागतील .न्युरेल्या या ८२८१ फूट उंचीवरील रम्य वनश्रीचे शहरात त्याला दार्जिलिंग अगर सिमलाप्रमाणे सदैव गरम सुटातच हिंडावे लागेल व जसजसा तो दक्षिणेकडे गॉल शहराकडे जाईल तसतसे केरळ व मद्रासचे हवामान तो अनुभवू लागेल. सर्वसाधारणपणे मेपासून जुलैपर्यंत सिलोनला मोठा पावसाळा असतो व जास्तीत जास्त कलंबोसारख्या ठिकाणी या महिन्यात शंभर इंचांवर पाऊस जातो व ऑगस्टमध्ये तो कमी होतो, पण येथेच पावसाळा थांबत नाही. नोव्हेंबर ते जानेवारीअखेर दुसरा पावसाळा येथे असतो. या दिवसात संध्याकाळी चार वाजल्यापासून रात्री आठपर्यंत पाऊस पडला नाही अशी संध्याकाळ नसते व पाऊस साधारणपणे या महिन्यात ५० इंचांवर होतो. या दोन पावसामुळे सिलोनची हवा सदैव समशीतोष्ण असते व त्यामुळे ती मनाला मोठी आल्हाददायक वाटते. भरपूर पाऊस व नद्यांचे महापूर पाणी यामुळे सिलोनचा तीन चतुर्थांश भाग नेहमीच हिरवागार असतो. दोन वेळा पडणाऱ्या पावसामुळे तांदळाचे पीक तीन वेळा काढता येते. सिलोनमध्ये मानवी वस्तीसाठी घरादारांनी व्यापलेली जागा सोडली तर जवळ जवळ १६२२८२३० एकर जमीन पीक, पाणलोट यासाठी वापरता येण्यासारखी आहे. त्यातील अवघी १०६६६२ एकर जमीन म्हणजे अर्ध्या टक्क्यापेक्षा थोडी जास्त जमीन बिनपिकाची आहे. यातील आठ टक्के म्हणजे १२६१९१० एकर जमीन नुसत्या भात पिकासाठी वापरली जाते तर चहाचे मळे ६३६२६० एकर, रबर ५६१८६० एकर, नारळ ६१८९१० एकर व इतर पिकासाठी १३३७१० एकर जमीन वापरली जाते. यावरून तांदूळ, चहाचे मळे, रबर व नारळ या भरपूर किंमत देणाऱ्या उत्पादनात सिलोन आपली जमीन कशी गुंतवीत आहे याची कल्पना वरील आकड्यांवरून येईल. तांदूळ हे सिलोनी नागरिकांचे मुख्य अन्न, पण या धान्याचा खप इतका भयंकर आहे की वर्षाकाठी १३१८२००० बुशल (१ बुशल-८० पौंड) धान्य पैदा होऊनही सिलोनच्या आजच्या १ कोटी लोकसंख्येला ते पुरत नाही व काही तांदूळ चीन व ब्रह्मदेशातून आणावा लागतो, पण पुढील तीन वर्षात धान्याचे दृष्टीने आम्ही पूर्ण स्वयंपूर्ण होऊ असा विश्वास मात्र सिलोनी राज्यकर्ते बोलून दाखवितात. सिलोन हा देशच असा आहे की त्याला स्वत:चे उत्पादन भरपूर निर्यात करावे व परदेशी माल भरपूर विकत घ्यावा



सिलोनमधील काही चहाचे कारखाने स्वतः चहा पिकवत नाहीत, इतर मळ्यातून चहाची पाने आणून प्रक्रिया करतात. सुमारे दीडशे झाडावरील पाने गोळा केल्यावर फक्त १ पौंड चहा जमा होतो. हे काम छाटणीचा काळ सोडून वर्षभर चालते. जमा केलेल्या पानांची वाहतूक तारांवरील ट्रॉलीजमधून होते.

अशा सवयीने तो भारलेला आहे. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी बोटींनी भरभरून परदेशी माल पाठविण्याची सवय सिलोनी नागरिकांना लावली व ती कमी करणे आताचे राज्यकर्त्यांना फार कठीण जात आहे. सिलोनची महत्त्वाची बंदरे म्हणजे माल नेणाऱ्या बोटीचे कायमचे तळ आहेत. तेथे ब्रिटिश बोटींची संख्या सर्वात जास्त आढळेल. येताना आपल्या देशातील जुन्या मोटारीपासून सर्व प्रकारचा माल भरभरून सिलोनमध्ये आणावा व जाताना चहा, रबर, व नारळ आणि मसाल्याचे पदार्थांनी भरून बोटी हाकाराव्या हा नेहमीचा ब्रिटिश व्यवसाय अजूनही सिलोनमध्ये भरपूर प्रमाणात चालू आहे. चहाचे मळ्यांपैकी ५० टक्के सिलोनी मळे अजूनही ब्रिटिश भांडवलदारांचे हाती आहेत व सिलोनची ६१ टक्के निर्यातीची मिळकत एकट्या चहावर जमा होते. २० टक्के रबर विकून सिलोन मिळविते व बारा टक्के नारळाचे निर्यातीवर पैदा होते. म्हणजे जवळजवळ ९३ टक्के निर्यात या तीन जिनसा कमवीत असतात. या जिनसा सिलोनकडून जास्तीतजास्त किंमत देऊन विकत घेण्याची चढाओढ परदेशीय व्यापाऱ्यांत लागलेली असते व यामुळेच सिलोनचे व्यापाराला आज परदेशीय बाजारपेठेत फार महत्त्व प्राप्त झाले आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने ५० कोटींच्या घरात असलेल्या हिंदुस्थानची एकूण वर्षात निर्यात कमाई ८०९ कोटी ५५ लक्ष रुपये १९६५–६६ साली होती तर एक कोटी लोकसंख्येच्या सिलोनची १९६५–६६ सालची निर्यात १९१ कोटी ५९ लक्ष १७ हजार सिलोनी रुपये होती. या वर्षी सिलोनी व हिंदी रुपयांची पौंडातील किंमत जवळजवळ सारखी होती. यावरून सिलोनी निर्यातीने गाठलेल्या उच्चांकाची कल्पना येईल.

या निर्यात मिळविण्याच्या वेडात सिलोन आपल्या जनतेच्या आवश्यक गरजांची जोपासना आपल्या देशात फारशी करू शकलेला नाही, हे मात्र तितकेच खरे आहे. सिलोनी नागरिकांना लागणाऱ्या वस्तुंपैकी अर्ध्या वस्तू परदेशातून आणाव्या लागतात. कांदे व बटाटे यांच्यासारख्या सहज समुद्रकाठाजवळील प्रदेशात अगर डोंगर पायथ्याशी पिकणाऱ्या वस्तू सिलोन परदेशीय बाजारपेठेतून विकत घेतो. साखरेची तीच रड आहे. मॉरिशस् व वेस्ट इंडीज बेटातून येणाऱ्या बोटी हे दोन जिन्नस सिलोनसाठी घेऊन येतात व इंग्लंडला रबर विकून सिलोनने मिळविलेले पौंड व डॉलरमधील चलन अशा



रबराच्या झाडाला खाच पाडून 'लेटेक्स' गोळा करण्यात येतो. सिलोनचा हा रबराचा मुख्य धंदा आज धोक्यात आहे, कारण आजचे युग कृत्रिमतेचे असल्याने कृत्रिम रबराची निर्मिती झाल्यास रबराचा व्यवसाय बसेल. हीच काळजी रबर पिकविणाऱ्या इतर देशांना वाटते. १८७६ ला रबराची लागवड सिलोनमध्ये प्रथम झाली. ब्राझिलमधून पहिले रोप येथे आले.

तऱ्हेने या साध्या वस्तूवर खर्ची पडते. सिलोनचे डडली सेनानायकं यांच्या राजवटीत मुख्य अन्न जे तांदूळ तेही सिलोनला कमी पडून चीनकडून भात विकत घेण्याची पाळी आली. हे पीक वाढविण्याची प्रतिज्ञा केली गेली व एका वर्षात तांदूळ पिकाचे मान ५ कोटी बुशलवरून ६ कोटी बुशलवर आणले, परंतु साखरेपासून कांद्या–बटाटयांपर्यंत बऱ्याच आवश्यक वस्तु परदेशांतून आणण्याची पाळी सिलोनवर येत असल्यामुळे भरपूर परदेशी चलन मिळवूनही सिलोनची परदेशी चलनाची ओरड कायम राहिली. हे कशामुळे झाले याची कल्पना येण्यासाठी सिलोनचा गेल्या दहा वर्षांचा राजकीय इतिहासाचा अभ्यास करावा लागेल. सिलोनमधील ९० टक्के साक्षर जनतेवर राज्य करताना तेथील राजकीय पक्षांना त्यांच्या गरजा पुरविण्यासाठी एवढे त्यांचे दास बनावे लागते की कोणतीही गोष्ट कोणत्याही राजकीय पक्षाला त्यांचेवर सहजासहजी लादता येत नाही. सरकारी अंदाजपत्रकाचा जवळजवळ ६० टक्के भाग नुसत्या सिलोनी नोकरवर्गाचे पगारावर खर्च पडत असतो. त्यांना खूष ठेवल्याशिवाय राजकीय पक्षांचे आसन स्थिर राहू शकत नाही. ही कम्युनिस्टधार्जिणी पद्धती सिलोनने सिरिमाओ बंदरनायकं यांचे राजवटीत आत्मसात केली व जनतेला संभाळून धरून आपले आसन स्थिर ठेवण्यासाठी त्यानंतरचे डडली सेनानायकं यांच्या राष्ट्रीय पक्षाला तिची पुन्हा जोपासना करावी लागत आहे. मिसेस बंदरनायकं राज्यावर आल्याने त्यांचा जोर वाढला असून त्यांनी देशाची सत्ता जवळ जवळ हातात घेतल्याचे नुकत्याच घडलेल्या राजकीय घटनांवरून दिसते.

या सुसंपन्न शेजाऱ्याचा फायदा हिंदुस्थानला किती मिळाला याचा विचार करावयाचा म्हटले तर मात्र आजपर्यंतचा इतिहास पाहता बरीचशी निराशाच पदरी येते. हिंदुस्थान व सिलोन यांचे संबंध गेल्या वीस वर्षांतील स्वातंत्र्याच्या काळातही फारसे सुधारलेले नाहीत. याचे कारणांचा जरा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आता निश्चित आली आहे. सिलोनसारख्या देशात परदेशातून दरवर्षी येणाऱ्या प्रवाशांची संख्या २० हजारांचे घरात असते. त्यात नुसते सहलीसाठी येणाऱ्यांची संख्या ६३ टक्के असते तर उद्योगधंद्यासाठी येणाऱ्यांची संख्या २७ टक्के आहे. सर्वात जास्त येणारे प्रवाशी ब्रिटनमधील असतात. त्यांची संख्या चार हजारांचे घरात असते. त्यांचे खालोखाल अमेरिका

व जर्मन प्रवाशांची संख्या असून या तिन्ही देशात मिळून जवळजवळ सिलोन-मध्ये वर्षाकाठी येणाऱ्या परदेशी प्रवाशांपैकी एकतृतीयांश प्रवासी असतात. हिंदुस्थानातून सिलोनमध्ये येणाऱ्यांची संख्या साडेचार हजारांचे घरात आहे. पण त्यातील बहुसंख्य बुद्ध यात्रेकरू आहेत. काहीतरी व्यापारी दळणवळण वाढवावे या उद्देशाने सिलोनमध्ये स्थायिक झालेली अवघी चाळीस गुजराथी कुटुंबे मला कलंबोत दिसली. नोकरवर्गात पाच महाराष्ट्रीय अधिकारी होते. हिंदी मजुरांची संख्या मात्र या ठिकाणी आठ लक्ष आहे. सिलोनी चहाचे मळ्या-वरील दोन तृतीयांश मजूर हिंदी आहेत. तरी या देशाचे १९१५९१७००० रुपये वार्षिक निर्यातीपैकी अवघी ४२५४५००० रुपयांची निर्यात हिंदुस्थानला मिळते. सर्वात जवळचा प्रदेश म्हणून या देशाशी सिलोनचे व्यापारी संबंध अधिक असावयास पाहिजे होते, पण देशमानानुरूप विचार करता तो कॉमन-वेल्थ राष्ट्रात चौथा लागतो. सिलोनची ५० कोटी रुपयांची निर्यात ब्रिटनशी चालते व त्याबरोबर २६ कोटी ६३ लक्ष ६५९ रुपयांचा माल ब्रिटनकडून सिलोन विकत घेतो. एवढा मोठा व्यापारी स्नेहसंबंध अजून ब्रिटनचा सिलो-नशी आहे. पूर्वेकडील देशांपैकी ऑस्ट्रेलिया व चीनशी सिलोनचे संबंध फार निकटचे आहेत. दरवर्षी १० कोटी रुपयांचा माल सिलोन ऑस्ट्रेलियाला पाठ-विते, तर अमेरिका व रशिया यांना अनुक्रमे १४ कोटी व ९ कोटींचा माल पाठविते. ब्रिटनच्या खालोखाल सिलोनचा माल मिळविणारे दुसरे मोठे राष्ट्र म्हणजे चीन होय. त्याला वर्षाकाठी १७ कोटी १७ लक्ष ७२ हजार रुपयांचा माल सिलोन पाठविते व तेथून ११ कोटी ३८ लक्ष ६९ हजार रुपयांचा माल आणते. यावरून पाश्चिमात्त्य देशात ब्रिटन व पूर्वेकडे चीन या दोन्ही देशांनी सिलोनशी कसे नजीकचे संबंध ठेवले आहेत, याची कल्पना येण्यासारखी आहे.

आज सिलोन राजकीयदृष्टया एक स्वतंत्र देश आहे, पण या छोटया देशाने आपले भरपूर साधनसंपत्तीचे बळावर पाश्चिमात्त्य व मोठ्या पौर्वात्त्य देशांशी फारच जवळचे स्नेहसंबंध ठेवले आहेत. पाकिस्तानशी अलीकडे अलीकडे त्यांचे स्नेहसंबंध प्रस्थापित होऊ लागले आहेत. हिंदने विमान-वाहतुकीस बंदी करताच पाक विमाने सिलोनला उतरून जाऊ लागली तर पूर्वेकडील चीन, ऑस्ट्रेलिया हे दोन्ही देश सिलोनला हिंदपेक्षा अधिक जवळचे

वाटतात, ही गोष्ट लक्षात यावी म्हणूनच निर्यातीचे वरील आकडे मुद्दाम देत आहे.

सिलोनला समृद्ध देश बनविणाऱ्या एकूण सोळा नद्या या पंचवीस हजार चौरस मैलांचे प्रदेशात वाहतात. मध्यंतरी डोंगराळ प्रदेश व दोन्ही बाजूला समुद्र किनारा या भूगर्भ रचनेमुळे या नद्यांचा उपयोग शेतीसाठी सर्व देशाला चांगला होतो. सिलोनचे नागरिकांना कालवे काढून त्याचे पाणी क्वचीच खेळवावे लागत नाही. दोन पावसाळ्यामुळे या नद्यांचे पाणी वर्षभर शेतीला व बागायतीला पुरते व डोहातून पंपाने ते खेळविता येते. यातील सर्वात मोठी नदी म्हणजे महावली गंगा होय. तिची लांबी २०६ मैल आहे. दुसरी नदी अरुवी–आरु ही १०४ मैल आहे, तर तिसरी नदी कला ओय ही ९७ मैल असून चौथी नदी यान्न ओय ही९४ मैल आहे. पाचवी नदी केलनी गंगा ही ९० मैल लांब आहे. या पाच मोठ्या नद्यांशिवाय ८७ पासून ६२ मैल लांबीच्या अकरा मोठ्या नद्या या छोट्या देशात ठिकठिकाणी विखुरल्या असल्यामुळे महापूर पाण्याचा देश म्हणून सिलोन ओळखला जातो.

सभोवताली समुद्र व सोळा नद्यांच्या वाहत्या प्रवाहामुळे सुपीक झालेली भूमी व हिरवीगार वनश्री हे या छोट्या बेटांचे वैशिष्टच कोणत्याही राष्ट्राला मोह पाडणारे आहे. यामुळेच या देशाला आंतरराष्ट्रीय क्षेत्रात फार महत्त्व प्राप्त झाले असून याचा फायदा पाश्चिमात्त्य देश जेवढा घेत आहेत तेवढा फायदा हिंदुस्थानसारख्या देशाला निश्चित मिळालेला नाही अगर तो मिळविण्याचा प्रयत्न अजूनही होत नाही.

# सुंदर रत्नांची जन्मदात्री

सिलोनला उत्तम रत्नांची भूमी म्हणून जग संबोधिते. जगातील पाच हिरे–माणकांच्या देशात सिलोनचा नंबर लागतो. दक्षिण आफ्रिका, दक्षिण अमेरिका, ब्रह्मदेश, सयाम व सिलोन हे ते देश होत. माणकांच्या या भूमीत बहुतेक प्रकारची मौल्यवान रत्ने मिळतात व शास्त्रज्ञ ही रत्नभूमी कशी निर्माण झाली असावी, याचा इतिहास सांगताना लाखो वर्षांपूर्वी सिलोन हा एक समुद्रातून वर आलेला मोठा खडक होता असे सांगतात. त्यावेळी या खडकाची उंची वीस हजार फुटांचे वर असावी. हा खडकमय पर्वत हळूहळू शांत होऊन थंड होत असताना काही प्रक्रिया शेजारच्या समुद्राचे सान्निध्यामुळे या खडकावर झाल्या. त्यामुळे या खडकाचे पोटात रत्नांची निर्मिती झाली असावी, असा शास्त्रज्ञांचा याविषयी कयास आहे. या उंच खडकाळ भूमीवर पडणारा अतोनात पाऊस विषुववृत्ताचे सान्निध्यामुळे निर्माण होणारी उष्णता व समुद्रावरील सोसाटयाचा वारा या सर्वच गोष्टींचा परिणाम या भूमीवर होऊन या पोटात रत्ने दडवणारी व भूमीवर सुंदर पिके येणारी सुपीक भूमी झाली. सिलोनचा कलंबो, पोलनगोडा व गॉल या तीन शहरांनी सांधणारा नैऋत्य कोपरा हा या रत्नाचे खाणीचे आगर आहे. ॲल्युमिनियम ऑक्साईड-पासून बनलेले कोरंडम् ( Corundum ) जातीचे रत्न हे हिऱ्याइतकेच कठीण असते. ते एक सिलोनचे वैशिष्टयपूर्ण रत्न आहे. माणके व निळ्या पिवळ्या टोपॅज व पांढऱ्या पाचुचे खडे ही खाणींची वैशिष्टये आहेत. सिलोनमध्ये सापडणाऱ्या मोठे कमी प्रतीच्या रत्नाला कॅटस् आय् व

अलेक्झांड्राईट, मून स्टोन अशी दोन सुंदर नांवे युरोपियन प्रवाशांनी दिली आहेत. त्यात पहिल्या प्रकारच्या रत्नात मांजराच्या डोळ्याची चमक असते तर अलेक्झांड्राईट जातीचे रत्न फक्त रशियन, सैबेरिया व सिलोनमध्येच मिळते. रशियाचे झार अलेक्झांडर यांचे नांव त्याला प्रथम मिळाले व ते तेथे अजून या जातीला चालू आहे.

सिलोनच्या इतिहासाचा जो पुरावा आज सिलोनमध्ये प्रसिद्ध झालेल्या पुस्तकातून हाती लागतो त्यावरून पाहता खिस्त जन्मापूर्वी दोनशे वर्षे भारताचे पूर्व, उत्तरेकडील व नैर्ऋत्य कोपऱ्यातील आर्य सिलोनमध्ये प्रथम आले असे आढळून आले. या आर्यांचे काही शीलालेखही सिलोनी संशोधकांचे हाती लागले आहेत. परंतु हे निर्देश आधारभूत धरता येत नाहीत. इसवी सनापूर्वी शंभर वर्षे मात्र सिलोनच्या इतिहासाची कल्पना देणारे काही पुरावे हाती लागले असून हिंदमधील अशोकाचे काळी कोरलेले काही शिलालेख आधारभूत धरण्यासारखे आहेत असे इतिहासतज्ज्ञांचे मत आहे. बुद्धाच्या अनेक ग्रंथातून सिलोनची वर्णने आढळतात. तर बुद्धभिक्कूंनी लिहिलेल्या श्रीकृष्णाच्या जातक कथांतूनही सिलोनची वर्णने आहेत, पण यातून सिलोनच्या जुन्या इतिहासाचा सुगावा नीट लागत नाही.१५०५ पूर्वी म्हणजे पोर्तुगिजांचे सिलोनमधील आगमनापूर्वीचे इतिहासासंबंधी मिळालेल्या पुराव्यावरून लिहिताना इतिहासाचे एक प्राध्यापक प्रो. पॅकमन हे लिहितात "पाश्चिमात्त्य राज्यकर्त्यांनी सिलोनमध्ये प्रवेश करण्यापूर्वीचा सिलोनचा इतिहास पाहावयाचा झाल्यास त्याविषयी एवढेच म्हणता येईल की बुद्ध धर्मियामुळेच सिलोनचे निरनिराळ्या राजघराण्यात थोडासा एकोपा दिसून येतो. नंतर मात्र दक्षिण हिंदुस्थानातील छोटया छोटया राज्यापेक्षाही सिलोनची राजघराणी निर्बल होती व ती कोणत्या तरी प्रबल छत्राखाली आश्रय घेऊन राहिलेली दिसतात." सोळाव्या शतकापूर्वीच्या सिलोनी इतिहासांचे जमा केलेल्या पुराव्यावरून हे स्पष्ट दिसते की सिलोनमधील सर्वात जुने नागरिक म्हणजे 'यख्ख' व 'नाग' या दोन रानटी जमाती होत. या 'यख्ख' रानटी टोळ्यांची सर्वात जुनी कथा सिलोनच्या उल्हास जातक नांवाच्या ग्रंथात वाचावयास मिळते. सिलोनला या पुस्तकात 'तम्बपनी' या नांवाने संबोधिण्यात आले असून

रामायणातील राक्षसांच्या कथांशी या कथांचे बरेच साम्य वाटते. या कथेला सुरुवात खालीलप्रमाणे होते.

"अनेक वर्षांपूर्वी तम्ब्रपनी बेटांचे पश्चिम किनाऱ्यांवर 'यख्खिणी महिलांचे शिरीषवस्तु नांवाचे एक राज्य होते. भर समुद्रातून पाचशे व्यापाऱ्यांना घेऊन जाणारा एक मोठा पडाव (हे लोक हिंदी होते किंवा काय याचा उल्लेख या कथेत नाही.)समुद्रात नादुरुस्त झाल्याने या बंदराला येऊन लागला व सर्व पाचशे पुरुष व्यापारी किनाऱ्यावर उतरले. याच वेळी या बेटातील यख्खिणी स्त्रिया किनाऱ्याजवळ हिंडत होत्या. सिलोनला याच कथेत नागदीप म्हणून संबोधले असून या याखिणी महिलांचे बंदर कल्याणी नदीचे काठी आहे असा उल्लेख आहे. हे व्यापारी उतरल्यानंतर या यख्खिणी निरनिराळे शोभिवंत वेश करून त्यांच्यासमोर आल्या. त्यांनी आम्ही शेती कसणारे सुधारलेले मानव आहोत असे त्यांना अंगविक्षेप करून सांगितले. आमचे पती समुद्रावर गेले व परतले नाहीत. तुम्ही आमचे येथे राहा व आमच्याशी लग्ने करा, असा त्यांनी आग्रह केला. त्यांनी त्यांना तांदूळ व फळे आणून दिली. यानंतर या यख्खिणींनी त्यांना आपल्या शहरात नेले. तेथे एका गुप्त ठिकाणी काही पुरुषांना सांखळीने बांधून ठेवले असल्याचा शोध या टोळीचे मुख्यास लागला. या यख्खिणी जरी या पुरुषांबरोबर क्रीडा करू लागल्या तरी दुसऱ्या दिवशी त्या नरमांसभक्षक आहेत हे या व्यापाऱ्यांना आढळून आले व त्यांचेपैकी अर्धे आपल्या जहाजात बसून पळून गेले."अशा स्वरूपाच्या अनेक कथा बुद्धाच्या जातक कथांतून वाचायास मिळतात. सिंहली लोकांचा सर्वात जुना धर्मग्रंथ दीपवंश यात या रानटी नरमांसभक्षक 'यख्ख' जमातीला सिलोनचा पहिला राजा विजय याने घालवून दिले असा उल्लेख आहे, तर बुद्धकथेत बुद्धांनी जम्बुद्विपातून येऊन 'याखांना' लंकेतून घालवून दिले असे म्हटले आहे. या यख्खिणींना कशा तऱ्हेने घालवून देण्यात आले यासंबंधी ज्या कथा बुद्धजातकातून देण्यात आल्या आहेत त्यात बुद्धांनी तेथे येण्यापूर्वी प्रथम मोठे वादळ निर्माण करून या स्त्रियांना शरण आणले व गिरी नांवाचे बेटावर घालवून दिले असे म्हटले आहे. हे बेट सिलोन–जवळच कोठेतरी असावे असे या वर्णनावरून वाटते. आजची सिलोनची मोठी नदी महावली गंगा हिचे वर्णन या जातकांतून आढळते. तिचे काठी या

यखिणी वस्ती करून असत, असा उल्लेख आहे. या यखिणीच्याविषयी निराळीच हकिकत 'महावंश' या बुद्धाच्या महान् ग्रंथात वाचावयास मिळते. सिलोनचा पहिला राजा विजय हा या यखिणीचे मदतीनेच सिलोनचा राजा होऊ शकला अशी हकिकत या ग्रंथात देण्यात आली आहे. लंकेच्या या यखिणी अनेक चेटके करीत व त्या मंत्रसामर्थ्याचे बळावर कोणत्याही मनुष्यप्राण्याला पशु बनवीत. सिलोनचा पहिला राजा विजय हा लाला बेटावरील सिंहबाहु याचा मुलगा, परंतु आपल्या युवराजांनी केलेले काही प्रताप सहबाहुला न आवडून त्यांनी त्याला त्याचे सातशे सहकाऱ्यांसह राज्यातून घालवून दिले व या सहकाऱ्यांना घेऊन विजय राजकुमार निघाला. सिंहबाहुचे वर्चस्व त्यावेळी हिंदी किनाऱ्यावर सर्वत्र होते व त्यामुळे त्याला कोठेही थारा मिळाला नाही व तो लंकेच्या किनाऱ्यावर येऊन उतरला. त्यांनी बेटावर उतरल्या–बरोबर आपल्या एका सहकाऱ्याला बेटाची पाहणी करण्यासाठी पाठविले, पण कुवाना नांवाचे यखिणीने आपल्या मंत्रसामर्थ्याने सर्व सातशे सहकाऱ्यांना अटक करून मारून ठेवले. तिच्या मंत्रसामर्थ्यापुढे कोणाही शूराचे काही चालेना. शेवटी विजय स्वतः या कुवानाकडे गेला व तिचे मंत्रसामर्थ्याचा प्रभाव होण्यापूर्वीच त्यांनी तिला शरण आणले. तेव्हा कुवानाने त्याला त्याचे लोक परत करण्याचे अभिवचन दिले व स्वतः षोडषवर्षीय रूपवान कन्या बनली. विजयनी तिला मोहित केले असल्यामुळे त्यांचेबरोबर तिने राहण्याचे कबूल केले व यखांची राजधानी शिखथ्थु शहर काबीज करण्याची विनंती केली. हे यख योद्धे केव्हाही लढताना अदृश्य होत व ते फक्त यखांनाच दिसत, अशी परिस्थिती असल्यामुळे कुवानाने विजय राजाला या लढचात प्रत्येक अदृश्य यखांचे ठिकाण दाखवून त्याला ठार करण्यास मदत केली व राहिलेले 'यख' पळून गेले व विजय लंकेचा पहिला आर्य राजा झाला. कुवाना ही कितीही सुंदर असली तरी अनार्य असल्यामुळे आपल्या राजाची पत्नी अनार्य असावी असे त्यांच्या आर्य सहकाऱ्यांना वाटेना. त्यांनी एखाद्या आर्य कन्येशी विजय राजाचे लग्न लावण्याचे ठरविले व दक्षिण हिंदमधील मदुरा येथील पंड्र राजाचे कन्येसाठी मागणी घातली, परंतु या राजकन्येने कुवाना ही अनार्य पत्नी विजय

राजाजवळ राहात असताना आपण तेथे राहणार नाही अशी अट घातली. तेव्हा विजयराजाने कुवानास यावेळपर्यंत तिला झालेल्या एक मुलगा व मुलगी-सह घालवून दिले. कुवाना 'यख्ख' लोकांचे लंकापूर नांवाचे सिलोनमधील शहरात गेली, पण तेथे तिला ती हेरगिरी करावयास आली असावी म्हणून ठार करण्यात आले. तिचा मुलगा व मुलगी मातेची हत्या झालेली पाहून कशी-तरी जीव घेऊन पळून गेली व आज ॲडम्स् पीक नांवाचे ओळखल्या जाणाऱ्या ठिकाणी राहिली. आपल्या रानटी वृत्तीप्रमाणे या भावाबहिणीने पती–पत्नी म्हणून संसार करून पुलींदा नांवाचे रानटी लोकांची स्वतंत्र टोळी बनवून ते त्यांची राजा–राणी झाले. अशा तऱ्हेने सिलोनच्या निरनिराळ्या भागात या यख्ख रानटी टोळीवाल्यांचे निरनिराळे गट ठिकठिकाणी वस्ती करून विजय राज्याचे वेळी राहात होते, हे या हकिकतीवरून स्पष्ट होते. या बुद्ध जातकातून प्रसिद्ध असलेल्या या गोष्टी नानाविध स्वरूपाच्या आहेत, पण त्या इतिहासाला आधारभूत मानता येण्यासारख्या नाहीत. बौद्धकालीन दिव्य-दत्त नांवाचे जातकात तर हिंदुस्थानचा सिलोनशी बराच संबंध जोडला असून सिलोनचा उल्लेख सिंहलदीप या नांवाने पदोपदी केला आहे. सिलोनी जुन्या ग्रंथातून सिलोनचे जुने नांव तामरदीप असे असल्याचा उल्लेखही या ग्रंथात आढळतो. दक्षिण हिंदुस्थानात राहणाऱ्या सिंहल राजाने आपल्या प्रवासात सिलोनमध्ये राक्षसिणी राहात असल्याचा उल्लेख केला आहे. या राक्षसिणी हिंदी किनाऱ्यावर येऊन तेथे सुंदर स्त्रियांचे रूपात वावरत व संधी सापडताच माणसे खात. राजघराणी नष्ट करीत असाही उल्लेख या कथातून आहे. याचे पारिपत्यासाठी सिंहल राजाने या बेटावर स्वारी करून तेथील राक्षसांशी लढा दिला व त्यांना शरण आणले व हिंदच्या दक्षिण किनाऱ्याला होणारा हा राक्षसांचा त्रास थांबविला, असा उल्लेखही आढळतो. या राक्षसिणीच्या कथा व रामायणकालीन राक्षसी कथांमध्ये बरेच साम्य आढळते. सिंहलदीपातील राक्षसिणी नुसत्या दक्षिण किनाऱ्यावरच नव्हे तर बनारसपर्यंत गेल्याचा उल्लेख पदकुसलमानव जातकात आहे. बनारसच्या राजाची पत्नी ही एक मानव–हत्या करणारी यख्खिणी होती व तिला ठराविक विभाग तोडून दिला होता, असाही उल्लेख या जातकात आहे. या विभागात शिरणाऱ्या माणसांचे भक्षण करण्याचा अधिकार तिला देण्यात आला होता. या राक्षसिणी अगर यख्खिणी-

विषयी सिलोन विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या इतिहासातून मात्र अशी जातकातील गंभीर वर्णने आढळत नाहीत. हे इतिहासकार लिहितात, "सिलोनमधील रत्नाच्या अभिलाषेने निरनिराळ्या देशातील व्यापारी येथे फारच पूर्वकालापासून येत असावे. या व्यापाऱ्यांना सिलोनच्या जुन्या रानटी टोळ्यांनी चांगलाच विरोध केला असला पाहिजे. या व्यापाऱ्यांना जुन्या रानटी टोळ्या अमानुष वाटत असाव्यात व त्यांनीच सांगितलेल्या या गोष्टींच्या आधारे या जातक कथातून या यख्खांच्या कथा आल्या असाव्यात.'' चिनी प्रवाशी फाहियन यांनी लिहिलेल्या प्रवास–वर्णनात या सिलोनच्या जुन्या नागरिकांना "डिमन्स राक्षस म्हणून संबोधले आहे. बुद्धाच्या पहिल्या भेटीच्या वेळी या यख्खांशी त्यांचा आलेल्या संबंधाचा उल्लेख महावंश ग्रंथात आहे, पण बुद्धांनी नाग टोळ्यांच्या उद्धारार्थ नागदीपाला दुसरी भेट दिली असाही उल्लेख या ग्रंथात आहे. महावंश ग्रंथातील उल्लेखावरून पाहता नागदीप (सिलोन) बेटात मोहदारा व कुलोदारा या दोन चुलत्या-पुतण्यांचे राज्य होते व पुतण्याचे ताब्यात असलेले रत्नजडित सिंहासन मिळविण्यासाठी चुलता मोहदारा हा दुसरा नागा राजा त्यांचेशी युद्ध करण्याचे बेतात असता बुद्ध आकाशातून प्रकट झाले व त्यांनी संपत्तीसाठी करण्यात येणाऱ्या या लढ्यामुळे नागवंश कसा नष्ट होईल, हे त्यांना समजावून सांगितले. बुद्धांचे हे प्रवचन या दोन्ही राजांवर एवढे परिणामकारक झाले की त्यांनी बुद्धांना या रत्नजडित सिंहासनावर बसवून त्यांची पूजा केली. गौतमबुद्धाने येथून जाताना त्यांचा लढा मिटवून टाकला. तेव्हापासून बुद्ध बसलेल्या सिंहासनाची पूजा करून हे नागाराजे त्याचेसमोर बसूनच आपला कारभार चालवीत व बुद्ध धर्माचा खरा उगम या गोष्टीतूनच सिलोनमध्ये झाला असे मानण्यात येते. या कालानंतर मात्र सिलोनच्या नागा राजांचे वृत्तीत फार फरक पडला. त्यांचेजवळ असलेली असाधारण शक्ती व त्यांचे बळावर ते करीत असलेले पराक्रम यांचा उल्लेखही बौद्ध ग्रंथातून आहे. मगागाला नांवाच्या नागा राजांनी अशी काही दैवी शक्ती प्राप्त करून घेतली होती की तो किती वर्षे जगला हे निश्चित सांगता येत नाही. कारण गौतम–बुद्धाच्या मागून आलेल्या चार बुद्ध नेत्यांनी सिलोनला या मगागाला राजांचे राजधानीला भेट दिल्याचा उल्लेख आहे. अशोक राजाने या मगागाला नागराजाला मुद्दाम हिंदुस्थानात बोलावून त्यांचा सन्मान केला. सिलोनमध्ये गौतम

बुद्धाबरोबरच या मगागाला राजाला मान दिला जातो. या सर्व नागा राजांचा संबंध सुवर्ण सिंहासनाशी आहे. सिलोनप्रमाणे काश्मीरमध्ये राहणाऱ्या अखला नांवाचे नागा राजाचा उल्लेखही बुद्ध ग्रंथातून सापडतो. नाग राज्य पाताळात होते, असा उल्लेख हिंदुधर्म ग्रंथातून आहे व त्याला बौद्ध धर्म ग्रंथातून आधार सापडतो. सिलोन हे एक बेट असल्यामुळे समुद्रात अगर पाताळात नाग नगरीत राहणारे दैवी शक्ति असलेल्या नागराजांनी सिलोन आपले पृथ्वीवरील ठिकाण म्हणून मानले व तेथे ते वर येत, असा उल्लेखहि काही ठिकाणी आहे. जुन्या अवशेषांविषयी प्रसिद्ध असलेल्या सिलोनमधील अनुराधपुरं या ठिकाणी जी नागमंदिरे आहेत त्यावरून या नागा राजांविषयी केवढा आदर बुद्धांच्या मनात होता ते स्पष्ट होते. याच नागाराजांचा इतिहास म्हणजे सिलोनच्या सुधारणेला सुरवात समजली पाहिजे. कलंबोच्या पदार्थ संग्रहालयात जी जी जुनी भांडी पाहावयास मिळतात त्या बहुतेकावर नागांची चित्रे कोरलेली आहेत. मिहिनतालय या ठिकाणी तर एका तळ्याचेजवळ तीन तोंडांची नागाची केवढी तरी मोठी मूर्ती कोरलेली आहे. बुद्धाच्या जुन्या ग्रंथात तर काही नाग लोकांतील माणसांनी बुद्धभिक्कूंचे जीवन कंठिले असा उल्लेख आहे.बुद्धांच्या ग्रंथातून हे नागलोक नागाचे रूप वेळोवेळी धारण करीत असे म्हटले असले तरी जेम्स फर्गसन या ब्रिटिश संशोधकांनी हे स्पष्ट केले आहे की नागांची पूजा करणारे ते नाग लोक होत. हे नागाराजे नागाराजांची पूजा करीत असे म्हटले आहे, पण सिलोनच्या उर्जितावस्थेचा काल या नागाराजांच्या राज्यव्यवस्थेपासूनच धरावा लागेल व तो इसवी सनापूर्वी २०० ते ३०० वर्षे असावा असा निर्देश इतिहासकारांच्या संशोधनात आढळतो.

या परिस्थितीत सिलोनच्या इसवी सनापूर्वीचा इतिहास म्हणजे बुद्ध भिक्कूंनी लिहिलेला महावंश हा एकच ग्रंथ होय. या ग्रंथातील बऱ्याचशा हकिकती फ्रेंच व इंग्लिश तत्कालीन ग्रंथाशी जुळत्या असल्यामुळे या एकाच ग्रंथावर विसंबून सिलोनच्या इसवी सनापूर्वीची इतिहासांची मांडणी करणे आवश्यक होऊन बसले आहे. या महावंश कालात विजय, पंडु वासुदेव, अभय, पंडुकान्ना व देवनापदा या राजांच्या कथा दिलेल्या आहेत. याच शेवटच्या राजाच्या कालात बुद्ध धर्माचा फैलाव सिलोनमध्ये विशेष झाला असावा असे

वाटते. एकूण तेरा राजांच्या कथा या ग्रंथात ग्रथित केल्या असून या ग्रंथाच्या सदतीस विभागांपैकी एकवीस विभाग बुद्ध धर्माचा प्रसार सिलोनमध्ये पूर्वी कसा झपाट्याने झाला हे दर्शविण्यात खर्ची पडलेले आहेत. या राजांपैकी द्रुत-गामिनी या राजांनी सिलोनच्या उत्तरेकडील प्रदेशात आलेल्या हिंदमधील तामीळ भाषा बोलणाऱ्या नागरिकांना घालवून दिले असाही एक उल्लेख आहे. याच राजांच्या विविध सुधारणांचे अवशेष अनुराधपुरं शहरात अजूनही दाखविले जातात. कालवे व बुद्ध धर्माचे वैशिष्टच दाखविणारे स्तुप या राजाने बांधले असा उल्लेख केला जातो. उत्तरेकडील तामीळ राजा एल्लाला याचा वध करून द्रुतगामिनी राजाने दहाव्या शतकाचे आसपास आपले साम्राज्य सर्व सिलोनभर कसे फैलावले याचा इतिहास महावंश ग्रंथात खालीलप्रमाणे दिला आहे : "या लढयात तामिळी लोकांचा उत्तरेकडील राजा मारला गेला व या लढयात विजयी झालेल्या राजाने आपल्या राजधानीत रथावर आरुढ झालेले सेनानी घेऊन मोठ्या महोत्सवात प्रवेश केला.त्यांनी मृत एल्लाला राजाचे दफन ज्या ठिकाणी केले त्या ठिकाणी एक स्मारक उभारून तेथे येणाऱ्या प्रत्येक योद्धयांनी या मृत वीराला सन्मानपूर्वक अभिवादन करावे, असा नियम केला व तो अजूनही सिलोनमध्ये पाळला जातो." द्रुतगामिनी राजाचे मनावर अशोकाप्रमाणे या लढ्यातील हत्येचा एवढा परिणाम झाला होता की तो विचारमग्न स्थितीत कित्येक दिवस या हत्येबद्दल सुस्कारे सोडीत असे. बौद्ध भिक्कूंनी आपले अहिंसा तत्त्वाचे वैशिष्टच दर्शविण्यासाठी अशी वर्णने या ंथात केली आहेत. या एकंदर प्रकारावरून दक्षिण हिंदुस्थानातील तामिळी राजे व अनुराधपुरंचे सिलोनी राजे यांच्यामध्ये फार मोठ्या लढाया इसवी सनाचे सुरवातीला झाल्या असाव्यात असे स्पष्ट होते. दक्षिण हिंदुस्थानातील नागरिक व सिलोनी नागरिक यांचे पूर्व कालापासून आलेले हे संबंध सिलोनचे सर्वच जुने इतिहास वाचताना स्पष्ट होतात. या जुन्या काळात अनुराधपुर सिगिरिया व पोलंनारुवा येथे सिलोनच्या निरनिराळ्या राजधान्या असाव्यात असा ब्रिटिश इतिहासकार लडविक यांचा तर्क आहे व या शहरातील जुने अव-शेष या तर्काला दुजोरा देणारे आहेत.


आजचे अनुराधपुरं शहर कलंबोपासून १२८ मैलांवर आहे व सिलोनची मूळ संस्कृति या शहरात पाहावयास मिळते. पंधरावे शतकात कमीत

कमी नव्वद राजांनी तरी या राजधानीत राज्य केले असावे असे सिलोनी इतिहासात म्हटले आहे. या शहराचा २५०० वर्षांचा इतिहास बुद्ध ग्रंथातून आला असून सिलोनमधील बुद्ध धर्माचे प्रमुख स्थान म्हणून याचा उल्लेख होतो. सिलोनचा चौथा राजा पंडुकाभ्य यांनी ही राजधानी बांधली तेव्हा तिचे नांव अनुराधग्राम असे होते. त्यावेळी सिलोनचे तीन भाग पडत. एकाला 'राजरतं—राजे लोकांचे ठिकाण. दुसरा भाग 'मायारतं म्हणजे मध्य सिलोनचा डोंगराळ भाग व दक्षिणेकडील 'रुहुनु रतं' अशी तीन नांवे या तीन भागांना दिलेली आढळतात. हे शहर सुरवातीला म्हणजे इसवी सनापूर्वी ४३७ वर्षे एवढ्या चांगल्या पद्धतीने बांधले गेले की त्याची कीर्ती सर्व जगात पसरली होती. यानंतर झालेल्या सिलोनच्या राजांनी या शहराच्या एवढ्या सुधारणा केल्या की जुन्या काळीही अनुराधपुरं हे शहर जगातील एक औत्सुक्यपूर्ण शहर झाले असावे. या शहराला कित्येक ग्रीक, रोमन व चिनी प्रवाशांनी भेटी दिल्या असाव्यात, असे येथील पदार्थ संग्रहालयातील पुराव्यावरून वाटते. या संग्रहातील काही पुतळे तरी २५०० वर्षांपूर्वीचे आहेत. इसवी सनापूर्वी ३०० वर्षे अशोकाच्या काळात जे स्तूप (दागोब) हिंदुस्थानात बांधण्यात आले त्यांच्या सुधारलेल्या आवृत्त्या सिलोनमध्ये पाहावयास मिळतात. येथील हे स्तुप बांधणारांनी इजिप्तचे पिरॅमिडचे रूप त्यांना दिले आहे. इसवी सनापूर्वी तीनशे वर्षे तुप्रग्रामा नांवाचा स्तूप तर घंटेच्या आकाराचा असून तो ५५ फूट सहा इंच उंच आहे. या शहरात सामावलेल्या सिलोनचे जुन्या अवशेषांवरून असे वाटते की इसवी सनापूर्वी १५० वर्षे या शहरात बांधण्यात आलेला मिरिजावती स्तूप दुतूरामकं या बुद्धराजाने बांधला असून त्याची आजची उंची बावन्न फूट सात इंच आहे. याच राजाने बांधलेल्या लोहा प्रसाद या इमारतीचे अवशेष अजूनही पाहावयास मिळतात. ही इमारत कशी होती याचे वर्णन महावंश ग्रंथात खालीलप्रमाणे केले आहे, " या इमारतीचे कोनाकोनातून रत्ने लावली होती व काही भाग तर सुवर्णाने मढविलेला होता. ही इमारत नऊमजली होती व प्रत्येक मजल्यावर १०० खोल्या होत्या. " या इमारतीचे स्तंभ फक्त आता उभे दिसतात पण सिलोनमधील या प्रासादावरून पूर्वीचे राजवैभवाची कल्पना पूर्णपणे येते. विहारासाठी बांधलेली मोठमोठाली तळी व निरनिराळ्या राजांच्या वैशिष्ट्यपूर्ण कलाकुसरीची कल्पना देणारी ही ठिकाणे इसवी सना-

पूर्वी एवढ्या कौशल्याने बांधणाऱ्या बुद्ध राजांच्या कलासक्तीची कल्पना पूर्णपणे देतात. सिलोनचा पूर्वेतिहास जरी इतिहासाचे वाचकांना अजून अज्ञात असला तरी अनुराधपुरंसारख्या शहरात मात्र तो अजून जिवंत उभा असल्या-सारखा भासतो.

# ब्रिटिशांनी सत्ता कशी मिळविली ?

इसवी सनाचे सुरवातीपासून पोर्तुगिजांचे आगमनापर्यंतच्या सिलोनच्या इतिहासाचा विचार करावयाचा तर युरोपियन प्रवाशांच्या हकिकतींवरच विसंबून राहावे लागेल. पोर्तुगीज, डच व ब्रिटिश या तिन्ही प्रबल नाविक शक्ति असलेल्या राष्ट्रांनी हिंदुस्थानप्रमाणे सिलोनवर पाय रोवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. यावेळी सिलोनमध्ये आलेल्या युरोपियन प्रवाशांनी श्रीलंका म्हणजे सुखसमृद्धी असलेले राष्ट्र असा उल्लेख केला आहे, तर अरब प्रवाशांनी लंकेला स्वर्गानंतरचे दुसरे समृद्ध राष्ट्र अशा गौरवाने या बेटाचा उल्लेख आपल्या ग्रंथातून केला आहे. युरोपियन लेखकांचे मते बुद्धाच्या निर्वाण दिनानंतर (इसवी सनापूर्वी ४८३ वर्षे) सिलोनच्या विजय राजाचे खऱ्या आर्य राजसत्तेला सुरवात झाली. या विजय राजाचे राज्य उत्तर व मध्य सिलोनमध्ये पसरले होते, व ते त्यांच्या वंशजांनी यानंतर वाढवीत हिंदच्या दक्षिण टोकापर्यंत आणले होते. या राज्यांचे दक्षिणेकडील हिंदी राज्यांशी फार सलोख्याचे संबंध होते, ही गोष्ट युरोपियन प्रवाशांचे वृत्तांतातही मान्य केली गेलेली आहे. सिलोनचे खरे मूळ रहिवाशी सिंहली भाषा बोलणारे का तामीळ भाषा बोलणारे तामिळी? हा वाद युरोपियन इतिहासकारही सोडवू शकलेले नाहीत. तामिळी हे सिलोनमध्ये दक्षिण हिंदुस्थानातून आलेले उपरे होत असे



कातरगामा येथील कार्तिकेयाच्या एका मंदिराचे प्रवेशद्वार हिंदूंचे एक अत्यंत महत्त्वाचे तीर्थक्षेत्र! आषाढी पौर्णिमेला भरणाऱ्या यात्रेत हजारो हिंदू, बुद्ध, मुस्लीम, खिश्चन, इ. धर्मांचे लोक येथे जमतात. रामाला येथे सीता सापडली अशी कथा सांगितली जाते. कातरगामा येथे दोन हिंदू देवालये, एक मशिद व एक दागोब असल्याने हिंदू, मुस्लीम, व बुद्ध या धर्मांचा त्रिवेणी संगम येथे झाला आहे.

सिलोनमध्ये आजही मानण्यात येते; पण सिंहली लोकांच्या पुराण कथातूनही ते हिंदुस्थानातून आले असाच उल्लेख आहे. एका हिंदी राजकन्येचा सिंहाशी संबंध आला व त्याचेपासून झालेली पिढी म्हणजे सिंहली लोकांची पिढी होय अशी एक दंतकथा आहे. या राजकन्येचे एका मुलाने आपल्या सिंह बापाला ठार केले व आपल्या बहिणीशी लग्न केले व हे कृत्य सहन न होऊन त्याला हिंदुस्थानातून घालवून देण्यात आले. त्याच बहीण-भावांची प्रजा म्हणजे आजची सिलोनमधील सिंहली मूळ जनता होय अशी ही दंतकथा. यात किती सत्य आहे हे जरी बाजूला ठेवले तरी तामिळी लोकांइतका सिंहली जनतेचा संबंध हिंदुस्थानशी आहे व हे दोन्ही या प्रदेशात उपरे आहेत. असे भासविण्याचा प्रयत्न युरोपियन लेखकांनी आपल्या ग्रंथातून केला. सिलोनचे ज्या जाफना विभागात तामिळी नागरिकांचे आज प्राबल्य आहे, तेथे पूर्वी तामीळ राजे राज्य करीत होते, असा निर्देश मानववंश ग्रंथात आहे. या सर्व गोष्टीवरून हे स्पष्ट होते की पुराण काळीही आजच्याप्रमाणे तामिळी जनतेचे वर्चस्व सिलोनच्या उत्तर भागात होते व दक्षिण व मध्य भागात सिलोनी राजे राज्य करीत. या राजांचे भांडणामुळेच अनुराधपुरं सिगिरिया व पोलंनारुवा या तीन राजधान्या उदयास आल्या. हे निरनिराळ्या ठिकाणचे सिंहली राजे सर्व सिलोनचे एकमेव राजे म्हणून कधीच मिरवू शकले नाहीत व त्याचाच फायदा पोर्तुगीज, डच व इंग्रजांना भरपूर मिळाला. स्थानिक राजवंशाचे वादात या युरोपियन राष्ट्रांनी हिंदुस्थानप्रमाणे येथेही पुरते हात धुवून घेतले व आपले पाय या सुंदर बेटात कायमचे रोवले.

तेराव्या शतकात मार्कोपोलो हा प्रवाशी ज्यावेळी आपले जहाज घेऊन सिलोनचे पूर्व किनाऱ्यावर उतरला त्यावेळी पोलंनारुवा या शहराचे दक्षिणेकडे यपाहुहा या शहरात मलायन लोकांचे राज्य होते असे त्याने म्हटले आहे. म्हणजे मलायातील राजेहि सिलोनमध्ये येऊन राज्य करीत होते हे स्पष्ट होते. मार्कोपोलो लिहितो, " सेंदामेन नांवाचे राजाने चंद्रभानू नांवाचे मलायन राजाचा पराभव करून त्याचा प्रदेश काबीज केला, पण चंद्रभानूचा मुलगा मात्र आपल्या वडिलांच्या पराभवाचा सूड घेण्यासाठी सिलोनमध्ये मागे राहिला होता. या मलायन् राजांचे लढयात दक्षिण हिंदुस्थानातील पांडायन राजाने

मलायन आक्रमकाला सिलोनमधून घालवून देण्यास सिंहली राजांना मदत केली असाही उल्लेख आहे, पण या सर्व हकिकती इतिहासातील आधारभूत पुरावे होऊ शकत नाहीत.

इसवी सन १५०५ साली ज्यावेळी पोर्तुगिजांची जहाजे प्रथम कलंबो बंदरात शिरली (सिलोनी इतिहासात ते प्रथम गॉल येथे दक्षिण टोका-कडे आल्याचा निर्देश आहे) तेव्हा कलंबोपासून पाच मैलांवर कोटे येथे असलेला सिंहली राजा आपण सर्व सिलोनचे राजे आहोत असे सांगत असे. पण थोड्याच दिवसांत बंदरात राहिलेल्या पोर्तुगिजांचे हे लक्षात आले की कॅन्डी व जाफना या दोन्ही शहरातून दोन निरनिराळे राजे स्वतंत्रपणे राज्य करीत होते. या पोर्तुगीज प्रवाशांनी लिहिलेल्या या इतिहासात असे म्हटले आहे की या वेळच्या सिलोनी प्रजाजनात 'भिक्कू'चे–बुद्ध भक्तांचे–वर्चस्व विशेष असे. राजा जसा देशांचा प्रमुख होता तसा तो भिक्कूंचा प्रमुख मानला जात असे. पोर्तुगिजांनी व्यापाराचे निमित्ताने सिलोनमध्ये प्रवेश केल्यापासून १५ वर्षांचे आत कोटे येथील राजाला एवढे आपलेसे केले की त्यांचे गोरे संरक्षक म्हणून त्यांचा उल्लेख होऊ लागला. रजवालीय या नांवाचे या वेळचे सिंहली ग्रंथात पोर्तुगिजांचे वर्णन खालील शब्दात केले आहे : "गोऱ्या लोकांची ही एक प्रमुख जात असून ते रक्तासारखा लाल पदार्थ (ही दारू असावी) पितात व दगडा-सारखे कठीण पदार्थ खातात. त्यांचे तोफखान्यांचा आवाज तर मेघाच्या गर्जने-पेक्षा मोठा असतो." या वेळच्या कवितातून आलेली पोर्तुगीज प्रवाशांची वर्णने अशाच स्वरूपाची आहेत. सिलोनी राजांशी मैत्रीचे संबंध जोडताना पोर्तु-गिजांनी आम्ही आमच्या युरोपियन राज्यसत्तेचे प्रतिनिधी म्हणून तुमच्याशी मैत्री जोडण्यासाठी आलो आहोत, अशी बोलणी या स्थानिक लोकांशी केल्याचा उल्लेख आहे. पोर्तुगिजांनी आपले उत्तम मद्याचे बळावर बऱ्याच सिंहली नाग-रिकांशी मैत्री संपादन केली. त्यांनी तयार केलेली ब्रेड व मद्य हे सिलोनमध्ये काही काळ औत्सुक्याचा विषय झाले होते असे या काळच्या सिलोनी लेखकांचे लेखावरून वाटते. सिलोनमध्ये पोर्तुगिजांचे वर्चस्व १६५८ म्हणजे १५७ वर्षे होते. या काळात त्यांची व्यापारी जहाजे चिनी समुद्रापर्यंत जात असल्याचा उल्लेख सापडतो. नेहमीच्या पाश्चिमात्त्यांच्या व्यापारी धोरणानुसार कलंबो-



कँडीयन नृत्य, सिलोनमधील एक वैशिष्ट्यपूर्ण परंपरागत नृत्यप्रकार म्हणून प्रसिद्ध आहे. परंपरेने चालत आलेल्या पोशाखात हे नृत्य सादर करण्यात येते.

मध्ये एक कारखाना व चर्च पोर्तुगिजांनी बांधले व आपले मिशनरी दल कार्यासाठी सिलोनमध्ये आणले. या दलाने आपले वर्चस्व एवढे प्रस्थापित केले की कोटेचे बुद्धराजेसाहेब हळूहळू पोर्तुगिजांचे हाती गेले. धर्मपाल हा नंतरचा कोटेचा राजा तर खिश्चन झाला व कलंबो भोवतालची राजसत्ता जवळजवळ पोर्तुगीजांचे हाती गेली. सिलोनच्या प्रत्यक्ष राजकारणात अशा तऱ्हेने पोर्तुगिजांचा शिरकाव झाला. पोर्तुगीज व सिंहली राजे हळूहळू पोर्तुगिजांचे सहकार्याने राज्यकारभार पाहू लागले व ज्याप्रमाणे हिंदमध्ये पोर्तुगिजांनी पाय रोवला. तसेच सिलोनच्या स्थानिक राजांनी आपसातील दुहीला तोंड देण्यासाठी पोर्तुगिजांशी सहकार्य करावयास सुरवात केली व त्यांचेबरोबर काही प्रदेश पोर्तुगिजांनी आपले सहकार्याचे निमित्ताने बळकावला. पोर्तुगीज सिलोनच्या जीवनाशी डच व इंग्रजांपेक्षा अधिक लवकर एकरूप झाले. त्यांची भाषा बरेच सिंहली बोलू लागले. कलंबो शहराचे आसपास पोर्तुगीज धर्मोपदेशकांनी बांधलेली अनेक चर्चेस् दिसतात. सिलोनी स्त्रियांशी त्यांचे संबंध आले. त्यापासून निर्माण झालेल्या प्रजेची कुटुंबे आजही सिलोनमध्ये दिसतात. त्या काळी पोर्तुगिजांनी सिलोनमध्ये मिळणारे मसाल्याचे पदार्थ–विशेषतः दालचिनी बोटी भरभरून युरोपला पाठविल्या व त्यामुळे इतर नाविक परराष्ट्रांचे लक्ष सिलोनकडे लागले. डचांच्या बोटी हिंदी महासागरात हिंडू लागल्या व त्यांनीही हळूहळू व्यापाराचे निमित्ताने आपली नजर सिलोनकडे वळविली. पोर्तुगिजांच्यापेक्षा डचांनी आपल्या नाविकदलांचे साहाय्याने आपला शिरकाव सिलोनच्या व्यापारात तरी लवकर करून घेतला व सिलोनच्या पूर्व व दक्षिण किनाऱ्यावर डचांच्या बोटी सारख्या फेऱ्या मारू लागल्या. पश्चिम किनाऱ्यावरील पोर्तुगीज वर्चस्व त्यांना थोपवू शकले नाही. कंदायनचे सिलोनी राजांचे डोंगराळ प्रदेशात दालचिनीचे उत्पादन फार आहे हे जाणून डचांनी त्यांच्याशी संधान बांधले. तामिळी व सिलोनी वादाचा फायदा घेऊन सिलोनमधील मुदलियार ही तामीळ जमात आपल्याकडे वळवून त्यांनी काही सिलोन राजांत मतभेद निर्माण केले व पोर्तुगिजांना युरोपमधील एक शत्रू सिलोनचे पूर्व किनाऱ्यावर निर्माण झाला. कोको, कॉफी, नारळ, कापूस व तंबाखू यांचे उत्पादन या भूमीत करून सिलोनला समृद्ध बनविण्याचे कार्य डचांनी हाती घेतले व त्यामुळे स्वदेशातून फारसा पैसा न आणता सिलोनमधील शेतीवर

डचांनी उत्पन्न मिळविण्यास सुरवात केली. ज्यावेळी पोर्तुगीज राजेरजवाड्यांशी मैत्री करून त्याना गटविण्यांत गढले होते, त्यावेळी डच सिलोनी शेती हाती कशी ठेवावी याचा विचार करीत होते. डचांची सिलोनमधील चलती १३८ वर्षांची होती, पण पोर्तुगीज व डचांचे राज्य करण्याचे पद्धतीत संपूर्ण फरक होता. होता होईतो स्थानिक जनतेला आपलेसे करून तिलाच सिलोनच्या आळशी राजां-विरुद्ध उठवावे व त्यांचा प्रदेश बळकवावा, तेथील लोकांचेच हाती थोडी बहुत सत्ता देऊन त्यांच्या कलाने राज्यकारभार करावा अशा धोरणाने डच नेते वागत. त्यांनी आपल्या प्रदेशात आपले स्वतंत्र कायदे प्रस्थापित केले, त्यामुळे डचांकडे सिलोनचे नागरिक जास्त आकर्षित होऊ लागले.

डच सत्ता सिलोनमध्ये आपले आसन स्थिर करीत होती. त्याच-वेळी ब्रिटिश व फ्रेंच आपले पाऊल हिंदुस्थानमध्ये पुढे टाकीत होते. त्याची नाविक सत्ता डचांशी तुलना करता केव्हाही प्रबल होती. डचांनी आपले नाविक दलाचे साहाय्याने सिलोनचे किनाऱ्याजवळील प्रदेशात आपले बस्तान चांगले बसविले. त्यांनी आपले कायदे या प्रदेशात प्रस्थापित केले व छोट्या छोट्या विभागाचा राज्यकारभार स्थानिक मुदलियारांचे हाती दिला. त्यावेळी कँडीची राजसत्ता एवढीच काय ती प्रबल सत्ता सिलोनमध्ये अस्तित्वात होती व तिचे-कडून डच अगर पोर्तुगिजांचे व्यापाराला अगर राज्यकारभाराला प्रत्यक्ष विरोध असा झालाच नाही. डचांचे पूर्वी पोर्तुगीज जरी सिलोनमध्ये ठाण मांडून बसले होते तरी सिलोनच्या जुन्या राजवटीत त्यांनी आपले अस्तित्वात मोठा फेरबदल केला असे म्हणता येत नाही. उलट सिंहली कायदे स्वतःच पाळून त्यांनी सर्वत्र सिंहली राज्यांशी मिळते घेतले, पण तशी स्थिती डचांची नव्हती. त्यांनी शक्यतो स्थानिक जनतेचे सहकार्य घेऊन आपलेच कायदे त्यांच्यावर लादले. डचांशी संबंध येऊन सिंहली महिलांनी निर्माण केलेली डच संतती-यांनाही सिलोनमध्ये बर्गर्ज म्हणतात- काही थोडी थोडकी नाही. पोर्तुगीज व डचाप्रमाणे व्यापारासाठी आलेल्या अरबांची स्थिती मात्र या युरोपियन प्रवाशांसारखी नव्हती. ते खरोखरच व्यापारी म्हणून सिलोनमध्ये वावरत होते. हिंदुस्थानात ज्याप्रमाणे पोर्तुगिजांनी सत्ता आपल्या हाती घेऊन डच तेथे प्रबल झाले त्या-प्रमाणे सिलोनमध्येही पोर्तुगीज आले असतानाही डचांचे प्राबल्य एवढे वाढत

गेले की एक युरोपियन प्रबल सत्ता म्हणून डच नेते ओळखले जाऊ लागले. पोर्तुगिजांना येथून कायमचे घालवून लावावयाचे याच उद्देशाने स्थानिक छोटे मोठे राजेरजवाडे व जनता यांच्या साहाय्याने डचांनी मोहीम उघडली. तिचा परिणाम एवढा झाला की १६५८ साली पोर्तुगिजांना सिलोन सोडून जाणे भाग पडले. जाफना या उत्तरेकडील शहरातून डचांशी शेवटचा लढा देऊन त्यांना बाहेर पडावे लागले.

पण ही डचांची हालचाल व पोर्तुगिजांची पिछेहाट सहजासहजी झाली नव्हती. पोर्तुगिजांचा धर्मप्रचार कँडीचे सिलोनी राजघराण्याला असह्य झाला. इ. स. १६३८ साली त्यांनी डचांशी एक गुप्त करार करून पोर्तुगिजांना सिलोनमधून हाकून देण्याची योजना आखली. त्याचीच परिणती डचांचे आसन बळकट होण्यात झाले. पोर्तुगिजांना अपेक्षेप्रमाणे १६५८ साली काढता पाय घ्यावा लागला, पण हे सिलोनमधील डचांचे वर्चस्व व हिंदमध्ये त्यांच्या चाल–लेल्या हालचाली ब्रिटिशांना डोईजड होऊ द्यावयाच्या नव्हत्या. हिंदी महा–सागरात सिलोन अगर हिंदमध्ये आपली सत्ता चिरस्थायी व्हावयाची असेल तर प्रथम आपली नाविक सत्ता प्रबल राखली पाहिजे हे ब्रिटिश ओळखून होते व सिलोनमध्ये डचांसारख्या सत्तेला त्यांना मुळातच विरोध करणे आवश्यक होते. हिंदमध्ये पोर्तुगीज, डच, फ्रेंच या तिन्ही युरोपियन राष्ट्रांना खडे चारून ब्रिटिश प्रबल बनले असता अठराव्या शतकाचे मध्यावर हिंदी महासागरातील फ्रेंच व ब्रिटिशांची नाविक चढाओढ कळसास पोहोचली होती. याचा परिणाम म्हणजे साहजिकपणे ब्रिटिशांना सिलोनच्या ट्रिंकोमली बंदरासारखे एखादे बंदर दक्षिणेकडे आपल्या हाती असावे असे वाटू लागले. या ठिकाणी ब्रिटिश बोटी प्रथम नुसत्या दुरुस्तीसाठी येऊ लागल्या व डचांनी त्याला विरोध केला नाही. पण येथेच हे प्रकरण थांबले नाही. डचांना फारसे न जुमानता मद्रासच्या ईस्ट इंडिया कंपनीचे गव्हर्नरांनी ट्रिंकोमली बंदर ताब्यात असलेल्या कॅन्डीचे राजेसाहेबांकडे स्वतंत्रपणे बोलणी करण्यासाठी मि. बॉईड नावाचे आपल्या वकिलास पाठविले, पण कॅन्डीचे राजेसाहेबांना या बंदराची सवलत मागताना काहीहि बदली द्यावयास ब्रिटिश तयार नसल्याने कॅन्डीचे राजेसाहेबांनी त्यांचेकडे दुर्लक्षच केले. डचांचे फुशीमुळे कँडीचे राजेसाहेब आपणाशी कोण–

ताही करार करणार नाहीत हे ब्रिटिश ओळखून होते व त्यांनी आपली सेना सरळ ट्रिंकोमली बंदरात उतरविली व डचांच्या तुटपुंज्या सेनेचा पराभव करून या उत्तम बंदराचा ताबा घेतला. तीच स्थिती कलंबोची झाली. तेथेही आपले सैन्य उतरवून ब्रिटिशांनी बंदराचा ताबा घेतला. ब्रिटिशांचा हा पराक्रम पाहून कँडीचे राजेसाहेबांनी ब्रिटिशांशी आतून संधान बांधून डचांना कसे घालवून द्यावे व दक्षिण हिंदुस्थानात व्यापाराच्या कोणत्या सवलती मिळवाव्या, याबाबत बोलणी सुरू केली, पण यातून कोणताही मोठा करार निष्पन्न होऊ शकला नाही. कलंबो व ट्रिंकोमली या दोन्ही ठिकाणी ब्रिटिश सत्ता आपल्या नाविक सामर्थ्याचे बळावर चांगलीच आसन धरून बसली होती. १७९६ पर्यंत छोटया मोठ्या लढाया देऊन ब्रिटिशांनी डचांच्या सेनेला नामोहरम केले व सिलोनचा बहुतेक किनारा आपले हाती घेतला. युरोपातील आपल्या राजसत्तेकडून ब्रिटिशांशी बोलणी करून लढाईत जे ते टिकवू शकले नाहीत ते डच सिलोनमध्ये आपलेकडे टिकविण्याचा प्रयत्न करू लागले. पण त्याचा उपयोग झाला नाही. कोणत्याही परिस्थितीत दक्षिण हिंदी महासागरातील सत्ता हाती राखावयाची म्हणजे ट्रिंकोमली व कलंबो ही दोन्ही बंदरे हाती हवीत अशी स्पष्ट सूचना मद्रासचे ब्रिटिश गव्हर्नरांनी आपले घरचे तडजोड करणाऱ्या राजसत्तेला दिली व ती बंदरे सोडण्यास नकार दिला. या गोष्टी ब्रिटिश स्थानिक अधिकाऱ्यांनी एवढ्या तातडीने केल्या की त्यांच्या ताब्यात बराचसा सिलोनचा प्रदेश आला. त्यांच्या हालचालीपुढे कँडीचे राजेसाहेब अगर डचांचे काहीच चालेना. १७९६ साली प्रथम ब्रिटिशांनी सिलोनचा लढा सुरू केला. मद्रासचे त्यावेळचे ईस्ट इंडिया कंपनीचे गव्हर्नर लॉर्ड हबट यांनी डचांना सिलोन खाली करण्याची आज्ञा केली. त्यांचेशी कोणतीही तडजोड करावयाची नाही असे स्पष्ट शब्दात त्यांना कळविले. कारण हिंदमध्ये डचांशी चिघळलेले ब्रिटिश संबंध येथे तुम्हाला तडजोडीला थारा देण्यासारखे नाहीत, असेही त्यांनी आपले इंग्लंडचे राज्यकर्त्यांना कळविले होते. कँडीचे निर्बल राजेसाहेबांशी ब्रिटिशांनी तह करून त्यांना संरक्षण दिले. पोर्तुगिजांना घालवून देण्यासाठी डचांशी ज्या पद्धतीचा करार कँडीचे राजेसाहेबांनी केला तसाच करार डचांना घालवून देण्यासाठी ब्रिटिशांशी त्यांनी या खेपेस केला व त्यांचे संरक्षण मिळविले. कँडीचे राजे राजाधिराजसिंघ यांनी कोणतीही अट न घालता १७९६ साली ब्रिटिशांशी

वरीलप्रमाणे तह केला. या सिलोनमधील ईस्ट इंडिया कंपनीचे ब्रिटिश अधिकाऱ्यांचे आक्रमणाला लंडनमध्ये त्यावेळी मिळावा तसा पाठिंबा मिळत नव्हता. प्रदेश ताब्यात घेताना जपून पावले टाका अशा सूचना सारख्या येत होत्या. ठिकठिकाणी विखुरलेले डच १८०२ साली एम्यन्स या बंदरातून सिलोनमधून कायमचे गेले. १८०२ साली सिलोन हे एक ब्रिटिश वसाहत बनले. ईस्ट इंडिया कंपनीच्या हिंदी साम्राज्याला एक मोठा आधार सिलोनवर ब्रिटिश सत्ता स्थापन झाल्याने मिळाला आहे, असा उल्लेख ब्रिटिश पार्लमेंटमध्ये सिलोनमध्ये ब्रिटिश सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर करण्यात आला. १८०२ पासून १९४८ पर्यंत ही सत्ता ब्रिटिशांनी अमर्याद उपभोगली व या सत्तेतून आजचा सिलोन कसा निर्माण झाला याचा इतिहास आता पुढे येणार आहे.

✤ ✤

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
अनुक्रम १०७२२ वि: भू.प्रवास
क्रमांक ५७५ दि: २२।७।७३

सि–३

# ब्रिटिश राजसत्तेला विरोध

डचांचे कायमचे उच्चाटन करून ब्रिटिशांनी १८०२ पासून सिलोनची सत्ता आपल्या हाती घेतली खरी तरी त्यांचे साम्राज्य किनाऱ्याचे वीस पंचवीस मैलांचे आसपास पसरलेले होते. कँडीची मोठी स्थानिक राजसत्ता व तिच्या सभोवताली ११ते१२ विभागात पसरलेला डोंगराभोवतालचा सुपीक प्रदेश अजूनही या राजांचे हाती होता व त्यातूनच खरे व्यापारी प्रमुख उत्पादन ब्रिटिशांना मिळवावयाचे होते. त्यासाठी या राजसत्तेशी सलोख्याचे संबंध ठेवणे ब्रिटिशांना भाग होते. सिलोनच्या सर्व किनाऱ्याची ब्रिटिशांनी तीन भागात विभागणी करून, पूर्व व उत्तरेकडे जाफनाकमांड, दक्षिणेकडे गॉल-कमांड व पूर्व किनाऱ्यावर कलंबोकमांड असे आपल्या नाविकदलाचे तीन भाग पाडले. त्या किनाऱ्यावर एक एक संरक्षक अधिकारी नेमला व आपल्या नाविक सामर्थ्याचे बळावर सिलोनच्या राजांची बाहेरच्या जगाशी नाकेबंदी केली. जे पोर्तुगीज अगर डचांना जमले नाही, ते ब्रिटिशांनी प्रथम केल्याने त्यांना इतर हालचाली यापुढे निर्धास्तपणे करता आल्या. यामुळे लष्कराची सत्ता किनाऱ्यावर प्रस्थापित झाल्यासारखी वाटले व ब्रिटिश पोर्तुगीजांचा गबाळा कारभार संपुष्टात आला. डचांशी लढा चालविण्यासाठी जो खर्च ब्रिटिशांना आला तो सर्व व्यापारी धोरणाने वसूल करता यावा व सिलोनी राज्यकारभार



बुद्ध मंदिराचे दोन प्रमुख असतात. पैकी एक पूजाअर्चा इत्यादींची व्यवस्था पाहतो व दुसरा मालमत्तेचे हिशोब पाहतो. सिलोनमधील 'दालदं मालिगवं' या मंदिराचे मालमत्तेचे प्रमुख श्री. उदुरावण व त्यांचे इतर साहाय्यक पेरहरातील एका रात्रीच्या समारंभाप्रसंगी.

सिलोनी पैशातून चालविता यावा म्हणून ब्रिटिशांनी नारळाचे झाडाचे मालकांवर कर बसविला आणि डच ज्या पद्धतीने पूर्वी करवसुली करीत त्याच पद्धतीने करवसुली त्यांनी सुरू केली. डचांनी ज्या मुदलियार (तामीळ) मंडळींच्या हाती नागरी राज्यकारभाराची सूत्रे दिली होती त्यावर सर्वस्वी विश्वास टाकावयास ब्रिटिश राज्यकर्ते तयार झाले नाहीत. ब्रिटिश राज्यकर्त्यांचे नवनवे कर सिलोनी नागरिकांमध्ये त्यांचे विषयी चांगले मत उत्पन्न करीनात. सर्वसाधारण स्थानिक जनतेकडून ब्रिटिशांना विरोध होऊ लागला. काही ब्रिटिश अधिकाऱ्यांवर तर सुरवातीला हल्लेही झाले व त्यामुळे मद्रासचे गव्हनर थोडेसे काळजीत पडले. पण ब्रिटिशांचे लष्करी अधिकारी हे दंगे आवरू शकले. सिलोनमधील या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी मद्रासचे गव्हनर लॉर्ड डड्ली हे त्यावेळी स्वत: सिलोन-मध्ये आले व त्यांनी निरनिराळ्या साहाय्यकांचे साहाय्याने सिलोनच्या राज्यव्यवस्थेची पाहणी केली व जुनी करवसुलीची डच पद्धती तशीच ठेवली. फक्त नारळावरील कर काढून टाकला. यानंतर वसाहतीवर गव्हनरच्या दर्जाचा स्वतंत्र अधिकारी नेमून कारभाराला सुरवात केली. हे प्रयत्न हळूहळू यशस्वी होऊ लागले.

हे सर्व सुरू असताना सिलोनच्या मध्यावर सुपीक प्रदेशात आपले राज्य चालविणारे कंदायन राजे मोठे स्वस्थतेने हे सर्व पाहात होते अशातला प्रश्न नाही. सिलोनमधून बाहेरचे जगाशी संबंध राखणारा आपला किनारा ब्रिटिशांनी वेढला आहे, ही गोष्ट त्यांचे मनाला सारखी लागली होती. ते संधी मिळाली की ब्रिटिश फौजांवर हल्ले चढवून किनाऱ्यावरील प्रदेश जिंकण्याचा प्रयत्न करीत. ते ब्रिटिशांशी कधी सहकार्य करतील असे वाटेना. यांचेशी सामोपचाराने तह करावयास ब्रिटिश गव्हनर नॉथ हे कधीच तयार झाले नाहीत. त्यांनी नागरिकांशी सलोख्याचेच संबंध ठेवून त्यांना राज्यकारभारात हळूहळू ओढण्याचा परिपाठ सुरू ठेवला. असा प्रकार १८०५ पर्यंत सुरू होता. मध्यंतरी सिलोनमध्ये आलेल्या देवीच्या साथीचे वेळी ब्रिटिश डॉक्टरांनी नागरिकांना केलेली मदत, ही एक नवे स्नेहसंबंध प्रस्थापित होण्यास मदत कर-णारी ठरली. १८०५ साली ब्रिटिश वसाहत खात्याने आपले हाती

सिलोनचा कारभार घेतला व तेथे गव्हनर व कमांडर इन चीफ असे दोन ब्रिटिश अधिकारी कारभारावर आले. सरसेनानी मेटलंड हे जरी ब्रिटिश लष्करी अधिकारी असले तरी त्यांनी सिलोनच्या नागरी कारभाराची घडी आतापर्यंत चांगली बसविली होती. जनरल मेटलंड यांनी ज्यावेळी सिलोनच्या किनाऱ्याजवळील प्रदेशाचा कारभार हाती घेतला, त्यावेळी सिलोनच्या कारभारात वर्षाकाठी सात लक्ष पौंडाची तूट येत असे. पण मेटलंड यांनी हळूहळू ही तूट आपल्या करवसुलीचे पद्धतीने भरून काढली. त्यांचेजवळ सिलोनचे संरक्षणार्थ अवघे पांच हजार सैनिक होते. पण या सर्वांचा खर्च भागवून आपले कारभारातून पैसे साठवून ते मद्रासला पैसे पाठवू लागले.आपल्या प्रदेशातील काही जमिनी युरोपियन मळेवाल्यांना व कारखानदारांना द्यावयास मेटलंड यांनी सुरवात केली. त्याचा परिणाम असा झाला की धाडशी ब्रिटिश नागरिक सिलोनमध्ये येऊ लागले. आपणास लागणारे सर्व पदार्थ सिलोनमध्ये पिकवावयाचे व सिलोनी भूमी समृद्ध करावयाची या धोरणाने सिलोनी जनतेला समृद्ध करण्याचे प्रयत्न प्रथम मेटलंड यांनी केले. डच राज्यकर्त्यांनी तंबाखू, कापूस व कॉफी यांचे पीक काढावयास केव्हाच सुरवात केली होती. हे सर्व होत असताना ब्रिटिशांनी सुरू केलेल्या या विकास योजना कंदायन राजांना आवडेनात व कित्येक प्रदेशावरून त्यांचे ब्रिटिश फौजांशी लढे सुरू झाले.विशेषत: कलंबो, कँडी व ट्रिंकोमली यांना जोडणारा रस्ता सुरू करण्यासाठी ज्यावेळी ब्रिटिशांनी कामाला सुरवात केली. त्या वेळी कंदायन राजांचे अडथळे पदोपदी येऊ लागले. ब्रिटिशांनी यावेळी आपल्या रस्ता करणाऱ्या एंजिनियरांना संरक्षण देण्यासाठी आपली फौज त्यांचेबरोबर दिली. कँडीचे राजेसाहेबांना ब्रिटिश तोफांचे हल्ल्यापुढे आपले राणीसह पळून जावे लागले. या वेळचे सेनाप्रमुख जनरल ब्राऊनरिग् यांनी आपले सैन्यासह कँडी शहरांत प्रवेश केला. यावेळी १८ फेब्रुवारी १८१५ रोजी ब्रिटिशांनी प्रथम कँडीचे राजाला अटक करून कंदायन राज्य ब्रिटिश गव्हनरांचे सत्तेखाली दिल्याचे जाहीर केले. बुद्ध धर्मानुसार कंदायन जनतेचे सर्व हक्क मात्र शाबूत राहतील व त्याच्या धर्मात कोणताहि हस्तक्षेप केला जाणार नाही असे आश्वासन हा प्रदेश ताब्यात घेताना कंदायन राजे व त्यांचे मांडलिकांशी करार करताना ब्रिटिश राज्यकर्त्यांने दिले. हा करार २ मार्च १८१५ रोजी झाला. स्थानिक संस्थानिकांचे हाताखालील प्रदेश सैन्यबळावर आपले हाती घेण्यास

यावेळी ब्रिटिशांनी सुरवात केली असे म्हणावे लागेल. ब्रिटिश अधिकारी जॉन ओडली यांनी कंदायन जनतेची व राज्याची संपूर्ण माहिती घेऊन व सिंहली भाषेचा स्वत: अभ्यास करून आपले म्हणणे जनतेपुढे त्यांचे भाषेत मांडले व ब्रिटिश राजवटीने सिंहली जनतेशी एकरूप होऊन कारभाराला सुरवात केली. यावेळी कंदायन राजांशी केलेला करार इंग्लंडमधील ब्रिटिश सत्तेने मान्य केला. या कराराने सौम्यपणे राज्यकारभार करण्याचे प्रयत्न ब्रिटिश अधिकाऱ्यांनी केले पण राजसत्ता गमावणारे कंदायन राजे व त्यांचे सहकारी यांना ब्रिटिश अधिकाराखालील राज्यव्यवस्थेत राहणे पसंत पडेना. त्यांची अनेक प्रकारे कुरबूर सुरू झाली. धर्मस्वातंत्र्य जरी ब्रिटिशांनी कंदायन नागरिकांना पूर्णपणे दिले होते तरी बौद्ध भिक्कूंचे अमर्याद सत्तेवर पदोपदी नियंत्रण येऊ लागले. फक्त व्यापार करण्यासाठी येणारे अरब प्रवासी यावेळी मधून मधून कंदायन राजांना फूस व पैसा व युद्धसामग्री पुरवून ब्रिटिश सत्ता उधळून लावण्याचे कट करू लागले. या कटाची प्रत्यक्ष माहिती स्थानिक राजकर्त्यांनी जमा केलेल्या लोकांकडून ब्रिटिशांना मिळाली. कंदायन राज्यकारभाराखाली येणाऱ्या जवळजवळ १५ छोटचा मोठ्या राजांनी एकत्र येऊन आपले प्रजाजनांचे करवी सिलोनमध्ये ब्रिटिशांविरुद्ध आघाडी उघडली. पूर्वीचे करार उधळून लावले व हिंदुस्थानात १८५७ साली ज्या तऱ्हेची क्रांती झाली व त्यांना राजेरजवाडयांनी जसा आतून पाठिंबा दिला, तसाच उठाव १८१७ साली सिलोनमध्ये ब्रिटिशांविरुद्ध झाला होता, असा उल्लेख ब्रिटिश राज्यकर्त्यांनी या घटनेसंबंधी आपले वृत्तांतात केला आहे. ही सिलोनी क्रांती १८१७ ते १८१८ पर्यंत सुरू होती. डोंगराळ प्रदेशांत जरी सिलोनी राजांनी ब्रिटिशांना जेरीस आणण्यासाठी सारखे प्रयत्न या एक वर्षाचे कालावधीत केले तरी एक गोष्ट महत्त्वाची होती. ती म्हणजे सर्व समुद्राजवळील प्रदेशाची ब्रिटिशांनी आपले आरमारी दलाकरवी नाकेबंदी केली असल्यामुळे त्यांना कोठूनही मदत येईना व हा विरोध फक्त डोंगराळ प्रदेशातच राहिला. तो मोडून काढण्यासाठी या छोटचाशा बेटात ब्रिटिशांनी आपली सर्व शक्ती पणाला लावली व कंदायन राजप्रमुखांचे सैन्याचा ठिकठिकाणी पाडाव करून सर्व बेटांची सत्ता आपले हाती घेतली. लॉर्ड ब्राऊनरिग् यांची ब्रिटिश गव्हनरांची सर्वच कारकीर्द या सिलोन प्रदेशांची साफसुफी करण्यात खर्ची पडली पण सिलोनमधील विरोधाचे पूर्ण निर्मूलन करण्यात त्यांनी

चांगले यश मिळविले हे निर्विवाद होय. त्यानंतर १८२० पासून १८३१ पर्यंतचे काळात सर एडवर्ड बार्नस हे ब्रिटिश गव्हनर अधिकारावर आले व त्यांनी सर्व सिलोन ब्रिटिशांचे हाती राहण्यासाठी जे काही लष्करीदृष्टया करणे आवश्यक होते ते सर्व केले. आपल्या सैन्याच्या हालचाली कोठेहि प्रभावीरीत्या करता याव्यात म्हणून सिलोनमध्ये उत्तम रस्ते त्यांनी करावयास सुरवात केली. यापूर्वी सिलोनी नागरिकांना कामावर लावून रस्ते करण्यासाठी कंदायन राजकर्त्यांनी वेठीची पद्धती सुरू केली होती, ती प्रथम ब्रिटिशांनी बंद केली व आपले लष्करी एंजिनियरांकरवी सर्व रस्त्यांची स्वतंत्रपणे आखणी केली. आपलेकडील वेठ पद्धती तर सिलोनमध्ये त्यावेळी एवढी रूढ होती की ती नाहीशी करण्यासाठी सिलोनमध्ये ब्रिटिशांना प्रथम निर्धाराने प्रयत्न करावे लागले. सिलोन मधील ब्रिटिशांचा अंमल इतर युरोपियन राष्ट्रांपेक्षा बळकट पायावर प्रस्थापित करण्यास मुख्य कारण जर कोणते झाले असेल, तर ते हे की सिलोनच्या सुपीक भूमीचा फायदा घेऊन कॉफीसारख्या उत्तम पिकाची पैदास करण्यासाठी हळूहळू ब्रिटिश जमीनदार सिलोनमध्ये आणण्यात आले. सिलोनमधील जनतेला पटतील व राज्यकारभाराला उपयोगी पडतील असे कायदे त्यांनी करावयास सुरवात केली. सिलोनच्या स्थानिक गव्हनरांना नजिकच्या हिंदुस्थानातील सेनेचा व तेथील राज्यकर्त्यांचा मोठा आधार होता. तरी त्यांना सर्व हुकूम इंग्लंडमधून येत व स्वतंत्रपणे पार्लमेंटला त्यांची हालचाल कळवावी लागे. यामुळे ब्रिटिशांची एक स्वतंत्र वसाहत म्हणून सिलोनची जोपासना केली गेली. त्याचा फायदा स्थानिक ब्रिटिश राज्यकर्त्यांना भरपूर मिळाला. याच आधारामुळे सिलोनमध्ये कंदायन राजेरजवाड्यांनी एकत्र येऊन केलेले युद्ध फार काळ टिकू शकले नाही. त्यानंतर तर सिलोनच्या सर्व भागात ब्रिटिशांना आपले हात सहजासहजी पसरता आले.

१८३३ पासून १८४७ पर्यंतच्या काळात ब्रिटिशांनी राज्यकारभाराला सोयीचे जावे म्हणून सिलोनची पाच भागात विभागणी केली व या सर्व भागांचे न्यायदानासाठी एक सुप्रीम कोर्ट बनविले. सिलोनमध्ये पूर्वी लागू असलेला राजकारिया हा जुन्या कंदायन राजघराण्याचा कायदा ब्रिटिशांनी काढून टाकून आपले कायदे सुरू केले. एकीकडे आलेल्या काही ब्रिटिश बागायतदारांनी १८२७

पर्यंत कॉफी पिकवून ती स्वदेशी पाठवावयास सुरवात केली. १८३९ पर्यंत ३९२० एकर जमीन स्थानिक शेतकऱ्यांचे मदतीने कॉफी उत्पादन होऊ लागले. निरनिराळ्या वस्तूंच्या उत्पादनासाठी जवळजवळ अडीच लक्ष एकर जमीन ब्रिटिश राज्यकर्त्यांनी ब्रिटिश मळेवाल्यांना अल्प किंमतीत विकली व त्यांचे हाताखाली स्थानिक सिलोनी नागरिक राबू लागले. या वेळी हे राबणारे मजूर महिन्याला १५ ते १८ शिलिंग मिळवीत तर त्याच कामावर ब्रिटिश घेत असलेला मासिक फायदा ३० ते ४० पट होता. या वेतनमानासंबंधी सिलोनी मजूर नाखूष होऊ लागताच त्यांचे पगार भराभर वाढवून जमीनदारांनी ३० ते ४० शिलिंगपर्यंत नेले. याचा फायदा नुसता सिलोनी नागरिकांना मिळाला नाही तर दक्षिण हिंदुस्थानात राहणाऱ्या काही तामीळ कामगारांना सिलोनमध्ये येऊन काम करावे असे वाटू लागले. ब्रिटिश लेखकांनी लिहून ठेवलेल्या हकिकतीतून ही गोष्ट स्पष्ट केली आहे की, १८३९ साली दक्षिण हिंदुस्थानातून १९७१ पुरुष १८२ स्त्रिया व त्यांची ९० मुले रोजगारीसाठी प्रथम सिलोनमध्ये आली. हे हिंदी कामगार सिलोनमध्ये आणून स्थानिक समजली पाहिजे.ब्रिटिशांना हे परदेशचे कामगार सिलोनमध्ये यावयाची सुरवात मजूरांना डोईजड होऊन द्यावयाचे नव्हते. व त्या उद्देशाने या उपक्रमाला त्यांनी फारच महत्त्व दिले, हे पुढील आकड्यावरून स्पष्ट होईल. १८४५ साली ६६५५७ पुरुष, ६४२ स्त्रिया व ७९ मुले हिंदुस्थानातून सिलोनमध्ये आली. या नंतर पुन्हा ही कामगार येण्याची संख्या कमी झाली. पण एकदा सिलोनमध्ये आलेले कामगार परत जात नसत. या हिंदी कामगारांशी सिलोनी स्थानिक कामगारांचे जमत होते,अशातला प्रश्न नाही.पण ब्रिटिश जमिनदारांनी या हिंदी कामगारांना एवढे जवळ केले की त्यांचे संरक्षणासाठी व सुस्थितीसाठी निरनिराळे वटहुकूम काढावयास त्यांनी मागे पुढे पाहिले नाही. या ब्रिटिश संरक्षणामुळे तामीळ कामगार या शेतीवर राबू शकले. या तामिळी कामगारांना तर उत्तरेकडील काही प्रदेशात जमिनी वाटून देऊन ते तेथे कायमचे रहिवाशी व्हावे म्हणून ब्रिटिशांनी प्रयत्न केले. या हिंदी कामगारांची ब्रिटिशांना नव्या वसाहतीसाठी एवढी गरज लागू लागली की १८५८ साली 'कुली एमिग्रेशन ऑर्डिनन्स' नावाचा एक नवा वटहुकूम त्यांनी काढला व हिंदुस्थानात सिलोन सरकार, इंग्लंडचे ब्रिटिश सरकार व मळेवाले यांची एक संघटना हिंदुस्थानात निर्माण

झाली व तिचेतर्फे लागतील तेवढे कामगार सिलोनमध्ये येऊ लागले. ब्रिटिश मळेवाले व त्यांचेकडे काम करणारे हिंदी कामगार त्यांना मिळणारे पैसे, सिंहली जमीनदारांकडे कशाबशा तुटपुंज्या उत्पन्नानावर कष्ट करणारे कामगार यांचे मधील आर्थिक फरक सर्वांच्या डोळ्यांत भरू लागला व सिंहली जमीनदारांनाही आपले कामगारांचे पगार वाढवावे लागले. विशेषत: तांदूळ व नारळ यांचे सिंहली जमीनदारांचे उत्पन्न थोडे थोडके नव्हते. जसजसे ब्रिटिश मळेवाले डोंगराळ प्रदेशात पुढे सरकू लागले तसतसे रस्ते व इतर वाहातुकीची साधने सिलोनमध्ये वाढू लागली. हे ब्रिटिश जमीनदार वर्षाकाठी या कामासाठी व संरक्षक सैन्याचे खर्चासाठी २४००० पौंड ब्रिटिश सरकारला देत व तो ते इंग्लंडडला पाठवित असलेल्या मालाचे स्वरूपात दिला जात असे. कोणतीही ब्रिटिश वसाहत एकोणिसावे शतकात ब्रिटनला एवढी फायदेशीर झाली नव्हती. यामुळे ब्रिटिशांचे लक्ष या बेटाचे सुधारणेकडे प्रथमपासून लागले व त्याची प्रचीती सिलोनमध्ये प्रवास करतांना आजही दिसून येते. १८६० साली १८०० मैल लांबीचे महत्त्वाचे रस्ते ब्रिटिशांनी या रस्त्यावर तयार केले. यावेळी सिलोनमध्ये येणाऱ्या कराचे उत्पन्नापैकी वीस टक्के ब्रिटिशांनी या रस्त्यावर घातले. कलंबो, कँडी-न्यूरेल्या व दक्षिणेकडे गॉल या शहरापर्यंतचे सर्व रस्ते तयार झाले व कलंबो ते कँडीपर्यंत ब्रिटिश रेल्वे धावू लागली. ही प्रगती शेजारचे हिंदुस्थानचे मानाने केवढी तरी मोठी होती व झपाट्याने होत होती. पार्लमेंटमधील चर्चेत सिलोनमधील ही ऊर्जितावस्था प्रथम ब्रिटिशांचे डोळ्यात भरू लागली व याचा परिणाम मात्र असा झाला की सिलोनकडून भरभक्कम पैसा मिळविता येईल अशी आशा ब्रिटिश वसाहत खात्याला वाटू लागली. या वेळी जगातील मंदीचे लाटेबरोबर सिलोनमध्येही मंदीची लाट उठली व येणारी तूट भरून काढण्यासाठी सिलोनी नागरिकांवर निरनिराळे कर लादण्याच्या योजना राज्यकर्त्यांकडून पुढे येऊ लागल्या. १८४८साली टॉरिंग्टन नावाचे सिलोनचे ब्रिटिश गव्हनर यांनी आपले राज्यकारभारासाठी बनविलेल्या सरकारनियुक्त लेजिस्लेटिव्ह कौन्सिलपुढे वसाहत सरकारकडून सहा नवे कर बसविण्यात आल्याचे ठरावमांडले. त्यातील एक बंदुकीवर, एक पाळीव कुत्र्यावर, एक रस्ते करण्याबाबतचा होता. सिलोनमधील १८ वर्षावरील प्रत्येक पुरुष नागरिकाला वर्षाकाठी रस्त्याचे खर्चासाठी प्रत्येक ३ शिलिंग अगर सहा दिवस रस्त्या-

वर काम करावे असा दंडक घालण्यात आला. या करामुळे सिलोनी नागरिकांच्या मनात ब्रिटिश राजसत्तेविषयी असलेले प्रेम कमी होऊ लागले. या कराने विरोध करण्याची वृत्ती बळावली. काही ब्रिटिश लेखकांनी तर या विरोधाला बंड असे नाव दिले आहे. यावेळी जनतेचे पुढारी म्हणून काही कंदायन राजे-रजवाड्यांचे वंशज व बुद्ध भिक्कू म्हणून पुढे येणारे पुढारी ब्रिटिशांना विरोधकरा-वयास पुढे सरसावले. कित्येक ठिकाणी ब्रिटिश शिपायांवर यावेळी हल्ले चढविले गेले. मातले व कुरुनायगलं येथे झालेल्या दंगली मोठ्या स्वरूपाच्या होत्या. कँडी व वरील दोन्ही ठिकाणी लष्कराला बोलावून व लष्करी कायदा पुकारूनच सिलोनी नागरिकांच्या दंगली ब्रिटिश अधिकाऱ्यांना आटोक्यात आणाव्या लागल्या. कलंबो येथेही हजारो लोकांचे निदर्शन झाले व सिंहली नागरिकांनी किल्ल्यात जाऊन ब्रिटिश राज्यकर्त्यांपुढे आपला करविरोधी अर्ज नेऊन गुदरण्याचा आग्रह धरला. लोक ऐकेनात, तेव्हा लष्कराचे संरक्षण गव्हनरांना घेऊन हा जमाव हटवावा लागला. कँडी, मातले, कुरुनायगलं या शहरांतून तर ब्रिटिश अधिकाऱ्यांची घरे जाळण्यापर्यंत दंगल माजली. काही दिवस तर सिलोनमधील ब्रिटिश व्यापारी मालमत्तेला आगी लागल्या व सर्वच ब्रिटिश सत्ता धोक्यात आली. शेवटी ईस्ट इंडिया कंपनीकडून मद्रासहून अधिक सैन्य मागवून सिलोनी फौजांचे मदतीस देण्यात आले. ट्रिंकोमली बंदरात हे हिंदमधील ब्रिटिश सैन्य उतरताच, सर्व रंग पालटला व सिलोनी विरोधकांना बऱ्याच ठिकाणी शरण येणे भाग पडले. या दंगलीतील विशेष म्हणजे सिलोनमधील हे लष्करी तंत्र व गव्हनरांचा लष्करी हस्तक्षेप आपले कामगारांचे तंत्राने वागणाऱ्या मळेवाल्यांनाही तेवढासा मान्य नव्हता. स्थानिक लोकांच्या सल्ल्यानेच या गोष्टी केल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते. त्यांनी आपली ही प्रतिक्रिया वसाहत खात्याला कळविल्यामुळे १८४८ साली सिलोनचे ब्रिटिश गव्हनर यारिंग्टन यांना परत बोलावण्यात आले व या दंगलीने माजलेला बेबनाव कमी झाला व हळूहळू सिलोनची चहाकॉफी हे एक ब्रिटिश निर्यातीचे वैशिष्ट्य बनू लागले. लिप्टनसारख्या ब्रिटिश कंपन्या आपली व्यापारी दृष्टि पुढे ठेवून सिलोनी नागरिकांची व कामगारांची काळजी घेऊ लागल्या. सिलोनी भूमीतून चहा - कॉफीचे उत्पन्नावर जेवढा जास्तीतजास्त फायदा मिळविता येईल तेवढा मिळवू लागल्या. यावेळी ब्रिटिश राज्यकर्त्यांतही काही समंजस राज्यकर्ते सिलोनपासून स्थानिक वसाहतवाल्यांचा

व आपला जास्तीतजास्त फायदा कसा होईल याकडे लक्ष देऊ लागले. त्याचा परिणाम सिलोनी नागरिक पुन्हा ब्रिटिश राज्यकर्त्यांचे आहारी या पैशाचे मोहाने जाऊ लागले. कंदायन राजघराण्याचे अस्तित्व यावेळपर्यंत जवळजवळ नाहीसे झाले होते. सिलोनी नागरिकांचा भिक्कूंवर विश्वास होता तो मात्र धार्मिक बाबतीत कायम राहिला. १८१७ व १८४८ हे सिलोनमधील जनतेचे दोन उठाव जरी यशस्वी झाले नाहीत तरी ब्रिटिश राज्यकर्त्यांना या दोन उठावामुळे सिलोनी नागरिकांच्या वैशिष्टयाची चुणूक कळली होती.यावेळी हिंदुस्थानमधून आलेले कामगार व मुदलियार मंडळी ब्रिटिशांचे बाजूला असल्यामुळे पूर्वीच्या दुबळ्या राजसत्तेने आधीच दुबळ्या झालेल्या सिलोनी नागरिकांना ब्रिटिशांपुढे मान वाकवावी लागली व एकोणिसावे शतकात भक्कम पायावर सिलोनमध्ये ब्रिटिश राज्यकर्त्यांनी आपले पाय रोवले ही गोष्ट स्पष्ट आहे.

# सिलोनचे नवे राजकीय जीवन

विसाव्या शतकाची सुरवात हा सिलोनचा काल, राज्यव्यवस्थेचे व ब्रिटिश राजसत्तेचे महत्वाचे कालखंडाची सुरवात समजला पाहिजे. जवळजवळ या पन्नास वर्षाच्या काळात सिलोनची सर्व जुनी राज्यव्यवस्था कोलमडून पडली व ब्रिटिशांनी या बेटाला आपल्या मालकीची वसाहतीचा असे रूप दिले. सिलोनी जनतेवर राजसत्ता गाजविणारे ब्रिटिश साम्राज्याधिकारी सिलोनपासून शेकडो मैल दूर होते, पण त्यांचे कारभारी सिलोनमध्ये आपले राष्ट्रांचे निशाण फडकावून जुन्या सिलोनी राजसत्तेचे सर्वस्वी उच्चाटन कसे करता येईल या विषयी निरनिराळे बेत रचीत होते. या वेळी हिंदुस्थानमध्ये अढळ पाय रोवणारी ब्रिटिश राजसत्ता व सिलोनीमधील ब्रिटिश सत्ता यांनी स्थानिक राजवंशाला काबूत ठेवण्यासाठी योजलेले उपाय एकमेकापासून फारसे भिन्न नव्हते. ब्रिटिश राजसत्तेची जुनी साम्राज्यशाही व वसाहतवाद हे आजचे दोन शब्द १९ व्या अगर २० व्या शतकाचे सुरवातीला रूढ झाले नव्हते. ब्रिटिश हे पराक्रमी राष्ट्र आहे व त्यांचेपुढे मान वाकविली पाहिजे याच भावनेने कंदायन राजे त्यांना शरण गेले. या कंदायन राजघराण्याविषयीचा स्थानिक जनतेचा जिव्हाळा कमी व्हावा यासाठी ब्रिटिशांनी ब्रह्मदेश व हिंदुस्थानमध्ये जे उपाय योजले तेच उपाय सिलोनमध्ये योजले.

ब्रह्मदेशच्या थिबा राजघराण्याला ब्रह्मदेशमधून रत्नागिरी येथे दूरवर आणून ठेवण्यात आले होते. तसेच कंदायन राजवंशातील राजकुमारांना दक्षिण हिंदुस्थानात अगर मद्रास प्रांतात नेऊन ठेवून त्यांच्या प्रजाजनापासून दूर करण्यात आले. सिलोनमधील ब्रिटिश सरकारचे पेन्शनर म्हणून ते किती वर्षे जगले याचा इतिहासही मद्रास अगर केरळ प्रांतांत मिळू शकला नाही. ब्रिटिश लेखकांनी या कंदायन राजाचे वंशजाचा जो तुटपुंजा इतिहास लिहून ठेवला आहे. त्यावरून पाहता एका कंदायन राणीने आपले राजकुमारासाठी लग्नाची भेट म्हणून एक घोडा घेण्यासाठी त्या काळी ५००० रुपये ब्रिटिश सरकारकडे मागितल्याचा उल्लेख सापडतो. ही मागणी ब्रिटिशांनी मान्य केली किंवा नाही याचा पत्ता नाही, पण एवढे परावलंबित्व या राजघराण्याला आले होते.

१८६० पासून सिलोनसंबंधी ज्या हकिकती वाचावयास मिळतात त्यात ब्रिटिशांनी सिलोनचे रहिवाशी म्हणून तीन जमातींचाच उल्लेख केलेला आहे. एक राज्यकर्ते युरोपियन्स, दुसरे सिलोन महिला व युरोपियन आक्रमक यांचेपासून निर्माण झालेली प्रजा (बर्गर्ज जमात) व तिसरे स्थानिक सिलोनी नागरिक यात सिलोन वि. तामीळ नागरिक असा भेदभाव ब्रिटिश लेखकांनी दाखविलेला नाही. एका ब्रिटिश पत्रकाराने २० वे शतकाचे सुरवातीला सिलोनला भेट दिली असता, राज्यकर्ते ब्रिटिश व सिलोनी नागरिक यांचेमध्ये भाषाभिन्नतेमुळे एकोपा निर्माण झाला आहे, असे मला वाटत नाही. ब्रिटिश राज्यकर्त्यांचे समाजाला सिंहली जनतेशी एकरूप होण्यासारखी परिस्थिती सिलोनमध्ये निर्माण झालेली नाही, असेच म्हटले आहे. १८६८ साली सिलोनला भेट देणारा दुसरा एक ब्रिटिश पत्रकार सिलोनहून पाठविलेल्या बातमीपत्रात लिहितो, "सिलोनमधील गव्हनराची अमर्याद सत्ता पाहिली की मला आश्चर्य वाटू लागते. कंदायन राजाना सिंहली लोक 'राजुरवो' असा बहुमानार्थी शब्द वापरीत. तसाच बहुमानार्थी शब्द ब्रिटिश गव्हनरांना येथे लावण्यात येतो. गव्हनर या एका व्यक्तीत एवढी सत्ता ब्रिटिश राज्यकर्त्यांनी येथे यावेळी केंद्रित करून ठेविली होती की ती या बेटातील कर्तुम् अकर्तुम शक्ती वाटल्यास त्यात फारसे नवल नाही. त्यांचे प्रतीक राजधान्यांचे भेटीचे वेळी तो एखाद्या राजाप्रमाणे मिरवत जातो. बकिंगहॅम राजवाड्याप्रमाणे त्याचे राहण्याचे ठिकाण विलासी

असते. कधी कधी तर गव्हनर कोणत्याच समारंभाला हजर राहात नसे तेव्हा त्यांचा रिकामा घोडा समारंभाचे ठिकाणी आणून ठेवला जात असे व त्यालाही सिलोनी नागरिक तेवढाच मान देऊन अभिवादन करीत, "हाच बातमीदार" आपल्या या सिलोन गव्हनराला काही वर्षांनी इंग्लंडमध्ये पाहतो, त्यावेळी दुकानातील एखादी वस्तू साध्या नागरिकाप्रमाणे पाहात उभा असलेला तो दिसला," असे लिहितो. हिंदुस्थानप्रमाणे १८७० नंतर सिलोनमध्ये कारभार चालविण्यासाठी ब्रिटिशांनी आपले आय. सी. एस. अधिकारी गव्हनरांचे मदतीस पाठवावयास सुरवात केली. १९०४ साली असे सिव्हिल सर्व्हंटस् गव्हनरचे दुय्यम अधिकारी म्हणून सिलोन-मध्ये दिसू लागले. पण जसजसा इंग्रजी शिक्षणाचा प्रसार सिलोनमध्ये झपाट्याने होऊ लागला तसतसे बरेच तरुण सिंहली व तामीळ अधिकारी मोठ्या महत्त्वाच्या जागांवर येऊ लागले व त्यांचा या ब्रिटिश आय. सी. एस. अधिकाऱ्यांना स्थानिक राज्यकारभाराचे दृष्टीने चांगला उपयोग होऊ लागला. पण सुरवातीला अशी स्थिती होती की ४० चौरस मैलांचे प्रदेशांत एखादा ब्रिटिश प्रमुख आय. सी. एस. सिलोनी नागरिकांवर राज्यकारभार करीत असे व स्थानिक अधिकाऱ्यांचे भरपूर साहाय्य घेतल्याशिवाय त्याचे चालत नसे. यासाठी भरपूर पगार देऊन काही इंग्रजी अधिकाऱ्यांना त्या जागी दुय्यम म्हणून नेमावे लागे. १८७० पर्यंत तरी सिलोनपर्यंतचा या इंग्लिश सिव्हिल सर्व्हंटस्‌चा प्रवास फारसा सुखाचा होत नसे. बोटीने कितीतरी दिवस काढून या दूरवरचे प्रदेशात यावयास या सिव्हिल सर्व्हंटस् अधिकाऱ्यांच्या पत्नी अगर ब्रिटिश मळेवाल्यांच्या इंग्लिश पत्नी तयार नसत. त्याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. सिलोनमधील या सुखासीन आयुष्यात या ब्रिटिश तरुणांचे लक्ष सिंहली व तामीळ तरुणींकडे विशेष वेधू लागले. विशेषतः चहा कॉफीच्या मळ्यावर कित्येक बेवारशी मुले जन्म घेऊ लागली व त्यांचे वंशज आज 'बर्गर्ज' या नामाभिधानाने अजूनहि सिलोनमध्ये ओळखले जातात. त्यांच्या व्यवसायांची सोय या मळेवाल्यांनी प्रथमपासून उत्तम केली. या ब्रिटिश मळेवाले व ब्रिटिश सिव्हिल सर्व्हंटस् यांचेबरोबर आलेल्या ब्रिटिश कॅथॉलिक मिशनरी मंडळींनी मात्र फार मोठे कार्य सिलोनमध्ये केले. सिलोनमधील इंग्रजी शिक्षणाची जबाबदारी सर्व मिशनरी लोकांनी अंगावर घेतली. डच आक्रमकांनी चर्चची निर्मिती केली व ब्रिटिश मिशनरी मंडळींनी ती पुढे वाढीस लावली. ही गोष्ट सिलोनमध्ये मान्य केली जाते. या मिशनऱ्यांना

राजसत्तेचा भरपूर पाठिंबा मिळत गेल्याने त्यांचे ख्रिश्चन धर्माचे प्रचारालाही यावेळी भरपूर मदत झाली. सिलोन म्हणजे प्रथमपासून बुद्ध धर्मीयांचे प्रमुख केंद्र तेथील बौद्ध भिक्कूंनी या प्रचाराला यावेळी भरपूर विरोध केला व राज्यकर्त्यांचे मार्गातील विघ्ने निर्माण होण्याची चिन्हे दिसू लागताच या मिशनऱ्यांना प्रचाराचे काम थांबविण्याच्या सूचना राजकर्त्यांना द्याव्या लागल्या. त्यांनी आपले लक्ष इंग्रजी शिक्षणावर केंद्रित करावे अशी सूचना त्यांना मिळाल्याने बरेच सिलोनी नागरिक उत्तम नोकरी मिळण्याचे अभिलाषेने भराभर या मिशनरी शाळातून इंग्रजी शिकू लागले. यावेळी हिंदुस्थानपेक्षा फार निराळी परिस्थिती सिलोनमध्ये होती. बहुसंख्य सिंहली बुद्धधर्मीय असल्यामुळे त्यांचेमध्ये जातिभेद नव्हते. उच्चनीच जातीच्या भावना नव्हत्या. पण हिंदमधून आलेल्या तामिळी कामगारांत मात्र स्पृश्यास्पृश्य वगैरे भेद होते. त्याचा फायदा जसा हिंदमध्ये घेतला गेला तसा सिलोनी मिशनऱ्यांनीही घेऊन तामिळी अस्पृश्यांना ख्रिश्चन धर्माची दीक्षा देण्यात पुढाकार घेतला. पण ही ख्रिश्चन होणारांची संख्या येथे हिंदुस्थान एवढी मोठी नव्हती. पण सिलोनमधील आजचे ख्रिश्चन बरेच हिंदी अस्पृश्य आहेत.

या वेळपर्यंत प्रथमपासून धार्मिक आचार–विचारांत पुढे गेलेल्या बौद्ध धर्मियांनी आपल्या शाळा काढल्या आणि मिशनरींच्या तोडीचा शिक्षणप्रचार सुरू केला. ख्रिश्चन मिशनरींच्या तोडीस तोड अशी बुद्धगीते या शाळातून म्हटली जाऊ लागली व सिलोनच्या बुद्ध संस्कृतीला आणखी उजळा मिळाला. या परिस्थितीत या शिकू लागलेल्या सिलोनी जनतेला राज्यकारभाराचे काही अधिकार देणे ब्रिटिश राज्यकर्त्यांना भाग पडले. गव्हनरांच्या मदतीस स्थानिक नागरिकांचे कौन्सिलची अशी फारशी आवश्यकता नाही असाही सूर सिलोनी गव्हनरांच्या पत्रातून येत होता. पण ब्रिटिश राजसत्तेने या विरोधाकडे फारसे लक्ष दिले नाही. लॉर्ड हटन या गव्हनराचे कारकीर्दीत अशा तऱ्हेचे १६ सभासदांचे लेजिस्लेटिव्ह कौन्सिल गव्हनरांचे मदतीस देण्यात आले. त्यात तीन सिलोनी नागरिक, तीन युरोपियन मळेवाल्यांचे प्रतिनिधी व दहा प्रमुख जागांवरील अधिकारी याप्रमाणे सोळाजण असत. यातील दहा अधिकारी मतदानाचे वेळी गव्हनरांचे मताप्रमाणे मते देत व सहा नॉमिनेटेड सभासद फक्त आपली स्पष्ट मते प्रदर्शित करून स्वस्थ बसत. म्हणजे निर्णय गव्हनर म्हणतील तोच, गव्हनरांना

हवा तसा कायदा या कौन्सलमध्ये पास करून घेणे नेहमीच शक्य असे. सिलोनमध्ये असलेल्या सैन्यावर बराच पैसा सिलोनी अंदाजपत्रकातून खर्ची पडत असे व त्यावर हे नागरी प्रतिनिधी सडकून टीका करीत. तर मळेवाल्यांचे प्रतिनिधी सिलोनमधील रस्ते सुधारून वाहातूक नीट सुरू व्हावी म्हणून धडपडत. सिलोनी मळेवाल्यांचे हाती सिलोनी पैसा भरपूर असे व ते आपल्या सुधारणा सरकारची वाट न पाहता करून घेत. पण या नागरिक प्रतिनिधींच्याकरवी सिलोनमधील बऱ्याचशा सुधारणा तातडीने उरकणे गव्हनरांना शक्य झाले ही गोष्ट तितकीच खरी आहे. विसावे शतकाचे सुरवातीला सिलोन ही वसाहत अशातऱ्हेने ब्रिटिश सरकारचे नजरेत प्राम्युख्याने भरण्याइतकी निर्यातीचे दृष्टीने महत्त्वाची वसाहत झाली, एवढेच नव्हे तर अति पूर्वेकडील मलाया–सिंगापूरसारख्या ब्रिटिश वसाहती व ऑस्ट्रेलियासारख्या मित्र राष्ट्रांबरोबर स्नेहसंबंध ठेवण्यासाठी नाविक मार्गावरील एक मुक्कामाचा महत्त्वाचा तळ म्हणून सिलोनचा उपयोग ब्रिटिश बोटी ताबडतोब करू लागल्या. त्यामुळे हिंदी महासागरातील ब्रिटिश हालचाली वाढल्या व ब्रिटनचे नाविक वर्चस्व या भागात प्रस्थापित झाले. हळूहळू सिलोनमधील राज्यव्यवस्थेसाठी स्थानिक पोलीस दल निर्माण करण्यात आले व त्यांना हिंदमधील काही ब्रिटिश पोलीस अधिकारी शिक्षण देण्यास आले. त्यामुळे ब्रिटिश लष्कराला या टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत नाचविविण्याचा ताण कमी झाला.

विसाव्या शतकातील पहिली वीस वर्षे तरी सिलोनमधील ब्रिटिश गव्हनरांनी शाळांसारख्या सुधारणा उत्तम राबवून शिक्षित तरुण पिढी निर्माण करण्यात घालविली. याचा परिणाम असा झाला की सिलोनी नागरिकांना आपले हक्काची जाणीव होऊ लागली. ब्रिटिश चहाचे मळेवाल्यांनी सिलोनच्या चहाकॉफीचे मळ्यावर मिळविलेली संपत्ती त्यांचे डोळ्यांसमोर दिसू लागली. आपल्या भूमीतील ही संपत्ती ब्रिटिश नागरिक लुटीत आहेत असे सूर स्थानिक चळवळीतून निघू लागले. त्यांच्या शिक्षणाबरोबर त्यांची वृत्तपत्रे सिलोनमध्ये निघू लागली. 'यंग सिलोन' नावांचे पत्रात ब्रिटिश देत असलेल्या शिक्षणाविषयी यावेळी असे लिहिले जात होते की, "राज्यकर्त्यांचे स्वार्थी हेतू फलद्रुप व्हावे म्हणून ते जुजबी इंग्रजी शिक्षण आम्हाला देतात. छोटया छोटया जागांवर

आमची नेमणूक केली जाते. यामुळे तिरस्कार मात्र अधिक निर्माण होतो व आपल्या महत्त्वाकांक्षा फलद्रुप करण्याची काही साधने या ब्रिटिश देत असलेल्या शिक्षणात काही आहेत असे मला वाटत नाही." वरील उद्गारावरून शिक्षित सिलोनी तरुणांच्या मनात ब्रिटिश राजकर्त्यांविषयी कोणत्या भावना निर्माण होत होत्या त्याची कल्पना येण्यासारखी आहे. सिलोन गव्हनरच्या मदतीस देण्यात येणाऱ्या कौन्सिलवर बिनसरकारी सभासद घेण्याची प्रथा १८३३ पासून सुरू झाली व १८६६ पर्यंत तर गव्हनर निर्माण करतील त्याच प्रश्नावर त्यांना चर्चा करता येत असे. याबाबत वसाहत खात्याकडे तक्रारी गेल्यामुळे त्यानंतर सरकारी अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचे अधिकार त्यांना मिळाले. हे तुटपुंजे अधिकार गव्हनर त्यांना नाममात्र उपभोगू देत, त्यामुळे प्रचलित राजसत्तेविषयी सिलोनमध्ये वाढती अप्रियता पुढारी मंडळीत निर्माण झाली व त्याचे परिणाम विसाव्या शतकातील पहिल्या वीस वर्षांत प्रामुख्याने दिसू लागले.

यातूनच विसावे शतकाचे सुरुवातीला शिक्षित सिलोनी जनतेने 'नॅशनल असोसिएशन' नांवाची एक राष्ट्रीय संस्था पी. रामनाथन् यांनी प्रस्थापित केली. या संघटनेचा जन्म सुरुवातीला शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सी. एस. डी. सोयसा नांवाचे सिलोनी गृहस्थांनी काढलेल्या सिलॉन ॲग्रिकल्चरल असोसिएशन नांवाचे संस्थेतून झाला. याचवेळी सिलोनमधील मुसलमान व कंदायन जनता लक्षात घेऊन त्यांचे एकएक प्रतिनिधि गव्हनरांचे कौन्सिलवर घेण्यात आले. या कौन्सिलचा थाट मोठा और असे व प्रत्येक सभासदाचे वैशिष्टय त्याच्या कपडयांवरून स्पष्ट होई. कंदायन सभासद आपला सणासुदीचा पोषाख घालून त्यावरून आपले पद्धतीचा अंगरखा घालीत, तर तामीळ सभासद लांब शेरवानी पेहरत. मुस्लीम सभासद युरोपियन वेषात येत व वरती फक्त फेझ टोपी असे. या प्रत्येक सभासदाचे नांवापुढे एम. एल. सी. लावले जात असे.

या सुधारणेबरोबर आणखी एक स्थानिक सुधारणा एकोणिसाव्या शतकाचे शेवटच्या वर्षांत झाली ती म्हणजे सिलोनमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थापना होय. कलंबो व कँडी या दोन महत्त्वाचे ठिकाणी येथे १८६६

सि.—४

साली म्युनिसिपालिटचा स्थापन होऊन त्याचे हाती नगरव्यवस्थेचा कारभार देण्यात आला होता व यानंतर दक्षिणेकडे गॉल या शहराला हे अधिकार देण्यात आले. ज्या सुधारणा हिंदुस्थानात होत होत्या, त्यांचे लोण अशा तऱ्हेने वसाहत खात्याचे आज्ञेनुसार सिलोनपर्यंत येऊन पोहचत असे. सिलोनमधील शिक्षणाच्या वाढत्या प्रसाराबरोबर सिलॉन नॅशनल असोसिएशनप्रमाणे आणखी कांही संस्था निघू लागल्या. त्याचे सुरवातीचे स्वरूप सामाजिक सुधारणांचे स्वरूपाचे असे व नंतर त्याचे राजकीय चळवळीत रूपांतर होत असे. अशाच तऱ्हेने सिलोनी फॉर्म्स लीग नांवाच्या राजकारणी मंडळींच्या संस्थेची १९१७ साली स्थापना झाली. या संघटनेत एकत्रित आलेली राजकीय मंडळे आता सिलोनच्या सुधारणासाठी इंग्लंडला शिष्टमंडळे नेण्याच्या गोष्टी बोलू लागली होती. मि. जेम्स पीरिस, एच. जे. सी. परेरा, ई. डब्ल्यू. परेरा, डी. बी. जयतिलकं व पी. रामनाथन् यांचे एक शिष्टमंडळ सिलोनमध्ये राजकीय हक्काची मागणी करण्यासाठी इंग्लंडला जाऊन त्यांनी तेथील काही मंत्र्यांच्या व सिलोनविषयी सहानुभूती बाळगणाऱ्या पार्लमेंट सभासदांच्या भेटी घेतल्या. पण सिलोनी जनतेला कोणतेही जादा अधिकार द्यावयास गव्हनरांचा विरोध असल्यामुळे या शिष्टमंडळाची भेट ताबडतोब तरी फलद्रुप झाली नाही. गव्हनरांच्या मते सिलोनी जनतेत एकी नाही तर त्यांचे मध्ये जातीय तेढ आहे. कॅंडी येथे असलेल्या बुद्धाच्या मिरवणुकी वाजत गाजत मशिदीवरून नेण्यावरून स्थानिक मुसलमान व बुद्ध यांचेमध्ये १९१५ चे मे महिन्यात दंगल माजली. अशा दंगली लष्करी कायदा पुकारून आम्हाला आटोक्यात आणाव्या लागतात. तेव्हा दिलेले अधिकार नीट वापरावयास ही जनता योग्य नाही. १९१५ चे दंगलीपासून स्थानिक गव्हनर व बुद्धजनता व त्यांचे पुढारी यांचेमधील बेबनाव वाढू लागला. त्यांचे अनेक अर्ज इंग्लंडकडे जाऊ लागले व १९१७ साली सिलोनी नागरिकांचे इंग्लंडला. गेलेल्या शिष्टमंडळाने याची अखेर गांठली. या प्रकारानंतर इंग्लंडमध्ये जे काही लेख प्रसिद्ध झाले, त्यात सिलोनी जनतेला सिलोनचे कारभारी नीट वागवीत नाहीत, त्यांना त्यांच्या मनस्थितीची नीट कल्पना येत नाही, असे विचार प्रदर्शित केलेले आढळतात. सिलोनी शिष्टमंडळाने ब्रिटिश पुढाऱ्यांचे भेटीगाठीत घडवून आणलेला मतप्रणालीतील फरक यानंतर त्यांना मिळालेल्या मूलभूत सुधारणांचा पाया ठरल्यास त्यात नवल नाही.

सिलोन रिफॉर्म लीगचे १९१७ चे सेक्रेटरी मि. पोनम्बलम् अरुणाचलम् यांनी त्यावेळचे सेक्रेटरी ऑफ स्टेट यांना पत्र लिहून आपले प्रतिनिधी करवी सिलोनमधील परिस्थितीची पाहणी करण्याची विनंती केली. सेक्रेटरी ऑफ स्टेटने यासाठी सरजॉन अँडसन यांना सिलोनला चौकशीसाठी पाठविले पण त्यांचा सिलोनसंबंधीचा अहवाल पुरा होण्यापूर्वी ते एकाएकी आजारी. पडले. २४ मार्च १९१८ रोजी कलंबो येथे मरण पावले. त्यांनी सिलोनमधील युरोपियन नागरिकांची किंचितही पर्वा न करता निष्ठेने जी चौकशी केली तिचेबद्दल सिलोनी जनतेमध्ये फार आदर उत्पन्न झाला. सर वुईल्यम निंगनी सिलोनचे गव्हनराचे जागेचा चार्ज १९१८ सप्टेंबरला घेतला व १९१९ साली सिलोनसाठी नव्या सुधारणा हाऊस ऑफ कॉमन्सपुढे मांडण्यात आल्या. या सुधारणासंबंधी विचार करण्यासाठी सिलॉन नॅशनल काँग्रेसची बैठक ११ डिसेंबर १९१९ रोजी सर पोनम्बलम् अरुणाचलम, यांचे अध्यक्षतेखाली भरली होती. ही नॅशनल काँग्रेस म्हणजे हिंदी काँग्रेसची सुधारून वाढविलेली आवृत्ती होती. त्यांत रिफॉर्म लीग व नॅशनल लीगमधील सिलोनी राजकीय पुढारीच होते.या नव्या सुधारणांत गव्हनरांच्या कार्यकारी मंडळात सिलोनमधील नागरिकांतून एक सिंहली, एक तामीळ व एक ब्रिटिश प्रतिनिधि घ्यावा व त्याचे मदतीला असलेल्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये ३७ सभासद असावे असे सुचवण्यात आले. या सदतीस सभासदात २३ बिनसरकारी सभासद असून त्यातील ११ निरनिराळ्या मतदार संघांनी निवडून द्यावयाचे होते व आठ प्रतिनिधी जातीय मतदार संघांतून निवडावयाचे होते. या सुधारणा अपुऱ्या असल्याचा ठराव काँग्रेसने पास केला, काहींनी तर सरकारशी असहकाराची चळवळ सुरू करण्याची योजना आखली. यानंतर गव्हनर मॅनिंग यांनी ब्रिटिश सरकार व काँग्रेस यांचेमध्ये मध्यस्थी करून एक वर्षपर्यंत सुधारणा राबवाव्या व त्यात ज्या अडचणी येतील त्यानुसार या घटनेत सुधारणा कराव्या अशी सूचना केली व ती मान्य होऊन काँग्रेसने १९२० च्या या सुधारणा राबविण्यास मान्यता दिली व सिलोनचे राजकीय आयुष्यातील एका नव्या पर्वाला यावेळी सुरुवात झाली. ही सुधारणा मान्य करताना काँग्रेस श्रेष्ठींत मतभेद झाले व नव्या सुरू झालेल्या काँग्रेसमध्ये दुफळी झाली.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १००03

# सुधारणांबरोबर विरोध वाढला

एकोणिसशे एकवीस नंतरचा कालावधी सिलोनच्या आयुष्यातील हक्क संरक्षणासाठी जनतेच्या लढ्याचा काळ समजावा लागेल. यावेळीच काँग्रेस व वसाहतीतील अधिकारी यांचेमधील मतभेद तीव्र होत गेले व सिलोनी पुढाऱ्यांनी इंग्लंडमधील कर्नल वेजफर्ड, रॅम्से मकडॉनल्ड यांचेसारख्या पुढाऱ्यांशी संधान साधून आपले प्रश्न त्यांचेपुढे मांडावयास सुरवात केली व त्याचे प्रतिध्वनि पार्लमेंटमध्ये उमटू लागले. सिलोनच्या ज्या नागरी हक्कांची जाणीव होऊं लागली होती, ते हक्क तुमच्याशी सामोपचाराची बोलणी करूनच आम्हाला मिळवावयाचे आहेत, अशी भाषा काँग्रेस पुढारी यावेळी वापरीत असत.

कलंबो बंदरातून ब्रिटिशांच्या निर्यात व आयात मालाची देवघेव एवढी जोरात सुरू झाली होती की व्यापारावर सर्वस्वी ब्रिटिश प्रभुत्व आहे असे सर्व जगाला वाटत असे. या वाढत्या व्यापारामुळे कामगारांची संख्या सिलोनमध्ये एवढ्या झपाट्याने वाढू लागली की हिंदुस्थानातून कल्पनेबाहेर लोक सिलोनमध्ये रोजगारासाठी येऊ लागले. कामगारांचे जीवन हा एक सिलोन काँग्रेसचा चिंतनाचा विषय झाला. वस्तूंचे भाव वाढू लागले, पण मजूरीचे दर ठरविणे ब्रिटिश मळेवाले व कलंबोचे राजकर्ते यांचे हाती असल्याने ते वाढेनात. त्यामुळे प्रत्येक उद्योगधंद्यातून संपाची वावटळ उठू लागली व सिलोन शिक्षित

पुढारी या कामगार दलिताचे प्रश्न सोडविण्यासाठी पुढे येऊ लागले. १९२० ला कलंबो पोर्टट्रस्ट व वर्कर्सचा संप व १९२३चा रेल्वे कामगारांचा संप हे दोन संप या राष्ट्रांतील कामगार उठावाची सूचना होती. ए. ई. गुणसिंह नांवाचे तरुण डाव्या पुढाऱ्यांनी यावेळी कामगारांचे नेतृत्व पत्करून त्यांना बरेच नवीन हक्क मिळवून दिले. कायद्याचा विद्यार्थी व एक शिक्षक असताना कलंबोसारख्या ठिकाणी गुर्णसिह यांनी कामगार चळवळ आपले हाती घेतली व जवळजवळ १९२९ पर्यंत कामगार चळवळीची सर्व सूत्रे या मजूर पुढाऱ्यांचे हाती होती. एकीकडे मजूर चळवळ अशा तऱ्हेने वाढीस लागली असता, काँग्रेस घटनाकत्मक राजकारणाभोवती घुटमळत होती व कौन्सिलच्या निवडणुका व त्यात तामीळ व सिलोन भेदभावावर आधारलेल्या निवडणुका या गोष्टी प्रामुख्याने चालू होत्या. १९३० साली अरुणाचलम्, एच्. जे. सी. परेरा, सेनानायकं वगैरे पुढारी मरण पावले व मागाहून आलेल्या सिलोनी मंडळींत तरुण तामीळ गट व सिंहली गट यांचेमध्ये वाढती भांडणे सुरू झाली. तामीळ नागरिकांसाठी कौन्सिल-मध्ये स्वतंत्र जागांची मागणी होऊ लागल्यामुळे सिलोनी व तामीळ पुढाऱ्यातील मतभेद वाढू लागले व बऱ्याच तामीळ पुढाऱ्यांनी सिलोन नॅशनल काँग्रेसमधून बाहेर पडून तामीळ महाजन सभेची स्थापना जाफना येथे केली. उत्तरेकडील हा गट स्वतंत्रपणे आपले हक्कांसाठी भांडू लागला. तरीपण कलंबो व दक्षिणे-कडील बरेच तामीळ वकील व इतर धंदेवाईक सिलॉन नॅशनल काँग्रेसमध्ये होते. यावेळी काँग्रेसमधील बर्गर्ज (अँग्लो सिलोन) पुढाऱ्यांनीही आपलेसाठी स्वतंत्र जागा हवी अशी काँग्रेसमध्ये येऊन मागणी केली. काँग्रेसने ही जमात आपले बाजूला यावी म्हणून त्यांना एक जागा मिळवून दिली. पण बर्गर्ज जमात काँग्रेसशी एकरूप होऊ शकली नाही व ती सदैव ब्रिटिशांचे बाजूलाच राहिली. व सिलोनमधील ब्रिटिशांना ते अजूनही आपले मोठे आधार वाटतात.

यावेळी सिलॉन नॅशनल काँग्रेसने घटना सुधारणेसंबंधी केलेल्या मागणीत प्रादेशिक प्रतिनिधित्वाला प्रभुत्व दिले व सत्ता जनतेच्या हाती यावी म्हणून प्रयत्न सुरू केले. तर तामीळ सभेचा कल गटांना प्रभुत्व देण्याकडे होता. या दोन्ही मागण्यांचा विचार करून १९२४ साली सिलोनला दिलेल्या सुधार-णांनी बिनसरकारी सभासदांना जादा अधिकार मिळाले व सरकारी गटांचे हाती

सदैव गुंतलेली मान किंचितशी सैल झाली. या १९२४ चे सुधारणान्वये लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमधील सभासदांची संख्या ४९झाली. त्यात १२ सरकारी अधिकारी, प्रादेशिक निवडणूक लढवून येणारे २३ प्रतिनिधी, अकरा भाषिक जमातीचे प्रतिनिधी यात तीन युरोपियन्स, दोन बर्गर्ज, दोन हिंदी, तीन मुसलमान व एक पश्चिम मतदारसंघातील तामीळ भाषा बोलणारांचा प्रतिनिधी असे. याशिवाय सिंहली, बर्गर्ज व तामीळ गटांचा एकएक प्रतिनिधि सरकारनियुक्त सभासद म्हणून या कौन्सिलात येत असे. यामुळे वाढलेल्या बिन–सरकारी सभासदांनी एकत्रित येऊन सरकारला नको असलेला, एखादा कायदा पास केला, तर तो बाजूला सारण्याचा हातचा अधिकार मात्र गव्हनरांना देऊन ठेवण्यात आला होता. गव्हनरांच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्ये मात्र कोणतीच सुधारणा करण्यात न आल्याने राजकारभाराचे सर्व अधिकार गव्हनर व त्यांचे सहकाऱ्यांच्या हाती राहिला. त्यामुळे हाती कोणतीच नवी सत्ता नसल्याने काँग्रेसची निराशा झाली. गव्हनरांचे एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्ये घेण्यात आलेल्या बिनसरकारी सभासदांना महत्त्वाची खाती कधीच मिळत नसत. यात थोडी सुधारणा करावी म्हणून आणखी तीन बिनसरकारी सभासदांना गव्हनरांचे एक्झिक्युटिव्ह कौन्सिलवर जागा देण्यात आल्या. त्यात एक सिंहली, एक तामीळ व एक युरोपियन सभासद घेण्यात आले. याच वेळी ब्रिटिश सरकारनी दिलेल्या सुधारणा राबविण्याबाबत हिंदमध्ये काँग्रेसने सुरू केलेली चळवळ ब्रिटिश राज्यकर्त्यांना काळजीत टाकणारी होती. यामुळे १९२४चे सिलोनी सुधारणाविषयी फारच दबकत दबकत ब्रिटिश सरकारपुढे पाऊल टाकीत होते. या सुधारणांचा परिणाम सिलोनमधील वाढत्या शिक्षित समाजावर कसा होतो ते पाहण्यासाठी तिघा स्वतंत्र कमिशनरांची नेमणूक ब्रिटिश सरकारने केली होती व त्यांचे अहवालानुसार सिलोनमधील सर्व भावी सुधारणांची सूत्रे हालवावीत असे ठरविण्यात आले. नव्या सुधारणान्वये निवडून आलेल्या बिनसरकारी सभासदांना पहिली मागणी जर कौन्सिलमध्ये कोणती केली असेल तर ती साम्राज्यान्तर्गत वसाहतीचे स्वराज्याची होय व त्याच अनुरोधाने सिलोनमधील काँग्रेसच्या मागण्या करण्यात येऊ लागल्या. या मागणीमुळेही सिलोनमधील ब्रिटिशांच्या हितसंबंधात धोका पोहोचणार असे ब्रिटिशांना मनातून वाटू लागले. कारण याबरोबर संपूर्ण स्वराज्य व स्वातंत्र्याच्या घोषणाही काही जहाल लोकांकडून सुरू झाल्या होत्या.

यापेक्षा साम्राज्यान्तर्गत स्वराज्याची मागणी बरी असा अहवाल नेमलेल्या कमिशनरांनी ब्रिटिश सरकारला पाठविला होता. काँग्रेसकडून एक मागणी मात्र सतत केली जात होती ती म्हणजे गव्हनरांच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलची सुधारणा करून त्यात बिनसरकारी सभासदांचे बहुमत होणे आवश्यक आहे ही होय. या योजनेनुसार कौन्सिलच्या अधिकारात थोडी बहुत सुधारणा करण्यात आली. अर्थ, परराष्ट्र खाते व संरक्षण ही तीन महत्त्वाची खाती तीन युरोपियन सभासदांकडे ठेवून इतर सर्व खात्यांची सत्ता सात समित्यांचे हाती द्यावी व या प्रत्येक समितीवर एकएक कौन्सिलचा बिनसरकारी सभासद अध्यक्ष यावा व हे सात सभासद व तीन महत्त्वाचे खात्याचे तीन ब्रिटिश सभासद मिळून दहा सभासदांचे कौन्सिल ऑफ मिनिस्टर्स बनवून त्यांचे हाती गव्हनरांचे राज्य-कारभाराची सूत्रे देण्यात यावी, अशी सूचना नेमलेल्या कमिशनरांनी केली.यामुळे सर्व कारभाराची सूत्रे हाती ठेवणाऱ्या गव्हनरांनी दहा लोकांचे सल्ल्याने काम करणे भाग होते. तीन महत्त्वाची खाती ब्रिटिश सभासदांचे हाती असल्यामुळे त्याची सत्ता पूर्णपणे गव्हनरांचे हाती होती. पण यात एकच मोठा दोष राहून गेला होता, तो म्हणजे मतदानाचे हक्कांचा होय. ज्या सभासदाचे उत्पन्न दर-महा ५० रुपयांचेवर असेल असे लोक मतदानास योग्य ठरविण्यात आले. रबराचे मळ्यातील उत्पादन इतके वाढलेले होते की एवढे उत्पन्न साध्या काम-गाराला या काळात केव्हाही मिळत असे व त्यांच्या मतावर कोणताही मळेवाला अगर त्याचा प्रतिनिधी निवडून येऊ शकला असता. निवडणुकीचे पद्धतीतील ही गैरसोय सिलोनमध्ये एक टीकेचा विषय झाली होती. तेव्हा सुधारणा सुचविण्या-साठी नेमलेल्या कमिशनने प्रत्येक वयात आलेल्या पुरुषाला व तीस वर्षे वयाचे स्त्रीला मतदानाचा अधिकार असावा अशी एक सूचना करून ती कौन्सिलपुढे चर्चेसाठी टाकली व त्यावर फारच साधक-बाधक चर्चा झाली व निर्णायक असा कोणताही निकाल यावेळी घेण्यात आला नाही. यावेळी काँग्रेसनेही हिंदी चळवळीचे धोरण डोळ्यापुढे ठेवून सिलोनसाठी स्वायत्त सरकारची (सेल्फ गव्हनमेंट) मागणी केली व सिलोनी सुधारणांना एक नवी धार येऊ लागली. यावेळी कौन्सिलमध्ये मतदानहक्कांचे प्रश्नांवर झालेल्या चर्चेत सिलोन नागरिक तामीळ, हिंदी यांचेमध्ये निर्माण झालेल्या भेदभावाला कशी सुरवात

झाली होती याची कल्पना येण्यासारखी आहे. यावेळी हा २१ वर्षांवरील मतदानांचा अधिकार फक्त सिलोनी नागरिकांना असावा व जे ब्रिटिश नागरिक हिंदमधून आलेले लोक आहेत त्यांना शिक्षण व उत्पन्नाची अट घालूनच हा मतदानाचा अधिकार द्यावा अशी सूचना सिंहली पुढाऱ्यांनी केली. त्यावेळी उत्तरेकडील तामीळ सभासदांनी या सिलोनी वृत्तीला चांगलाच विरोध केला. यावेळी सेनानायकं यांनी केलेले भाषण चांगलेच गाजले. ते म्हणाले "आमचे हिंदी बांधव आम्हाला परके वाटत नाहीत. त्यांनी सिलोनशी एकरूप होऊन मतदानाचा हक्क मिळवावा ही आमची इच्छा आहे." चहाचे मळ्यांवर काम करणाऱ्या तामीळ कामगारांनी मतदानाचे अधिकार देणे म्हणजे युरोपियन मळेवाल्यांना सहजासहजी निवडून आणण्यास मदत करणे होय, अशीही टीका यावेळी गृहात झाली.

विशेषत: सिलोनमधील तामिळी नागरिकांविषयी सिंहली पुढाऱ्यांनी कौन्सिलमधील प्रतिनिधींनी दाखविलेल्या अविश्वासामुळे १९३०पासूनच सिंहली व तामीळ भाषा प्रेमियांचा वाद सर्वत्र उफाळून येऊ लागला. सिलोनसाठी इंग्लंडने जी नवीन घटना अंमलात आणावयाचे ठरविले होते, त्यासंबंधी काँग्रेसचे सर्वसाधारण धोरण समजूतदारपणाचे होते, पण काँग्रेसमधील सिंहली व तामीळ पुढाऱ्यात निर्माण झालेली चढाओढ व द्वेषभावना दोन्ही गटांना मोठी पोषक नव्हती. १९२९ चे जून महिन्यात सिलोनचे गव्हनर सर हबर्ट स्टॅन्ले यांनी नव्या सुधारणाविषयी सिलोनमधील प्रतिक्रियेबद्दल आपले मत ब्रिटिश सरकारला कळविले. त्यात कमिशनने केलेल्या नव्या सुधारणा अंमलांत आणू नये असा मानणारा मी नाही, परंतु या सुधारणाबद्दल कौन्सिलमध्ये जी निरनिराळया पुढाऱ्यांची भाषणे झाली त्यावरून पाहता या १९२८चे डोनमो कमिशनच्या सुधारणांना विरोध करणारेच सिलोनी सुशिक्षितात अधिक आहेत असे मला वाटते असे म्हटले होते. या चर्चेच्या अनुरोधाने सिलोनला देऊ केलेल्या या सुधारणात थोडा फेरबदल करण्याची माझी इच्छा आहे, असेही त्यांनी या अहवालात म्हटले होते, पण त्यांचाही अहवाल ब्रिटिश सरकारला पोहोचण्यापूर्वी ब्रिटिश कॉन्जरव्हेटिव्ह सरकार बदलून मजूर सरकार अधिकारावर आले. मि. ॲमरि यांचे हातची वसाहतखात्याची सत्ता

जाऊन त्या जागी सिडनी वेब हे आले. यावेळी पार्लमेंटरी अँडर सेक्रेटरी ऑफ स्टेट मि. ड्रमन्डशिल्ड हे होते.हेच गृहस्थ डोन्मो कमिशनवर मजूर पक्षाचे सभासद म्हणन काम करीत असल्यामुळे गव्हनरांनी केलेल्या सुधारणा अर्थात कपाटात पडल्या व जुन्या सुधारणावर पुन्हा विचारविनिमय सुरू झाला. मजूर सरकारने सिलोन गव्हनरांच्या सर्व सुधारणा जरी स्विकारल्या नाहीत तरी काही महत्त्वाचे मुद्यांचा विचार सिलोनसाठी नवी घटना तयार करताना केला व त्यांचा आराखडा सिलोनपुढे टाकला. १९२९ साली १२ डिसेंबरात या नव्या सुधारणा सिलोन कौन्सिलने अवघ्या दोन मतांच्या बहुमताने मान्य केल्या व नव्या सुधारणान्वये निवडणुकांची तयारी सुरू झाली.

या नव्या सुधारणाअन्वये १९३१ साली नव्या कौन्सिलच्या निवडणुका घेण्याचे निश्चित करण्यात आले. यात जनतेने निवडून दिलेले पन्नास प्रतिनिधी कौन्सिलात राहणार होते. तीन प्रमुख अधिकारी व आठ सरकारनियुक्त सभासद मिळून ६१ सभासदांचे हे कौन्सिल होते. या सभासदांच्या सात समित्या अनुक्रमे १ गृह, २ शेती व जमीन, ३ स्थानिक कारभार, ४ मजूर, ५ उद्योगधंदे, व्यापार, ६ शिक्षण व ७ वाहतूक व पी. डब्ल्यू. डी. खात्याचा कारभार पाहणार होत्या. या सात समित्यांचे चेअरमन त्या त्या खात्यांचे मंत्री समजण्यात येणार असून हे सात मंत्री व तीन प्रमुख खात्यांचे (परदेशसंबंध, संरक्षण व अर्थखाते) ब्रिटिश अधिकारी यांचे मंत्रिमंडळ गव्हनरांचे मदतीस राहणार असून त्यांचा सल्ला पदोपदी गव्हनरांनी घ्यावा, अशा सूचना सिलोन गव्हनरांना इंग्लंडमधून देण्यात आल्या होत्या. या नव्या सुधारणामुळे सिलोनमधील जनतेच्या प्रतिनिधींना जरी राज्यकारभारात अधिक भाग घेण्याची संधी मिळाली होती तरी वसाहतीच्या गव्हनरांची व त्यांच्या ब्रिटिश सल्लागारांची सत्ता बिलकूल कमी झालेली नव्हती, उलट ती वाढली होती. कारण अखेर निर्णयाचे हक्क सर्वस्वी त्यांचेकडे ठेवण्यात आल्यामुळे सर्व सत्ताधारी सिलोनचे गव्हनरच होते. १९२९ साली या सुधारणा जाहीर झाल्या व १९३१ साली त्या अन्वये निवडणुका घेण्यात आल्या. परंतु या मध्यंतरीचे काळात निवडणुकीसाठी मतदार संघ तयार करणे, मतदारांच्या याद्या बनविणे, या गडबडीत राज्यकर्त्यांचा एवढा वेळ गेला की सिलोनच्या उत्पादनवाढीच्या अनेक योजना मागे पडल्या. सिलोनचा राज्य-

कारभाराचा खर्च वाढला व त्यातच आर्थिक मंदीची लाट आल्यामुळे हे सुधारणांचे गाडेही थोडे आखडते घ्यावे लागले. ६५ मतदार संघाचे, ५० मतदार संघ करण्यात आले. पण या सुधारणांचे सर्वत्र स्वागत होण्याऐवजी याला विरोधक बरेच निर्माण झाले. सिलोनच्या राजकीय जीवनावर नवनवीन ढग जमू लागले. सिंहली व तामिळी वाद वाढीस लागला. जाफना व त्यांचे आसपासचा तामीळ गट त्यांच्या गटाला आवश्यक असलेले स्वतंत्र मतदार संघ न मिळाल्याने तो या निवडणुकांपासून बाजूलाच राहिला. त्यांनी या निवडणुकांवर बहिष्कार टाकला. तामीळ समाजातील तरुण पिढी तर जुन्यापेक्षा विचाराने पुढे गेलेली होती. पण त्यांनीही निवडणुकीत भाग घेतला नाही व उत्तरेकडील चार मतदार संघाचे प्रतिनिधी बिनविरोध निवडून आले.

निवडणुकीपूर्वी यावेळी काँग्रेसमधील काही जुन्या सभासदांची मवाळ पक्ष (लिब्रल पार्टी) व मि. गुणसिंह या मजूर पुढाऱ्याने बनविलेला मजूर पक्ष असे आणखी दोन पक्ष काँग्रेसबरोबर निवडणुकीचे रंगणात उतरले, पण या खेपेच्या निवडणुका तरी बऱ्याचशा वैयक्तिक महत्त्व लक्षात घेऊन मतदारांनी केल्या. गुणसिंह व त्यांचे एका सहकारी मित्राला निवडणूक जिंकता आली, तर लिब्रल पक्षाचे ई. डब्ल्यू. परेरा एवढेच निवडून आले. परंतु कोणतीही शिस्तबद्ध राहील अशी योजना निवडून आलेल्या उमेदवारात नव्हती. त्यामुळे दोन मंत्र्यांच्या जागावर प्रादेशिक पद्धतीवर निवडून आलेले उमेदवार आले व पाच जागा काँग्रेस पक्षांच्या उमेदवाराकडे गेल्या. स्पीकरचे जागीही फ्रान्सीस मोलम्योर या काँग्रेस सभासदांचीच निवड झाली व या जुन्या पक्षाला योग्य ते प्रतिनिधित्त्व सिलोनचे राज्यकारभारात पहिल्या निवडणुकीत तरी मिळाले.

# स्वातंत्र्यापूर्वीचे सिलोन

सात जुलै १९३१ रोजी नवे सिलोन कौन्सिल अस्तित्वात आले. १० जुलै रोजी मंत्र्यांची निवड होऊन सात समित्यांचे प्रमुखांची निवड झाली. पण याने काही तरुण मंडळींचे समाधान झाले नाही. ई. डी. परेरा नावाच्या डाव्या गटाच्या सभासदांनी प्रथमपासून मिळालेली घटना सुधारण्यासाठी कौन्सिल-मध्ये ठराव आणावयास सुरवात केली. वर्षांच्या आत समित्यांचे अध्यक्षपदी निवडून आल्यामुळे मंत्री बनलेले पुढारी तरुण मंडळींना आवडेनासे झाले व परेरा यांनी ही समिती पद्धतच बंद करावी असा ठराव आणला.त्याला डी. एस्. सेनानायकं यांचेसारख्या काँग्रेस पुढाऱ्यांनी विरोध केला. ते म्हणाले "या पद्धती-मुळे सिलोनला ज्या स्वरूपाची सत्ता हवी आहे ती हळूहळू मिळत आहे असे मला वाटते. अशा तऱ्हेने लोकनियुक्त प्रतिनिधीत निरनिराळे मतभेद मंत्र्यांच्या निवडीबाबत सुरू झाले. याच वेळी ब्रिटिश विद्यापीठात पदवी घेऊन काही तरुण मंडळी सिलोनमध्ये येऊ लागली व त्यावर सिलोन सर्व्हिसमध्ये समाविष्ट करून घेण्याची योजना आखली जाऊ लागली. १९२१ पर्यंत सिलोन विद्यापीठाचे विद्यार्थ्यांची–बसत त्यांची–परीक्षा कलंबो येथे घेण्याची सोय केंब्रिज विद्या-पीठाने केली व केंब्रिज विद्यापीठाचे पदवीधर सिलोनी नोकरीत येऊ लागले.

१९३४ साली या नव्या राज्यकारभाराचे मार्गात एक आणखी संकट उत्पन्न झाले ते म्हणजे सिलोनमध्ये पसरलेली मलेरियाची भयंकर साथ ! २० पैकी १९ जिल्ह्यात ही साथ सर्वत्र पसरली. जवळ जवळ ६८०० चौरस मैलांच्या प्रदेशातील लोकांना या साथीने हैराण केले. सुमारे पंधरा महिन्यांच्या अवधीत सिलोनमधील २ लक्ष ५४ हजार ९६८ नागरिक या साथीत मरण पावले, असे अधिकृत अहवालात म्हटले आहे. यावेळी मंत्रिमंडळाने घेतलेले परिश्रम व अविश्रांत कष्ट अमर्याद होते. लागेल तेवढा पैसा पर्वा न करता जनतेसाठी खर्च करण्यात आला. ब्रिटिश मिशनरी डॉक्टरांनी अहोरात्र काम केले. ही साथ आटोक्यात आणली. पण यामुळे सिलोनच्या आर्थिक परि-स्थितीत चांगलाच परिणाम झाला व आर्थिक मंदीची लाट सिलोनला भेड-सावू लागली. कामगार आजारी पडल्याने उत्पादन घटले. सिलोन कारभारी मंडळींना खर्चाचे बाबतही टंचाई भासू लागली व घोडदौडीने चाललेल्या सुधा-रणा मंदावू लागल्या. स्टेट कौन्सिलकडून जनतेच्या मागण्या पुऱ्या होईनात. याचा परिणाम डावा गट बलवान होण्यात होऊ लागला. त्यांची मंत्रिमंडळा-वरील टीका वाढू लागली.

याच वेळी लंका समसमाज पार्टीचा जन्म १८ डिसेंबर १९३५ ला झाला. इंग्लंडमध्ये विद्याभ्यासासाठी राहिलेल्या व तेथील राज्यकारभाराची पद्धती पाहिलेल्या तरुण सिलोनी तरुणांनी या पक्षाची उभारणी सिलोन-मध्ये येऊन केली. आर्थिक मंदीत मार्क्सच्या तत्त्वज्ञानानुसार जनतेच्या हक्का-साठी झगडावयास सज्ज झालेले हे तरुण तिशीच्या आतले कार्यकर्ते, या पक्षाचे निशाणाखाली एकत्रित आले. अशा स्वरूपाच्या मार्क्सवादी तरुण-तरुणींच्या संघटना जर्मनी व मध्य युरोपातील देशातून निर्माण होत होत्या व त्याला धरूनच हे सर्व सिलोनमध्ये सुरू होते. या पक्षाचे नेतृत्व अमेरिकेत मार्क्स-वादाचा झेंडा फडकविणारे मि. फिलीप्स, गुनवर्दनं, लंडन स्कूल ऑफ इकॉ-नॉमिक्सचे विद्यार्थी एन. एम. परेरा, लंडन विद्यापीठात शिक्षण घेतलेले एक वकील व इतिहासतज्ज्ञ कॉल्विन डी. सिल्व्ह व लेस्ली गुनवर्दनं या चौघांकडे होते. यांनी प्रथम कलंबोचा कामगार वर्ग एकत्र आणून त्यांची संघटना करण्याचा प्रयत्न केला. यापूर्वी कामगारसंघटन मि. ए. ई. ई.

गुर्णसिंह यांनी केली होती. पण या मार्क्सवाद्यांचे व त्यांचे तेवढेसे पटेना व त्यांच्या नवनवीन संघटना अस्तित्वात येऊ लागल्या. जुन्या काँग्रेस पुढाऱ्यांचे व त्यांचे तर कोठेच जमेना, याच तरुणांनी सूर्यमल नावाची एक नवी संघटना तयार करून मलेरियाचे साथीचे उच्चाटनासाठी शहराबाहेर खेड्याखेड्यातून जाऊन काम केले व आपले कार्यक्षेत्र वाढविले. या चळवळीचे नेतृत्व सिलोनचे एक तरुण पुढारी डॉ. एस. ए. विक्रमसिंघ व त्यांच्या ब्रिटिश पत्नी डोरीन विक्रमसिंघ यांचेकडे होते. पाच वर्षांनंतर जेव्हा कौन्सिलच्या पुन्हा निवडणुका झाल्या, त्यावेळी सिंहली व तामिळी गटाने आपले वाढते वजन खर्च करून जातीय भावना अधिक चेतविल्या. या वेळच्या निवडणुकीत फिलिप्स गुनवर्दनं व डॉ. एन. एम. परेरा हे लंकापक्षाचे नेते निवडून आले व डॉ. एस. ए. विक्रमसिंघ पडले. या निवडून आलेल्या मंत्र्यांचे मंडळात सिंहली मंत्र्याचे प्राधान्य असले तरी घटनेतील मंत्र्यांची निवडपद्धती बदलली पाहिजे, असे मत बहुसंख्य मंत्री प्रदर्शित करू लागले. या खेपेच्या मंत्र्यात एस. डब्ल्यू. आर.जी. बंदारनायकं हे स्थानिक स्वराज्य मंत्री, व मजूरमंत्री म्हणून जी. एस. कोरिया हे निवडून आले होते. यांनी सिलोनला सोईचा,असा घटनेचा एक नवा मसुदा तयार केला व तो घेऊन गृहमंत्री सर बॅरन जयतिलकं हे इंग्लंडला जावयास निघाले, पण हा नव्या घटनेचा आराखडा जरी प्रसिद्ध झाला नव्हता, तरी त्यांच्यासंबंधी जे अंदाज बाहेर पडले त्यावरून तामिळी जनतेवर या घटना दुरुस्तीने अन्याय होईल अशी हाकाटी आधीच सुरू झाली. याच सिलोनमधील मोठ्या जागांवर सिलोनी माणसे हवीत अशी मागणी सर्वत्र सुरू झाली. आतापर्यंत सिलोनमधील पहिल्या दर्जाच्या २३ सिलोनी अधिकाऱ्यात अवघा एक सिलोनी अधिकारी,२७ दुसऱ्या दर्जाचे अधिकाऱ्यात अवघे पाच, तिसऱ्या दर्जाचे ४३ अधिकाऱ्यात १३ व चवथ्या दर्जाचे २८ जणात १६ अशी सिलोनी अधिकाऱ्यांची संख्या होती. १२३ सिव्हिल सर्व्हंटस् नोकरवर्गापैकी अवघे २५ सिलोनी होते. सुधारणा आल्या तरी ब्रिटिश मंडळी आपल्या हातातील जागा, लायक सिलोनीकडे घ्यावयास तयार असूनही सोडावयास तयार नाहीत अशी टीका ऐकू येऊ लागली व याचा ओरडा वरपर्यंत गेला. याचा परिणाम एवढाच झाला की कौन्सिलमध्ये असा ठराव पास झाला की, कोणत्याही नव्या सिलोनेतर अधिकाऱ्यांची नेमणूक सिलोनमध्ये कौन्सिलच्या परवानगीशिवाय

होऊ नये व योग्य त्या योग्यतेचा मनुष्य मिळत नसेल तरच परदेशचे व्यक्तीला नोकरीत घ्यावे. हा ठराव जरी मान्य करण्यात आला तरी १९४१ पर्यंत त्याची अंमलबजावणी प्रामाणिकपणे ब्रिटिश अधिकाऱ्यांनी केली होती असे वाटत नाही. १९४१ पर्यंत तरी पश्चिम व मध्य सिलोनच्या सर्वाधिकाऱ्यांचे जागेवर निश्चित सिलोनी मनुष्य नेमला जाईल असे आश्वासन द्यावयास चीफ सेक्रेटरी तयार नव्हते. गृहखाते जरी बिनसरकारी मंत्र्यांचे हाती होते तरी सिलोनचे पोलीस दल मात्र चीफ सेक्रेटरीचे हाती होते व त्यावर या गृहखात्याचे मंत्र्यांची सत्ता नव्हती, असा प्रकार सुरू होता. यावेळी सिलोनमध्ये लष्कर फारसे नसल्याने हे पोलीस दल म्हणजेच लष्कर आहे असे समजून ब्रिटिश चीफ सेक्रेटरीचे हाताखाली ठेवले जात असे, असे ब्रिटिश गव्हनरांतर्फे सांगण्यात येई. यावेळी सिलोनी पोलीस दलातील बरेच अधिकारी युरोपियन असत. त्यांना सिलोनी मंत्र्यांचे हाताखाली देण्याचे धोरण ब्रिटिश राज्यकर्त्यांना तेवढेसे मान्य नव्हते. अशातऱ्हेने बिन सरकारी मंत्रिमंडळ व गव्हनर व त्यांचे तीन मोठे ब्रिटिश मंत्री यांचे मतभेद होण्यासारखी परिस्थिती वारंवार निर्माण होऊ लागली. याच वेळी लंका समसमाज पक्षाचे हालचालीही कॉंग्रेस मंत्रिमंडळाला सारख्या विरोधक होऊ लागल्या. ही डाव्या गटांची मंडळी या पक्षातील परदेशीय विद्यापीठात शिक्षण घेतलेल्या मार्क्सवादी मंडळींचे तोडीला माक ॲन्थनी लिस्टर ब्रेसगड्ल नांवाचे ऑस्ट्रेलियन गृहस्थ सिलोनमध्ये आले. चहाचे एका ब्रिटिश मालकीच्या मळचात शिक्षणासाठी प्रथम ते आले व नंतर लंका समसमाज पक्षात सामील होऊन त्यांनी मळेवाल्याविरूद्ध कामगारांना चिथविण्यास सुरवात केली. कम्युनिस्ट वृत्तीचे या ऑस्ट्रेलियन पुढाऱ्यास हद्दपार करणे आवश्यक आहे असा आग्रह ब्रिटिश पोलीस प्रमुखांनी धरला. त्याला सर बॅरन जयतिलकं यांनी इंग्लंडला जाण्यापूर्वी परवानगी दिली असे सांगण्यात आले.पण जयतिलकं यांचेजागी काम करणाऱ्या हंगामी मंत्र्यांनी आपली परवानगी हा हद्दपारीचा हुकूम काढण्यापूर्वी घेतली नव्हती अशीच घोषणा केली. या वेळी मिस्टर ब्रेसगड्ल हेही भूमिगत झाले व पोलिसांचे हाती ते सापडेनात. मंत्री व पोलीस प्रमुख व गव्हनर यांचेमध्ये हा हद्दपारीचे हुकुमाचा खल चालू असता एका सभेत हे ऑस्ट्रेलियन मजुर पुढारी ब्रेसगड्ल एकाएकी प्रकट झाले व त्यांनी चहाचे मळचांवरील कामगारांना चिथावणारे भाषण केले. तेव्हा पोलिसांनी आणीबाणीचे

परिस्थितीला लागू अशा कायद्याखाली त्यांना पकडून कैदेत ठेवले. तेव्हा लंका समसमाज पक्षासाठी सुप्रीम कोर्टाकडे त्यांचे मुक्ततेसाठी अर्ज करण्यात आला व एच. व्ही. परेरा यांनी तो चालविला. या वेळी सुप्रीम कोर्टानेही निर्णय देताना सरकारला आणीबाणीची परिस्थिती नसताना त्या कायद्याखाली अशा तऱ्हेने कोणालाही अटक करण्याचा अधिकार नाही असा निर्णय दिला. त्यामुळे मिस्टर ब्रेसगड्ल बंधमुक्त झाले. पुढे कोठून कशा किल्ल्या फिरल्या नकळे, ब्रेसगड्ल यांना सिलोन सोडून जावे लागले. पण या प्रकरणानंतर लंका समसमाज हा तरुणांचा पक्ष एक प्रमुख विरोधक पक्ष म्हणून गाजू लागला. मंत्र्यांचे हाती सत्ता असली तरी अधिकार नाही. गव्हनर आपले खास अधिकार वापरून वाटेल ते करू शकतात ही गोष्ट यावेळी स्पष्ट झाली. मंत्रिमंडळ व गव्हनर यावर लंका समसमाज पक्षाचे तरुण सभासदांनी टीकेची झोड उठविली. सिलोनमध्ये गव्हनरांच्या सत्तेविरुद्ध असा डाव्यांचा लढा उघडपणे सुरू झाला. त्यातच जपान युद्धात पडल्यामुळे सिलोनसारख्या महत्त्वाच्या नाविक तळाची सत्ता आपले हाती कशी राहील हा प्रश्न ब्रिटिशांना सारखा जाचू लागला. सिलोनच्या उत्पन्नाचे प्रमुख अंग चहाचे मळे त्यावरील ब्रिटिश मळेवाल्याविरुद्ध तर लंका समसमाज पक्षाने लढा पुकारून सिलॉन एस्टेट वर्कर्स युनियन नावाची एक कामगार संघटना स्थापन केली व तिचेतर्फे चहाचे मळ्यांवर संप सुरू झाला. १९४० साली या संपाने एवढे तीव्र स्वरूप धारण केले की पोलिसांना गोळीबार करावा लागला व त्यात एक कामगार ठार झाला. तेव्हा ताबडतोब गोळीबाराची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. ही मागणी गृहमंत्री सर बॅरन जयतिलक यांनी मान्य केली व कामगारावर भरलेले काही खटले काही दिवस तहकूब करावे अशी सूचना त्यांनी ब्रिटिश इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस यांना दिल्या. पण त्या पाळण्याऐवजी आपण कायद्याविरूद्ध वर्तन करावयास मला सांगत आहात असे उत्तर ब्रिटिश इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस यांनी गृहमंत्र्यांना दिल्याने प्रकरण चिघळले, गव्हनरांचेकडे गेले. गव्हनरांनी आपले ब्रिटिश इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस यांचे म्हणणे उचलून धरताच गव्हनरांचे विरुद्ध टीकेचा एकच डोम उसळला. प्रथम मंत्री डडले सेनानायक यांनी राजीनामा दिला व इतरांना त्याचे अनुकरण करणे भाग पडले. ५ मार्च रोजी झालेल्या कौन्सिलचे बैठकीत गृहमंत्र्यांनीच गव्हनरांचे धोरणाचा निषेध करणारा व दुसरी घटना राब-

विण्यास नकार देणारा ठराव गृहापुढे मांडला. पण ही सूचना येण्यापूर्वी मंत्र्यांशी सामोपचाराची बोलणी गव्हनरांनी चालू केली होती. त्याचा परिणाम एवढाच झाला की फक्त गव्हनरांचे धोरणाचा निषेध करणारा ठराव गृहापुढे आला. या वेळी गव्हनरांचे मंत्री व खातेप्रमुख यांचेमध्ये सहकार्य कसे नांदेल यांचा विचार करावयास एक समिती नेमण्याचीही तयारी दर्शविली. या वेळी ही सलोख्याची बोलणी मंत्र्यांनी सुरू केल्यामुळे त्यांचेवर अविश्वासाचा ठराव गृहात आला पण तो पास होऊ शकला नाही. कारण ब-याच सभासदांनी या प्रश्नात तटस्थ राहावयाचे ठरविले होते. या सर्व परिस्थितीत सिलोनचा राज्य कारभार म्हणजे गोंधळाचा होऊ लागला. मंत्री म्हणजे पत्त्यातले राजाराणी आहेत, त्यांना कोणताही अधिकारी धमकावू शकतो अशी टीका उघडपणे होऊ लागली.या वेळी दुसरे महायुद्ध चिघळू लागले होते. ब्रिटिश सरकारला सिलोनचा पाठिंबा गमावून चालण्यासारखे नव्हते. सिलॉन स्टेट कौन्सिलने एक ठराव पास करून युद्धाला पाठिंबा दिला होता. पण लंका समसमाज पक्षाने मात्र युद्धाला पाठिंबा देण्याचे ठरावाचे वेळी मतदान केले नाही, ते तटस्थ राहिले. हा पक्ष सर्वत्र ट्रॉट्स्कीचे तत्त्वज्ञानाला पाठिंबा देणारा होता. त्यांचेमधील स्टॅलिनिस्टस् विचाराची मंडळी पक्षातून बाहेर पडून १९४३ साली त्यांनी उघडपणे सिलोन कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली.१९४१ साली ज्या वेळी जर्मनीने रशियावर स्वारी केली त्यावेळी या दोन्ही विभागांनी जर्मनी विरुद्ध लढयास एकमुखी पाठिंबा दिला. पण तत्पूर्वी डॉ. डी.एम. परेरा, फिलिप्स गुनवर्दनं वगैरे लंका सम-समाज पक्षाचे कार्यकर्ते अटकेत पडले. जपानने जरी पलहाबरवर हल्ला केला तरी या लढयाचा आपणाला काही त्रास होणार नाही असे मानणारे लोक सिलोनमध्ये बहुसंख्य होते. पण जपानने मलायापर्यंत आक्रमण केल्या-नंतर मात्र संरक्षणाचे विचार सिलोनमध्ये सुरू झाले व सिलोनमध्येही नागरी संरक्षणाच्या योजना अंमलात येऊ लागल्या. ब्रिटनने आपले या वसाहतीचे संरक्षणासाठी ॲडमिरल जेफ्री लेट्न यांची सिलोनचे संरक्षणाधिकारी म्हणून नेमणूक केली व त्यांना संरक्षणासाठी भरपूर अधिकार देण्यात आले. यावेळी मंत्रिमंडळाने परिस्थिती ध्यानात घेऊन त्यांना कोणताही विरोध केला नाही. उलट डडली सेनानायकं यांनी ८ एप्रिल १९४३ रोजी कौन्सिलमध्ये असे भाषण

केले की सिलोन ब्रिटिशांचे खांद्याला खांदा लावून शत्रूशी लढावयास तयार आहे. ब्रिटिश आरमार दलाच्या मोठया बोटी सिलोनमध्ये असाव्यात, या इराद्याने जपानी व्हाईस ॲडमिरल नागुमो यांनी ५ एप्रिल रोजी कलंबोवर व ९ एप्रिल रोजी ट्रिंकोमली बंदरावर बाँब हल्ला केला व सिलोनला आपण लढाईचे ऐन रणधुमाळीत कसे आहोत याची कल्पना आली. यावेळी सर्व राज्य-कारभार ब्रिटिशांनी आपले हाता घेतला होता. सिलोनच्या नव्हे तर हिंदच्या संरक्षणासाठी सिलोन सर्वस्वी ब्रिटिश अधिकाऱ्यांचे ताब्यात असणे आवश्यक आहे,अशी भावना या वेळी दृढमूल झाली होती.ब्रिटिशांचे आग्नेय आशिया कमां-डचे सेनानी लॉर्ड माऊंट बॅटन् यांनी आपली एक महत्त्वाची छावणीच सिलोन-मध्ये आणली व हिंदी महासागरातील दोस्तांचा लढा सिलोनमधूनच खेळला जाऊ लागला. याच वेळी बोर्ड ऑफ मिनिस्टर्सचे अध्यक्ष म्हणून डडली सेना-नायकं यांची नेमणूक झाली. मंत्र्यांचे मागे असलेली सिलोन नॅशनल काँग्रेसची सत्ता त्यांचेमागे होती.पण या नॅशनल काँग्रेसमध्ये हळूहळू कम्युनिस्टपक्षाचा समा-वेश होऊ लागल्याने व तरुणांनी बरीच सूत्रे आपले हाती घेतल्यामुळे डडली सेना-नायकं यांचे व काँग्रेसचे पटेना व मंत्र्यांचा गट काँग्रेसमधून बाहेर पडल्यासारखा झाला.याच वेळी सिंहली महासभेची स्थापना एस. डब्ल्यू.आर.डी. बंदारनायकं यांनी केली व काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या बऱ्याच मंत्र्यांनी त्यांना पाठिंबा दिला.यावेळी ऑल तामीळ सिलोन काँग्रेस श्री.जी.जी.पोनाम्बलम यांनी स्थापना केली. मंत्रिमंडळापैकी तामीळ सभासदांनी त्यांना पाठिंबा दिला. या एवढ्या सर्व गटाचे सहकार्य घेऊन कारभार करणे ब्रिटिशांना युद्धकाळात तरी शक्य नव्हते व त्याबरोबर नव्या निवडणुकाही कशा घ्याव्यात हा प्रश्न पडला.आजपर्यंतच्या सिलोनच्या निवडणुका पक्षांनी न लढविता व्यक्तीचे मोठेपणावर लढविल्या गेल्या होत्या. यामुळे सिलोनचे बाबतीत काय करावे हा प्रश्न ब्रिटिश राज-कर्त्यांपुढे होता. त्यांची अधिक हक्काची मागणी सारखी सुरू होती. (१) १९४१ मध्ये१ सप्टेंबरला सिलोन कौन्सिलने पास केलेल्या ठरावात सिलोनच्या राज-कीय हक्कांचा कमिशन नेमून विचार करावा अशी मागणी होती. (२)१९२४ मार्चमध्ये केलेल्या एका खाजगी सभासदाने मांडलेल्या ठरावात युद्धानंतर सिलो-नला वसाहतीचे स्वराज्य (डोमिनियन स्टेटस्)मिळावे अशी मागणी केली होती. (३) १९जानेवारी १९४३ केलेल्या मागणीत मि.डडली सेनानायकं यांनी स्टेट

सि. ५–

कौन्सिल व वसाहत मंत्री यांचेमध्ये सिलोनी सुधारणासंबंधी पत्रव्यवहार सुरू आहे असे म्हटले आहे. तर याच वर्षी (४) २६ मे रोजी ब्रिटिश सरकारने युद्धा-नंतर जबाबदार सरकार देण्याचे अभिवचन दिले, पण राज्यव्यवस्था आपले नेतृत्वाखाली चालेल असे सांगितले. (५) १९४४ चे फेब्रुवारी महिन्यात सिलोनी मंत्र्यांनी आपले राज्याची घटना तयार केली व ती सेनानायकं यांनी ब्रिटिश सरकारला सादर केली पण ती स्वीकारण्याऐवजी ब्रिटिशांनी ५ जुलै १९४४ रोजी सिलोनमधील सर्व मतप्रणालींचा अंदाज घेण्यासाठी एक कमिशन नेमण्याची घोषणा केली. पण या कमिशनशी सहकार्य करावयास मंत्र्यांनी नकार दिला. यासाठी सॅलिसबरी कमिशनची नेमणूक २२ डिसेंबर रोजी करण्यात आली. लॉर्ड सॅलिसबरी हे या कमिशनचे चेअरमन होते. परंतु आपण घटनेच्या रूपाने दिलेली सूचना ब्रिटिशांनी मान्य करावी असा आग्रह मंत्र्यांनी धरला. सिलोनमध्ये यावेळी कोणताहि गोंधळ होऊ देणे ब्रिटिशांना शक्य नव्हते. कारण दुसऱ्या महायुद्धात जपानची सत्ता सारखी वाढत असल्यामुळे सिलोनमध्ये अंतस्थ बेदिली होऊ देणे ब्रिटिशांना योग्य वाटत नव्हते. त्यासाठी सॅलिसबरी कमिशनने फारसे आढेवेढे न घेता मंत्र्यांनी तयार केलेली घटनाच थोड्याफार फरकाने मान्य केली व सात एप्रिल १९४५ रोजी ती सेनानायकं यांनी कौन्सिल-पुढे मांडली. या घटनेने गव्हनरांना योग्य वेळी काही खास अधिकार दिले असले तरी सिलोनचे वसाहतीचे स्वराज्याचे हक्क देण्याचे मान्य केले होते. या सुधारणान्वये नागरी राज्यकारभारावर असलेले ब्रिटिश नियंत्रण बरेच कमी झाले होते. संरक्षण व परदेश संबंधाबाबतही कौन्सिलने ठरावान्वये मान्यता दिल्यानंतरच गव्हनरना त्यांची अंमलबजावणी करता येत होती. बोटीची वाहतूक परदेश प्रवासी वाहतूक याबाबतचे सर्व अधिकार मंत्रिमंडळाचे हाती दिले गेले.

१७ मे १९४५ रोजी ब्रह्मदेशला ब्रिटिशांनी संपूर्ण स्वातंत्र्य दिले व त्याचा परिणाम सिलोनवर झाला. यावेळी सिलोनला वसाहतीचे स्वराज्य मिळालेच आहे असे सांगण्यात आले. यावेळी जुन्या कॉंग्रेस पक्षात तरुण मंडळी शिरल्याने डडली सेनानायकं वगैरे पुढाऱ्यांशी त्यांचे जमेना व १९४७ चे १८जून रोजी आजच्या युनायटेड नॅशनल पार्टीची स्थापना डडली सेनानायकं यांनी केली. सॅलिसबरी कमिशनचे सूचनेनुसार होणाऱ्या हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हच्या निवड-

णुकांची ही तयारी होती. २५ सप्टेंबर रोजी डडली नव्या घटनेनुसार सिलोनचे पंतप्रधान झाले व त्यांचे मंत्रिमंडळाचे हाती सर्व कारभार आला. नव्या घटनेनुसार प्रतिनिधी गृहात निवडून आलेल्या ७० सभासदांपैकी ५९ सभासदांनी सिलोन स्वातंत्र्याचे ठरावाला ११ डिसेंबर रोजी मान्यता दिली. विशेषत: देश व हिंदुस्थानला स्वातंत्र्य दिल्यानंतर युद्धात सिलोनसारख्या ब्रिटनला अधिक मदत पुरविणाऱ्या देशाला स्वातंत्र्य मागण्याचा अधिक अधिकार होता. तो ब्रिटिश वसाहतखात्याला मान्य करावा लागला. ४ फेब्रुवारी १९४८ रोजी सिलोनच्या संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा करावी लागली. यासाठी सिलोनचे पंतप्रधान सेनानायकं यांनी केलेली कामगिरी फार मोठी होती. या नव्या घटनेनुसार सिलोनला हाऊस ऑफ लॉर्डस्चे धर्तीवर नव्या गृहाचे अधिकार मिळाले.

सिलोनच्या राजकारणात आतापर्यंत श्री. एस. डब्ल्यू. बंदारनायकं यांची सिंहली महासभा, सिलोन तामीळ काँग्रेस व सेनानायकं यांचा युनायटेड-नॅशनल पार्टी हे एवढेच पक्ष प्रामुख्याने दिसत होते. पण २४ जून १९४५ रोजी डाव्या गटांचे सर्व पुढाऱ्यांना सोडून देण्यात आल्यामुळे लंका समसमाज पक्ष पुन्हा या राजकीय रंगणात उतरला व सिलोनच्या राजकारणाला नवा रंग चढू लागला. त्यातच सिलोनची लोकसंख्या निरनिराळ्या गटांची बनली असल्यामुळे स्वराज्याचे अधिकार हे गट कसे राबविणार हा प्रश्न सर्व जगापुढे होता.

# पहिले संयुक्त मंत्रिमंडळ

"आम्हाला मिळालेले स्वातंत्र्य नुसते शाब्दिक स्वातंत्र्य राहू नये. त्याने सिलोनी नागरिकांचे जीवन सुखी व समृद्ध झाले पाहिजे. लोकशाहीची ज्योत अशा तऱ्हेने प्रज्वलित झाली पाहिजे की तिने प्रत्येक सिलोनी नागरिकाला त्याच्या स्वातंत्र्याविषयी विश्वास वाटला पाहिजे, त्याचे स्वाभिमानाचे रक्षण झाले पाहिजे व त्याला मानवी जीवन प्रामाणिकपणे कंठिता आले पाहिजे. हेच स्वतंत्र लंकेचे यापुढचे धोरण राहणार," अशी घोषणा गृहाचे नेते एस. डब्ल्यू आर.डी. बंदारनायकं यांनी स्वातंत्र्य दिनाचे दिवशी केली. सिलोनी नागरिक आम्ही लुबाडले जातो, आमचेवर दडपशाहीने कित्येक गोष्टी लादल्या जातात, आमचा धर्म, भाषा व संस्कृती बाजूला सारून ब्रिटिश राज्यकर्ते कारभार पाहतात, अशी तक्रार केली जात असतानाच सिलोनमधील नागरिकांना स्वातंत्र्य मिळत होते. आमच्या देशात भरपूर धनधान्य असून आम्ही उपाशी राहतो, अशी तक्रार सरसहा केली जात होती व याच परिस्थितीने गांजलेल्या सिलोनला एकदम स्वातंत्र्य मिळाले असे चित्र स्वातंत्र्याचे वर्णन करताना काढण्यात येत होते.

नव्या स्वातंत्र्य घोषणेत राज्यकारभारासाठी सिलोनला वरिष्ठ सभागृह म्हणजे सेनिट् हे सरकारनियुक्त सभासदांचे कायदेमंडळ व ९५ निवडलेल्या व

सहा सहकारनियुक्त सभासदांचे प्रतिनिधी गृह(हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह)मिळाले होते. या दोन गृहाकरवी सर्व देशाचा लोकनियुक्त कारभार चालणार होता. स्वातंत्र्यापूर्वी सिलोनचा पुढारी म्हणून पुढे येणारे,इंग्लिश बोलणारे काही परदेशी पंडीत, व्यावसायिक, नेते, व्यापारी, काळाबाजारवाले, कंत्राटदार वगैरे मंडळी होती. हीच मंडळी प्रथम स्वातंत्र्याचा फायदा घेऊन वैयक्तिक ऊर्जितावस्था कशी प्राप्त करून घ्यावी याचाच विचार प्रामुख्याने करू लागली. स्वातंत्र्य काळातील मंत्रीही वरच्या वर्गातीलच होते. त्यांचे हितसंबंध ब्रिटिश मळेवाले व सिलोनी जीवनाशी एकरूप झालेल्या ब्रिटिश व इतर परकीयमंडळींशी एकरूप झालेले होते यामुळे पहिल्या प्रतिनिधि गृहात डाव्यांचे पुढारी म्हणून निवडून आलेले डॉ. एन. एम.परेरा यांचेसारखे पुढारी भाषण करताना म्हणाले की, "हे मिळालेले स्वातंत्र्य एका ठराविक सत्ताधारी वर्गासाठी मिळालेले स्वातंत्र्य आहे, ही गोष्ट आजचे परिस्थितीत मला स्पष्ट दिसत आहे. सिलोनच्या सर्वसाधारण नागरिकांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याची मला आशा नाही, त्यांचे पगारांचे प्रश्न सुटणार नाहीत." याच वेळी हिंदुस्थानातून सिलोनी मळचावर कामासाठी आलेल्या आठ लक्ष कामगारांची स्थिती काय होणार हा प्रश्न प्रथम उपस्थित झाला. १९४७ सालचे माहितीनुसार पाहता ९३ टक्के सिलोनी नागरिकांचे उत्पन्न अवघे ५०ते १००रुपये महिना होते. या लोकांचे जीवनावर ब्रिटिश मळेवाले व ब्रिटिश छत्राखाली राहणाऱ्या स्थानिक व काही परकीय नागरिकांना सिलोनचे दोन तृतीयांश उत्पन्न मिळत होते, तेही या उत्पादनातील बराचसा भाग निर्यात करून! ७० टक्के लोकसंख्या शेतात राबून वरील तुटपुंज्या पगारावर काम करीत होती. सिलोनची ७५ टक्के शेत जमीन या उत्पादनासाठी खर्ची पडत होती. सिलोनच्या शेतात पिकणारा ६० टक्के तांदूळ, निर्माण होणारी थोडीबहुत साखर, दूध पावडर व लोणी, सुकी मासळी बोटी भरभरून परदेशी जात होती. याच बोटीतून सिलोनी नागरिकांना लागणारा हलक्या किंमतीचा परदेशी माल येत होता. यामुळे सिलोनला स्वातंत्र्य मिळाले तरी त्याचे आर्थिक स्वातंत्र्य सर्वस्वी परदेशी बाजारपेठांचे हाती होते. परदेशात कोणतीही आर्थिक घडामोड झाली की त्याचा धक्का कॉमनवेल्थ राष्ट्रात सर्वात जास्त सिलोनला बसत असे. सिलोनची सर्व स्थानिक संपत्ती परदेशांचे व्यापारात भाग घेणाऱ्या सर्व स्थानिक व्यापाऱ्यांचे हातात होती.यामुळे नव्या आलेल्या राष्ट्रीय सरकारला आपले देशाचे

आर्थिक जीवन स्थिर करण्यासाठी काहीतरी उपाय योजणे भाग होते. युद्धकालात ब्रिटनला जी मदत सिलोनने केली त्यामुळे एकूण ११३कोटी ८०लक्ष रुपयांची परदेशीय गंगाजळी १९४७ साली सिलोनचे नावावर परदेशात पडून होती. याचा उपयोग सत्ताधारी मंडळींनी व ब्रिटिश मळेवाल्यांनी आपल्या उपयोगाच्या अनेक वस्तु (मोटारी वगैरे) खरेदी करण्यास सुरवात केली. त्यावेळी मंत्री-मंडळाने सर्व परदेशी चलन उधळणारांना दिलेला इषारा महत्त्वाचा होता. या ठरावात असे म्हटले आहे, "युद्धकाळात आम्ही जे परदेशीय चलन साठविले ते, काही सिलोनी नागरिकांनी आपले पोट बांधून केलेल्या स्वार्थत्यागामुळेच सांठलेले आहे. आज आमची बहुसंख्य जनता जेवढे जीवन जगवावयास आवश्यक तेवढेच अन्न घेत आहे. असा स्वार्थत्याग यापुढे तिला करणे कठीण आहे ! नव्या सत्ता हाती घेणारे सिलोन सरकारला आपली उत्पन्नाची परिस्थिती सुधारण्यासाठी व्यापारात आमूलाग्र बदल करणे भाग होते. सिलोनची पैदास फक्त निर्यात मिळविण्यासाठी ब्रिटिशांनी वाढविली व स्थानिक गरजा तुटपुंज्या आयातीवर, कसेबसे ते भागवीत ही परिस्थिती आमूलाग्र बदलणे आवश्यक होते. साधी गोष्ट, सिलोनसारख्या बेटात सभोवतालच्या समुद्रातून भरपूर मासे मिळण्याचा संभव असताना स्थानिक उपयोगासाठी ते मारले जात नसत,तर दीड कोटी रुपयांचे मासे परदेशातून आयात केले जात, अशी एकंदर परिस्थिती होती. सिलोनमध्ये एवढी नवी शेतीसुधारणा झाली असून ही बेकारांची व पुरेसे काम नसलेल्या कामगारांची संख्या यावेळी २७७६००० वर होती. म्हणजे सिलोनच्या अर्ध्या नोकरवर्गाला यावेळी नोकरी मिळवून पुरेसे उत्पन्न मिळवून देण्याची आवश्यकता होती.युद्धामुळे सिलोनच्या खालच्या वर्गाची स्थिती थोडीफार सुधारली व ज्यांनी भरपूर काम केले ते चांगले धनिक बनले. जो वर्ग १९३५ साली जेमतेम महिना २५ते५० रुपये मिळवीत असे तो १९३७ साली ५०ते१०० रुपये दरमहा मिळवू लागला होता. यामुळे शेवटच्या थराचा वर्ग जवळजवळ नाहीसा झाला होता. पण या दुसऱ्या वर्गात सिलोनची ७५टक्के प्रजा होती. अशा स्वरूपाचा बदल हिंदुस्थानात युद्धकाळात झाला नाही. पण सिलोनच्या निर्यात उत्पादनामळे तो या बेटात होऊ शकला. सिलोनमधील मळेवाले हे कामगारवर्गाचे मोठे कार्यक्षेत्र पण या मळ्यावर ७८ टक्के कामगार हिंदमधील होते व तेच ब्रिटिश मळेवाल्यांना हवे होते. याचे महत्त्वाचे कारण असे

होते, की स्थानिक नागरिक कामाला चांगले नसल्याने त्यांना ते परवडत नसत. त्यामुळे काहीशा स्वार्थी भावनेनेच हिंदी कामगार त्यांनी कामावर घेण्यास सुरवात केली.

सिलोनमध्ये शिक्षणाचा प्रश्नही हिंदुस्थानइतका कठीण नव्हता. युद्धानंतर सिलोनमधील ८६ . २ टक्के मुले प्राथमिक शाळेत जात पण त्यातून पुढे अवघी ५टक्के मुले एस. एस. सी. पर्यंत वरचे वर्गात येत,तर जेमतेम दोन टक्के मुलांना कॉलेजचे शिक्षण घेता येत असे. शिक्षण हे सर्वांना फुकटच मिळाले पाहिजे ही कल्पना सिलोनी पुढाऱ्यांनी प्रथमपासून मांडली. या लढयात त्यांना यश येऊन १९४५ सालीच सिलोनमधील नागरिकांना सर्व शिक्षण फुकट मिळू लागले. सिलोनमधील ब्रिटिश राजवटीत लोकनियुक्त प्रतिनिधींनी सतत झगडून करून घेतलेली ही सुधारणा कोणत्याही ब्रिटिश वसाहतीत यावेळी झाली होती असे वाटत नाही. परंतु स्वातंत्र्यापूर्वी ही योजना पूर्ण मात्र होऊ शकली नाही. हे फुकट शिक्षण म्हणजे नुसती शाळेची फी असे नसून बोर्डिंगचा खर्च, विद्यार्थ्यांचे घरापर्यंतचा सुटीचा प्रवास, पुस्तके व इतर साधने त्याला प्राथमिक शिक्षणात मिळत, पण दुय्यम शिक्षणात हे इतर खर्च सिलोनी कुटुंबावरच पडत व यामुळे प्राथमिक शाळा पूर्ण झाल्याबरोबर बऱ्याच मुलांची नावे शाळेतून पालक काढून घेत. यामुळेच १९४७ साली प्राथमिक शाळेत जरी ८७ टक्के मुले जात तरी एस.एस.सी. पर्यंत शिकणाऱ्या मुलांची संख्या पाच टक्क्याचे वर जात नसे. ही परिस्थिती कशी सुधारावी हा प्रश्न नव्या स्वातंत्र्यातील सरकारपुढे होता.

सिलोनची नैसर्गिक रचना मोठी रम्य आहे, त्या दृष्टीने खर्च करावा तेथे उत्पन्न निघते अशी परिस्थिती आहे. ब्रिटिशांची सर्वांत कमी जागेत भरपूर उत्पन्न देणारी एक आवडती वसाहत म्हणून सिलोनचा उल्लेख युरोपियन लेखकांनी वेळोवेळी केला आहे. सर्व बाजूला समुद्र व मध्यंतरी एक हजार नऊशे फूट उंचीपर्यंत गेलेली पर्वत श्रेणी व तिचे भोवती पसरलेली, उत्तर पठार, दक्षिण–पूर्व पठार व दक्षिण-पश्चिम पठार, अशी शेतीचे उत्पादनाला उत्तम पठारे या भूमीत आहेत. या डोंगरावरून जवळजवळ १५० मोठमोठाले धबधबे या भूमीवर सारखे येऊन आदळत आहेत व त्यांची मोठी बनलेली महावली गंगा ही महानदी

सिलोनचे ऐश्वर्य म्हणून सर्व देशभर २०६ मैल धावत जात असते. याशिवाय या धबधब्यामुळे निर्माण झालेल्या दुसऱ्या सोळा नद्या उत्तरेकडून दक्षिणेपर्यंत सर्वत्र सारख्या वाहात आहेत. देशाचे मध्यंतरी असलेल्या पर्वतश्रेणीने व भरपूर पावसाने फुलवलेले हे १६ नद्यांचे ऐश्वर्य सिलोनमध्ये दोन हाताने परिपूर्ण उधळले जात आहे. यामुळे कालवे काढून शेती पिकविण्याची आवश्यकता देशाला फारशी नाही. याचे कारण पाण्याचे भरपूर पाणलोट प्रत्येक लागवडीखालील प्रदेशांचे जवळपास होते. यामुळे वर्षातून दोन वेळा एकूण १००ते१५० इंच पाऊस पडणाऱ्या या भूमीला पाण्याची ददात कधीच पडली नाही व पडत नाही. या परिस्थितीत या पाण्याचा भरपूर उपयोग करून देशाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करणे हे नव्या स्वातंत्र्य कालातील मंत्रिमंडळाचे पहिले कर्तव्य होते. यासाठी पाणी-पुरवठ्याच्या, वीजपुरवठ्याच्या अनेक योजना आखून शेती व उद्योगधंदे सारख्याच भूमिकेवरून सुरू करणे आवश्यक होते. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी शेतीचे,बागायतीचे सिलोनी उत्पादन परदेशी नेले व त्यांचे मोबदल्यात आपल्या बाजार पेठेतील कारखानदारी माल सिलोनमध्ये आणून विकला, कारण ही व्यापारी देवघेव त्यांचे हाती होती. ज्या ज्या वसाहती पूर्वेकडे ब्रिटिशांच्या हाती होत्या, त्यांचेमधील कच्चा व उत्तम माल युरोपात नेणे व आपल्या कारखानदारीला पूर्वेकडील आपले अंमलाखालील वसाहतीतून गिऱ्हाईक मिळविणे हा एक मोठा व्यापारी व्यवसाय ब्रिटिशांनी केला व आपल्या स्वार्थासाठी सिलोनची कारखानदारी ऊर्जितावस्थेत येऊ दिली नाही ही गोष्ट स्पष्ट आहे. सिलोनच्या नव्या राज्यकर्त्यांनी ही गोष्ट ओळखून पुढे पाऊल टाकणे आवश्यक होते. त्यासाठीच सिलोनचे नव्या मंत्रिमंडळाला प्रयत्न करावयाचे होते. सिलोनचे स्वातंत्र्य मिळवून देणारे नेते म्हणून प्रथमतः डी.एस. सेनानायकं यांचे युनायटेड नॅशनॅलिस्ट पक्षाचे स्वागत सर्वत्र झाले. कॉंग्रेसमधून फुटून बाहेर पडलेली ही मंडळी एक मोठा वृत्तपत्रीय गट चालवीत होती व त्यांचे बळावर इंग्रजी पत्रे चालवून जनतेचे मत म्हणून ते सर्व सिलोनमध्ये आपले मत पसरवीत व ते गृहीत धरले जात असे.

स्वातंत्र्यानंतर पहिले वसाहतीचे गव्हर्नर जनरल म्हणून सर हेन्री मोर यांची नेमणूक ता.४ फेब्रुवारी १९४८ रोजी झाली.सिलोनच्या पहिल्या

पार्लमेंटचे उद्घाटन १०फेब्रुवारी १९४८ रोजी सहावे जॉर्ज यांचे बंधु ड्यूक ऑफ ग्लूस्टर यांनी केले. १९४७चे निवडणुकीचे वैशिष्टच पक्षबलाचे दृष्टीने महत्त्वाचे होते असे वाटत नाही. निवडून द्यावयाच्या ९५ सभासदात पक्ष म्हणून झगडणारे असे दोन गट होते. ते म्हणजे युनायटेड नॅशनॅलिस्ट पार्टी व दुसरा गट डाव्यांचा म्हणजे लंका समसमाज पार्टी व मजुर पक्ष यांचा होय. युनायटेड नॅशनॅलिस्ट पक्ष हा या वेळी तरी जुने मंत्री, व्यापारात ज्यांचे हितसंबंध गुंतले आहेत अशा धनिकांचा होता. त्यांचे खजिनदार श्री. जे. एल. कोतलावलं यांना धनिकांचा भरपूर पाठिंबा होता. परंतु हा पक्ष तेवढासा शिस्तबद्ध नव्हता. या निवडणुकीचे वेळी १८१स्वतंत्र उमेदवार उभे राहिले होते, हीच गोष्ट सिलोनमधील निरनिराळ्या पक्षावर जनतेचा किती विश्वास होता हे दर्शविणारी होती. लोकानांही या निवडणुकीचे वैशिष्टच तेवढेसे ध्यानात आले नाही व सबंध सिलोनमध्ये अवघे ४९ टक्के मतदान झाले व कित्येक नागरिक आपले मताचे महत्त्व न कळल्यामुळे घरी बसून राहिले.

या मतदानात जरी सर्वांत जास्त जागा युनायटेड नॅशनॅलिस्ट पक्षास मिळाल्या तरी स्वतंत्रपणे सरकार बनविण्याची शक्ती त्यांचेमध्ये आली नाही. डाव्या गटांपैकी लंका समसमाज पक्ष व कम्युनिस्ट यांना अठरा, उत्तरे कडील तामीळ काँग्रेसला सात व सिलॉन इंडियन कॉंग्रेसला सहा व स्वतंत्रांना २१ जागा मिळाल्या. यातील विशेष म्हणजे बर्गर्ज जमातीचे एक प्रतिनिधी पी.जी.बी कुनेमन हे निवडून आले. ते कम्युनिस्ट पक्षाचे होते. या परिस्थितीत सिलोनला पक्षाचे मंत्रिमंडळापेक्षा संयुक्त मंत्रिमंडळ बनविणे भाग होते. युनायटेड नॅशनॅलिस्ट पक्षाचे श्री. डी. एस. सेनानायकं, एकवीस स्वतंत्र सभासद, सहा सरकारनियुक्त सभासद (चार युरोपियन व दोन बर्गर्ज) यांचे मदतीने मंत्रिमंडळ या वेळी बनवावे लागले.या सेनानायकं मंत्रिमंडळात एकूण तेरा मंत्री होते.मागील मंत्र्यांपेक्षा ही संख्या दुप्पट होती. त्यातील चार जुन्या मंत्र्यांना महत्त्वाची खाती देण्यात आली.आजचे पंतप्रधान डडली सेनानायकं हे जुन्या पंतप्रधानांचे चिरंजीव. यांना प्रथम या वेळी मंत्रिमंडळात घेतले गेले. तर पंतप्रधानांचे पत्नीचे एक नातलग जे. आर. गुनवर्दनं अर्थमंत्री बनले. असे हे नातलगाचे सरकार सेनानायकं यांनी बनविले व त्याची चेष्टा ब्रिटिश पार्लमेंटपर्यंत झाली. या मंत्रिमंडळात

सिलोनच्या राजकारणात पुढे प्रामुख्याने आलेले एस. डब्ल्यू. आर. डी. बंदारनायकं हे होते. पण त्यांचेकडे स्थानिक स्वराज्य खात्याचा कारभार देण्यात आला होता. अशा तऱ्हेने या लोकशाही कारभाराला अशा संयुक्त मंत्रिमंडळाने सुरवात झाली. त्यात अनेक दोष होते. त्यामुळे विरोधाला तोंड देतच मंत्रिमंडळाला कारभार करावा लागला.

# शेती उत्पादनाचा बिकट प्रश्न

सिलोनची सत्ता लोकनियुक्तांचे हाती आल्याबरोबर प्रथम कोणता महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला असेल तर तो सिलोनी परकीय चलनाचा होय. सर्व हिशोब पूर्ण होताच ब्रिटिशांचे खात्यावर सिलोनचे १२६ कोटी पौंड निघाले. हे पैसे ताबडतोब मिळणे शक्य नव्हते. परंतु याबाबत हे पैसे ब्रिटिशांनी कसे परत करावे याबाबत एक सोईचा करार मंत्रिमंडळाने केला. मंत्रिमंडळाने पहिल्या सहा वर्षांची नव–नव्या सुधारणांची एक योजना आखली. प्रत्येक खात्याने आपणाला काय हवे व पहिल्या सहा वर्षांत काय झाले पाहिजे याची कल्पना या षड्वार्षिक योजनेत दिली होती. ब्रिटिशांनी अशा तऱ्हेच्या कोणत्याच योजना सिलोनसाठी पूर्वी केल्या नव्हत्या असे नाही, पण त्यांनी केलेल्या योजना १९४७ पर्यंत तरी फायद्याचे दृष्टीने मूर्त स्वरूपात आल्या नव्हत्या. युद्धकालीन अडचणी हे त्यातले एक महत्त्वाचे कारण असू शकेल. १९२४ सालपासून कित्येक विद्युत् उत्पादनाच्या योजना हाती घेण्यात आल्या होत्या, पण त्या पुऱ्या होऊ शकल्या नव्हत्या. १९४६साली प्लायवुड व काच सामानाचे कारखाने सरकारीरित्या काढण्यात आले. पण त्यांचा वार्षिक नफा अवघा ४ लाखांचे घरात होता. काही कांही योजना वीस वर्षांपूर्वी ब्रिटिश एंजिनियरांनी आखल्या होत्या. पण त्या पुऱ्या न झाल्यामुळे त्याचा राष्ट्राला फायदा मिळत

नव्हता व भांडवल गुंतून मात्र पडत होते. त्या तातडीने कार्यान्वीत करण्यासाठी मंत्रिमंडळाने जे पाऊल पुढे टाकले व त्यासाठी आमच्या पैशातून निदान आम्हाला लागेल तो कच्चा माल तरी द्या अशी मागणी ब्रिटिशांकडे नव्या मंत्रिमंडळाला प्रथम करावी लागली.

मंत्रिमंडळाने प्रथम हाती घेतलेले कोणते कार्य असेल तर सिलोनी नागरिकांचे जे मुख्य अन्न तांदूळ त्याचे उत्पादनात वाढ करण्याच्या योजना होत. या योजना २० वर्षांपूर्वी हाती घेण्यात आल्या व त्या अजूनही १९७२ साली व्हाव्या तशा पुऱ्या झालेल्या नाहीत. याची कारणे विविध आहेत व त्यासाठी सर्वच सिलोनी शेती पद्धतीची स्वतंत्र माहिती असणे आवश्यक आहे.

सिलोनमधील १६२२८२३० एकर जमिनीपैकी शहरे व शेतजमीन नसलेली जमीन ४८२७० एकर आहे. पिकास योग्य पण अजून उपयोगात न आणलेली जमीन १०६६२० एकर आहे. तर फळ-बागायती खाली आलेली जमीन १४४८८०० एकर आहे. (जवळजवळ ९ टक्के) चहा, रबर, नारळ व इतर सिलोनच्या उत्पन्नाच्या इतर फळांनी जवळजवळ १३टक्के जमीन व्यापली आहे. तर भात जमीन ८३ टक्के (१२६१९१०एकर) आहे. यावरून केवढ्या मोठ्या जमिनीतून सिलोन आपले उत्पादन काढते याची कल्पना येण्यासारखी आहे. शेती सुधारणा व उत्पादनवाढीस सिलोन सरकार दरवर्षी ४ कोटी ८० लक्ष रुपये खर्च करते, ही गोष्ट विचारात घेतली की उत्पादन कसे झपाट्याने वाढत जात आहे याची कल्पना येते. सिलोनच्या जवळ जवळ पन्नास पटीने मोठ्या असलेल्या हिंदुस्थानात शेतीवर ६००ते८०० कोटी रुपये तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत आम्ही खर्च करू शकलो. यावरून मंत्रिमंडळानी आपले शेती व बागायतीचे वाढीसाठी केलेले हे प्रयत्न बरेच अभिनंदनीय वाटतात. अर्थात या प्रयत्नांना आतापर्यंत तरी भरघोस यश येत गेले.

सिलोनच्या शेती पद्धतीत प्रथमपासूनच अनेक दोष राहून गेले होते. रान तोडून तेथे जमीन कसावयाची म्हटले अगर शेतीस उपयुक्त जमीन पिकास आणावयाची म्हटले तर त्या जमिनीवर (चेना लँड) सरकारची अगर खाजगी मालकांची मालकी ब्रिटिशांनी केलेल्या कायद्यान्वये राहात असे व ती

कसणारा शेतकरी नुसता कूळ म्हणून काम करी! यामुळे हजारो एकरांची नवी भर पडणारी जमीन सरकारी नावावर सारखी चढत होती. वाढती शेती निर्माण करावयाची पण ती सरकारी मालकीची अगर ब्रिटिश बागायतदारांचे मालकीची व्हावयाची हा प्रकार स्वातंत्र्य मिळेपर्यंत सुरू होता. शेतकरी कुळाचे हाती असलेल्या जमिनीत भरपूर उत्पन्न न निघाल्यास त्याला शेतसारा व मक्ता देता येत नसे व तो न दिल्यामुळे या कुळाच्या हाती असलेल्या जमिनी सरकार खाजगी मालकांना विकून त्याचा पैसा उभा करी. १८८२ पासून १८८५ पर्यंतचे काळात एकट्या न्युरेल्या भागात २८८९भात शेते विकण्यात आली, यामुळे जमीनदार व पैसेवाला वर्गही शेते विकत घेई व खऱ्या शेतकऱ्याला त्यांच्या हाताखाली मजूर म्हणून राबविण्याशिवाय दुसरे गत्यंतर नव्हते. यामुळे सिलोनच्या सुपीक बागायत जमिनी व शेती यांचे उत्पादन जसजसे वाढू लागले तसतसा जमीनदार वर्ग लक्षाधीश होऊ लागला व शेतकरी मात्र त्यांच्या हाताखाली राबणारा साधा मजूर राहिला.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हाती सत्ता असलेल्या युनायटेड नॅशनल पक्षाच्या सरकारने ८ वर्षे कारभार करूनही सिलोनची परिस्थिती कशी होती याचे चित्र युनिव्हर्सिटी ऑफ सिलॉनतर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या अहवालात पाहावयास मिळते. त्यात असे म्हटले आहे की "आज सिलोनमध्ये शेतावर राबणाऱ्या कामगाराला भरपूर खाण्यापुरते अन्न मिळते असे वाटत नाही. मध्यमवर्गीय, व्यापारी व बागायतदार यांच्याकडून तो पिळला जात आहे. १९५० साली शेतावर राबणाऱ्या ३८ टक्के शेतकरी कुटुंबाजवळ एक तसूभरही स्वतःचे मालकीची जमीन नव्हती, २१ टक्के शेतकऱ्याजवळ अवघी अर्धा एकर जमीन होती. अकरा टक्के शेतकऱ्याजवळ एक ते दीड एकर जमीन होती, तर २३ टक्के शेतकरी पाच एकराचे आत जमिनीचे मालक होते. म्हणजे सिलोनमधील ९० टक्के शेतकरी ५ एकराचे आतील मालक जमीनदार होते. यातच दरवर्षी वाढत्या प्रजेची भर पडत असल्याने या पाच एकराची विभागणी आणखी कमी होऊ लागली. जमीनदार व कसणारे जमीनदार यांचे प्रमाणही या अहवालातून देण्यात आले आहे. साधारणपणे खेड्यात राहणाऱ्या मंडळीत अवघे १टक्के जमीनदार, १४ टक्के कसणारे शेतकरी, ७ टक्के कूळ शेतकरी व १८ टक्के

शेतकामगार व राहिलेल्या ६० टक्क्यात, मास्तर, आयुर्वेद डॉक्टर, कारकून, धोबी, ७ टक्के व्यापार करणारे, ५ टक्के छोटे छोटे धंदे करणारे व सतरा टक्के बिगर शेतकरी कामगार आहेत. सर्वसाधारणपणे खेड्यातून अशा तऱ्हेने व्यवसा-सायाची विभागणी होती. उत्पन्नाचे बाबतीत बोलावयाचे तर खेड्यात राहणाऱ्या ६८ टक्के लोकांची मिळकत दर महिन्याला १०० रुपयांचे आत आहे. ७ टक्के लोकांचे १५० रु. ते १९७ रु. व ७ टक्के लोक २०८ रुपयांचे वर मिळविणारे होते. खेड्यातल्या भात शेतीचे उत्पन्न एकरी २५ बुशल आहे,तर जपानमध्ये एवढ्याच पावसात व पाणीपुरवठ्यात ७० बुशल एकरी उत्पादन काढले जाते. यावरून सिलोनच्या उत्पादनवाढीला अजूनही किती वाव आहे त्याची कल्पना येण्यासारखी आहे.

बागायतीचे उत्पन्नाबाबतही खेड्यातील नागरिकांचे उत्पन्न कसे समपातळीत नव्हते त्याची कल्पना अहवालातील विवेचनावरून येण्यासारखी आहे. सर्वसाधारण रबराचे उत्पादन काढणाऱ्या जमीनदाराचे उत्पन्न महिना ३२९ रुपये, तर रबर पिकविणारा शेतकरी महिना १८३ व खंडकरी महिना १०७,तर शेतमजुर महिना ८१ रुपये याप्रमाणे खेड्यात राहून मिळवितो. हिंदी खेडुतांचे मानाने हे उत्पादन जास्त आहे. पण सिलोनमधील जमीनदार वर्ग जरी अवघा १टक्का असला तरी त्यात बंदारनायकं कुटुंबासारखी मोठी कुटुंबे आहेत. त्यांचे उत्पन्न जरी दिसावयास फार वाटत नसले तरी प्रदेशाची आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थिती या बड्या जमिनदारीमुळे सर्वस्वी त्यांचे हाती होती. सर्व कुळावर जमिनदारांची अमर्याद सत्ता होती. कुळाची जमीन एक वर्षानंतर कुळाकडूनही काढून घेतली जात होती. त्यामुळे जमीनदार वर्गाचे वजन शेतकरी वर्गावर फार होते. खेड्यात सहकारी संस्थांचा प्रसार १९२१ पासून सुरू झाला. त्या वर्षी ही संख्या १५४ होती ती १९४१ पर्यंत १८५२ वर गेली आहे व या संस्थांची सभासद संख्या १८००० वरून ७९००० वर गेली. या सोसायट्यांचे कर्जात सिलोनचा शेतकरी एवढा गुरफटला आहे की १९५१ साली ३० टक्के शेतकरी या सोसायट्यांचे कर्ज घेऊनच जगत होते.

नव्या मंत्रिमंडळात श्री. जे. आर. जयवर्दनं यांनी शेतकी मंत्री म्हणून सत्ता आपले हाती घेतल्यानंतर या सहकारी सोसायट्या व शेतकऱ्यांचा

शेतकामगार व राहिलेल्या ६० टक्क्यात, मास्तर, आयुर्वेद डॉक्टर, कारकून, धोबी, ७ टक्के व्यापार करणारे, ५ टक्के छोटे छोटे धंदे करणारे व सतरा टक्के बिगर शेतकरी कामगार आहेत. सर्वसाधारणपणे खेड्यातून अशा तऱ्हेने व्यवसासायाची विभागणी होती. उत्पन्नाचे बाबतीत बोलावयाचे तर खेड्यात राहणाऱ्या ६८ टक्के लोकांची मिळकत दर महिन्याला १०० रुपयांचे आत आहे. ७ टक्के लोकांचे १५० रु. ते १९७ रु. व ७ टक्के लोक २०८ रुपयांचे वर मिळविणारे होते. खेड्यातल्या भात शेतीचे उत्पन्न एकरी २५ बुशल आहे,तर जपानमध्ये एवढ्याच पावसात व पाणीपुरवठ्यात ७० बुशल एकरी उत्पादन काढले जाते. यावरून सिलोनच्या उत्पादनवाढीला अजूनही किती वाव आहे त्याची कल्पना येण्यासारखी आहे.

बागायतीचे उत्पन्नाबाबतही खेड्यातील नागरिकांचे उत्पन्न कसे समपातळीत नव्हते त्याची कल्पना अहवालातील विवेचनावरून येण्यासारखी आहे. सर्वसाधारण रबराचे उत्पादन काढणाऱ्या जमीनदाराचे उत्पन्न महिना ३२९ रुपये, तर रबर पिकविणारा शेतकरी महिना १८३ व खंडकरी महिना १०७,तर शेतमजुर महिना ८१ रुपये याप्रमाणे खेड्यात राहून मिळवितो. हिंदी खेडुतांचे मानाने हे उत्पादन जास्त आहे. पण सिलोनमधील जमीनदार वर्ग जरी अवघा १टक्का असला तरी त्यात बंदारनायकं कुटुंबासारखी मोठी कुटुंबे आहेत. त्यांचे उत्पन्न जरी दिसावयास फार वाटत नसले तरी प्रदेशाची आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थिती या बड्या जमिनदारीमुळे सर्वस्वी त्यांचे हाती होती. सर्व कुळावर जमिनदारांची अमर्याद सत्ता होती. कुळाची जमीन एक वर्षानंतर कुळांकडूनही काढून घेतली जात होती. त्यामुळे जमीनदार वर्गाचे वजन शेतकरी वर्गावर फार होते. खेड्यात सहकारी संस्थांचा प्रसार १९२१ पासून सुरू झाला. त्या वर्षी ही संख्या १५४ होती ती १९४१ पर्यंत १८५२ वर गेली आहे व या संस्थांची सभासद संख्या १८००० वरून ७९००० वर गेली. या सोसायट्यांचे कर्जात सिलोनचा शेतकरी एवढा गुरफटला आहे की १९५१ साली ३० टक्के शेतकरी या सोसायट्यांचे कर्ज घेऊनच जगत होते.

नव्या मंत्रिमंडळात श्री. जे. आर. जयवर्दनं यांनी शेतकी मंत्री म्हणून सत्ता आपले हाती घेतल्यानंतर या सहकारी सोसायट्या व शेतकऱ्यांचा

कर्जबाजारीपणा यांचा चांगला अभ्यास केला व ५ मे १९५४ रोजी प्रसिद्ध केलेल्या अहवालात ही खेड्यातील सहकारी चळवळ खालावत चालल्याचे सांगितले. या सोसायटया एवढ्या दलाल बनल्या आहेत की त्या आता कष्टाळू शेतकऱ्यांना लुबाडू लागल्याचे त्यांनी उजेडात आणले. ते आपले अहवालात लिहितात, "या सहकारी सोसायटयांनी खेड्यातून व तालुक्याचे ठिकाणी निरनिराळी दुकाने काढली व तेथे असा माल भरला की तो जनतेचे उपयोगाचा नव्हता, पण तो खरेदी केला गेल्यामुळे जनतेचे पैसे ठराविक व्यापाऱ्यांना मिळाले व पैसे अशा सहकारी खरेदीत फुकट गेले व यामुळे विशिष्ट कारखानदारांचा तेवढा फायदा झाला."

सिलोनमधील कोणत्याही शेतकरी समाजरचना असलेल्या खेड्यात ग्रामपंचायतीला महत्त्व दिले जाते. तालुक्याचे ठिकाणचे म्युनिसिपालिटचा व मोठ्या शहरातील कॉर्पोरेशनप्रमाणे खेड्याचे जीवनाशी ग्रामपंचायती एकरूप झाल्यासारख्या दिसतात. हिंदुस्थानप्रमाणे तेथेही पंचायती अगर शहरातील नगरपालिकांची कर्तव्ये ठरलेली असतात.पण खेड्यात मात्र पंचायतीचे प्रमुख, शाळेचे मास्तर, बुद्धधर्मोपदेशक व आयुर्वेदीक डॉक्टर यांचे हाती सर्व सत्ता असते.हिंदमधील शेतकऱ्यांचा संबंध परदेशीय मंडळीशी फारसा आलेला नाही, पण तशी स्थिती सिलोनमध्ये नाही. रबर व चहाचे मळ्याचे निमित्ताने ब्रिटिश मळेवाले आले. ते खेड्यात जाऊन राहिले व चहाचे उत्पादनासाठी खेडुतांना त्यांनी जवळ केले ते कामगार म्हणून! मध्य सिलोनमधील या चहाच्या मळ्यात व विशेषत: बागायतीत राबणाऱ्या कंदायन शेतकऱ्यांची संख्या २० लाखावर आहे, तर डोंगराळ प्रदेश सोडून इतरत्र सखल प्रदेशात राहणाऱ्या सिंहली शेतकऱ्यांची संख्या ३५ लाखावर जाईल, पण या सखल प्रदेशातील भात पिकविणारे शेतकऱ्यांची स्थिती थोडीतरी बरी आहे, कारण त्यांना ब्रिटिश मालकांचे हाताखाली काम करावे लागत नाही व त्यांची पिळवणूकही होत नाही. सिलोनमधील भातशेतीविषयी ब्रिटिशांनी कधीच औत्सुक्य दाखविले नाही. या शेतकरी कामगारांपैकी बऱ्याच जणांची थोडी फार शेतीही असते व ते जवळ जवळ स्वतंत्र अगर एखाद्या सिंहली जमीनदारांचे कूळ असतात. परंतु ज्या ठिकाणी नव्या रबर एस्टेट ब्रिटिशांनी निर्माण केल्या तेथील मूळ जमीनदार

सिंहली शेतकरी असूनही ते ब्रिटिशांचे हाताखाली आले. हे कंदायन शेतकरी बरेचसे अशाच अवस्थेत कामगार म्हणून सिलोनमध्ये वावरत असून, खरे उत्पन्न काढणारे ते असूनही त्यांना मिळावे तसे सुखसौख्य मिळत नाही. ब्रिटिश मळेवाल्यांचे दहशतीखाली ते भरडून निघतात, अशी त्यांची स्थिती अजूनही काही ठिकाणी आहे.

सिलोनची सत्ता लोकनियुक्त शेतकी मंत्री श्री. जी. एस. सेनानायकं यांचे हाती आल्यापासून त्यांनी प्रथम जर कोणती गोष्ट केली असेल तर ती शेतीचे विशेषत: सिलोनचे मुख्य अन्न जे भात पीक त्याचे उत्पादनवाढीसाठी प्रयत्नाला सुरवात केली. त्यांच्या षड्वार्षिक योजनेचा शेती उत्पादनवाढ हा मुख्य गाभा होता. त्यांनी पडीक जमीन उपयोगात आणण्यासाठी जुनी परंतु उपयोगात नसलेली तळी प्रथम सुरू केली व कलंबोच्या कित्येक भांडवलदारांना त्यात पैसे घालावयास लावले. त्यांच्या राजवटीतील मोठे काम म्हणजे पूर्वेकडील गॉलओया नदीचे खोऱ्यातील गॉलओया धरण होय. या धरणामुळे जवळ जवळ दीड लक्ष एकर जमीन पिकास येऊन त्याखाली १ लक्ष २० हजार एकर जमिनीत भात पीक काढणे शक्य झाले आहे. याशिवाय या धरणाचे पाण्याचा उपयोग विद्युत् उत्पादनासाठी होणार होता. १९४९ पासून १९६५पर्यंतचे काळात शेती पाणीपुरवठ्याचे योजनेखाली २ लाखावरून ४ लाख एकर शेती भिजेल एवढ्या मोठ्या योजना शेतीसाठी पुऱ्या झाल्या. १९४५ साली २१३४१३ एकर जमीन, पाणीपुरवठ्याचे मोठ्या योजनेखाली होती. ती ४६३७१८ एकर १९६५साली झाली तर छोट्या योजनाखाली २०५३२२ एकरावरून ही संख्या ३८०१५७एकरावर गेली. एवढी प्रगती या शेतीत पाणी पुरवठा योजनेनंतर वीस वर्षाचे स्वातंत्र्याचे काळात झाली. गॉलओया नदीवरील धरणामुळे ऊस पिकविण्याची योजनाही शेतकी मंत्री सेनानायकं यांना अमलात आणावयाची होती व त्यासाठी २७ हजार ऊस पिकाला पाणी द्यावयाचे त्यांनी ठरविले होते, पण ती योजना फारशी मूर्त स्वरूपात कधीच येऊ शकली नाही.

या सुधारणा सुरू असताना नव्या शेतीसाठी व वसाहतीसाठी प्रयत्न करताना तेथे सिंगली शेतकरी बहुसंख्य होणार का तामिळींचे अधिराज्य राहणार? ही गोष्ट राजकीय पुढारी प्रथम पाहात व त्यामुळे भांडणेही होत व

अशा तऱ्हेने सिंहली व तामीळ भाषियांचा लढा कमी होण्याऐवजी सिलोनच्या रक्तात प्रत्येक नवनव्या सुधारणांबरोबर अधिक मुरत गेला. सिंहली नागरिकांनी सिलोन ही आपली भूमी ही भावना प्रामुख्याने मनात असे तर उपरे आलेले तामिळी आम्हालाही सिलोनमध्ये हक्क मिळाले पाहिजेत असे सांगत. असे जरी होते तरी भातशेतीचे उत्पादन सिलोनमध्ये पूर्णपणे वाढत होते, यात बिलकूल शंका नाही. १९३९ साली सिलोनला १ कोटी १० लक्ष हंड्रेडवेट धान्य परदेशातून आणावे लागे. ते १९६३ साली ७० लक्ष हंड्रेडवेटवर आले. या मुदतीत सिलोनची लोकसंख्या ६३ टक्क्यांनी वाढली असूनही या वाढत चाललेल्या उत्पादनामुळे लोकसंख्या कितीही वाढो आम्ही एक दोन वर्षात धान्याचे दृष्टीने निश्चित स्वयंपूर्ण होऊ असे विश्वासाने व निश्चयाने सिलोनीमंत्री सांगत आहेत. सिलोनमध्ये भात हेच मुख्य अन्न समजले जाते. दिवसातून तीन वेळा भरपूर भात खाणारे सिलोनी, क्वचितच गहू खातात. सिलोनच्या या धान्य आयातीत एक गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे ती म्हणजे तांदूळ साखर यांची परदेशी आयात सर्वस्वी सरकार करते. कोणत्याही व्यापाऱ्याला यात हातचलाखी करू देत नाही. बाहेर धान्य जरी महाग मिळाले तरी जनतेला ते योग्य प्रमाणात व योग्य किमतीत विकण्याची जबाबदारी सरकारने प्रथमपासून आपले हाती ठेविली व त्यात मिळणारे उत्पादन जनतेसाठी ते वापरू शकतात. यामुळे सिलोनच्या आयात व्यापारापैकी निदान तांदूळ व साखर यासारख्या महत्त्वाच्या जिनसांचा व्यापार अजूनपर्यंत सिलोनच्या हाती राहिला आहे. तांदळासारखा आवश्यक पदार्थ ३६ सेंट किलोने सिलोनमध्ये विकला जात होता पण त्याची खरेदी ६२सेंट होती. (आपले पैशाप्रमाणे सेंट हे नाणे सिलोनमध्ये वापरले जाते) अशा तऱ्हेने साखरेचे बाबत जादा किंमत देऊन किलोमागे २६ सेंट सरकार आपले पदरचे भरून जनतेला १९४८ पासून स्वस्त तांदूळ विकत असे. जनतेच्या अन्नासाठी सरकारी पैसे खर्च करण्याचीही वृत्ती येथे राष्ट्रीय सरकारमध्ये एवढी वाढत गेली की १९६८ साली सिलोनमध्ये युनायटेड नॅशनॅलिस्ट पक्षाचे सरकारने स्वतःचे खर्चाने तांदूळ विकत घेऊन ते माणशी दोन किलो याप्रमाणे सर्व नागरिकांना फुकट वाटले. आपल्या नागरिकांना रोज लागणाऱ्या अन्नापैकी २ किलो भाग फुकट देणारे जगातले सिलोन हे पहिले राष्ट्र आहे. ही वाटणी किती पद्धतशीर

सि.—६

रेशनकार्डावर चालते हे मी स्वतःचे डोळ्यांनी माझे सिलोन प्रवासाचे वेळी पाहिले आहे. यामुळे सिलोनमध्ये एकही भिकारी आढळत नाही. नोकरी नसली तरी सिलोनमध्ये नागरिक म्हणून राहून या मिळणाऱ्या दोन शेर धान्यावर उदरनिर्वाह करणारे काही थोडे आहेत. साखरेच्या व्यापारात मात्र सरकार स्वतः व्यापार करीत असल्यामुळे १९६८ साली परदेशातून सिलोनमध्ये आणण्यात येणारी साखर ७५ सेंट किलोने सिलोनमध्ये पडत होती. पण सिलोन सरकार ती १५० सेंट किलोने विकून आपला मिळणारा फायदा जनतेच्या उपयोगाच्या इतर गोष्टी खरेदी करण्यासाठी खर्च करते. उदाहरणार्थ धान्य स्वस्त अगर फुकट देता यावे म्हणून सरकारने सिलोन १९६६ साली २९ कोट रुपये 'फूड सबसिडी' साठी खर्च केले तर वाहतूक रेल्वे व मोटार यांच्या वाढत्या खर्चाचा ताण जनतेवर पडू नये म्हणून सिलोन सरकारने 'समाजसेवा' खात्यासाठी ४९ कोटी १० लक्ष रुपये खर्च केले. यावरून हिंदुस्तानप्रमाणे वाढत्या खर्चाचा ताण सिलोनच्या राष्ट्रीय सरकारने जनतेला पडू दिला नाही.

अशा तऱ्हेने सिलोनच्या राष्ट्रीय सरकारने जनतेला जेवढे विश्वासात घेता येईल तेवढे घेण्याचा प्रयत्न केला, तरी पण सिंहली व तामीळ भाषिक यांचे वाद मिटू शकले नाहीत. प्रतिनिधि सभेत या दोन्ही भाषातून भाषणे करण्यात येत.वरिष्ठ सभागृहात ३०सभासदच होते पण त्यातील १५ सभासद प्रतिनिधी सभागृहाचे सभासद निवडीत.या निवडीचे वेळी पुन्हा पक्ष व भाषा प्रामुख्याने पुढे येत असे. या वरिष्ठ सभागृहातील सभासद मंत्रिमंडळात घेतले जात पण त्यांना प्रतिनिधी गृहात बसून उत्तरे देण्याचा अधिकार मात्र नसे. त्यांचा एखादा पार्लमेंटरी सेक्रेटरी मुद्दाम प्रतिनिधी गृहातला घेतला जातो व तो मंत्र्याचे काम करतो.ब्रिटिश पार्लमेंटचे अनुकरण या सभागृहातून पदोपदी होत असते.हळूहळू मंत्र्याचे जागी चांगली हुशार माणसे येऊ लागल्यामुळे खात्याचे सेक्रेटरीचे हातची सत्ता कमी झाली. सिलोनी पुढाऱ्यांचे हाती जसजशी सत्ता येऊ लागली तसतसा तामीळ व सिंहली वाद डोके वर काढू लागला. सिलोनी मळ्यावर १९४७साली६६५४४३ हिंदी कामगार राहात होते.यांना सिलोनविषयी वाटावे तसे प्रेम वाटत नाही असे आरोप केले जात होते व यातूनच पुढे सिलोन–हिंदचा प्रश्न चिघळू लागला व तोच आजतागायत सुटू शकलेला नाही.

१९६८ साली सिलोनमधील हिंदी नागरिकांची संख्या आठ लक्षावर होती. एक कोटी दहा लक्ष लोकसंख्येत हे नागरिक आपले स्वतंत्र स्थान निर्माण करून आहेत. त्यांना आपल्यात सामावून घेण्यास सिलोनची सर्वसाधारण जनता तयार होती, परंतु हिंदुस्तानशी सर्व संबंध तोडून या देशाशी एकरूप झाले पाहिजे, येथील नागरिकत्व घेतले पाहिजे असा सिलोनी जनतेचा आग्रह आहे. याविषयी बोलताना एक तामीळ मंत्री मला म्हणाला, "या नागरिकांची सोय हिंदुस्थानने लावावी. तेथे चहाचे मळे काढून त्यांना तिकडे न्यावे." तर दुसरे एक कामगार पुढारी म्हणाले, "हे कसबी कामगार जर स्वेच्छेने आपले देशात जात असतील तर त्यांना आम्ही अवश्य जाऊ देऊ पण ते येथे आज वर्षानुवर्षे आमचेशी एकरूप होऊन राहिले आहेत. त्यांना हुसकावून लावण्याचे प्रयत्न जर कोणी केले तर मात्र आम्ही ऐकणार नाही. तसेच येथे पैसे मिळवून त्यांचा उपयोग जर त्यांची हिंदी कुटुंबे पोसण्याचा उपक्रम जर ते करणार असतील तर तोही आम्ही चालू देणार नाही." अशा तऱ्हेने सिलोनमधील हिंदी मजुराचा प्रश्न हा तेथील राजकारणाचा एक घटक प्रश्न होऊन बसला आहे. सिलोनी शेत कामगार हे हिंदी कामगारांचे मानाने आळशी वाटतात. कामचुकारपणा त्यांचेमध्ये विशेष आढळतो तसा प्रकार हिंदी मजुरात नाही. हे तामीळ नागरिक कष्टाळू व प्रामाणिक असल्यामुळे मालक बागायतदार त्यांना जास्त पसंत करतात. त्यांना ते हवे आहेत. ते आज जर स्वदेशी गेले तर सिलोनी चहाचे मळ्यावर कष्ट करणारी माणसे मिळणार नाहीत हेही सिलोनी बागायतदार व ब्रिटिश मळेवाले ओळखून आहेत. त्यामुळे त्यांना घालवून देण्याचा प्रश्न रेंगाळत पडला आहे व तो तसाच रेंगाळत ठेवणे सिलोनी बागायतदारांच्या व मळेवाल्यांचे हिताचेच आहे, असे त्यांच्या एकंदर धोरणावरून वाटते.

# हिंदी मजुरांचा प्रश्न

सिलोनच्या स्वातंत्र्यानंतर हिंदी–सिलोनी संबंध मोठे प्रेमाचे होत चालले आहेत असे म्हणता येत नाहीत. सिलोनी व हिंदी पुढारी एकमेकांना भेटत असले, अनेक गोष्टीवर खल करीत असले तरी सर्वसाधारण हिंदी माणसाला सिलोनी नागरिकाविषयी आपला शेजारी म्हणून प्रेम वाटते. त्याच्या व्यापारात, प्रगतीत व स्नेहसंबंध वाढविण्यासाठी आपण भाग घ्यावा असे दोन्ही राष्ट्रातील लोकांना वाटत नाही. ही गोष्ट सत्य आहे. आपले संस्कृतीशी जवळचा शेजारी म्हणून सिलोनकडे हिंदी पुढारी कधीच आस्थेने पाहात असावे असे वाटत नाही. सिलोनी राज्यकर्तेही या दृष्टीने काही प्रयत्न करीत आहेत अशी चिन्हे माझे पाहणीत तरी आढळली नाहीत. सिलोनचे निर्यातीचे अधिकृत आकड्यावरून पाहाता हिंदच्या जवळचे हे राष्ट्र दरवर्षी अवघा जवळ जवळ ४२५४५००० रुपयांचा माल सिलोन हिंदमध्ये निर्यात करते. तर अमेरिका १४ कोटी, रशिया ९ कोटी, चीन १७ कोटी व इंग्लंड ५० कोटीचा माल या देशातून मिळवितो. याशिवाय ऑस्ट्रेलिया, कॅनडा यासारख्या देशातूनही आमच्यापेक्षा जास्त माल सिलोन पाठविते पण हिंदुस्थानसारख्या जवळच्या देशाला तो पाठविणे सिलोनला आवडत नाही. आयातीबाबतही ही स्थिती आहे. हिंदचा फार तर १३ कोटीचा माल सिलोन दरवर्षी विकत घेते. ब्रिटनकडून २६ कोटी खरेदी करते. चीनसारख्या देशाला ११ कोटीची मागणी मिळते, तर ऑस्ट्रेलियातूनही ९ कोटीचा

खरेदी केला जातो. यावरून सिलोनचे संबंध हिंदपेक्षा इतरांशी कसे निकटचे आहेत याची कल्पना येते.

या हिंद व सिलोन संबंधात तेढ उत्पन्न करणारा मोठा प्रश्न कोणता असेल तर तो सिलोनमधील हिंदी मजूरांचा प्रश्न होय. हे हिंदी कामगार आमचे देशाला लुबाडतात व पैसे घेऊन जातात अशी समजूत सिलोनी नागरिकांची आहे. आज सिलोनची परिस्थितीच अशी आहे की सिलोनमधील दोन तृतीयांश कामगार वर्ग (८ लक्ष कामगार) हिंदमधील आहेत. विशेषतः चहा व रबराचे मळे व नारळाच्या बागा यात हे मळेवाले पसरले असून, त्यांच्या नागरिकत्वाचा प्रश्न कसा सोडवावा हा एक मोठा विचार करण्यासारखा प्रश्न होऊन बसला असून, यामुळे सिलोनी व हिंदी संबंधात दिवसेदिवस अधिक तेढ वाढत चालली आहे. कोणतेही महत्त्वाचे नागरिकत्वाचे हक्क या हिंदी कामगारांना आज सिलोनमध्ये नाहीत. १९२० सालापासून सिलोनमधील या हिंदी नागरिकांचा प्रश्न वर डोके काढू लागला. सिलोनी नागरिकांना नवे हक्क देण्याची मोहीम सुरू झाली, तेव्हापासून सिलोनी वृत्तपत्रातून या हिंदी मजूरांना कोणतेही हक्क देण्याचे कारण नाही, ते हिंदी नागरिक आहेत अशीच ओरड सुरू केली. १९४६ साली घेतलेल्या शिरगणतीत नुसत्या चहाचे व रबराचे मळ्यावर राहणाऱ्या हिंदी कामगारांची संख्या ६६५८५३ भरली. ब्रिटिश लेखकांनी लिहिलेल्या पुस्तकातून या हिंदी कामगारांना पुरेसे अन्न हिंदमध्ये मिळत नाही म्हणून ते सिलोनमध्ये येतात अशा अर्थाची टीका सुरू केली व हिंदचे दारिद्र्य वेशीवर टांगले. सिलोनच्या ऊर्जितावस्थेला या हिंदी कामगारांनी मळ्यात अविरत राबून केवढी भर टाकली याचा विचार करावयास फारसे कोणी तेथे सध्यातरी तयार नाहीत.

सिलोनमध्ये हिंदी नागरिकात एकंदर तीन प्रकार असून, (१) शेतावर राबणारे मजूर, तामीळ नागरिक, (२) ज्यांनी व्यापारात आपले लक्ष घातले आहे. सिलोनी व्यापार ऊर्जितावस्थेत आणले आहेत. याशिवाय (३) हिंदमधील काही गुजराती कुटुंबे व तुरळक पारशी मंडळी सिलोनच्या बाजारपेठेत अद्याप व्यापारी म्हणून वावरत असून, त्यांनी मोठे मानाचे स्थान सिलोनमध्ये मिळविले आहे. मातृभाषा तामीळ असणाऱ्या नागरिकांची

संख्या सिलोनमध्ये इतकी आहे की जाफनाच्या आसपासचा बहुतेक प्रदेश त्यांनी व्यापला असून, काही विभागात तर तामीळशिवाय दुसरी भाषा ऐकू येत नाही. सिलोनी जीवनाशी एकरूप झालेल्या नागरिकांनी आपणाला नागरिकत्व मिळावे म्हणून अनेकदा प्रयत्न केले. पण त्यांना यावे तसे यश आलेले नाही. १९५४ पासून १९५८ पर्यंतचे चार वर्षाच्या मुदतीत सिलोनमध्ये कोणतेच हक्क मिळेनात म्हणून तो देश सोडून हिंदुस्थानात परत येणाऱ्या नागरिकांची संख्या ४८३०३ होती. यावरून सिलोनमधील हिंदी नागरिकांचे स्नेहसंबंध कसे दुरावत चालले होते याची कल्पना येते. ही परिस्थिती चिघळत चाललेली पाहून १९५४ चे जानेवारीत त्या वेळचे सिलोनचे पंतप्रधान सर जॉन कोतलावलं व हिंदचे पंतप्रधान पं. नेहरू यांचेमध्ये सिलोनमधील हिंदी नागरिकांना नागरिकत्वाचे हक्क देण्यासाठी करार करण्यात आला. परंतु या कराराची अंमलबजावणी करताना व कलमा कलमाचा अर्थ लावताना सिलोनी राज्यकर्त्यांत एवढे मतभेद झाले की कोतलावलं यांच्या मंत्रिमंडळातील व्यापार मंत्री श्री. आर. जी. सेनानायकं यांना आपले जागेचा राजीनामा द्यावा लागला. तरी या कराराचा फायदा हिंदी नागरिकांना प्रत्यक्ष किती मिळाला याची कल्पना काही आकडयांवरून येण्यासारखी आहे. हा करार झाल्यानंतर चार वर्षांत म्हणजे १९५८ साली हिंदी नागरिक सिलोनमधील संख्या ८२९६१९ होती. त्यापैकी २३७३०४ लोकांनी नागरिकत्वासाठी अर्ज केले. त्यातील ९६९२३ लोकांना नागरिकत्व देण्यात आले व जवळ जवळ ६९६२५२ लोकांना नागरिकत्व देता येणार नाही असे सांगण्यात आले. तेव्हा जवळ जवळ ७३९७ लोकांनी आपले अर्ज मागे घेतले. म्हणजे १९५८ चे अखेरीस आठ लक्षापैकी अवघ्या ९६९२३ लोकांना नागरिकत्व मिळाले. यावरून या हिंद व सिलोनी कराराची वासलात सिलोनमध्ये कशी लागली याची कल्पना येण्यासारखी आहे. या परिस्थितीत आणखी पडणारी विशेष भर म्हणजे १९५९ पर्यंत सिलोनमध्ये सारखे येणारे हिंदी कामगार होत. ही हिंदी वाहतूक थांबविण्यासाठी सिलोनने यानंतर व्हिसा परवाना पद्धती अंमलात आणली कोणालाही सिलोन हायकमिशनरचे परवानगीशिवाय सिलोनमध्ये येता येईना, त्यामुळे या बेकायदा प्रवासाला आता चांगलाच आळा बसला.

ब्रिटिशांनी जाता जाता सिलोनच्या शेतकऱ्याला जो तडाखा दिला तो म्हणजे सिलोनमधील नवीन निर्माण केलेली जमीन निरनिराळ्या अधिकारी जमीनदारांना अत्यंत स्वस्त किंमतीत विकत दिली. अशी जमीन जवळजवळ ५ लक्ष एकरपर्यंत होती व ती एका शिलिंगापासून पाच शिलींग एकर याप्रमाणे विकत दिली गेली. यावरून शेतकऱ्यांच्या हाती पडणाऱ्या या जमिनीची वासलात कशी लागली याची कल्पना येण्यासारखी आहे. मळेवाल्यांनी या विकत घेतलेल्या जमिनी पिकविण्यासाठी परत हिंदी मजूर आणल्याकारणाने पुन्हा सिलोनच्या स्थानिक शेतकऱ्यांचा मजूर म्हणून काम करण्याचा हक्कही हिरावून घेतला गेला. याशिवाय दक्षिणेतून येणारे हे कामगार कधीही सिलोनी स्त्रियांशी लग्ने लावीत नसत. ते वर्षाला घरी जात व तेथे तामीळ, हिंदी मुलींशी लग्ने लावून परत सिलोनमध्ये येत. त्यामुळे या तामिळी नागरिकांचा समावेश सिलोनी जीवनात फार होत असे. कलंबोचे मेयर डॉ. कुमार रत्नम् यांनी लिहिलेल्या एका लेखात तर या हिंदी मजुरांना सिलोनमधून लवकर घालविले नाही तर सिलोन म्हणजे दक्षिणेकडील हिंदी लोकांचे प्रभुत्व असलेला देश बनेल, असे म्हटले आहे. एवढ्यावरच हे प्रकरण थांबले नाही तर ज्या ज्या वेळी शेतकऱ्यांच्या सुधारणाचे एखादे प्रकरण निर्माण होई, त्यावेळी या हिंदी कामगारांचे डोक्यावर सुधारणा अंमलात न आणण्याचे सर्व खापर फोडले जाई. पण हिंदी व्यापारी व कामगार यांना डावलून कोणत्याही राजकीय पक्षाचे सिलोनमध्ये चालण्यासारखे नव्हते. हिंदी व्यापाऱ्यांना व कामगारांना मतदानाचे जरी अधिकार नव्हते तरी त्यांचे पैसे यू. एन्. पी. पक्ष सावरण्यासाठी उपयोगी पडत. त्यांची आर्थिक मदत या पक्षांना होत असल्याने त्यांचे विरुद्ध बोलण्याचे धैर्य कोणालाही होत नसे. प्रतिनिधी सभेत हिंदी-सिलोनी योनेजवर चर्चा सुरू असताना १९५४ साली श्री. बंदारनायकं यांचेसारख्या पुढाऱ्यांनी तर या हिंदी नागरिकांची मदत तुम्हाला हवी म्हणून तुम्ही त्यांचे विरुद्ध बोलू शकत नाही असा स्पष्ट आरोप केला होता. यावरून सिलोनच्या राजकीय इतिहासात या हिंदी नागरिकांचे स्थान कसे महत्त्वाचे झाले, याची कल्पना येण्यासारखी आहे. सिलोनच्या कामगार जगात या दोन तृतीयांश कामगारांचा आवाज फार मोठा आहे. तो उचलून धरण्या-

शिवाय कामगार पुढाऱ्यांना आज गत्यंतर नाही. यामुळे त्यांना बाहेर घालवून सिलोन, सिलोनी नागरिकांसाठी साफ होणे कधीकाळी शक्य होईल असे कोणालाच वाटत नाही. यामुळे हा हिंदी कामगारांचा प्रश्न सोडविण्यासाठी कोणी कितीही करार केले तरी त्याचा फारसा उपयोग होईल असे वाटत नाही. सिलोनमधील हिंदी कामगारांनी परत हिंदमध्ये येणे म्हणजे आपले नवे आयुष्य सुरू करणे होय. त्यांना मळेवाले व बागायतदारांकडून आज ज्या सवलती मिळत आहेत, त्या हिंदुस्थानात मिळण्याची कोणालाच आशा नाही. कारण चहाचे मळे व रबराचे मळे हिंदमध्ये या कामगारांना काम देण्याइतके पुरेसे नाहीत.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अधिकारारूढ यू. एन्. पी. पक्षाने सिलोनचे नागरिकत्वासाठी गव्हनमेंन्ट सिटिझनशिप अॅक्ट १९४८ हा पास करून घेतला व त्याअन्वये सिलोनमधील जवळजवळ एकदशांश हिंदी नागरिकांचे हक्क हिरावून घेतले. या कायद्यान्वये विवाहित परकीय नागरिक जर ७ वर्षे व अविवाहित १० वर्षे सिलोनमध्ये राहात असेल तरच त्याला नागरिकत्वासाठी अर्ज करता येत असे. काही अशिक्षित कामगारांना तर आमचे आजेपणजे अगर वडील येथे राहात होते, यासंबंधीचे दाखले मिळविल्याशिवाय येथे राहण्याचे नागरिकत्वांचे हक्क मिळविणे कठीण झाले. सिलॉन पार्लमेंटरी इलेक्शन अॅक्टमध्येही असाच बदल करून हिंदी-नागरिकांचा मतदानाचा हक्क हिरावून घेण्यात आला. यामुळे जवळजवळ मळेवाल्यांच्या मतदार संघातील हिंदी कामगारांना असलेला मतदानाचा हक्क एकदम नाहीसा झाला व तेथील परिस्थिती पालटून गेली. गेल्या निवडणुकीत याच मतदार संघातून या कामगारांचे मतांवर पाच यू. एन्. पी. व मजूर सभासद निवडून आले होते. या मतदार संघात तर १९२९८ मतदारांपैकी हिंदी मतदार गेल्यामुळे अवघे २९१२ मतदार राहिले. यामुळे सिंहली मतदारांचे हाती सर्व सिलोनी राजकारणाची सूत्रे आली व सिलोनच्या मतदार संघांत मोठी क्रांती झाली. हिंदी नागरिकांची अशा तऱ्हेने गळचेपी करणारा हा कायदा हिंद व सिलोनी नागरिकांचे दोन भाग पाडण्यास कारणीभूत झाला. या कायद्याचा परिणाम सिलोनचे राजकारणावर

चांगलाच झाला. आधीच हिंदी कामगार आपणाला राहण्याची व्यवस्था नीट नाही, औषधपाण्यासाठी दवाखाने नाहीत वगैरे अनेक तक्रारी करू लागला होता. विशेषत: चहाचे मळयावर या तक्रारी वाढू लागल्या होत्या. त्यातच हा मतदानाचा हक्क हिरावून घेतल्याची घोषणा होताच त्यांचेमधील कम्युनिस्ट चळवळीला ऊत आला. यू. एन्. पी. सरकारविरुद्ध मतभेदाचे वारे अधिक पसरू लागले. या कायद्यानुसार सिलोनमध्ये कायमचे राहू इच्छिणारांची एक स्वतंत्र यादी बनविण्यात आली व सिलोनी नागरिकांपासून स्वतंत्र मतदारांची एक यादी तयार करण्यात आली व या जमातीचा स्वतंत्र अल्पसंख्य जमात म्हणून एक विभाग पाडण्यात आला. हे सिलोनचे होऊ घातलेले नागरिक सिलोनी राजकीय भावनांशी पुरते एकरूप झाले नसल्यामुळे त्यांना असे स्वतंत्र मतदार संघाचे अधिकार देण्यात आले असेही यावेळी सांगण्यात आले. या यादीत सिलोनमध्ये गेली १०० वर्षे काढलेली कुटुंबे होती. त्यांना अशा तऱ्हेने वेगळे काढून सिलोनशी एकरूप होऊ दिले नाही, अशी टीका यावेळी सिलोनी वृत्तपत्रातूनही झाली. या प्रश्नावर एवढा ओरडा झाला की हिंदुस्थानातही त्याचे प्रतिध्वनि उमटले. २९ फेब्रुवारी १९५४ रोजी लोकसभेत या प्रश्नावर बोलताना पं. नेहरू म्हणाले, "अशा तऱ्हेने हिंदी नागरिकांच्या स्वतंत्र मतदार संघाची यादी बनविण्यात सिलोनमधील काही राजकीय पक्षाचे हितसंबंध रक्षणाचा एक डाव आहे." युनायटेड नॅशनल पक्षाने यावेळी हिंदी नागरिकांची या यादीत नावे घालताना अनेक लांचलुचपतीचे प्रकार झाल्याचे आरोप सिलोनी पत्रातून करण्यात आले आहेत. यावेळी सिलोनमधील न्यायपद्धती व लोकशाहीचे विडंबन झाले असेही आरोप सिलोनी पत्रांनी केले आहेत. याच हिंदी कामगारांचे मतदानांचे हक्क हिरावून घेतल्याबद्दल यू. एन्. पी.चे एका मंत्र्यांनी राजीनामा दिला. सदर तामीळ गृहस्थ पंतप्रधानाचे मित्र होते व त्यांनी जातीय व भाषीयवादाचा कधीही पुरस्कार केला नव्हता. या प्रश्नावरील त्याचे राजीनाम्यानंतर तामीळ काँग्रेसचे पुढारी जी. जी. पोनम्बलम् यांना मंत्रिमंडळात घेण्यात आले, पण त्यामुळे तामीळ काँग्रेसमध्ये फूट पडून व खिरश्चन तामीळ पुढारी वकील, श्री. चेलव्हनायकम् यांचे नेतृत्वाखाली तामिळींचे हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी नव्या

फेडरल पक्षाचा जन्म झाला. या पक्षाने तामिळी प्रजेला न्याय मिळवून देण्यासाठीच आमचा जन्म आहे अशी उघड उघड घोषणा केली. राजकीय आखाड्यात उघड उघड या पक्षाचे हालचालींना सुरुवात झाली. या तामीळ जमातीच्या जमातवादी पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व अद्यापही सिलोनमध्ये कायम आहे.

यू. एन्. पी. पक्षाचे कारभाराची पहिली अडीच वर्षे पक्षाला पाठिंबा देणाऱ्या मंडळींवर भरपूर पैसा खर्च करण्यात गेली. युद्धकालातील ९ वर्षे काटकसरीत घालविल्यानंतर परदेशीय गंगाजळीतील ९९ कोटी रुपये जवळजवळ खर्ची घातले गेले. कोरियन लढ्यामुळे रबराची किंमत एवढी वाढली की सिलोनच्या रबरावर भरपूर पैसा मिळू लागला. पण या अशा क्षणात वाढणाऱ्या किंमतीवर अंदाजपत्रकाची उभारणी करून नव्या योजना आखणे शक्य नसते.

दुसरे महायुद्ध, कोरियन लढा व त्यानंतर एक मोठे राष्ट्र म्हणून चीनने पूर्वेकडे टाकलेले पाऊल हे लक्षात घेता, आशियातील छोट्या राष्ट्रांना कोठून तरी एकत्रित येऊन आपले अस्तित्व टिकविण्यासाठी काही-तरी करणे आवश्यक होते. आग्नेय आशियातील प्रगतीशील राष्ट्रांनी एक-त्रित येऊन यासाठी प्रयत्न करणे आवश्यक वाटू लागले व यासाठी ९ जाने-वारी १९५० रोजी या विभागातील परराष्ट्र मंत्र्यांची परिषद सिलोनचे पंतप्रधान डी. एस्. सेनानायकं यांचे नेतृत्वाखाली चार दिवस भरली व हीच खरी कलंबो योजनेची सुरवात समजली पाहिजे. या परिषदेने पूर्वेकडील राष्ट्रांनी आपला एकोपा साधताच त्यांचेकडे पाश्चिमात्य राष्ट्रांना लक्ष देणे भाग पडले व पाश्चिमात्य राष्ट्रांनी या योजनेत सामील होऊन आपली मदत या योजनेसाठी देण्याचे कबूल केले व पूर्वेकडील राजकारणात मदत देण्याचे निमित्ताने आपला शिरकाव करून घेतला. या परिषदेमुळे हिंद व पूर्वेकडील राष्ट्रे अधिक जवळ आली.

# यू. एन् पी. पक्षाचा धुव्वा!

स्वातंत्र्यानंतर सिलोनचे राष्ट्रीय महत्त्व वाढावयास पहिले पंतप्रधान श्री. डी. एस्. सेनानायक यांचे प्रयत्न कारणीभूत झाले ही गोष्ट कोणीही अमान्य करीत नाही. १९५० साली आग्नेय आशियातील राष्ट्रांची झालेली परिषद हा एक सर्व आंतरराष्ट्रीय योजनांचा पाया समजला पाहिजे. या चार दिवसाच्या चर्चेत आग्नेय आशियावर मोठ्या राष्ट्रांचे येणारे दडपण मार्शल योजनेनुसार युरोपातील सर्व मोठी राष्ट्रे एकत्रित आल्यानंतर ही राष्ट्रे जशी विशिष्ट दृष्टीकोनातून पूर्वेकडील देशांकडे पाहू लागली, त्याप्रमाणे ही आग्नेय आशियातील राष्ट्रेही एकत्रित येऊन आपल्या संरक्षणाविषयी व उन्नतीविषयी काहीतरी एकत्रित येऊन या परिषदेमुळे बोलू शकली व योग्य त्या बाबतीत सहकार्य करू शकली. आग्नेय आशियातील प्रगतीशील राष्ट्रांना मदत मिळवून देण्याचा प्रश्न यावेळी प्रथम चर्चिला गेला व यामुळेच युरोपातील व अमेरिकेसारख्या सधन राष्ट्रांचे लक्ष आग्नेय आशियातील अविकसित राष्ट्राकडे वेधले व कलंबोयोजना याच चर्चेच्या अनुरोधाने पुढे तयार होऊ शकली. यानंतर कलंबो येथे झालेल्या कॉमनवेल्थ परराष्ट्र मंत्र्यांचे परिषदेत अर्नेस्ट बेव्हिन व हिंदचे पंतप्रधान पं. नेहरू स्वतः हजर राहिल्यामुळे नैर्ऋत्य आशियातील अनेक प्रश्नांचा विचार पंतप्रधान सेना-

नायकं यांच्याशी त्यांना करता आला व यातूनच एकमेकाचे मदतीसाठी कलंबोयोजना तयार करण्याचा निश्चय करण्यात आला. यानुसारच ऑस्ट्रेलियात १९५१ साली भरलेल्या सिलोन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, हिंदुस्थान, न्यूझीलंड, पाकिस्तान व ब्रिटन या राष्ट्रांचे प्रतिनिधींचे सभेत पुन्हा चर्चा झाली. त्यांनी कलंबो येथे आणखी एक बैठक बोलविली. या बैठकीस ब्रह्मदेश, लाओस, कंबोडिया, थायलँड, व्हिएतनाम यांचेही प्रतिनिधी बोलविण्यात आले. ही घडामोड सुरू असताना अमेरिकेने आपणही या आग्नेय आशियातील राष्ट्रांचे उन्नतीत भाग घ्यावयास तयार आहोत असे कळविल्यामुळे या सर्वांचे एक सेक्रेटरिएट कलंबो येथे तयार झाले व येथूनच सर्व राष्ट्रांना प्रगतीसाठी लागणारी आवश्यक ती मदत जाऊ लागली. आंतरराष्ट्रीयदृष्टचा, सिलोनसारख्या सर्वांत छोटया राष्ट्राचे पंतप्रधान यांनी केलेले शेजारी राष्ट्रांना एकत्रित आणण्याचे कार्य फार मोठे होते. त्यामुळे सिलोनला नवे आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त होऊन पंतप्रधान सेनानायकं यांचे आंतरराष्ट्रीय वजन चांगलेच वाढले.

त्यांची ही भरभराट सिलोनमधील इतर पुढाऱ्यांना फारशी मानवली असावी असे वाटत नाही. यू. एन्. पी. पक्षाचे श्री. सेनानायकं यांचेसारख्या पुढाऱ्यांचे नेतृत्वाखाली संयुक्त मंत्रिमंडळाचे चाललेले हे कार्य मंत्रिमंडळांतील इतर पुढाऱ्यांना यू. एन्. पी. पक्ष आपणाला मागे टाकून करीत आहे किंवा काय असे वाटू लागले. प्रतिनिधी गृहाचे प्रमुख म्हणून यावेळी एस्. डब्ल्यू. आर. डी. बंदारनायकं हे काम करीत पण त्यांना पंतप्रधानांनी आपले विश्वासात फारसे कधीच घेतले नाही. ही गोष्ट त्यांचे मनात सारखी डाचत होती. त्यांचेकडे महत्त्वाचे खाते जरी देण्यात आले होते तरी सेनानायकं यांचा आंतरराष्ट्रीय व स्थानिक व्यवहारातील वरचष्मा त्यांना फारसा न आवडून १२ जुलै, १९५१ रोजी त्यांनी आपले मंत्रिमंडळातील जागेचा राजीनामा दिला. या राजीनाम्याचे प्रसंगी त्यांनी गृहात केलेल्या भाषणात माझे विरुद्ध आता किती मोठी शक्ती एकत्रित केली जाईल याची मला पूर्ण कल्पना आहे, असे सांगितले. बंदारनायकं यांना पंतप्रधान सेनानायकं यांनी जरी बरीच प्रसिद्धी मिळविली असली तरी

त्यांच्याशी मतभेद असलेली पुढारी मंडळी बरीच आहेत व ती यू. एन्. पी. पक्षातून फुटून आपणाला मिळतील असा विश्वास वाटत होता. सिलोन सुंदर बनविणे, तेथे परदेशीय प्रवाशांची सोय करणे वगैरे गोष्टी ब्रिटिश मित्रांच्या साहाय्याने वाटेल तसे पैसे खर्च करून सेनानायकं यांनी केल्या. पण बंदारनायकं यांचे भाषेत बोलावयाचे म्हणजे सेनानायकं यांचे राजवटीत सिलोन, सिलोनी नागरिकाला उत्साहजनक वाटत नाही, निराशाजनक वाटते, असेच मत सर्वसाधारण माणसे प्रदर्शित करीत. त्याचा फायदा बंदारनायकं यांनी भरपूर घेतला. या निराशावादी वर्गाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी सिंहल महासभा या आपल्या पक्षाचे रूपांतर श्री. लंका फ्रीडम् पार्टी या पक्षात केले व सिलोनची जुनी संस्कृती कायम टिकवून ते सर्वसाधारण नागरिकासाठी प्रयत्न करू लागले. जनतेचे पुढारी म्हणून ते हळूहळू विरोधी पक्षातून पुढे येऊ लागले. त्यांना या वेळपासूनच सर्व डाव्या गटांनी उचलून धरले.

बंदारनायकं यांचे राजीनाम्यामुळे मोठी राजकीय घडामोड सिलोनमध्ये घडून येईल असे बऱ्याच जणांना वाटत होते, परंतु पंतप्रधान सेनानायकं यांची सिलोनमधील ठराविक वर्गावरील पकड अजूनही घट्ट होती ही गोष्ट त्यांनी थोड्याच दिवसात सिद्ध करून दाखविली. तामीळ काँग्रेस पक्षाला त्यांनी जवळ केले व आपले गृहातील बहुमत कायम टिकविले. सिलोनच्या सुधारणांसाठी पैसा कमी पडू नये म्हणून त्यांनी इंटरनॅशनल बँक ऑफ डेव्हलपमेंट व रिकन्स्ट्रक्शन या बँकेची मदत घेऊन त्यांना सिलोनची पाहणी करावयास सांगितली व त्यांचे एक शिष्टमंडळ सर सिडने केन यांच्या नेतृत्वाखाली सिलोनमध्ये आले. पण हे कार्य सेनानायकं यांचे हातून पुरे व्हावयाचे नव्हते. ते आपला घोड्यांचे रपेटीचा नेहमीचा व्यायाम कलंबोच्या गॉलफेस वाळवंटांत घेत असता घोड्यावरून खाली पडले व २१ मार्च १९५२ रोजी दुसऱ्या दिवशीच हॉस्पिटलमध्ये मरण पावले. त्यांचे वय मृत्युसमयी ६८ वर्षांचे होते. मधुमेहाचे विकाराने आजारी असतानाही अतोनात परिश्रम करून ते आपले कार्य करीत होते व ते त्यांनी अखेरपर्यंत कोठेही कमी पडू दिले नाही ही गोष्ट विरोधी पक्षीयही मोठ्या आदराने मान्य करतात.

त्यांचे निधनाने सिलोनच्या राजकीय आयुष्यातील एक महत्त्वाची व्यक्ती नाहीशी झाली असे सर्वत्र मानले गेले. सेनानायकं कुटुंबानी सिलोनच्या इतिहासात आपली आठवण राहील असे कार्य केले आहे, असे त्यांचे संबंधी प्रतिनिधी सभेत झालेल्या भाषणात एकमुखाने सांगण्यात आले. त्यांचा मृत्यु झाल्याबरोबर त्यांच्या अन्त्यविधीपूर्वी यू. एन्. पी. पक्षाचे कार्यकारिणीची सभा भरून यापुढील पक्षाचा नेता कोणाला करावयाचे याबाबत चर्चा सुरू झाली. १९४७ पासून त्यांनी सिलोनचे राज्यकारभारात भाग घ्यावयास सुरवात केली. पंतप्रधानाचे निधनाचे वेळी गव्हनर जनरल लॉर्ड सॉल्सबरी हे सिलोनबाहेर दौऱ्यावर गेले होते. ते दोन दिवसातच कलंबोला आले. सेनानायकं यांचे जागी पक्षाचे नेते म्हणून त्यांचे चिरंजीव डडली सेनानायकं यांची निवड कार्यकारिणीने केली. एकूण परिस्थिती ओळखून प्रथमत: संयुक्त मंत्रिमंडळाचे कारभारात यश येणे कठीण म्हणून पार्लमेंट बरखास्त करण्याची विनंती गव्हनर जनरल यांनी केली व नव्या निवडणुका त्याच वर्षी घेण्यात आल्या.

श्री. डडली यांचा हा तातडीने निवडणुका घेण्याचे योजनेचा परिणाम चांगला झाला. चार दिवस निवडणुका चालून यू. एन. पी. पक्षाला सर्वांत जास्त म्हणजे ५४ जागा मिळाल्या. तामीळ काँग्रेस, काँग्रेसचे चार सभासद व बरेच स्वतंत्र मिळून डडली यांचे यू. एन. पी. पक्षाला गृहात ८९ सभासदांचा पाठिंबा मिळाला तर बंदारनायक यांचे श्री. लंका फेडरेशन पक्ष, ट्राटस्की गट, कम्युनिस्ट पक्ष मिळून विरोधकांच्या हाती अवघ्या २३ जागा पडल्या. पित्याच्या मृत्यूनंतर मला त्यांचे काम पुढे चालवू द्या, अशी भावनाप्रधान हाक त्यांनी मतदारांना दिल्यामुळे त्या जोरावर डडली एवढ्या जागा मिळवू शकले, अशी टीका यावेळी झाली. यावेळी बुद्धभिक्कूंनी सेनानायकं यांना पाठिंबा दिला. पण हा यू. एन. पी. पक्षाने मिळविलेला विजय फारसा चिरस्थायी होऊ शकला नाही. पंतप्रधान डडली यांनी आपले मंत्रिमंडळात आपले वडिलांचे जुनेच भाईबंद कायम ठेवले व आपले चुलत बंधु आर. जी. सेनानायकं यांना व्यापार मंत्र्यांची जागा दिली. पंतप्रधानांशी न पटल्यामुळे त्यांचे वडिलांचे वेळचे जुने व अनुभविक मंत्री सर जॉन कोतलावलं यांनी आपले मंत्रिपदाचा राजीनामा

दिला. डडली यांच्या मार्गात ही मतभेदाची पहिली अडचण उभी राहिली. पण नंतर काही जुन्या मंडळींनी यू. एन. पी. पक्षात मतभेद नकोत म्हणून कोतलावलं यांना राजीनामा मागे घ्यावयास लावला. परंतु सर्व जुन्याच मंत्र्यांनी व विशेषत: सेनानायकं कुटुंबियांनी सर्व राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्याचे सर्वसाधारण जनतेला तेवढेसे आवडले नाही. युद्ध संपल्यापासून रबराच्या किंमती सारख्या उतरू लागल्या व सिलोनच्या आर्थिक परिस्थितीला धक्के बसू लागले. अमेरिकेसारखे राष्ट्रही सिलोनी रबराला किंमत देईना, पण सिलोनचे व्यापारमंत्री श्री. आर. जी. सेनानायकं यांनी चीनशी करार करून५० हजार टन रबर खपवून व स्वस्त भावात तेथून तांदूळ उचलण्याची योजना आखली. पण सिलोनने चीनशी असे व्यापारी करार करणे पाश्चिमात्य राष्ट्रांना आवडले नाही. या धोरणावर इंग्रजी पत्रात भरपूर टीका येऊ लागली. सिलोनचा जवळ जवळ पंचवीस कोटींचा माल चीन उचलू लागला. चीनचा अशा तऱ्हेने सिलोनी राजकारणात व्यापाराचे निमित्ताने का होईना पहिला प्रवेश झाला. यावेळी सिलोनचे मदतीस अमेरिका धावत जाईल व चीनचे जोडले जाणारे हे संबंध दुरावतील अशी अपेक्षा फार राष्ट्रांनी केली. पण ती फलद्रूप होऊ शकली नाही. याचा परिणाम असा झाला की रबर पडून न राहता त्याला बाजारपेठ मिळाली व सिलोनी नागरिकांना स्वस्त किंमतीत तांदूळ देण्याचे यू. एन. पी. पक्षाचे ध्येय पुरे करता आले. अशा तऱ्हेने एक वर्षपर्यंत यू. एन. पी. पक्षाला नागरिकांना न दुखविता राज्यकारभार करता आला.

पण ही परिस्थिती फार काळ टिकू शकली नाही. तांदूळ व साखर हे दोन्ही व्यापार सरकारचे ताब्यात येथे प्रथमपासून आहेत. खर्च भागविण्यासाठी प्रत्येकाला देण्यात येणारा तांदूळ यावेळी पाव किलोने कमी करण्यात आला व साखरेचा दर इतर खर्च भागविण्यासाठी पौंडामागे १५ सेंटने वाढविण्यात आला. ही घटना काही मंत्र्यांनाच पटली नाही व गृहखात्याचे मंत्री एम. सेनानायकं यांनी आपल्या जागेचा राजीनामा दिला. जनतेला लागणारी साखर जरी महाग झाली तरी मुख्य अन्न तांदूळ आम्ही महाग होऊ देणार नाही ही घोषणा मात्र प्रत्येक मंत्री आपल्या भाषणातून करीत असे. परंतु या घोषणा ते पाळू शकले नाहीत. आर्थिक सल्लागाराचे मते धान्य स्वस्त

देण्यासाठी जे पैसे सरकार आपल्या खजिन्यातून भरते (सबसिडी) ते कमी झाले पाहिजेत, तरच सिलोनचा तरणोपाय आहे, हे म्हणणे शेवटी मंत्रिमंडळास मान्य करावे लागले व सरकारी मदत कमी झाल्याबरोबर पंचवीस सेंट किलोने विकला जाणारा तांदूळ एकदम ७५ सेंटवर गेला. जनतेचे मुख्य अन्न महागल्याने सर्वसाधारण नागरिक बिथरला.

सिलोनमधील डाव्या गटांनी यावेळी एकदम उचल खाल्ली व सरकारचे निषेधार्थ सर्व शहरातून कडकडीत हरताळ पाळण्यात आला. हिंसक हल्ले बसेसवर झाले. पोलिसांना गोळीबार करावा लागला व काही ठिकाणी तर शांतता प्रस्थापनेसाठी लष्कराला बोलवावे लागले. या प्रकरणामुळे पंतप्रधानांचे विरुद्ध सर्व जनता खवळली. त्यांच्यावर प्रत्यही टीका होऊ लागली. याला कंटाळून ऑक्टोबर १९५३ मध्ये डडली सेनानायकं यांनी राजीनामा दिला व त्यांच्या जागी गृहनेते सर जॉन कोतलावलं हे मुख्यमंत्री झाले. त्यांनी प्रथम तांदळासाठी देण्यात येणारी सरकारी मदत काही प्रमाणात सुरू केली व जनतेचा रोष थोडाबहुत कमी केला.

पण हरताळ व जनतेमध्ये सुरू झालेल्या खळबळाटाचा फायदा लंका समसमाज पक्षाने व सर्व डाव्या गटांनी चांगलाच घेतला. यू. एन. पी. पक्ष सिंहली भुकेल्यांचे पोटावर लाथा मारू लागला, अशी भडक टीका या पक्षावर सुरू झाली. यात नुसती सर्वसाधारण जनताच सामील होती असे नाही तर बौद्धभिक्कूही या निषेधात सामील झाले. सरकारी धोरणाचे निषेधार्थ त्यांनी उपवास सुरू केले. त्यांचा एक महत्त्वाचा गट डाव्या गटाला उघडपणे मिळाला. या सर्व गोष्टीमुळे यू. एन. पी. मंत्रिमंडळाला बसलेला धक्का फार मोठा होता. त्यांच्या मागून आलेले सर जॉन कोतलावलं गेली २५ वर्षे सिलोनच्या राजकारणात मुरलेले पुढारी होते, तरी त्यांचा कल नेहमीच सिलोनमधील वरच्या पाश्चिमात्य राहणीत राहणाऱ्या धनिकांकडे होता १९५१ पासून ते गृहनेते होते. ते आल्याबरोबर जुने डी. एस सेनानायकं यांची राजवट सुरू झाल्यासारखे लोकांना वाटले. डडली सेनानायकं मात्र राजकीय जीवनातून यावेळी तरी पूर्णपणे सेवानिवृत्त झाले. त्यांच्या मागोमाग व्यापारमंत्री श्री. आर. जी. सेनानायकं यांनीही राजीनामा दिला व सिलोन मंत्रि-

मंडळावरील सेनानायकं गटाचा वरचष्मा बराचसा कमी झाला. पण यान यू. एन. पी. पक्षाची परिस्थिती सुधारली असे मात्र म्हणता येत नाही. एप्रिल १९५६ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकात गेली नऊ वर्षे सत्ता गाजविणाऱ्या युनायटेड नॅशनॅलिस्ट पक्षाचा संपूर्णपणे धुव्वा उडाला. श्री. बंदारनायकं यांचे लंका फेडरेशन पक्षाने सिंहली ही राज्यभाषा करण्याची मोहीम हाती घेतली. नाटकानाटकातून यांचे प्रचार होऊ लागले. बुद्धभिक्कूनीही या मोहिमेला हातभार लावल्यामुळे त्याला धार्मिक स्वरूप आले. गेल्या निवडणुकीत जी मते यू. एन. पी. पक्षाला मिळाली होती त्यापैकी तीन लक्ष मते या खेपेस त्यांना कमी पडली व ४६ जागा या पक्षाने गमावल्या, श्री. बंदारनायकं यांचा लंका समसमाज पक्ष अधिकारावर आला. सिलोन मधील पाश्चिमात्यांचा मोठा आधार समजण्यात येणारा यू. एन. पी. पक्ष अधिकारारूढ पक्ष नाहीसा झाला व सिलोनची सत्ता डाव्या गटाचे हाती गेली. ही गोष्ट सर्वच बाबतीत आंतरराष्ट्रीय दृष्टचा महत्त्वाची होती. चीनच्या वाढत्या वर्चस्वाचा हा परिणाम आहे, अशीही टीका पाश्चिमात्य पत्रांनी केली. यू. एन. पी. पक्षाचे पुढाऱ्यांविषयी सिलोनच्या वृत्तपत्रांनी ही गोष्ट स्पष्ट केली की हे पुढारी कमी देशभक्त होते असे बिलकूल नाही. पण त्यांचा सर्व जनसमुहाशी यावा तसा संबंध कधीच आला नाही. त्यांच्याभोवती अशा काही वातावरणाचे जाळे पसरले होते की त्यातून ते खऱ्या सिलोनी नागरिकाला काय हवे ते पाहू शकले नाहीत, म्हणूनच या प्रबल पक्षाचा असा निवडणुकीत धुव्वा उडाला.

सि.–७

# कम्युनिस्ट सरकारला तडाखा

१९५६ च्या निवडणुकानंतर सिलोनमध्ये मोठी सामाजिक क्रांती घडून आली असे म्हटले जाते, पण ही सामाजिक क्रांती सर्व राष्ट्रांच्या उन्नतीसाठी नव्हती तर भाषीय लढा वाढविणारी होती. लंका फेडरेशन पार्टी अगर युनायटेड नॅशनॅलिस्ट पार्टी या दोन्ही पक्षातील जबाबदार राजकीय पुढारी या भाषीय वादापुढे मान वाकविणारे होते अशातला बिलकूल भाग नाही. उलट त्यांना इंग्रजी भाषेचे व नव्या पाश्चिमात्य सुधारणांचे प्रेम अधिक होते ही गोष्ट स्पष्ट आहे. सिलोनमधील बुद्धभिक्कूंचे जनतेवर असलेले वजन कोणाही राज्यकर्त्यांना बाजूला सारता येण्यासारखे नव्हते. सिंहली भाषा राजभाषा करण्याचा अट्टाहास धरणारे भिक्कू 'भासा पेरामुना' (भाषाप्रेमी संघटना ) काढून सिंहलीचा हट्टाग्रह धरून बसले होते. यू. एन. पी. पुढारी उत्तरेकडे जाफनासारख्या ठिकाणी भाषणासाठी गेले की सिंहली व तामीळ या दोन्ही भाषांना सारखे महत्त्व देण्याची भाषा बोलत. ती भाषा या भिक्कू पुढाऱ्यांना बिलकूल आवडत नसे. त्याचा परिणाम निवडणुकीत या पक्षांचे मतांवर झाला.

याचा अर्थ असा नव्हे की राज्यकारभाराची सूत्रे हाती घेणाऱ्या बंदारनायकं यांचा लंका फेडरेशन पार्टीला सर्वच बाबतीत बहुमत मिळाले होते. त्यांनी कारभार हाती घेताना महाजन एकसथ पेरामुना (पीपल्स युनायटेड

फ्रंट) नांवाचे निरनिराळे भाषीय गट व फिलीप गुनवर्दनं यांचा ट्राटस्काईट गट एकत्रित करून हा संयुक्त पक्ष बनविला व सूत्रे हाती घेतली. पण यामुळे त्यांच्यावर आलेले बौद्धभिक्कूंचे व सिंहली गटांचे दडपण फार मोठे होते. पंत प्रधान बंदारनायकं हे खरे एका मोठ्या जमीनदार कुटुंबातून पुढे आलेले. यांच्या कित्येक मैल पसरलेल्या जमीनदारीत आजही अनेक कामगार राबताना दिसतील, पण युनायटेड नॅशनॅलिस्ट पक्षाला विरोध करण्यासाठी हा जमीनदार पण हुशार पुढारी, भाषिक व कामगार संघटनांना जवळ करावासा वाटला ही गोष्ट स्पष्ट आहे. बंदारनायकं हे एकटेच नव्हे तर त्यांच्या आजोबा,पणजोबा-पासून सर्वांनी ब्रिटिश – डचांचे वेळीही पुढारी म्हणून सिलोनची सेवा केली असल्यामुळे त्यांचे वजन समाजावर चांगले होते. पार्लमेंटमध्ये लोकनियुक्त प्रतिनिधी म्हणून निवडून आलेले सर्व इंग्रजी माध्यमाच्या शाळातून शिकलेली मंडळी होती, परंतु त्यांनी सिंहली भाषेचा प्रचार हे आपले ध्येय नुसते सिलोनी जनतेला जवळ करण्यासाठी ठेवलेले होते. ते युरोपियन वेषातच गृहात येत व सिलोनी वैशिष्टच त्यांच्याजवळ कोणतेच नव्हते. नव्या निवडणुकात यू.एन.पी. पक्षाला अवघ्या आठ जागा मिळाल्या होत्या. जाफना वगैरे उत्तरेकडील तामीळ प्रमुखांचा तामीळ काँग्रेस अगर फेडरल पक्ष, लंका फेडरल पक्षाने सिंहली भाषाप्रेमी सारखे वाढते ठेवल्यामुळे कोणाला मिळणार हा एक महत्त्वाचा प्रश्न होता. या पक्षाने बाजूला राहण्याचे ठरविल्यामुळे चांगल्या निष्णात कार्यकर्त्यांना बंदारनायकं यांचा पक्ष मुकला होता. याशिवाय काही बुद्धधर्मीयां-पैकी 'भिक्कू'चे वजन सिलोनी जनतेत सारखे वाढू लागले होते व ते यू. एन.पी. पक्षाने वाढू दिले. यामुळे भिक्कूसारख्या धार्मिक मंडळींना आता देशाचे राजकारणात चांगलेच महत्त्व प्राप्त झाले होते. या भिक्कूंनी यू. एन. पी. पक्षाला विरोध करताना यू. एन. पी. पक्ष सिंहली भाषेला व बुद्ध धर्माला घातक ठरेल असा प्रचार सुरू केला. या भिक्कूंची संयुक्त आघाडी (एकसथ भिक्कू नमुना) स्थापन झाली व तीच भाषिक आघाडी म्हणून सिलोनभर गर्जू लागली. या गटाने बंदारनायकं मंत्रिमंडळावर सिंहली ही एकटीच राज-भाषा करण्यासाठी भरपूर वजन आणावयास सुरवात केली. हा वाद निवड-णुकींचे सुरवातीलाच एवढा वाढीस लागला होता की यू. एन. पी. अगर लंका समसमाज पक्षाला जाफना भोवतालच्या तामीळ प्रदेशात आपले उमेदवार

निवडून आणणे कठीण गेले. बंदारनायकं यांचे ५१ सभासद एम. ई. पी. या नवीन संयुक्त पक्षाचा स्वतंत्र सभासदांचा भरपूर पाठिंबा मिळाल्यामुळे खंबीर बहुमतावर आता त्यांचे पक्षाची उभारणा झाली होती. नव्या मंत्रि-मंडळात तामिळींचे फेडरल पक्षाचे दहा सभासद व कम्युनिस्ट तीन होते. खिरश्चन व तामीळ गटांना विरोध करण्यासाठी सिंहली भाषेविषयी प्रेम दाखविणाऱ्या मंडळींविरुद्ध भिक्कू संघटनेनी यावेळी कंबर कसली. बंदारनायकं मंत्रिमंडळाचा (एम. ई. पी.) गट जरी कितीही खंबीर पायावर उभा असला तरी त्याचे भोवतालची विरोधकांची संकटे किंचितही कमी झालेली नव्हती.

नव्या मंत्रिमंडळात सिंहली महासभा व फिलीप गुनवर्दनं यांच्या मार्किस्टस् गट याचे वर्चस्व होते.मंत्रिमंडळातील दोन मार्किस्टस् मंत्र्यांचे धोरण ठरलेले असे व त्यांना धरूनच बंदारनायकं यांना वागणे भाग पडून मतभिन्नता दाखवू न देता वागणे भाग होते. यू. एन. पी. पक्षाचे लोक पार्लमेंटमध्ये जरी थोडे होते तरी ते मंत्रिमंडळाचे विरोधकांचा फायदा कसा घ्यावा हे चांगले जाणून होते. तामीळ व रोमन कॅथॉलिक यांच्याविरुद्ध सिंहली भिक्कूंची मोहीम सारखी सुरू होती व या दोन गटांना कसे आवरावे हा प्रश्न सर्वांपुढे होता. बंदारनायकं सरकारचा तीन वर्षांचा काळ म्हणजे एकामागून एक पेचप्रसंगाचा काळ होता. प्रथमतःच बंदारनायकं यांनी आपण अधिकारावर आल्याबरोबर चोवीस तासांचे आत सिंहली ही एकटीच राजभाषा करू, असे अभिवचन बुद्धभिक्कूंना दिले असल्याचे बुद्धभिक्कू बोलून दाखवीत होते. या ओरडयामुळे सिंहली ही एकटीच राज्यभाषा करण्याचे बिल जून १९५६ साली आणण्यात आले. त्याबरोबर तामिळी मंडळींचे चळवळीला सुरवात झाली. कलंबोत त्यांनी सत्याग्रह सुरू केला व सर्वत्र त्याचे प्रतिध्वनी उमटू लागले. तामीळ व सिंहली या दोन्ही भाषा सिलोनमध्ये राहाव्या म्हणून स्वभाषा संघटनेतर्फे चळवळ सुरू झाली. आतापर्यंत सिलोनमधील कारभाराची भाषा इंग्रजी होती व ती पाच टक्के लोकांना समजते, असा दावा या स्वभाषा समितीचा होता. सिंहली भाषा ८० लक्ष लोक बोलतात व २० लक्ष लोक तामीळ भाषा बोलभाषा म्हणून वापरतात. ही गोष्ट सिलोनचे राष्ट्रीय सरकारने डोळयाआड करू नये, असा दावा उघडपणे मांडला जाऊ लागला. तामीळ व इंग्रजी भाषेला

यापुढे जास्त महत्त्व दिले गेले तर या भाषियांचा आमच्यावर वरचष्मा होईल व सिलोनमधील सिंहली भाषेला, यावेळी तामीळ भाषियांचा स्वतंत्र प्रांत करून त्याचे एक स्वायत्त सरकार प्रस्थापित करावे (फेडरल गव्हनमेंट) अगर या भाषियांची संख्या लक्षात घेता त्यांना संरक्षण द्यावे, अशी सूचना तामिळी नागरिकांतर्फे येऊ लागली. या सूचनेला बंदारनायकं यांनी फारसा पाठिंबा देऊ नये अशा तऱ्हेचे दडपण बंदारनायकं यांच्यावर सारखे येऊ लागले. यावरच ही चळवळ थांबली नाही, तर तामीळ व सिंहली गटांचे मतभेद एवढे वाढू लागले की शांतता व सुरक्षिततेच्या मार्गात अनेक अडचणी निर्माण होऊ लागल्या. पण त्यांना कसेबसे तोंड देत बंदारनायकं यांचे मंत्रिमंडळ दिवस काढीत होते. या परिस्थितीतच ब्रिटिशांशी सेनानायकं सरकारने केलेला रक्षण करार बदलण्याची योजना बंदारनायकं यांनी प्रथम आखली. ट्रिंकोमलीचा मोठा नाविक तळ व कलंबोचा कटुनायकं विमानतळ ब्रिटिशांचे हातात होता. तेथून त्यांना हालविण्यासाठी बंदारनायकं यांनी प्रयत्न सुरू केले व प्रथम हे दोन्ही तळ आपल्या हाती घेतले. ब्रिटिशांनी आपले वैमानिक ठाणे मालदीव बेटावर नेले. अशा तऱ्हेने परकीयांशी संबंध नसलेले स्वतंत्र राष्ट्र बनविण्याचा प्रयत्न सिलोनमध्ये झाला. पण सिलोनची आर्थिक बैठकच अशी होती की हिंदुस्थानप्रमाणे परदेशाशी संबंध तोडून 'अलिप्त' राष्ट्र म्हणून सिलोनला वागणे शक्य नव्हते. तरी पण हे धाडस बंदारनायकं यांनी केले. एक जुलै १९५८ रोजी सिलोनची सर्व वाहतूक सिलॉन ट्रान्स्पोर्ट बोर्डाचे हाती देण्यात आली, त्यावेळी या राष्ट्रीयीकरणाचा पहिला तडाखा या देशाला जाणवू लागला. पूर्वीच्या व्यवस्थेतील सर्व नोकरवर्ग जरी या बोर्डाने आपल्या हाती घेतला असला तरी त्यात राजकारणी मंडळींचा हात फिरताच त्यात अनेक अडचणी उत्पन्न होऊ लागल्या. त्या वाहतुकीतून फायदा मिळावयास पुढील पाच वर्षे लागली व हळूहळू वाहतुकीचे दर वाढवावे लागले. आतापर्यंत जगातील सर्व देशांपेक्षा सिलोनची वाहतूक स्वस्त होती. पण या सुधारणेमुळे ती आता तशी राहिली नाही.

बंदारनायकं मंत्रिमंडळाचे सर्वसाधारण धोरण सर्व समाजाला सोयीचे असे कायदे पुढे आणण्याचे होते. परंतु कामगारांचे पुढारी म्हणून मिर-



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १२००३

विणारे फिलीप गुनवर्दनं यांचेसारखे कामगार पुढारी या मंत्रिमंडळात होते. त्यांनी पॅडीलॅन्ड बिल नांवाचे एक बिल आणले. त्याअन्वये कुळांना जमिनी कसण्याचे बाबतीत संरक्षण मिळावे म्हणून सोय होती. या बिलावरून मंत्रि-मंडळात मतभेद उत्पन्न होऊन दोन्ही कामगार पुढाऱ्यांनी (मार्किस्टस) मंत्रि-मंडळाचे राजीनामे दिले.पण त्याने कामगार वर्गात चांगलीच खळबळ उडाली. एकीकडे कामगारवर्ग असंतुष्ट, तर दुसरीकडे तामीळ व सिंहली लढ्यामुळे दोन्ही जमाती असंतुष्ट अशा तऱ्हेने असंतुष्टांचे राजकारण दिवसेदिवस वाढू लागले. अतोनात कष्ट करून राज्यकारभाराला सुव्यवस्थित वळण लावणारा पुढारी म्हणून बंदारनायकं यांचा लौकिक होता. त्यातच हे असंतुष्टांचे राज-कारण वाढू लागले. भिक्कू मंडळींनी आम्ही देशाचे सिंहली भाषेचे प्रवर्तक, आम्हाला मिळावा तसा मान मिळत नाही, अशी ओरड बंदारनायकं यांचेविरुद्ध सुरू केली व ती एवढी भडकली की १९५९ च्या सप्टेंबर महिन्यात एका बुद्ध भिक्कूने आपल्या बंद झग्यात दडवून आणलेल्या रिव्हॉल्व्हरने पंतप्रधान बंदार-नायकं यांचा त्यांच्या राहत्या बंगल्यात भरदिवसा गोळ्या झाडून खून केला. या भिक्कूने कॉलेज ऑफ इंडिजिनस मेडिसिन या सरकारी कॉलेजात प्रोफेसरचे जागेसाठी अर्ज केला होता. त्याला ती जागा बंदारनायकं यांनी न दिल्यामुळे त्याने हा खून केला, असे सांगण्यात आले. परंतु बुद्ध समाजाचे मनातून बंदार-नायकं उतरल्यामुळे हा प्रकार झाला, असे सांगण्यात येते. तीन वर्षे व पाच महिने बंदारनायकं यांच्या हाती सत्ता होती. पण सर्व बाजूंनी विरोध असूनही त्यांनी सिलोनमध्ये ज्या सुधारणा केल्या त्या सर्वांच्या डोळ्यांसमोर आहेत. 'डेली न्यूज' पत्राने त्यांच्या निधनानंतर लिहिलेल्या संपादकीयात या मुख्य-मंत्र्यांनी सिलोनचे राजकीय जीवन प्रकाशित केले असे म्हटले आहे व लोक-शाही प्रधान राजकीय जीवन कसे असावे, याची खरी कल्पना सिलोनला दिली, असे प्रतिपादले. त्यांच्यावर जवळून झाडण्यात आलेल्या गोळ्यांमुळे त्यांच्या देहाची चाळण झाली होती. सिलोनच्या चौकात त्यांचा उभा पुतळा पाहिला की अजूनही सिलोनचे नागरिक त्यांच्यापुढे मान वाकवितात. बुद्धभिक्कूंनी जरी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या तरी बहुसंख्य बुद्ध जमात त्यांच्या निधना-नंतर हळहळणाऱ्या लोकात होती. केलंनियातील राजमहा विहारातील एक गट बंदारनायकं यांचेविरुद्ध होता. यांच्याविरुद्ध मंत्रिमंडळातील एक महिला

मंत्रीही होत्या हेही या तपासात बाहेर आले. पण कोर्टात त्यांच्याविरुद्ध कोणताच आरोप सिद्ध होऊ शकला नाही. खुनाबद्दल पकडलेल्या बुद्धभिक्कूला फाशी देण्यात आले. केलंनिया विहाराचे प्रमुख भिक्कूला या खुनाचे कटात आयुष्यभर कारावासाची शिक्षा झाली.

पंतप्रधानांच्या खुनानंतर २५ सप्टेंबर रोजी आणीबाणीची परिस्थिति गव्हनर जनरल यांनी जाहीर केली व मंत्रिमंडळातील हजर असलेले सर्वांत मुख्यमंत्री डब्ल्यू. धननायकं यांना पंतप्रधान करण्यात आले. या नव्या पंतप्रधानांनी अधिकारावर येताच मंत्रिमंडळात आपला एक नवा गट स्थापन करावयास सुरवात केली. परंतु या गटाचे इतरांशी जमेना. १९६० च्या मार्च महिन्यात निवडणुका घेऊन राज्यकारभाराचे भवितव्य पुन्हा ठरविण्याचे ठरले. बंदारनायकं यांच्यामागे त्यांच्या श्री लंका फेडरेशन पक्षाची सूत्रे सी.पी. डी सिल्व्हा यांनी हाती घेतली पण त्यांना बंदारनायकं यांच्याएवढा पाठिंबा मिळाला नाही. मध्यंतरी सेवानिवृत्त होऊन वृत्तपत्र व्यवसायात शिरलेले पूर्वीचे पंतप्रधान यू. एन. पी. पक्षाचे डडली सेनानायकं पुन्हा हालचाली करू लागले होते. त्यांनी आपल्या पक्षाची सूत्रे हाती घेतली.त्यांच्या यू. एन. पी. पक्षाने १९६० मार्चचे निवडणुकीत ५५ जागा मिळविल्या पण ज्यांना निर्णायक बहुमत म्हणता येईल असे बहुमत त्यांना मिळू शकले नाही. कारण श्री लंका समसमाज पक्षाला ४६ जागा मिळाल्या होत्या. हिंदी व तामीळ गटाला अवघ्या दहा जागा मिळाल्या. तामीळच्या फेडरल पार्टी गटाला १५ जागा मिळाल्या. यू. एन. पी. पक्षाला सरकार बनविता आले. पण तामीळ मंडळींशी कोणतेही सहकार्य करावयाचे नाही,असे मंत्रिमंडळाने ठरविल्यामुळे एका महिन्याचे आत इतर सर्व गट एकत्र येऊन त्यांनी यू. एन. पी. सरकारचा पराभव केला. डडलींच्या यू. एन. पी. पक्षांचा हा पराभव म्हणजे त्यांच्या विरोधी पक्षांनी सुरू केलेल्या लढ्यातील पहिला विजय होय. जुलै महिन्यात पुन्हा नव्या निवडणुका घेण्याचे ठरविण्यात आले व मृत पंतप्रधान बंदारनायकं यांच्या पत्नी श्रीमती श्रीमावो बंदारनायकं या आपले पक्षाचे नेतृत्व स्विकारून लढ्यासाठी पुढे सर-सावल्या. त्या चांगल्या शिक्षित होत्या, पण आजपर्यंत सिलोनच्या राजकारणात त्यांनी कधीच भाग घेतलेला नव्हता पण माझ्या पतीचे राहिलेले कार्य पुरे करण्या-

साठी मी पुढे सरसावत आहे,या भावनात्मक घोषणेने त्यांनी आपले पक्षाचे निवडणूक मोहिमेला सुरवात केली. यावेळी डडली सेनानायकं यांचे हाती असलेल्या लेक पेपर्स या वृत्तपत्राचे गटाने त्यांचे विरुद्ध अशी जोराची मोहीम सुरू केली की ही मोहीमच त्यांचेवर उलटली. या पत्रातून सिलोनचा नकाशा काढून त्यामधील एक भाग तांबडा (हिंदचा रंग) दाखविला आहे व हा भाग श्री लंका फेडरल पक्षाला(श्रीमती बंदारनायकं यांचे पक्षाने) हिंदी नागरिकांना आंदण देण्याचे ठरविले आहे असा प्रचार सुरू झाला. या प्रचाराचा उलट परिणाम झाला व श्रीमती बंदारनायकं यांना सर्व पक्षांनी पाठिंबा देऊन यू. एन. पी. पक्षाला विरोध करण्यासाठी ते एकत्रित आले.एकटचा श्री लंका फेडरल पक्षाने७५जागा मिळवून श्रीमती बंदारनायकं यांनी स्वतःचे मंत्रिमंडळ बनविण्यासारखी परिस्थिती निर्माण केली. यावेळी भिक्कू मंडळींनी राजकारणातून आपले अंग काढून घेतले. यामुळे यू. एन. पी. पक्षाचा तोही आधार नाहीसा झाला. जगात कोणीही केला नाही एवढा मोठा विक्रम सिलोनमध्ये झाला व पहिली महिला पंतप्रधान म्हणून श्रीमती बंदारनायकं निवडून आल्या. त्यांचे मागे सर्व तरुण मंडळींचे सामर्थ्य होते.त्यांनी परराष्ट्रसंबंध व संरक्षण हे महत्त्वाचे खाते आपले हाती घेतले.डडली सेनानायकं हे विरोधी पक्षाचे प्रमुख झाले.श्रीमती बंदारनायकं यांचे सर्व जीवन कंदायन म्हणजे सिलोनच्या काहीशा सनातनी कुटुंबात गेले होते. मुख्य म्हणजे सिलोनची परदेशीय गंगाजळी वर्षावर्षाला कमी होत चालली होती.कारण जेवढा माल सिलोनमधून निर्यात होई त्यापेक्षा अधिक माल परदेशातून सिलोनमध्ये येऊ लागला. १९५६ सालची १०६ कोटींची सिलोनचे परदेशीय गंगाजळी१९६४ साली ४२ कोटींवर आली. गेल्या दहा वर्षात सिलोनची लोकसंख्या २५ लाखाने वाढली होती. खाणारी तोंडे वाढली त्याप्रमाणे उत्पन्न वाढेना. कम्युनिस्ट गट व चीन या दोन गटांचे सहकार्य श्रीमावो अधिक घेऊ लागल्या. डाव्या गटाचा पाठिंबा श्रीमावोंना अधिक मिळाल्यामुळे धंद्याचे राष्ट्रीयीकरण वगैरे गोष्टी पुढे आल्या. कित्येक सरकारी कार्पोरेशन, वाहतुकीपासून मिठापर्यंत सारे धंदे त्या हाती घेऊ लागल्या. यामध्येही व्यापाऱ्यानी आपला शिरकाव करून घ्यावयास सुरवात केली.सिलोनमध्ये असोसिएटेड न्यूजपेपर्स ऑफ सिलॉन या मोठ्या वृत्तपत्रीय संघटनेवर सर्वस्वी यू. एन. पी. पक्षाचा ताबा होता. सिलोनमध्ये खपणारी ही बड्या खपाची पत्रे 'विधवेचे सरकार'म्हणून श्रीमती बंदारनायकं सरकारची

वाटेल तशी कुचेष्टा करीत रोज त्यांचेवर राळ उडवीत होते. या वृत्तपत्रांना आवर कसा घालावा व त्यावर कोणते नियंत्रण आणावे हा एक मोठा प्रश्न श्रीमती बंदारनायकं यांना पडला होता. प्रेस कौन्सिल, प्रेस ट्रायब्युनल वगैरे सर्व उपाय थकले, परंतु वृत्तपत्रांची ही अयोग्य टीका कमी होईना.याचा परिणाम असा झाला की जनतेच्या मनात या वृत्तपत्रांनी निर्माण केलेले वातावरण श्रीमती बंदारनायकं याना घातक होऊ लागले. मध्यंतरी सैन्य व पोलीस यांनी काही जहाल डाव्या गटांशी संगनमत करून क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न केला: परंतु त्यात तेवढा जोर नसल्याने त्याचा श्रीमती बंदारनायकं यांचे मंत्रिमंडळावर फारसा परिणाम होऊ शकला नाही. यानंतर राष्ट्रीयीकरण झराझर करण्याचा सपाटा श्रीमती बंदारनायकं यांनी केला.१९६१ साली त्यांनी सिलोन बँक ताब्यात घेतली. तर १९६४साली सिलॉन इन्शुअरन्स कॉर्पोरेशन सरकारी नियंत्रणाखाली आले. आयातीवर नियंत्रण, साठेबाजांची धरपकड वगैरे गोष्टी जनतेच्या मनाप्रमाणे व्हाव्यात म्हणून श्रीमती बंदारनायकं यांनी जोराने त्या दिशेने हालचाल केली, पण यामुळे त्यांचे शत्रू वाढले व जनता दर खेपेस अधिकाधिक मागण्या करू लागली. बंदारनायकं यांचे सरकारला डावा गट जवळचा वाटे व त्यांचे पाठिंब्यामुळेच त्या यू.एन्. पी. सारख्या सधन पक्षाला तोंड देत होत्या. कम्युनिस्ट पक्षही त्यांनी जवळ केल्यामुळे चीनला त्या जवळचा वाटू लागल्या. आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट जगात त्यांचे महत्त्व चांगलेच वाढले.सेनानायकं यांनी पाश्चिमात्त्यांना जवळ केल्यावर बंदारनायकं यांनी कम्युनिस्टांना आपले सोयीसाठी जवळ केले.१९६२चे चीन व हिंद लढ्यात समझोता घडवून आणण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. सिलोनच्या अलिप्तवादाचा पुरस्कार करून त्यांनी हे केले, यामुळे जगातल्या या पहिल्या महिला पंतप्रधान चांगल्याच पुढे आल्या, पण कम्युनिस्टांचे त्या अधिक नादी लागत आहेत अशी टीका त्यांच्यावर पाश्चिमात्त्य पत्रातून सारखी होऊ लागली. परंतु यू. एन. पी. पक्ष यावेळी काही स्वस्थ बसलेला नव्हता.त्यांचे पंतप्रधानाविरुद्ध माणसे जमा करण्याचे प्रयत्न सारखे सुरू होते. डाव्या जहाल गटाला अजूनही श्रीमती बंदारनायकं या आपले बाजूला आहेत असे खात्रीने वाटत नव्हते. गृहनेते सी. पी. डी. सिल्व्हा यांचे सारखे गृहनेतेही अजून श्रीमती बंदारनायकं यांचे मूळ राजशाही घराणे विसरावयास तयार नव्हते.काही डाव्या गटाचे नेत्यांनी तर श्रीमती बंदारनायकं मंत्रिमंडळ यू. एन्. पी. पक्षापेक्षा

फारसे वेगळे नाही अशीही टीका करावयास सुरवात केली. याला तोंड देणे बंदारनायकं यांना कठीण गेले. माझे पाठीत माझे बरोबरच्या पक्षानीच खंजीर खुपसला अशा तऱ्हेची कबुली बंदारनायकं या देऊ लागल्याने या परिस्थितीत सिलोन पार्लमेंट बरखास्त करण्याव्यतिरिक्त दुसरा उपाय नव्हता. २२ मार्च १९६५ रोजी नव्या निवडणुका घेण्याचे ठरविण्यात आले.

नव्या निवडणुकात लंका समसमाज पक्ष व श्री लंका फेडरल पक्ष एकत्रित आले. त्यांनी मार्क्सिस्टस् पक्षाशी पुन्हा सहकार्य केले, पण यामुळे त्यांचे सिंहली जनतेशी सहकार्य वाढले असे मात्र म्हणता येत नाही. पुन्हा एक-साथ भिक्कू प्रेमुना ही प्रमुख भिक्कूंची संघटना यू.एन्.पी. पक्षाकडे गेली व कम्यु-निस्टविरोधी आघाडी यू. एन्. पी. पक्षानी तयार केली. याच वेळी तामीळ मजुरांचा आपणाला पाठिंबा मिळावा म्हणून बंदारनायकं यांनी पं. नेहरूंशी बोलणी करून १५ वर्षांचे अवधीत ५ लक्ष २५ हजार तामीळ कामगारांना हिंदमध्ये पाठविण्याचा करार केला एवढीच गोष्ट त्या करू शकल्या. त्यामुळे त्यांनी सिंहली जनतेचा गेल्या निवडणुकीचे वेळी मिळविलेला विश्वास गमावला व शुद्ध डाव्या गटाच्या आधारावर त्यांनी निवडणुका लढविल्या. पण त्यांना म्हणावे तसे यश आले नाही.

उलट यू. एन्. पी. चे डडली सेनानायकं यांनी हळुवारपणे सिंहली जनतेला चुचकारून व तामिळी जनतेच्या फेडरल पक्षाला जवळ करून आपले बहुमत मिळविले. त्यासाठी त्यांनी काही आश्वासनेही गुप्तपणे दिली होती. आपले सरकार खरे राष्ट्रीय सरकार आहे. बंदारनायकं व डाव्या गटाला व चीन सारख्या सत्तेला देशाला विकले आहे, असा दावा त्यांनी जनतेपुढे मांडला. १५१ सभासदांचे गृहात जवळजवळ ८५ सभासदांना आपल्या बाजूला मिळवून आपले आसन त्यांनी स्थिर केले व शांतपणे राज्यकारभाराला सुरवात केली. बंदारनायकं यांचा पक्ष प्रमुख विरोधक पक्ष बनला व सिलोनचे राजकारणात चीनसारख्या राष्ट्राला जवळ करून आपले हित साधू इच्छिणाऱ्या श्रीमती बंदारनायकं मागे पडल्या.

१९४७ साली डी. एस. सेनानायकं हे आजचे पंतप्रधानांचे वडील ज्या पद्धतीने पाश्चिमात्त्य व पौर्वात्य सहकार्य साधून राज्यकारभार करीत

होते त्याच पद्धतीने डडली यांचाही कारभार आजपर्यंत सुरू केला व या कारभाराने सिलोनच्या भोवताली जमणारे कम्युनिस्ट वर्चस्वाचे ढग वाढत आहेत का कमी होत आहेत हे नीट कळत नव्हते. पण श्रीमती बंदारनायकं यांची चाललेली कारस्थाने मात्र डाव्या गटांना पूरक आहेत, असे सिलोनी जनता उघडपणे म्हणते.

❊ ❊

# सत्तेने अस्थिरता कायम

पंतप्रधान डडली सेनानायकं यांनी फेडरल पक्षाशी सहकार्य करून जरी मंत्रिमंडळ बनविले असले तरी त्यांनी तामीळ जनतेच्या मनात विश्वास मात्र अजूनही निर्माण केला नव्हता. त्यामुळे १९६८ चे जानेवारी महिन्यात ज्यावेळी मी सिलोनमध्ये गेलो तेव्हा त्यांचा कारभार मोठ्या धैर्याने केला जात आहे अगर मोठ्या खंबीर पायावर उभा आहे असे मला वाटले नाही. कारभारी डडली विरोधी पक्षाला विशेषत: श्रीमती बंदारनायकं व कामगार डावे पक्ष यांनी उठाव करू नये म्हणून त्यांना घाबरूनच पदोपदी वागत असावे असे मला यावेळी वाटले. उलट विरोधी पक्षाच्या प्रमुख श्रीमती बंदारनायकं जरी डडली यांच्यासारख्या राजकारणात मुरलेल्या नसल्या तरी मला मोठ्या धीराच्या व निश्चयी वाटल्या. निरनिराळ्या कामगार गटांचे पुढारी त्यांच्या बंगल्यावर विचारविनिमयासाठी नेहमी जमत. त्यांना डडली कुटुंबाइतका राजकारणाचा अनुभव असावा असे मला वाटले नाही. पण बरीचशी जुनी राजकारणी मंडळी त्यांचेभोवती वावरताना दिसत. कम्युनिस्टांशी प्रथमपासून त्यांचे संगनमत असल्याने त्यांचे बंगल्यावर चिनी पाहुणे उतरत व त्यांचा चीनशीही भरपूर पत्रव्यवहार चालतो, अशी राजकीय वर्तुळातील मंडळी उघडपणे बोलतात. डडली यांच्या हाती सत्ता आल्यामुळे सिलोनचे

राजकारण आता उजव्या गटाकडे पुन्हा वळणार अशी शंका घेतली जात असे. ब्रिटिश बातमीदारांनी ही गोष्ट गेल्या दोन वर्षात उघडपणे बोलून दाखविली आहे, पण मला ही परिस्थिती बरोबर वाटली नाही.आपले वर्चस्व अगर आपल्या सत्तेची छाप डाव्या गटावर पाडण्याऐवजी डाव्यापुढे नमते घेऊन शक्यतो पेच-प्रसंग निर्माण होऊ न देण्याचे प्रयत्न डडली हे करीत असावे असे मला वाटले. तामीळ फेडरल पक्षाचे अवघे पंधरा सभासद त्यांच्याबरोबर होते. त्यांच्यातील तामीळ मंत्री अजूनही आपल्या गटाशी धरून असतात व सेनानायकं यांचे-कडून जास्तीत जास्त तामीळ जनतेचे हितसंबंधाची काळजी घेणे कसे शक्य आहे याचा विचार अधिक प्रामाणिकपणे करतात असे मला वाटले.

सिलोनने आपले स्वातंत्र्याचा २० वा वाढदिवस साजरा केला. त्या वाढदिवसाचे निमित्ताने जो आढावा घेण्यात आला त्यात पंतप्रधान डडली सेनानायकं त्यांचे कारभाराचा सुंदर आढावा होता. त्यांनी आपल्या वाढत्या पिकांचा आशावाद पुढे मांडून जनतेपुढे नव्या सुखाचे सुखस्वप्न रंगविले. धान्याचे बाबतीत तरी आम्ही लवकरच स्वयंपूर्ण होणार, तुम्हाला लागेल तेवढा तांदूळ देऊ अशी माहिती जनतेला सांगितली. पण सिलोनकडे विचारपूर्वक पाहणाऱ्या व्यक्तीला सिलोन अजून राजकीय व आर्थिक अस्थिरतेतच रेंगाळत असल्यासारखा या अहवालावरून दिसे. गरीब व श्रीमंत यांचे मधील अंतर वाढत आहे असा भास पदोपदी होतो. अजूनही सिलोनचे आर्थिक जीवन परदेशीय गंगाजळीवर बरेच अवलंबून आहे. ९३ टक्के पैसा सिलोनने परदेशात निर्यात केलेल्या मालाचे किंमतीवर उभा राहतो. यात चहा ६१ टक्के, रबर २० टक्के व नारळ १२ टक्के अशी वाटणी आहे. चहाची निर्मिती सिलोनमध्ये सारखी वाढती आहे. त्या मानाने मागणी कमी व मळ्यावरील खर्च सारखा वाढत आहे व देशात चहाच्या किमती उतरत आहेत, याला हिंद सिलोनची चढाओढ कारणीभूत आहे, हे ओळखून सिलोन – हिंदमध्ये सह-कार्य करार करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. जगाला लागणारा ९० टक्के चहा सिलोन व हिंद पुरवितो व त्यावर जगाची बाजारपेठ अवलंबून आहे. मळ्या-वरील कामगार वाटेल त्यावेळी आपल्या मागण्या पुऱ्या करण्यासाठी संपावर जाऊ शकतात. रबराचे निर्यातीची स्थिती हीच आहे. या रबराची बरीचशी

खरेदी चीन करतो व सिलोनला लागणारा तांदूळ देत असतो. पौंडाची किंमत २० टक्के उतरल्यामुळे सिलोनचे केवढे तरी नुकसान झाले व आयात मालाची किंमत २ कोटी ८० लक्षानी या वर्षी वाढली. यात एकच चांगली गोष्ट म्हणजे सिलोनी शेतकरी तांदूळ पिकाच्या मागे चांगला लागला आहे. वर्षातून तीन वेळ महापूर पाण्यामुळे तो भात पीक काढू शकतो. १९६० मार्चअखेर त्यांनी ते पीक ५ कोटी ४० लक्ष बुशलवरून ६ कोटी बुशलवर नेले आहे ही गोष्ट खरी आहे.

सिलोनमध्ये वाहतूक व धान्यपुरवठा या दोन्ही गोष्टी सरकारने मोठ्या आस्थेने सांभाळल्या आहेत. याबद्दल सेनानायकं सरकारला धन्यवाद दिले पाहिजेत. त्यांचे नियोजन हा दिवसाप्रमाणे बदलणारा विषय असून देशाचे अंदाजपत्रकापैकी साठ टक्के भाग नोकरवर्गाचे पगारावर खर्ची पडतो. देशात कोठेही कामगारांची बेदिली माजू नये म्हणून ही धावपळ व पगारवाढीची कसरत सिलोन सारखी करीत असते. यावरच विरोधी पक्षाची सदैव टीका सुरू असते. श्रीमती बंदारनायकं या जरी विरोधी पक्षाच्या नेत्या असल्या तरी त्यांचे मुख्य प्रवक्ते त्यांचे पुतणे फीलिक्स बंदारनायकं हे आहेत. त्यांची व सेनानायकं यांची पार्लमेंटमधील लढत मोठी पाहण्यासारखी असते. सेनानायकं मंत्रि–मंडळामागे तामीळ गट, मुसलमान व रोमन कॅथॉलिक आहेत. या लोकांचेमागे २१ टक्के तामीळ, ७ टक्के मुसलमान व ८ टक्के खिरश्चन जनता येते. हे जरी खरे असले तरी यातील १० टक्के हिंदी, तामीळ कामगारवर्ग कामगार संघट–नांचे पुढाकाराखाली आहे. तो केव्हा बंदारनायकं यांचे डावे पक्षास मिळेल हे सांगता येत नसे. याशिवाय बेकारांचा पाच लाखांचा गट बंदारनायकं पक्षाचे मागे असे आणि तुम्हाला नोकऱ्या देणे हे आमचे पहिले कार्य राहील असे ते सांगतात.

या सर्व परिस्थितीत ज्या ज्या ठिकाणी मी गेलो, त्या त्या ठिकाणी सिलोनची सर्व सत्ता पक्षाच्या बदलत्या धोरणानुसार हेलकावे खात असावी असे मला वाटली. पंतप्रधान डडली सेनानायकं यांचे अधिकारारूढ असलेले त्या वेळचे यू. एन. पी. पक्षाचे मंत्रिमंडळ व १९४७ चे डी.एस. सेनानायकं यांचे मंत्रिमंडळ यांचेमध्ये अनेक दृष्टीने फरक होता. एका काळचे ट्राटस्काईटस्

फिलीप गुनवदनं हे त्यांना मदत करण्यासाठी मंत्रिमंडळात आले असले तरी त्याच्या मताशी मिळते घेता घेता डडली यांची पुरेवाट होत असे. तर दुसरीकडे तामीळ काँग्रेसच्या नेत्यांना आवरता आवरता त्यांची पुरेवाट होते. ते हिंदुस्थानात जाऊन वर्ल्ड तामीळ काँग्रेसचे अधिवेशनास खुशाल हजर राहू शकतात व सिलोनशी संबंध कायम ठेवून आपले हिंदी बांधवांशीही हितगुज करू शकतात. यामुळे सिलोनची स्वतंत्र राजवट उभारू इच्छिणाऱ्या डडली सेनानायकं यांना ते मनातून अस्तनीतील निखाऱ्यासारखे वाटत असल्यास त्यात फारसे नवल नाही. एकीकडे श्रीलंका फेडरेशन पक्षाचे मध्य सिलोनमधील वर्चस्व मार्क्सिस्टस् व डाव्या संघटनांशी जोडलेले संबंध व यू. एन. पी. ची निर्बल भूमिका व परिस्थिती या सर्वांच्या कचाटयांत त्यावेळचे सिलोन सापडल्यामुळे गेल्या वीस वर्षांत मोठा स्थिर राज्यकारभार सिलोनला लाभला आहे असे वाटत नाही. या सर्वांच्या मुळाशी प्रामुख्याने तामीळ व सिंहली भाषांचा वाद असून त्याच्या अनुरोधाने परिस्थितीचा भरपूर फायदा घेऊन राज्यसत्ता वाटेल तशी राबवू पाहणाऱ्या कामगार संघटना दिवसेंदिवस तेथे अधिक प्रबल होत चालल्या आहेत हे तितकेच खरे आहे. या सर्व परिस्थितीत राजसत्तेला स्वतंत्र सिलोनच्या संरक्षण योजनेकडे बिलकूल लक्ष देता आलेले नाही. सिलोनची यावेळची स्थिती १९६२ च्या हिंदुस्थानसारखी होती. एका प्रमुख सेनानीशी बोलताना मला असे आढळून आले की आम्हाला हिंदुस्थानसारख्या सरहद्दीजवळ चीनची भीती नाही, पण आमची मोक्याची समुद्रातील राष्ट्रे लक्षात घेता संरक्षणाच्या दृष्टीने असे निर्बल राहणे सिलोनला कधीच परवडणार नाही. या एक कोटी दहा लक्ष लोकांचे छोटया राष्ट्रात ४० हजारांवर संरक्षक सेना त्यावेळी नव्हती. विमानदल व नाविकदलाचे बाबतीत सर्वसाधारण आधुनिक राष्ट्राचे मानाने सिलोन फारसा पुढे गेलेला नव्हता. सिलोनचे एकूण वार्षिक उत्पादन १८१ कोटींच्या घरात आहे व सर्व खर्च १७४ कोटीपर्यंत जातो. यात संरक्षण योजनेसाठी किती होतो यांचा नक्की अंदाज घेण्यासारखी माहिती मला मिळाली नाही, पण एकंदर खर्चाचा अंदाज पाहता हा खर्च मोठया आस्थेने केला जात असावा असे वाटत नाही.

सिलोनची अंतस्थ परिस्थिती वरीलप्रमाणे आजही स्फोटक असली तरी अजूनही सिलोनला सुधारण्याच्या वाटेवर असलले राष्ट्रच म्हणावे

खरेदी चीन करतो व सिलोनला लागणारा तांदूळ देत असतो. पौंडाची किंमत २० टक्के उतरल्यामुळे सिलोनचे केवढे तरी नुकसान झाले व आयात मालाची किंमत २ कोटी ८० लक्षानी या वर्षी वाढली. यात एकच चांगली गोष्ट म्हणजे सिलोनी शेतकरी तांदूळ पिकाच्या मागे चांगला लागला आहे. वर्षातून तीन वेळ महापूर पाण्यामुळे तो भात पीक काढू शकतो. १९६० मार्चअखेर त्यांनी ते पीक ५ कोटी ४० लक्ष बुशलवरून ६ कोटी बुशलवर नेले आहे ही गोष्ट खरी आहे.

सिलोनमध्ये वाहतूक व धान्यपुरवठा या दोन्ही गोष्टी सरकारने मोठ्या आस्थेने सांभाळल्या आहेत. याबद्दल सेनानायकं सरकारला धन्यवाद दिले पाहिजेत. त्यांचे नियोजन हा दिवसाप्रमाणे बदलणारा विषय असून देशाचे अंदाजपत्रकापैकी साठ टक्के भाग नोकरवर्गाचे पगारावर खर्ची पडतो. देशात कोठेही कामगारांची बेदिली माजू नये म्हणून ही धावपळ व पगारवाढीची कसरत सिलोन सारखी करीत असते. यावरच विरोधी पक्षाची सदैव टीका सुरू असते. श्रीमती बंदारनायकं या जरी विरोधी पक्षाच्या नेत्या असल्या तरी त्यांचे मुख्य प्रवक्ते त्यांचे पुतणे फीलिक्स बंदारनायकं हे आहेत. त्यांची व सेनानायकं यांची पार्लमेंटमधील लढत मोठी पाहण्यासारखी असते. सेनानायकं मंत्रि–मंडळामागे तामीळ गट, मुसलमान व रोमन कॅथॉलिक आहेत. या लोकांचेमागे २१ टक्के तामीळ, ७ टक्के मुसलमान व ८ टक्के ख्रिश्चन जनता येते. हे जरी खरे असले तरी यातील १० टक्के हिंदी, तामीळ कामगारवर्ग कामगार संघट–नांचे पुढाकाराखाली आहे. तो केव्हा बंदारनायकं यांचे डावे पक्षास मिळेल हे सांगता येत नसे. याशिवाय बेकारांचा पाच लाखांचा गट बंदारनायकं पक्षाचे मागे असे आणि तुम्हाला नोकऱ्या देणे हे आमचे पहिले कार्य राहील असे ते सांगतात.

या सर्व परिस्थितीत ज्या ज्या ठिकाणी मी गेलो, त्या त्या ठिकाणी सिलोनची सर्व सत्ता पक्षाच्या बदलत्या धोरणानुसार हेलकावे खात असावी असे मला वाटली. पंतप्रधान डडली सेनानायकं यांचे अधिकारारूढ असलेले त्या वेळचे यू. एन. पी. पक्षाचे मंत्रिमंडळ व १९४७ चे डी.एस. सेनानायकं यांचे मंत्रिमंडळ यांचेमध्ये अनेक दृष्टीने फरक होता. एका काळचे ट्राटस्काईटस्

फिलीप गुनवदनं हे त्यांना मदत करण्यासाठी मंत्रिमंडळात आले असले तरी त्याच्या मताशी मिळते घेता घेता डडली यांची पुरेवाट होत असे. तर दुसरीकडे तामीळ काँग्रेसच्या नेत्यांना आवरता आवरता त्यांची पुरेवाट होते. ते हिंदु-स्थानात जाऊन वर्ल्ड तामीळ काँग्रेसचे अधिवेशनास खुशाल हजर राहू शकतात व सिलोनशी संबंध कायम ठेवून आपले हिंदी बांधवांशीही हितगुज करू शकतात. यामुळे सिलोनची स्वतंत्र राजवट उभारू इच्छिणाऱ्या डडली सेनानायकं यांना ते मनातून अस्तनीतील निखाऱ्यासारखे वाटत असल्यास त्यात फारसे नवल नाही. एकीकडे श्रीलंका फेडरेशन पक्षाचे मध्य सिलोनमधील वर्चस्व मार्क्सिस्टस् व डाव्या संघटनांशी जोडलेले संबंध व यू. एन. पी. ची निर्बल भूमिका व परि-स्थिती या सर्वांच्या कचाट्यांत त्यावेळचे सिलोन सापडल्यामुळे गेल्या वीस वर्षात मोठा स्थिर राज्यकारभार सिलोनला लाभला आहे असे वाटत नाही. या सर्वांच्या मुळाशी प्रामुख्याने तामीळ व सिंहली भाषांचा वाद असून त्याच्या अनुरोधाने परिस्थितीचा भरपूर फायदा घेऊन राज्यसत्ता वाटेल तशी राबवू पाहणाऱ्या कामगार संघटना दिवसेंदिवस तेथे अधिक प्रबल होत चालल्या आहेत हे तितकेच खरे आहे. या सर्व परिस्थितीत राजसत्तेला स्वतंत्र सिलो-नच्या संरक्षण योजनेकडे बिलकूल लक्ष देता आलेले नाही. सिलोनची यावेळची स्थिती १९६२ च्या हिंदुस्थानसारखी होती. एका प्रमुख सेनानीशी बोलताना मला असे आढळून आले की आम्हाला हिंदुस्थानसारख्या सरहद्दीजवळ चीनची भीती नाही, पण आमची मोक्याची समुद्रातील राष्ट्रे लक्षात घेता संरक्षणाच्या दृष्टीने असे निर्बल राहणे सिलोनला कधीच परवडणार नाही. या एक कोटी दहा लक्ष लोकांचे छोट्या राष्ट्रात ४० हजारांवर संरक्षक सेना त्यावेळी नव्हती. विमानदल व नाविकदलाचे बाबतीत सर्वसाधारण आधुनिक राष्ट्राचे मानाने सिलोन फारसा पुढे गेलेला नव्हता. सिलोनचे एकूण वार्षिक उत्पादन १८१ कोटींच्या घरात आहे व सर्व खर्च १७४ कोटीपर्यंत जातो. यात संरक्षण योजनेसाठी किती होतो यांचा नक्की अंदाज घेण्यासारखी माहिती मला मिळाली नाही, पण एकंदर खर्चाचा अंदाज पाहता हा खर्च मोठ्या आस्थेने केला जात असावा असे वाटत नाही.

सिलोनची अंतस्थ परिस्थिती वरीलप्रमाणे आजही स्फोटक असली तरी अजूनही सिलोनला सुधारण्याच्या वाटेवर असलले राष्ट्रच म्हणावे

लागेल. सत्ता हाती घ्यावयास धडपडणारे निरनिराळे गट तेथे सारख्या हालचाली करीत असले तरी कारभारी मंत्र्याच्या आज्ञेनुसार वागणारे पोलीस दल ब्रिटिश अधिकाऱ्यांचे हाताखाली तयार झालेले असल्यामळे कोणत्याही हालचाली प्रभावीरित्या ते दडपू शकतात. विशेषत: डडली सेनानायकं सरकारचे या पोलीस दलावर चांगलेच वजन आहे. ही गोष्ट अनेक वेळा स्पष्ट झालेली आहे. कोणताही कायदा यशस्वीरित्या अंमलात आणण्यात त्यांचा हातखंडा आहे. सायंकाळी पाच वाजता कायद्याप्रमाणे सिलोनची सर्व दुकाने बंद होतात व शहराशहरातून या गुमास्ता कायद्याची अंमलबजावणी कसोशीने केली जाते. इन्स्पेक्टर त्यांच्याकडे दुर्लक्ष करू शकत नाहीत. फक्त होटेले, औषधी दुकाने यानंतर उघडी मिळतील.आठवडयातून एक दिवस(रविवार नव्हे) सिलोनी कॅलेंडरप्रमाणे (पोया डे)बाजार बंदच राहतो. याबाबत कोणताही दुकानदार अगर व्यापारी बेकायदेशीर हालचाल करू शकत नाही. या कायदा संरक्षक पोलिसांचे त्यांच्यावर मोठे काटेतोल लक्ष असते. ही गोष्ट मी शहराशहरातून डोळ्यांनी पाहिली. यामुळे व्यापारी पेठेतील सर्वसाधारण नोकरवर्ग या सेनानायकं यांचे राज्यव्यवस्थेवर खूष दिसला. धंद्याचे राष्ट्रीयीकरण करण्याबाबत बंदारनायकं यांच्या सरकारने जी आघाडी साधली त्या आघाडीचे सर्व निर्णय जनता दुखविली जाऊ नये म्हणून सेनानायकं सरकारनी सर्व मान्य केले. ब्रिटनसारख्या परराष्ट्रांशी त्यांचे मोठ्या प्रेमाचेच संबंध असूनही त्यांच्या सिलोनमधील तेरा कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा श्रीमती बंदारनायकं यांनी घेतलेला निर्णय त्यांनी मान्य केला. विमानांचे पेट्रोल फक्त सध्या अजून त्यांचे हाती आहे. त्यांना नुकसानभरपाई देताना थोड्या सढळ हाताने मदत केली असेल पण त्यामुळे केलेल्या आर्थिक व्यवस्थेत त्यांनी कोणताच बदल होऊ दिलेला नाही. राज्यकर्त्यांचा परराष्ट्रीयांकडे कितीही कल असला तरी सर्वसाधारण जनतेला परराष्ट्रीय मंडळींनी सिलोनवर ठेवलेले दडपण उडवून द्यावे असे वाटते. त्यांना परकीयांनी केलेल्या सुधारणा प्रिय वाटतात. आपल्या आर्थिक व सामाजिक जीवनात त्यांचा समावेश करावासा वाटतो, पण त्यांना आपले म्हणून एक स्वतंत्र अस्तित्व असावे असे वाटते. आज खेड्यापाड्यातून ५० वर्षापूर्वी जुन्या बुद्ध पद्धतीने लग्न लावणाऱ्या आजोबा–आजी झालेल्या म्हाताऱ्यांनाही ही गोष्ट कळते. आपल्या सर-

कारनी विवाहाला युरोपियन राष्ट्राप्रमाणे नोंदणी आवश्यक आहे असे जाहीर करताच ते खेड्या-पाड्यातून तालुक्याचे ठिकाणी येऊन हे आजोबा-आजी आपल्या जुन्या लग्नाची नोंदणी करून घेत व त्यांची नातवंडे हे पाहण्यासाठी हजर राहात असा प्रकार मला कलंबोत पाहावयास मिळाला.या शहरात दुधाच्या भुकटीसाठी रांगा दिसत. सिलोनमध्ये दूधपुरवठा भरपूर असूनही ही परदेशीय भुकटी बरी असे मानणारे सिलोनी बरेच आहेत. त्यामुळे परदेशीय गंगाजळीचे प्रमाणात आणलेली भुकटी सिलोनी नागरिकांना ठराविक प्रमाणात वाटावी लागते. एक जुनी आवड व तिच्यासाठी वेडी होणारी ही सिलोनी जनता पाहिली की त्यांना आवरणे व त्यांच्या इच्छेप्रमाणे वागणे राजकर्त्यांना किती कठीण जात असावे याची कल्पना पुरेपूर येते.

❊ ❊

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ८०७२२ भू-प्रवास
क्रमांक ५७५ २२।७।७३

सि.-८

# सिलोनमधील कांही सुधारणा

गेली २३ वर्षे सिलोनी राज्यकर्त्यांचे हाती सिलोनची सत्ता आल्यापासून बेटाच्या १ कोटी १० लक्ष लोकसंख्येपैकी काम करू शकणाऱ्या ४५ लक्ष नागरिकांपैकी जवळजवळ ३२ लक्ष लोक निरनिराळ्या व्यवसायात गुंतले आहेत व त्यात २५ लक्ष पुरुष व ६ लक्ष स्त्रिया आहेत. यात शेती व्यवसायात गुंतलेले पुरुष १२ लक्ष ७२ हजार असून, स्त्रियांची संख्या ४ लक्ष आहे. म्हणजे सिलोनच्या, वयात आलेल्या व काम करू शकणाऱ्या लोकसंख्येपैकी एकतृतीयांश पेक्षा अधिक लोकसंख्या या महत्त्वाच्या व्यवसायात गुंतली असल्यामुळे त्यांच्या मतासाठी तरी त्यांच्या चरितार्थाची चांगली सोय लावणे आवश्यक होते, त्यासाठी प्रत्येक मंत्रिमंडळाने प्रयत्न केले आहेत. पहिले लोकनियुक्त पंतप्रधान डी. एस. सेनानायकं नेहमी म्हणत की मला सिलोनमधील प्रत्येक शेतकऱ्याला २ एकर जमीन व एक गाय यांचा मालक बनवावयाचे आहे. पण ही त्यांची प्रतिज्ञा अद्याप तरी पुरी झालेली नाही व अजूनही खेड्यांत राहणारे ६६ टक्के शेतकरी एक एकर अगर त्यापेक्षाही कमी जमिनीचे मालक आहेत. त्यामुळे जास्त जमीन असलेल्या सावकारांच्या जमिनीवर कूळ म्हणून राबण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय त्यांना उरलेला नाही. आपलेकडील कूळ कायद्याप्रमाणे एखादा कायदा सिलोनमध्ये अजून जारी झालेला नाही.

शेती सुधारणा व शेतवाटणीच्या कांही नव्या योजना जारी करण्यात आल्यामुळे हे अजिबात जमीन नसलेल्या खेडुतांचे प्रमाण ४४ टक्क्यां-वरून ३४ टक्क्यावर आले आहे. एक एकराच्या आत जमीन असणारांचे प्रमाण ७१ टक्क्यावरून ३२ टक्क्यावर आले आहे. यासाठी सिलोन सरकारने दोन पद्धती अंमलात आणल्या त्या म्हणजे सरकारच्या ताब्यात असलेल्या जमि-नीची, जमीन नसणारांना तातडीने वाटणे व योग्य जमिनीवर शेतकरी वसाहती स्थापन करणे. या दोन्ही उपायांनी हा प्रश्न सर्वस्वी सुटू शकला नाही. कारण या वाटणीत प्रत्येक शेतकऱ्यांचे हाती आलेली जमीन फार थोडी होती. शिवाय जागेची नीट पाहणी केल्याशिवाय कांही जमिनी वाटल्या गेल्यामुळे शेतक-ऱ्यांना पोटापुरते उत्पन्न त्यातून काढता येईना. तीच स्थिती शेतकऱ्यांच्या नव्या वसाहतीची झाली.

शेतावर काम करणाऱ्या शेतकरी मजुरांचा प्रश्न हा एक ज्वलंत प्रश्न अजूनही सिलोनमध्ये आहे. १९५८ साली बंदारनायकं मंत्रिमंडळात असलेल्या कम्युनिस्ट मार्क्सिस्टस् मंत्र्यांनी एक बिल तयार करून त्याचे कायद्यात रूपांतर करून घेतले याला 'पॅडी लँडस् ॲक्ट १९५८ या नावाने ओळखण्यात येते. या कायद्यान्वये कूळ म्हणून राबणाऱ्या शेतकऱ्याला बरेच संरक्षण मिळाले. या कायद्यासंबंधीची चर्चा पार्लमेंटमध्ये सुरू असताना यू. एन्. पी. संघटनेच्या लेकपेपर्स या संघटनेने यावर फारच जोराची टीका केली. या कायद्याचा मूळ उद्देश भातशेतीत काम करणाऱ्या शेतकऱ्याला संरक्षण देणे हा होता. या अन्वये (१) कुळाला जमिनदारापासून संरक्षण मिळाले, त्याला भाताचे निर्मितीसाठी जमिनदारांनी किती मदत द्यावी याची निश्चिती करण्यात आली, (२) त्यांनी खंड किती द्यावा हे ठरविण्यात आले व यामुळे जास्त खंड मिळण्याचे आशेने कुळे बदलण्याचे जमिनदारांचे हक्क मर्यादित झाले, (३) सरकारने एक मशागत मंडळ नेमून त्याला शेतावर काम करणाऱ्या मजुरांचा मेहताना ठरविण्याचे अधिकार दिले. (४) पुरेसे उत्पन्न काढावयास सोईचे जावे म्हणून किती जमीन एकेकाला ताब्यात देण्यात यावी हेही ठरवि-ण्यात आले (५) शेती उत्पन्न किती आले पाहिजे या संबंधीचे निर्बंध कुळावर घालण्यात आले. (६) शेतकऱ्यांचे कर्ज निवारण त्यांचे कर्जावरील व्याजाचे दर

यावर निर्बंध घातले (७) मशागत कमिटीला जादा अधिकार देण्यात येऊन त्यांनी पीक कमी पडत असल्यास योग्य ते उपाय योजावे असे ठरविण्यात आले. तेव्हा हा कायदा बऱ्याचशा विरोधानंतर पास झाला.पण तो अंमलात आणण्याचे अधिकार मंत्रिमंडळाचे हाती असल्यामुळे मंत्र्यांचे मर्जीतील जमिनदारांचे शेतात सिलोनमध्ये अजून हात राखूनच तो वापरला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांना सुख-सौख्याच्या सोयी कायद्याने हाती दिल्या असूनही त्याचा वापर व्हावा तसा तत्परतेने होत नाही. याशिवाय यू.एन्.पी. सरकारने शेती व बागायतीचे उत्पन्न वाढविण्यासाठी ज्या काही नवनवीन योजना आखल्या त्यातही त्यांना चांगले यश आले आहे असे म्हणता येत नाही.उदाहरणार्थ रबराच्या नव्या निर्मितीसाठी१९ कोटी रुपये खर्च जर सरकारने काही आवश्यक सुधारणा केल्या असल्या तरी या उत्पादनात ६० हजार टन जादा रबराची निर्मिती झाली असती व आजची किंमत विचारात घेता उत्पन्न ५० टक्क्याने वाढले असते. पण शेतकऱ्यांच्या वसाहती करून जे उत्पादनवाढीचे प्रयत्न झाले, त्यात भरमसाट पैसा खर्च होऊन उत्पन्न अवघे १६ टक्क्यांनी वाढले. तीच स्थिती नारळाच्या निर्मितीत पैसा न गुंतविल्यामुळे झाली. राज्य सरकारच्या या धोरणाचा परिणाम देशाचे आर्थिक प्रगतीवर झाला अशी टीका आज सिलोनमध्ये ऐकू येते.

सिलोनमधील सर्व शिक्षण फुकट आहे. राजकर्त्यांनी जनतेच्या सुखसोईसाठी ही जबाबदारी प्रथमपासूनच उचलली. सिलोनच्या अंदाजपत्रकापैकी ३७ कोटी ३० लक्ष रुपये (१४।। टक्के) पैसा सिलोनच्या नागरिकांच्या मुलांच्या शिक्षणावर खर्ची पडतो. यामुळे हा देश गेल्या वीस वर्षात शिक्षणाचे बाबतीत तरी मागे पडलेला नाही. ही गोष्ट मान्य करावी लागेल. सिलोनमध्ये सर्वच ठिकाणी शाळा कॉलेजे या मुलांना पुरेशी अशी काढावी लागली व त्यापैकी बहुसंख्यांकांची सर्व आर्थिक जबाबदारी प्रथम सरकारला उचलावी लागली. ९५५० शिक्षण संस्था व त्यासाठी जवळ जवळ ९२०८३ शिक्षक नोकरीस ठेवावे लागतात. त्याचे नेतृत्वाखाली २५६५१९१मुलांना शिक्षण दिले जाते. साधारणपणे २८ मुलामागे एक शिक्षक असे हे प्रमाण पडते. यावरून कशी पूर्णपणे आधुनिक तत्त्वानुसार येथे शिक्षणाची आखणी तयार करण्यात आली आहे.याची कल्पना येईल. या एवढ्या सोईमुळे सिलोनमधील ८० टक्के पुरुष व ६३ टक्के

स्त्रिया शिक्षित आहेत. सर्वसाधारण साक्षरांचे प्रमाण ९० टक्क्यावर जाईल. यावरून सिलोन हिंदुस्थानचे मानाने कोठे आहे याची कल्पना येते. अद्यापही भारतातील साक्षरतेचे प्रमाण ३० टक्क्यावर गेलेले नाही.

या देशातील ही शैक्षणिक प्रगति सर्वस्वी लोकशाही राजवटीने केली असे म्हणता येत नाही. ज्या इंग्रज राज्यकर्त्यांनी हिंदच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करून नुसते कारकून बनविणारे शिक्षण दिले त्याच ब्रिटिश राजकर्त्यांनी १९३१ पासून म्हणजे सिलोनला वयात आलेल्यांना मतदानाचे हक्क दिल्यापासून शिक्षणासाठी नवनव्या योजना आखावयास सुरवात केली. याचा बराचसा हिस्सा मिशनऱ्यांचा होता. निवडून आलेल्या सिलोनी प्रतिनिधींनी पहिली कोणती मागणी जोराने केली असेल तर ती सार्वत्रिक शिक्षणाची सोय होय. याचा परिणाम असा झाला की, पुढील आठ वर्षांचे काळात शाळांची संख्या हजारांनी वाढली व शिक्षणावर सरकार ५० टक्के अधिक खर्च करू लागले. या शिक्षणपद्धतीत सुधारणा व्हावी म्हणून १९४० साली एक खास समिती नेमली. तिने आपले अहवालात जे पैसे देऊ शकतील अशांच्या शाळा व पैसे देऊ न शकणाऱ्याच्या शाळा अशा दोन प्रकारच्या शाळा काढल्या. बरेचसे सिलोनी राज्यकर्ते ऑक्सफर्ड व केंब्रिजचे विद्यार्थी असल्यामुळे त्यांना शिक्षणाचे महत्त्व कळत होते. त्यांनी शिक्षणाची आवड प्रथम वाढावी म्हणून तामीळ माध्यमातून व काही शाळातून इंग्रजीतून शिक्षण द्यावयास सुरुवात केली. प्रथम शिक्षण सार्वत्रिक केले. १९५५ साली सिलोनमध्ये असलेल्या सहा हजार शाळांपैकी अवघ्या १५ शाळा फी घेऊन शिकविणारांच्या होत्या. शाळासाठी उत्तम शिक्षक मिळावे म्हणून दक्षिण हिंदुस्थानातील बरेचसे शिक्षक येथे येऊ लागले. त्यांनाही या सिलोनी शाळांतून सामावून घेण्यात आले. यामुळे हिंदमधील शिक्षकांची बेकारी सिलोनच्या पथ्यावर पडली. सिलोनचे राज्यकर्त्यांनी सिंहली, तामीळ व इंग्रजी या तिन्ही माध्यमातून शिक्षण सुरू ठेवल्यामुळे शिक्षणाचे बाबतीत तरी भाषीयवादाला फारसा अवसर मिळाला नाही. विशेषतः मुसलमान, ॲंग्लो इंडियन जमात (बर्गर्ज) व यांनी प्रथमपासूनच इंग्रजी माध्यमाच्या शाळा पसंत केल्या. त्यामुळे हा वर्ग स्वतंत्रपणेच सिलोनमध्ये वाढू लागला. सिंहली ही राज्यभाषा असल्यामुळे त्यांना ती शिकावीच लागे तर

तामीळ जरी तामीळ शाळेतून शिक्षण घेत असले तरी त्यांनाही व्यवहारासाठी सिंहली भाषा शिकावी लागतेच. सिलोनच्या माझ्या दौऱ्यात जेवढे तामीळ पदवीधर मला भेटले त्यांना सिंहली भाषा उत्तम येत होती. ही तामिळी, पदवी मिळविताना मात्र मद्रासला जाऊन तेथे पदवी मिळविण्याचा त्यांचा कल विशेष दिसला. यावरून परकीयांना सिलोनी शिक्षण जरी फुकट मिळत असले तरी त्याविषयी मोठे प्रेम असावे असे वाटले नाही.

सिलोनमधील शिक्षणाचे सुधारणेसाठी १९४३ साली नेमलेल्या कमिशनने याबाबतीत फार मोठे कार्य करून ठेवले. या समितीने शिक्षणाचा भार सर्वस्वी राष्ट्राने कसा वाहिला पाहिजे, याचे सविस्तरपणे विवेचन आपले अहवालात केले आहे. समितीचे सूचनेनुसार१९४५ साली ऑक्टोबर महिन्यात फीशिवाय शिक्षण दिले जाऊ लागले. ग्रँट इन एड खाली काम करणाऱ्या शाळांना विचार करण्यासाठी संधी दिली गेली. पण याचा परिणाम असा झाला की सिलोनमधील ६००० शाळांपैकी अवघ्या १५ शाळा सरकारी मदत घेऊन शिक्षण देणाऱ्या खाजगी शाळा राहिल्या. सर्व शाळातून इंग्रजी ही भाषा सक्तीचा विषय म्हणून शिकविली जाई, पण शिक्षणाचे माध्यम मात्र सिंहली अगर तामीळ राहिले. कॉलेजातूनही साहित्य विभागात सिंहली व तामीळ या माध्यमातून शिक्षण देण्यास सुरूवात झाली व १९६३ साली या माध्यमातून इतिहास, अर्थशास्त्र, भूगोल, यासारखे विषय घेऊन पदवीधर बाहेर पडले. सिलोनमधील विद्यापीठातून सिंहली व तामीळ या भाषांतून शिकवावयास तर यापूर्वीच सुरुवात झाली होती.

तेथील शिक्षणतज्ज्ञांनी आपले परदेशांतील अनुभवाचा पुरेपूर उपयोग केलेला मला दिसला. आठव्या इयत्तेनंतर रशियाप्रमाणे त्याचा विद्यार्थी आपला आवडीचा विषय शिकविण्यासाठी महाविद्यालयात जातो. त्यांना पूर्वी 'जयेस्तं'–शाळा म्हणत. सध्या महाविद्यालय म्हणतात. या ठिकाणी विद्यार्थ्यांची वर्गवारी केली जाते. या विभागातील विद्यार्थी शेतकी, ब वर्गातील विद्यार्थी तंत्रज्ञ (एंजिनीयरिंग),क वर्गातील विद्यार्थी शास्त्रीय विषय व ड वर्गातील विद्यार्थी व्यापारी शिक्षण घ्यावयास जातात. अशा तऱ्हेने विद्यार्थी वर्गाची आवड व पालकांची इच्छा विचारात घेऊन विद्यार्थ्यांच्या त्या त्या प्रकारचे

वर्गांतून महाविद्यालयात प्रवेश दिला जातो. सर्वसाधारणपणे वयाचे चौदावे वर्षी या वर्गवारीने वर्गांत विद्यार्थी येतो व त्यांचे विषयाचे आवडीनुसार शिक्षण सुरू होते. हे सर्व शिक्षण बहुसंख्य मुले–मुली एकत्र येऊन घेतात. अशा शाळा सिलोनमध्ये ४१७४ असून, त्यातील अवघ्या ७१५ (१७ टक्के) फक्त मुलांना अगर मुलींसाठी स्वतंत्र शाळा आहेत. पण सर्वसाधारणपणे सहशिक्षणाला सिलोनी समाजात प्राधान्य आहे.

सिलोनचे सर्व विद्यापीठात एकूण १९१३४ विद्यार्थी शिकत असून (१) युनिव्हर्सिटी ऑफ सिलॉन, (२) विद्याराय युनिव्हर्सिटी, (३) विद्यालंकार युनिव्हर्सिटी व याशिवाय फक्त कायद्याचे शिक्षण देणारे एक स्वतंत्र विद्यापीठ तेथे आहे. अर्थात सर्व प्रकारच्या शिक्षणाची सोय या विद्यापीठातून करण्यात आली असून ठराविक गुणवत्ता मिळविणाऱ्या विद्यार्थ्यालाच विद्यापीठात प्रवेश मिळतो. विद्यापीठात ९५६० मुले व ४५७९ विद्यार्थिनी शिकत असून त्यांचेसाठी ५६३ शिक्षक आहेत. कोणत्याही शाखेत विद्यार्थिनींची संख्या कमी नाही. कायद्याचे विद्यापीठात ३०७ विद्यार्थ्यांपैकी फक्त २१ स्त्रिया दिसल्या. सिलोनी शिक्षणशास्त्रज्ञ जरी ब्रिटिश शिक्षण पद्धतीचे कितीही भोक्ते असले तरी त्यांनी ब्रिटिश शिक्षणक्रम आपले दारात येऊ दिला नाही. आमचेकडील अँग्लो–इंडियन शाळातून शिकून ब्रिटिश विद्यापीठात जाण्यासाठी केंब्रिज मॅट्रिकला बसण्याची सोय अजूनही ठेवली आहे. पण सिलोनने ती अजिबात बंद केली. सिलोनी विद्यार्थ्यांनी सिलोन संस्कृतीशी एकरूप होऊन शिकले पाहिजे. वाटल्यास पदवी परीक्षेनंतर त्यांनी परदेशी जावे, हे धोरण त्यांनी स्वीकारले, ज्या सिलोन अमीर-उमरावांची मुले पूर्वीप्रमाणे ब्रिटिश विद्यापीठातून अभ्यासासाठी जाऊ इच्छितात.त्यांना केंब्रिज मॅट्रिक होण्यासाठी हिंदुस्थानात यावे लागते. ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. यावरून सिलोनी शिक्षणतज्ज्ञ केवढे राष्ट्रनिष्ठ आहेत याची कल्पना येईल.

सिलोनच्या ग्रामीण विभागात व छोटयामोठ्या शहरातून घराचा व राहण्याच्या जागेचा तुटवडा भासत नाही. पण कँडी, न्यूरेल्या, गॉलसारख्या मोठ्या शहरातून सिलोनी राज्यकर्त्यांनी राहण्याचे जागेचा प्रश्न सोडविला आहे असे वाटत नाही. युद्धकालानंतर कलंबो शहरात जी नागरिकांची उद्योग-

धंद्यासाठी एकदम गर्दी झाली, त्याचा विचार करता १४४००० घरांची गरज होती. ती गरज नाहीशी करण्यासाठी आखलेल्या कार्यक्रमातील अवघी २३५३ घरे बांधून झाली व कलंबोतील जागेचे हाल अजूनही कायम आहेत. शहरातील ६६ टक्के कुटुंबे एका खोलीत राहतात. तर ३२ टक्के कुटुंबांना अवघ्या दोन खोल्यांचे घरात राहावे लागते, अशी परिस्थिती शहरात आहे. यामुळे या घरबांधणीचे बाबत तरी सिलोनचे शहरातील नागरिकांची स्थिती आमच्यापेक्षा फारशी वेगळी नाही. खेड्यातून मात्र घरांभोवती नारळाचे उत्पन्न काढण्यासाठी जागा उठविणे हाही सिलोनी नागरिकांचा एक छंद आहे. यामुळे भाडेकरी असो अगर मालक असो खेड्यातून बागा असलेल्या घरात सुखात राहणे हे एक सिलोनी नागरिकांचे वैशिष्टच आहे. आमच्याकडे ३० ते ३५ मजल्याच्या इमारती मुंबई व दिल्ली शहरातही नाहीत पण कलंबो-सारख्या शहराने या बाबतीत आघाडी केव्हाच गाठलेली आहे. अशा इमारतीतून युरोपातील शहराप्रमाणे फिरते जिने, (एस्कलेटर्स) 'जे अजून मुंबईतही नाहीत ते कलंबोसारख्या शहरात १० वर्षांपूर्वी आले आहेत. शोभिवंत बांधणी, हे कलंबोच्या इमारतीचे वैशिष्टच आहे. तेथे युरोपातील शहरांचे तंतोतंत अनुकरण केल्यासारखे कित्येक ठिकाणी दिसते. कलंबो शहर कोणत्याही युरोपियन शहरापेक्षा वेगळे दिसत नाही. याचे कारण तेथे दिसणाऱ्या या इमारती आहेत. तीच स्थिती कँडी, गॉल, न्यूरेल्या या शहरांची आहे. सिलोन आपल्या नागरिकांच्या आरोग्याची काळजी चांगली घेते. कोणत्याही परदेशी पाहुण्याला १० दिवसांचे वर सिलोनमध्ये राहाण्याचे असेल तर, क्वारन्टीमध्ये जाऊन प्रथम तपासून घ्यावे लागते. पंचवीस हजार चौरस मैलांचे या प्रदेशांत २९६ लहान मोठी हॉस्पिटल्स सिलोन सरकार चाल-विते. १ कोटी लोकसंख्येच्या या बेटात १४१९४ डॉक्टर्स व २४४ वैद्य आहेत. तर ३६४२ नर्सेस हॉस्पिटलमधून नोकरीसाठी ठेवलेल्या आहेत. वर्षाकाठी १६ लक्ष ४० हजार रोगी हॉस्पिटलमधून औषधोपचार घेऊ शकतात व या आरोग्य खात्यावर एकूण १५ कोटी २० लक्ष रुपये सिलोन सरकार खर्च करते. यावरून आपल्या नागरिकांच्या आरोग्याची काळजी सिलोन सरकार कशी घेते याची कल्पना येण्यासारखी आहे.

सिलोनच्या सर्वसाधारण नागरिकाला आजच्या स्वातंत्र्याविषयी काय वाटते असा प्रश्न विचारला तर तो काहीसा गोंधळल्यासारखा वाटतो. आज त्याचे वार्षिक वैयक्तिक उत्पन्न सर्वसाधारणपणे वर्षाकाठी ६४० रुपये सिलोनी रुपयांचे (सिलोनचे १४ रुपये म्हणजे आपले १८ रुपये होतात) आहे. हिंदुस्थानचे २० वर्षांचे स्वातंत्र्यानंतर ते जेमतेम २९८ हिंदी रुपयांचे घरात गेले आहे. म्हणजे सिलोनी मनुष्य आर्थिकदृष्ट्या आपले पुढे किती आहे याची कल्पना येईल. सिलोनच्या माझ्या सर्व पाहणीत एकही भिकारी अगर फाटके कपडे घातलेला सर्वसाधारण मनुष्य आढळला नाही. याबाबत बोलताना सिलोनचे एक प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ मला म्हणाले, "तुमच्या हिंदुस्थानच्या भाषेत बोलावयाचे तर आमच्या लहानशा बेटात तुम्ही हिंदुस्थानात जो दलित वर्ग म्हणता ती अजिबात नाही. मध्यमवर्गीय व श्रीमंत हे दोनच वर्ग या बेटात राहतात व त्यामुळे तुमचे मध्यमवर्गीयाचे जे उत्पन्न आहे ते आमच्या सर्वसाधारण माणसाचे आहे. त्याला हिंदी माणसांपेक्षा अधिक सुखसोयी आहेत. कामगाराचे उत्पन्न दिवसाला आज पाच रुपयाचे आत नाही. त्याला तुमचेपेक्षा साखर, दूध, आवश्यक धान्य स्वस्तात मिळते. त्याचे मुख्य अन्न जे भात व मासे आहेत त्याला भरपूर व स्वस्त मिळतात. तरीही आहे ही परिस्थिती सुधारली पाहिजे. यासाठी तो झगडत असतो. यातूनच आजच्या सिलोनमध्ये सारख्या सुरू असलेल्या संपाचा व ट्रेड युनियन चळवळीचा जन्म झालेला आहे. पण या बरोबर सुशिक्षित बेकारांची संख्या वाढत आहे.

१९५६ हे वर्ष सिलोनचे सामाजिक क्रांतीचे वर्ष समजले पाहिजे. या वर्षापासून सिलोनच्या ट्रेड युनियन चळवळीला खरी सुरुवात झाली. सिलोनची बहुतेक तरुण राजकारणी मंडळी या सिलोनच्या ट्रेड युनियन चळवळीचे मागे आहेत. त्यांनी खेड्यातील चहाचे व रबराचे मळ्यापासून शहरातील कारखाने, गिरण्या व बंदर कामगार या सर्वांना आपल्या निशाणाखाली एकत्रित आणले आहे. आज जरी या कामगारांचे हाती सिलोनच्या राजकारणाची प्रत्यक्ष सत्ता नसली तरी, आजच्या राज्यकर्त्यांना या सिलोनच्या कामगार चळवळीपुढे मान तुकवावी लागते व त्यामुळे सामाजिक व आर्थिक जीवन सर्वस्वी या पुढाऱ्यांचे हाती गेले आहे. १९४८ साली सिलोनमध्ये वर्षाला ५३

संप झाले व त्यात २४१६५ कामगार सामील झाले, तर १९६४ साली संपाची संख्या २२९ वर गेली व त्यांत ७००४६ कामगार सामील झाले. यावरून हे संपाचे विष किती दूरवर पसरत चालले आहे, याची कोणालाही कल्पना येईल. यातील काही संप तर तीन तीन महिने चालविण्यासारखी शक्ती काही संघटनांचे अंगी आहे. सिलॉन मर्कंटाईल युनियन नांवाच्या प्रमुख कामगार संघटनेचे चिटणीस मि. पी. वी. तुंपोल यांचेशी काही काळ या संपाचे परिस्थितीबाबत मी बोलू शकलो. ते म्हणाले, "बंदारनायकं यांचे डाव्या गटाचे सरकार येवो अगर सत्ता सेनानायकं यांचे संयुक्त मंत्रिमंडळाचे हाती असो. सिलोनी कामगारांना अजून संप केल्याशिवाय न्याय मिळतो असे मला वाटत नाही. ही परिस्थिती पालटण्याचे सामर्थ्य लवकरच कामगार संघटनांच्या हाती येईल असा मला विश्वास आहे. चौतीस हजार कामगार सभासद असलेल्या संघटनेचे ते नेते होते, त्यांच्या संघटनेची गंगाजळी ३ लाखांचे घरात होती. या कामगार संघटनेच्या हालचाली सिलोन पुरत्याच मर्यादित असाव्यात असे मला वाटत नाही. आपलेप्रमाणे चीनशी प्रत्यक्ष संबंध ठेवणाऱ्या कामगारांची संघटना व आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट जगाशी नजिकचे संबंध असलेल्या संघटना सिलोनमध्ये आहेत. त्यांच्यावर कामगारांचा विश्वास आहे. या परिस्थितीत डावे गट समजण्यात येणारे पक्ष या संघटनांच्या बळावर सिलोनची सत्ता हाती घेतील किंवा कसे हे सांगणे कठीण आहे. सेनानायकं सरकार अगर लंका फेडरेशन पक्षाचे नेतृत्व असलेले बंदारनायकं सरकार यापैकी कोणी जर सिलोनची सत्ता हाती घेतली तरी ती भांडवलदारांच्या कलाने चालणार, त्यांचेपासून आम्हाला मिळावा तसा न्याय मिळणार नाही. ही गोष्ट सिलोनचे कामगार पुढारी उघडपणे बोलून दाखवितात. ते आवाक्याबाहेर जाऊ नयेत व त्यांना तक्रार करावयास जागा मिळू नये, म्हणून सिलोनी राज्यकर्ते कामगार कायदे पाळण्यात मोठे जागरूक असतात. तरी वरील तक्रार कामगार पुढाऱ्याकडून केली जाते. आज चहाचे मळ्यावर राहणाऱ्या तामिळी कामगाराला अगर गोदीतील सिंहली मजूराला कामाचे तास व इतर सुखसोयींबाबत कोणतीही कमतरता पडली तरी त्याबाबत कामगार कायद्यानुसार वागावयास कामगार पुढारी नेहमीच जागरूक असतात.

सर्वसाधारण माणसाचे जीवनाविषयी बोलावयाचे तर सिलोनचे सामाजिक जीवन मोठे शिस्तबद्ध आहे, असे मात्र मला वाटले नाही. शहरातील अगर खेडयातील कुटुंबात हिंडताना, अनेक बाहेरख्याली पुरुषांप्रमाणे सिलोनी स्त्रिया विवाहाच्या मर्यादा पाळताना मला दिसल्या नाहीत. थोडीबहुत शिस्त येण्यासाठी हिंदुस्थानप्रमाणे आता सिलोनमध्येही विवाह झाल्यावर त्याची नोंद सरकारी कचेऱ्यातून करावी लागते.

एका गांवाहून दुसऱ्या गावी जाताना रस्त्यावरती जागोजागी काजू व शहाळी विकून पैसे मिळविणाऱ्या मुली दिसतात. सदैव हसतमुख राहणाऱ्या मुली, साधासुधा पोशाखात केलेला थोडाफार नखरा, रस्त्याच्या कडेला खोपटात मांडलेले स्टॉल्स आणि शहाळयांची केलेली आकर्षक मांडणी, हे सारेच दृश्य मनोहारी असते. काजू व शहाळी विकता विकता या मुली वेश्या-व्यवसायही करतात. इतकेच नव्हे तर कॉलेजातून शिकणाऱ्या अनेक सुशिक्षित मुलींनीसुद्धा 'पॉकेटमनी' मिळवण्यासाठी हा मार्ग स्वीकारला आहे. या साऱ्या समस्यांचे स्वरूप पाहिल्यावर पुढारी, लोकसेवक व सिलोनी अधिकारी विवाह-संस्थेविषयी बोलताना लोकांच्या नैतिक जीवनाकडे काहीसे दुर्लक्ष करूनच बोलतात.

सिलोनच्या मंत्रिमंडळात एक विवाहित पत्नी व चार इतर स्त्रिया ठेवून वैवाहिक जीवन कंठणारे पुरुष मंत्री मला पाहावयास मिळाले व यातील या महिला वर्गाचे शैक्षणिक स्थान व वर्चस्व यांचा परिणाम सिलोनच्या राज-कारणावरही होत असल्याची माहिती मला चांगल्या जबाबदार व्यक्तींनी सांगितली. कलंबो येथे गेली तीस वर्षे राहिलेले एक व्यापारी शिक्षित गृहस्थ मला या विषयी बोलताना म्हणाले, "याबाबत जेवढे सिलोनविषयी कमी बोलावे तितके चांगले. हिंदी दृष्टीकोनातून जर या सामाजिक परिस्थितीकडे तुम्ही पाहू म्हणाल तर येथील परिस्थिती भीषण दिसेल. काही खेडयांतून व सिलोन शहरातील काही वर्गांतून विवाहसंस्था खरोखरी रूढ आहे, किंवा काय याची मला शंका वाटते". दुसऱ्या एक प्रमुख महिला अधिकारी आपले कचेरीतील परिस्थितीविषयी बोलताना म्हणाल्या. "एखाद्या तरुणाने तीन चार तरुणींशी एका वेळी संबंध ठेवणे ही कल्पना जगात सर्वत्र त्याज्य आहे.पण सिलोनमध्ये ती



रस्त्यावरती जागोजागी काजू व शहाळी विकून पैसे मिळविणाऱ्या मुली दिसतात. सदैव हसत मुख राहणाऱ्या मुली, साधासुध्या पोशाखात केलेला थोडाफार नखरा, रस्त्याच्या कडेला खोपटात मांडलेले स्टॉल्स आणि शहाळ्याची केलेली आकर्षक मांडणी हे सारेच दृश्य मनोहारी असते.

तेवढीशी त्याज्य वाटत असावी, असे मला वाटत नाही, असे मी रोज समोर पाहात असलेल्या प्रकारावरून मला वाटू लागते." सिलोनमधील नव्या पिढीचे मी केलेले हे वर्णन माझ्या तुटपुंज्या अनुभवावर आधारलेले आहे. पण अधिकृतरीत्या प्रसिद्ध झालेले काही आकडे पाहता वैवाहिक शिस्तबद्ध जीवन कंठण्याची प्रवृत्ती 'आपल्या इतकी येथील मुलांमुलींत असावी असे मला वाटत नाही. सिलोनच्या १ कोटी लोकसंख्येत अविवाहितांची संख्या ६४,७९,७१० आहे तर विवाहित ३६,७२,४०० आहेत. ज्यांना विधुर म्हणून जीवन जगावे लागते, असे स्त्री–पुरुष ४,१५,३६० आहेत, तर १८,६६०, स्त्री–पुरुष घटस्फोट घेऊन, विवाहबंधनातून मोकळे झालेले आहेत. युरोप, अमेरिका व आशियातील कोणत्याही देशाशी या आकड्याची तुलना करता वैवाहिक जीवनाचे दृष्टीने एक अस्थिर देश म्हणून सिलोनकडे पाहावे लागेल. अर्थात याबरोबर निर्माण होणाऱ्या अनेक सामाजिक प्रश्नालाही सिलोनला तोंड द्यावे लागले ही गोष्ट तितकीच स्पष्ट आहे.

# १९७१ मधील सिलोन

भारतात मार्चचे निवडणुकीत अनपेक्षित यश मिळवून इंदिराजींची इंडिकेट कॉंग्रेस ज्याप्रमाणे सर्व सूत्रधारी बनली, त्याचप्रमाणे १९७० चे मे महिन्यात झालेल्या निवडणुकीत श्रीमती सिरिमाओ बंदारनायकं यांचे श्रीलंका फ्रीडम पक्षाने यश मिळवून युनायटेड नॅशनॅलिस्ट पक्षाचा धुव्वा-उडवून सत्ता हाती घेतली व सिलोनच्या इतिहासात एक नवे पान उघडले आहे. त्यांनी तीन पक्षांशी एकोपा साधून एक संयुक्त गट बनविला. यात त्यांची लंका फ्रीडम पार्टी, लंका समसमाज पक्ष व मॉस्को कम्युनिस्ट असे तीन डावे गट एकत्रित आले व त्यांनी १५० जागा असलेल्या सिलोन पार्लमेंटमधील ११५ जागा मिळविल्या. यात लंका फ्रीडम पक्षाला ९०, लंका समसमाज पक्षाला १९ व मॉस्को कम्युनिस्टांना ६ याप्रमाणे जागा मिळून देशातील निर्णायक बहुमत श्रीमती बंदारनायकं यांचे हाती आले. जुन्या कारभारी यू. एन. पी. पक्षाला यावेळी १७ जागा, १३ फेडरल तामीळ पक्षाला, तामीळ कॉंग्रेसला ३ व दोन स्वतंत्र एवढे विरोधक गृहात निवडून येऊ शकले. या क्रांतिकारी निवडणूक निकालाने सिलोनच्या राजकारणातून सत्ताधारी यू. एन. पी. पक्षाचे अस्तित्वच नाहीसे झाले व डावे समजण्यात येणाऱ्या पक्षांचे हाती सर्व सत्ता आली. बंदारनायकं यांचा पक्ष इंदिरा गांधींचे इंडिकेट कॉंग्रेसप्रमाणे सिंहली

जनतेचा खराखुरा पक्ष समजला जाऊ लागला व त्यांच्या एकट्या पक्षाचे नव्वद सभासद निवडून आल्याने दोनतृतीयांश बहुमत त्यांच्या सहकारी पक्षाचे साहाय्याने त्याच्या पदरात पडले. श्रीमती सिरिमाओ यांच्याबरोबर त्यांचे पक्षाचे खरे प्रवक्ते मि. फीलिक्स बंदारनायकं यांचा हा मोठा विजय समजण्यात आला. यापूर्वीचा अधिकारी पक्ष यू. एन. पी. म्हणजे नुसता श्रीमंत दलालांचा पक्ष अशी त्यांच्यावर या निवडणूक प्रचारात टीका झाली. सर्वसाधारण मतदाराला नाविन्य म्हणून बंदारनायकं यांचा संयुक्त गट जवळ करावासा वाटला. पाच वर्षांच्या यू. एन. पी. पक्षाच्या कारकीर्दीत सर्वसाधारण माणसाला वाटणारे मोठे न्यून म्हणजे किंमतीत झालेली वाढ होय. यू. एन. पी. पक्षाचे आर्थिक गैरव्यवस्थेचे प्रतीक म्हणून मतदार बोटे दाखवीत होते. सिलोनमधील महिला मतदारांपैकी जवळजवळ ९० टक्के मतदार या निवडणुकीत मतदानासाठी हजर राहिल्या व त्यांनी श्रीमती बंदारनायकं यांना भरघोस मते दिली व यामुळे यू. एन. पी. पक्षाचा पराजय सिलोनच्या गृहिणींनी (स्वयंपाकघराने) केला, असे मत प्रदर्शित करण्यात आले. खरे पाहिले असता यू. एन. पी. पक्षाचे पंतप्रधान डडली सेनानायकं हे एक आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पुढारी होते; पण त्यांच्या इतर मंत्र्यांविषयी मात्र जनतेच्या मनात फारसा आदर नव्हता. त्यांचे शिक्षणमंत्री मि. इरिया गोली यांनी लॉटरी काढून शिक्षणासाठी पैसा जमविण्याची जी एक योजना आखली ती तर एक टीकेचा विषय झाला होता. यू. एन. पी. पक्षाने मात्र आम्ही सिलोनची शेती सुधारून उत्पन्न वाढविले हा जो दावा आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात मांडला तो मात्र बऱ्याच अंशी खरा होता.

पण आतापर्यंत सिलोनच्या राजकारणात घोटाळणारा भाषीय व जातीयवाद या निवडणूकातही डोके वर काढून यावेळी पुढे आला. वरच्या ब्राह्मण जमातीचा पाठिंबा यू. एन्. पी. ला मिळाला तर सर्व कामगार व श्रमजीविवर्ग बंदारनायकं यांचेमागे गेला. सिंहली भाषा बोलणारांचे व तामीळ भाषिकांचे संबंध हे सिलोनचे राजकारणाचा गाभा असल्यामुळे तामीळ जमात सेनानायकं पक्षाला मदत करीत होती हे ओळखून सर्व सिंहली भाषिक विरोधी पक्षाला मिळाले. तर शिक्षणात उच्च पदस्थ म्हणून मिरविणारे तरुण कॅथॉलिक

बर्गर्ज व मुस्लीम मतदार डाव्या गटाच्या गरिबांच्या गरीबी हटविण्याच्या कार्यक्रमाला भाळले. यामुळे जे १९७१ चे मार्चमध्ये हिंदुस्थानात झाले त्याची सुरवात सिलोनच्या १९७० च्या निवडणुकीत सिलोनमध्ये होऊन सिरिमाओ यांना यश मिळाले व आशियातल्या या पहिल्या महिला पंतप्रधान पुन्हा आपले देशात पंतप्रधान म्हणून निवडून आल्या व त्याची राजवट जून १९७० पासून सुरू झाली. ही राजवट सिलोनमधील सिंहली व स्थानिक जनतेच्या आधारावर उभारली गेली असल्यामुळे सिलोनमधील भारतीयांना त्यांचा कितपत फायदा होईल याविषयी मात्र सर्वांना शंका होती व त्यांचे प्रत्यंतर सिलोनमधील राहिलेल्या हिंदी नागरिकांवर येणाऱ्या नवनव्या निर्बंधावरून हळूहळू स्पष्ट होऊ लागले आहे.

डाव्या गटांशी सहकार्य करून पंतप्रधान श्रीमती बंदारनायकं यांनी राज्यकारभार हाती घेतला व नंतर १० महिन्यात त्यांनी जे काही केले त्या सिलोनी जनतेच्या सुख–सौख्याच्या बऱ्याच गोष्टी होत्या. पूर्वीप्रमाणेच दोन किलो तांदूळ माणशी फुकट वाटण्याची प्रथा त्यांनी कायम ठेवली. काळा बाजारवाले व साठेबाज यांच्या विरुद्ध त्यांनी जोराची मोहिम सुरू केली व सेनानायकं सरकारने संरक्षण दिलेली ही व्यापारी मंडळी श्रीमती बंदारनायकं सरकारचे रोषाला बरीचशी बळी पडली. त्यामुळे किंमती आटोक्यात राहण्यास मदत झाली. सरकारी उद्योगधंद्यात त्यांनी कामगार प्रतिनिधीच्या समित्या स्थापून त्यांचे हाती कारभार दिला. त्यामुळे कम्युनिस्ट पुढारी खूष झाले. लंका जुलुस्तलं नांवाची एक संघटना सरकारी पाठिंब्याने तयार झाली. परदेशाहून चोरून कापड आणून त्यावर फायदा मिळविणाऱ्या व्यापाऱ्यांना शोधून काढण्यासाठी ती स्थापन झाली व तिचे कार्याला मंत्रिमंडळाने पाठिंबा दिला पण सिलोनची जुनी घटना या सर्व नव्या सुधारणांना पुरी पडणारी नव्हती. तेव्हा सिलोन रिपब्लिकसाठी एक खास घटना बनविण्याची तयारी बंदारनायकं सरकारने सुरू केली. या अन्वये भारतात वादाचा प्रश्न झालेले मूलभूत हक्काचे कलमांचाही विचार सिलोन स्वतंत्रपणे या घटनेत करणार होते. आज बंदारनायकं यांचे पक्षाचे हाती पार्लमेंटमधील ९० जागा व त्यांचे संयुक्त संघटनेच्या हाती व नंतर मिळालेले आठजण धरून १२३ जागा असल्यामुळे

त्या सिलोनला आपले मनाप्रमाणे योग्य ते रूप देण्यास समर्थ आहेत. त्यांनी पार्लमेंट विजयानंतर केलेल्या भाषणात सर्व सिलोनी जनतेला लोकशाही अधिकार व न्याय्य वागणूक देण्याचे अभिवचन दिले असले तरी आवश्यक वस्तूंच्या किमती त्या नागरिकांच्या मागणीप्रमाणे खाली आणू शकल्या नाहीत. ही कामगारांचे मनात त्यांच्या धोरणाविषयी साशंकता आहे. या परिस्थितीत त्यांचे कारभाराबद्दल संशय घेणारे बरेच निर्माण झाले आहेत. चीनशी त्यांचे स्नेहाचे संबंध, पाकिस्तानशी दोस्तीचे करार व मधूनमधून पाश्चिमात्यांशी होणारे व्यापारी करार या गोष्टी तरुण पिढीला तेवढ्याशा मानवणाऱ्या नाहीत. त्या कितीही डाव्या गटाच्या आहोत असे दाखवित असल्या तरी जमीनदाराविषयी जनतेला हवे असलेले प्रभावी कायदे त्या करू शकल्या नाहीत.अनेक एकर जमिनीचे मालक जमीनदार व त्यांचे शेतात राबणारे भरपूर मजूर हे दृश्य सिलोनमध्ये पावलोपावली दिसते. कामगारांचे हाती असावी तशी सत्ता देण्याबाबत त्यांचे पाऊल मंद गतीने पडत आहे, अशी टीका श्रीमती बंदारनायकं सरकारवर होते व यातून तरुणांचा हिंदमधील नक्षलबारी कम्युनिस्टाप्रमाणे एक जहाल पंथ आता सिलोनमध्ये निर्माण झाला आहे.या पंथाला दडपून टाकण्यासाठी काही दिवस सिलोनमध्ये आणीबाणीची परिस्थिती बंदारनायकं यांनी जारी केली.

या सर्व गोष्टीचा स्फोट १० एप्रिल रोजी झाला. सिलोनचे स्वातंत्र्यवादी (Guevarist) एकदम उठाव करून पुढे आले, त्यांनी कित्येक पोलिस चौक्यांना आगी लावल्या व त्याची संख्या सिलोनच्या ४० हजार सेनेपेक्षा किती तरी मोठी होती व त्यांना चीनसारख्या राष्ट्राचा आतून पाठिंबा असल्यामुळे शस्त्रास्त्रांचा पुरवठा होत होता अशी शंका घेतली जात होती. त्यांच्या या हल्ल्याने पंतप्रधान बंदारनायकं यांची पाचावर धारण बसली. त्यांनी हिंद, ब्रिटन व अमेरिकेची मदत घेऊन हा लढा कसाबसा महिन्यात आटोक्यात आणला. या बेकार तरुणांच्या पेटलेल्या लढ्याला चार मुख्य कारणे होती ती म्हणजे ( १ ) ज्या सामाजिक क्रांतीची अपेक्षा बंदारनायकं मंत्रिमंडळाकडून केली गेली होती ती झाली

सि.–९

नाही. (२) तरुणांची इच्छा बंदारनायकं यांनी पाश्चिमात्य राष्ट्रांशी संबंध तोडावे ते त्यांनी मानले नाही, (३) जुन्या डाव्या गटांचे धोरण (मॉस्कोवाले) त्यांना नको होते. (४) उद्योगधंद्याचे राष्ट्रीयकरण केले नाही.

बंदारनायकं सरकारवर केले जाणारे हे आरोप ज्या जहालाकडून होत, ते तरुण हिंदमधील नक्षलवादी चळवळीपेक्षा फारसे निराळे नव्हते व त्यांची चळवळ काही मार्क्सवादी राष्ट्रांचे गुप्त पाठिंब्याने सिलोनमध्ये धुमसत आहे, असा आरोप उघडपणे केला गेल्याने श्री. बंदारनायकं यांनी उत्तर कोरियाची वकिलात बंद केली. पण यानंतरही हा धुमसणारा लढा अखेरपर्यंत आटोक्यात आला नव्हता. सिलोनमधील २२ टक्के कामगार सध्या बेकार आहेत. तेथील साक्षरता ७२ टक्क्याचे वर आहे. या परिस्थितीत तेथील जागृतीचे प्रमाण केव्हाही अधिकच राहणार.

## 'श्री लंका' रिपब्लिक झाले

सिलोनचे 'श्रीलंका' हे नवे नाव धारण करून रिपब्लिक ऑफ सिलॉन या नावाने जगाने आपल्याला ओळखावे, अशी घोषणा दि. २२ मे १९७२ ला केली. या दिनानिमित्त तयार करण्यात आलेल्या नव्या घटनेनुसार लोकशाहीचे सर्व अधिकार श्रीलंकेस प्राप्त झाले असून, ब्रिटिश साम्राज्यांतर्गत अशा सिलोनी लोकशाहीचा आता पूर्णत: अस्त झाला आहे.

यापुढे गव्हनर जनरलही सिलोनीच राहणार असून त्याच्या सर्व सत्ता सिलोनी पार्लमेंट, गव्हनर जनरल व मंत्रिमंडळाच्या हाती येणार आहे.

आतापर्यंत ब्रिटनशी असलेला राजनैतिक संबंध सिलोन जरी पूर्ववत राखणार असला तरी त्या संबंधातही आता बदल होणार असून, भारताप्रमाणे श्रीलंकेची सत्ता तेथील नागरिकांच्या हाती आली आहे. सिलोनच्या इतिहासातील हे नवे पान, त्याला खरे लोकसत्ताक राज्य बनविणार असून, तेथील निरनिराळे पक्ष ही सत्ता कशी राबवतात हे आता जगाला दिसावयाचे आहे.

पंतप्रधान सिरिमाओ बंदारनायकं यांचा कल पाश्चिमात्यांपेक्षा चीनकडेच अधिक आहे. मध्यंतरी डाव्या गटाने श्रीलंकेत केलेला उठाव चीनच्या अंतस्थ मदतीमुळेच त्या आवरू शकल्या असे बोलले जात आहे. नुकतीच आठ दिवस त्यांनी

चीनला भेट देऊन जी बोलणी केली व मदत मिळवली, ती अशा स्वरूपाची आहे कीं चीन इतर कोणत्याही राष्ट्रापेक्षा श्रीलंकेच्या अधिक जवळ आला असे जगाला वाटू लागले आहे.

भारताच्या दक्षिणेकडील हे एक महत्त्वाचे राष्ट्र ! हिंदी महासागरात सत्तेसाठी मोठ्या राष्ट्रांचा लढा सुरू असताना पंतप्रधान श्रीमती सिरिमाओ बंदारनायकं यांच्यामुळे श्रीलंका चीनच्या आहारी जात आहे, ही गोष्ट श्री लंकेचा जुना दोस्त ब्रिटन, महायुद्धानंतर जवळ आलेली अमेरिका व आताचा नवा दोस्त रशिया यांना आवडलेली नाही. त्याचा परिणाम श्रीलंकेच्या राजकारणावर कसा होणार, भारत व श्रीलंकेचे संबंध कसे राहणार, हे जलच्या अखेरपर्यंत तरी स्पष्ट झालेले नव्हते.

भारताच्या अगदी जवळचे व मोक्याचे असे सिलोनसारखे महत्त्वाचे बेट मित्र राष्ट्रात असावे असे हिंदी महासागरात लष्करी सत्ता वाढवू पाहणारी राष्ट्रे मानतात. त्यामुळे सिलोन-हिंदी महासागरातील सत्तेच्या चढाओढीत फार महत्त्वाचे स्थान पटकावू पाहात आहे. यावेळी भारताचा हा दक्षिणेकडील शेजारी कितपत स्वतंत्रपणे आपले वैशिष्टय कायम टिकवून दिवस काढू शकेल याविषयी आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांना शंका वाटते. सिलोनमधील एकदशांश भारतीय जनता आपले उद्योगधंद्यासाठी सिलोनमध्ये अडकून पडली असता तिचे हित-संबंधासाठी आम्ही काय केले पाहिजे, सिलोनशी आजपर्यंत ठेवलेले तुटक संबंध त्यांना कितपत फायदेशीर होतील, याचा स्वतंत्र भारताने जागरूकपणे तातडीने विचार करण्याची वेळ आता आली आहे. आमच्या परराष्ट्रीय संबंधाचा मोठा आधार असलेल्या या देशाकडे आतापर्यंत तुटकपणे पाहिले गेल्यामुळे पाकि-स्तानला हिंदी हद्दीवरून विमाने नेण्यास बंदी होताच सिलोन त्याला जवळ करते व सैन्य वाहतूकही आपले तळावरून करून देते. कोणाचे दडपणामुळे बंदारनायकं यांना हे करावे लागले. याचा विचार गंभीरपणे आमचे परराष्ट्र खात्याने करून या छोटया पण अतिशय महत्त्वाच्या मोक्याचे देशाशी आपले संबंध सुधारले पाहिजेत. आज आम्ही परराष्ट्रीय संबंधी याबाबत एवढे निर्बल झालो आहोत की आमचे रागालोभाची पर्वा सिलोनसारख्या छोटया देशालाही नाहीं. ही गोष्ट पूर्व पाकमधील स्वातंत्र्य लढयात नुकतीच स्पष्ट झाली.

# सिलोन प्रवासात काय पहाल?

युरोप, अमेरिका अगर पौर्वात्य देशांचा प्रवास करणे ज्यांना पैशाचे अभावी शक्य नाही त्या हिंदी प्रवाशांना पाहण्यासारखा जवळचा देश म्हणजे सिलोन हा आहे. या देशाचा प्रवास करून या आपल्या अगदी नजीकचे शेजाऱ्याची माहिती मिळवावी व सिलोनच्या सामाजिक जीवनाचा व सौंदर्याचा उपभोग सर्वसाधारण माणसाला सहज घेता येईल अशी योजना भारत सरकारने अगर सिलोन सरकारने काही केल्याचे माझे ऐकिवात नाही. युरोप, अमेरिका देशातील नागरिकांच्या जशा स्वतंत्र सफरी सिलोन पाहण्यासाठी निघतात तशी सोय आमचेकडेही आता होऊ लागली आहे. ब्रिटन, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, चीन व जपानचे कित्येक प्रवासी सिलोन पाहण्यासाठी जेवढ्या प्रमाणात पूर्वी येत तेवढ्या प्रमाणात अजूनही येतात, तेवढे जवळचे हिंदी येत नाहीत, पण हिंदुस्थानातून नोकरी–धंद्यानिमित्त सिलोनकडे जाणारांची संख्या १९६१ साली १००५३ होती ती आता सर्व मिळून अवघी ४ हजाराचे घरात आली आहे. त्यात हौशी प्रवाशी फारच थोडे असतात. वर्षाकाठी सिलोनमध्ये येणाऱ्या प्रवाशांपैकी ६३ टक्के प्रवासी फक्त देश पाहण्यासाठी येतात, त्यात हिंदी नागरिकांची संख्या अत्यंत अल्प आहे. हे प्रवाशी जास्तीत जास्त १५ दिवस राहतात म्हणजे सिलोन हा देश १० दिवसांचे मुक्कामात सर्व चांगला पाहता येण्यासारखा असूनही तो

पाहण्याची उत्सुकता सधन हिंदी कुटुंबातही नाही. ही गोष्ट गेल्या पाच सहा वर्षाचे आकडयावरून स्पष्ट होते. असे का होते याचा विचार करता या देशाशी आमचे सरकारी गोटातून ठेवण्यात येणारे तुटपुंजे संबंध होत, तेथे जाऊन कोणताही महत्वाचा व्यापार करण्याचा प्रयत्न आम्ही केलेला नाही. साधे पाणी खेचण्याचे पंपही सिलोन ऑस्ट्रेलियाशी संबंध ठेवून अगर ब्रिटिश एजंटाशी पत्रव्यवहार करून स्वदेशी आणवितो. उसाचे लागवडीची माहिती हवी असेल तर सिलोनचे मंत्री हिदुस्थानात येण्याऐवजी मॉरिशस् अगर वेस्ट इंडिजला जाऊन येतील, पण भरपूर ऊस पिकविणाऱ्या हिंदशी पत्रव्यवहार करणार नाहीत. एवढे हिंदी शेजारी असून सिलोनला दूरचे वाटतात. असे का होत आहे, याचा विचार परराष्ट्रीय संबंधाचे दृष्टीने ताबडतोब होणे आवश्यक आहे.

कोणत्याही देशापेक्षा हिंदी नागरिकांचा संबंध जास्त राहिला पाहिजे. कारण दक्षिण हिदुस्थानात प्रामुख्याने तामीळ भाषा बोलली जाते व तीच भाषा सिलोनचे २० टक्के लोक बोलतात. जाफनाचे आसपासचे या उत्तरेकडील सिलोनी प्रदेशात काही ठिकाणे तर अशी आहेत की तेथे तामिळी भाषेशिवाय दुसरा शब्द ऐकू येत नाही. कलंबोसारख्या शहरात तर व्यापारानिमित्त आलेली ४०–५० गुजराथी व काही पारशी कुटुंबे मला भेटली. ते चांगले सधन आहेत. त्यापैकी काही जुन्या मंडळींनी सिलोनचे नागरिकत्वही मिळविले असून उत्तम व शोभिवंत घरे बांधून ते स्थाईक झाले आहेत. पण असे हिंदी बांधव हाताच्या बोटावर मोजण्याइतके आहेत. श्री. शांतिलाल बँकर नावाचे असेच एक गुजराथी गृहस्थ सिलोनच्या मर्चंट ऑफ चेंबरचे अध्यक्ष आहेत. त्यांचेशी मला सिलोनी व्यापार व त्याकडे हिंदी नागरिकांचे होत असलेले दुर्लक्ष याबाबत बरेच बोलावयास मिळाले. महाराष्ट्रातील फार तर आठ दहा कुटुंबेच सिलोनमध्ये असतील व ती सर्व निरनिराळ्या व्यवसायातील प्रमुख अधिकारी मंडळी आहेत. सिलोनला जाणारी व्यक्ति जर संपूर्ण शाकाहारी असेल तर तिचे मात्र जेवणाचे थोडे हालच होतील. सिलोन जरी बुद्धधर्मियांचा देश असला तरी मासे व अंडी हे बहुसंख्य नागरिकांच्या अन्नातील प्रमुख भाग असल्यामुळे कोणत्याही होटेलला याच पद्धतीचे जेवण प्रामुख्याने ठेवावे लागते. मी जरी शाकाहारी नसलो तरी माझ्याबरोबर असलेल्या माझ्या पत्नी संपूर्ण शाकाहारी अस-

त्यामुळे कोलंबोमधील एकुलते एक उत्तम शाकाहारी राहाण्याचे ठिकाण म्हणजे रामकृष्ण आश्रम. या शाकाहारी वसतिगृहात आम्हाला राहावे लागले. हे वसतिगृह अत्यंत सुंदर व परदेशातून येणाऱ्या प्रवाशांचे सुखसोयीकडे लक्ष देऊन समुद्रकाठी बांधले आहे. तेथील अन्नातील तिखट सांबार खाताना डोळ्यातून पाणी आल्याशिवाय राहात नाही. पोळी करण्याची प्रथा या वसतिगृहात नाही. पण शाकाहारी परदेशीय प्रवासी येथे सतत उतरत असल्यामुळे त्यांचेसाठी उत्तम ब्रेडची व्यवस्था येथे केलेली असते व या बाजारी ब्रेडवरच तुम्हाला आपली वेळ भागवावी लागते. शाकाहारी मंडळींना सिलोनमधील प्रवासात प्रामुख्याने येणारी कोणती अडचण असेल तर ही अन्नाची अडचण होय. काही तामिळी हॉटेलमधून चपात्या वगैरे देण्याची सोय आहे. पण ती वरच्या दर्जाची अगर महाराष्ट्रीयांना पसंत पडण्यासारखी नाही. सिलोनमधील ही तामिळी विश्रांति गृहे आपल्याकडील उडुपी हॉटेलसारखी वाटतात.

सिलोनचे हवामानाचा विचार करावयाचा तर मे ते जुलै हे मोठे पावसाळी महिने म्हणावे लागतील. यावेळी बहुसंख्य जिल्ह्यात १०० इंचावर पाऊस पडतो, उत्तरेकडील जाफना व सिलोनच्या ईशान्य कोपऱ्यात मात्र हे पावसाचे प्रमाण ५० इंचावर नसते व इतर वेळचे तेथील हवामान काहीसे हिंदमधील समुद्र किनाऱ्याजवळील प्रदेशासारखे असते. तेथील उष्णतामान ८५ ते ९५ अंश फॅरेनहाईटपर्यंत असते. म्हणजे सिलोनमधील प्रवासासाठी हिंदी माणसाला काही कपड्यांची स्वतंत्र तयारी करावी लागत नाही. त्यांचा हिंदी पेहराव सिलोनमधील प्रवासात चालू शकतो, सिलोनमधील सर्वसाधारण तामीळ मनुष्य जरी दाक्षिणात्याप्रमाणे लुंगी व शर्टवर भागवत असला तरी पण कलंबो व कँडीसारख्या शहरात राहणारा सिंहली युरोपियन कपड्याचा भोक्ता आहे. त्यांचेकडे अलिकडे बुशकोटचे प्रस्थ वाढत चालले आहे. पण सर्वसाधारण सधन व्यापारी मंडळी मला युरोपियन वेषात अधिक दिसली.

सिलोनला हिंदी नागरिकाला जावयाचे झाल्यास इतर परदेशाप्रमाणेच पार्सपोर्ट व व्हिसा या दोन्ही गोष्टी लागतातच. आंतरराष्ट्रीय आरोग्यनियमानुसार देवी व कॉलरा प्रतिबंधक लस टोचून घेतल्याचे सर्टिफिकेट हे

लागतेच. इतर परदेशाप्रमाणे सिलोन भेटीची कारणे देऊन प्रथम पासपोर्टसाठी अर्ज करावा लागतो. रामायण कालापासून सिलोन हिंदी नागरिकांचे तीर्थयात्रेचे ठिकाण असल्यामुळे तीर्थयात्रेसाठी जावयास व्हिसा मिळू शकतो व सरकार यासाठी काही परदेशी चलनही देऊ शकते. आपल्या सिलोनमधील एखाद्या मित्राकडे अगर नातलगाकडे जावयासही हिंदी नागरिकांना परवाना मिळू शकतो. तो परवाना सिलोन कॉन्सल मुंबई यांचेकडून मागणी करून घ्यावा लागतो. साधारणपणे सिलोन पाहावयास जाणाऱ्या प्रवाशाला १० दिवसांपेक्षा जास्त दिवस सिलोनमध्ये राहावयाची आवश्यकता नाही. विमानाने सिलोनला जाणाऱ्या प्रवाशाला सिलोन एअरवेजची विमाने व इंडियन एअर लाईन्सची विमाने मिळू शकतात व त्याला येण्या-जाण्याचे प्रवासाला हिंदी चलनात ८९३ रुपये पडतात. रिझर्व्ह बँक परवानगी देईल तेवढे चलन या दहा दिवसांचे प्रवासासाठी आपणाला ड्राफ्ट चेक अगर सिलोनी बॅन्कवर ड्राफ्ट घेऊन नेता येते. सर्वसाधारणपणे १ पौंडाला हिंदुस्थानात १८रुपये पडतात तर सिलोनी रुपये १४ पडतात व त्या हिशोबाने योग्य ते पैसे घेऊन सिलोन बँकावर रिझर्व बँकेचे आज्ञेनुसार आपल्या बँका आपणाला ड्राफ्ट देऊ शकतात व ते सिलोनमध्ये मोडता येतात. पैसे मोडताना अगर येथून नेताना याचा उल्लेख इतर परदेशी प्रवासाप्रमाणे पासपोर्ट करून द्यावा लागतो. या परदेशी चलनाबाबत सिलोनचे कस्टम आपले इतकेच चोखंदळ असते. हिंदी पैसे जर तुमचे जवळ असतील तर ते सिलोन विमान तळावर अधिकाऱ्याकडे देऊनच नंतर सिलोनी शहरात जाता येते व परतताना ते परत मिळू शकतात. मी गेलो त्यावेळी बी. ओ. ए. सी. व सिलोन एअरवेजची विमाने मुंबईमार्गे कलंबोला जात. मद्रासमार्गे जावयाचे झाल्यास इंडियन एअर लाईन्सचे विमानातून मद्रास-मार्गे कलंबोला जावे लागे. अर्थात सोईचा व अवघा ४ तासात होणारा प्रवास मुंबईमार्गे दुपारी १ वाजता निघून सिलोनला ५ वाजता पोहोचणे अधिक सुख-कर वाटते. बी. ओ. ए. सी.चे विमान मिळाले तर हा प्रवास अडीच तासात होतो. ही विमाने कलंबोच्या रतम्लाना विमान तळावर उतरतात, मुंबईच्या सांताक्रूझ व मद्रासच्या विमानतळावरून सिलोनला जाण्यासाठी निघावे लागते. रतमलाना विमानतळ कलंबो शहरापासून साडेआठ मैलांवर आहे. पण कलंबो शहर व विमान तळ यामधील मार्गावर कलंबोचे उपनगर पसरलेले आहे.

रामेश्वरपर्यंत आगगाडीने जाऊन तेथून छोट्या बोटीने सिलोनच्या-किनाऱ्यावर चार तासात जाता येते व तेथून रेल्वेने कलंबोला जाण्याची सोय आहे. या बोटी सोमवारी व गुरुवारी आठवड्यातून दोन दिवशी रामेश्वरहून सुटतात. सिलोनला यात्रेसाठी जाणाऱ्या मंडळींना ही बोट सोईची पडते. येताना रामेश्वरकडे यावयास मंगळवारी व शुक्रवारी सकाळी १० वाजता बोटी मिळू शकतात. व्हिसासाठी करावयाचा अर्ज सिलोनला निघण्यापूर्वी दोन आठवडे आधी करावा लागतो. सिलोनमध्ये उतरण्यापूर्वी विमानात अगर बोटीवर प्रवाशाला एमिग्रेशन कार्ड भरावे लागते व त्यात आपले जवळ असलेले दागदागिने, मौल्यवान वस्तु व इतर पैशांचा सविस्तर हिशेब द्यावा लागतो. परतताना अशीच नोंद या कार्डावर मद्रास अगर मुंबईला करावी लागते. म्हणजे सिलोन हा जरी अगदी जवळचा देश असला तरी कोणत्याही परराष्ट्रांत प्रवेश करताना जे पासपोर्ट, व्हिसा व चलनाचे नियम पाळावे लागतात ते सर्व नियम या ठिकाणीही पाळावे लागतात. त्यासाठी सिलोन म्हणजे आशियातील एक छोटे राष्ट्र आमचे मानाने कितीतरी लहान अशी कल्पना करून घेऊन कोणीही सिलोनमध्ये, प्रवेश करू नये. कुशल राज्यकर्ते व ब्रिटिशांचे तंत्रात तयार झालेले व कित्येक परराष्ट्रांशी सतत संबंध ठेवणारे कार्यनिष्ठ अधिकारी सिलोनमध्ये आहेत. हे ओळखूनच या देशात प्रवास करावा.

दहा दिवसांच्या मुक्कामात ज्यांना नुसती वनश्री व सिलोनमधील वैशिष्टचपूर्ण ठिकाणे पाहावयाची आहेत, त्यांना सर्व सिलोन साधारणपणे सात ते आठ दिवसात पाहता येते व दोन दिवस कलंबो व राजधानीचे ठिकाणी भेटीगाठीसाठी ठेवावे लागतात. माझ्यासारख्या पत्रकाराला कलंबो येथेच बऱ्याच गाठीभेटी घ्यावयाच्या असल्यामुळे दोन दिवस अपुरे पडले. सिलोनमध्ये उत्तरकडे जाफनापासून दक्षिणकडे गॉलपर्यंत व पूर्व किनाऱ्यावरील त्रिकोमाली व अनुराधपुर या ठिकाणापर्यंत जाण्याचे मार्ग व वाहनाच्या सोयी इतक्या चांगल्या आहेत की कोणताही त्रास न होता प्रवास करता येतो. कलंबोमधील टुरिस्ट ब्यूरोच्या कचेरीत सविस्तर माहिती देऊन प्रवासाची तयारी करावी. स्वतंत्र खासगी मोटार मिळाल्यास फारच चांगले, कारण दोनशे मैल लांब व १४० मैल रुंदीच्या या बेटात रस्ते अत्यंत चांगले व खासगी मोटारमधील प्रवास युरोपमधील प्रवासाइतकेच सुखकर आहेत.

दक्षिणेकडून प्रवासास सुरुवात करावयाची तर सिलोनमधील गॉल-(Gallo) या शहरापासून करावी. कलंबोपासून सिलोनचे हे दक्षिण टोक ७२ मैलांवर असून तेथे रेल्वेने तीन तासात जाता येते व रस्त्याने, मोटारीने जावयाचे म्हटले तरी तेवढाच वेळ लागतो. टचुरिस्ट ब्यूरोच्या आरामगाडचा चांगल्या आहेत व रस्ता समुद्रकिनाऱ्याजवळून गेला असल्याकारणाने प्रवास मोठा आल्हाददायक होतो. या ठिकाणी सिलोनमध्ये प्रथम डच उतरले व तेथे त्यांनी आपल्या संरक्षणासाठी बांधलेल्या किल्ल्याची भित व दीपस्तंभ अजूनही पाहावयास मिळते. बहुतेक परराष्ट्रीय मंडळींचे आक्रमण गॉलच्या समुद्र-किनाऱ्यावरून झाले असल्यामुळे शहराला सिलोनच्या इतिहासाचे दृष्टीने फार महत्त्व आहे. एक जुने चर्च डच कमांडरचा राहण्याचा बंगला अतिक्रमणाचे जुने अवशेष म्हणून येथे राखून ठेवले आहेत. शहरांत डच व सिलोनी नागरीक यामधील संमिश्र प्रजाजनांची कुटुंबे (बर्गर्ज) येथे बरीच पाहावयास मिळतात. सिलोनमधील हस्तीदंती काम येथे चांगले मिळते. दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिश विमानदलाचा एक मोठा तळ येथून आठ मैलांवर कारेगाला, या खेडचाजवळ होता. चहाचे व रबराचे मळे शहराभोवती बरेच पाहावयास मिळतात. कासवाच्या कवचाच्या अनेक वस्तू या शहरात विकत मिळतात. सरकारी योग्य दरात विकणारे लक्सरं हे दुकानही येथे आहे. गॉल व कलंबोचे रस्त्यावर हिक्कडुवां नावाचे एक ठिकाण असून, त्या ठिकाणी समुद्रातील कॉरल रिफ नावाचे एक सुंदर ठिकाण आहे. काचेच्या तळ असलेल्या बोटीतून समुद्रांचे तळाची ही बाग रंगोबेरंगी बाग-पाहण्याचीही सुंदर सोय आहे. सिलोनमधील हे एक वैशिष्टच आहे व ते इतर ठिकाणी पाहावयास मिळत नाही. जगातील एक प्रेक्षणीय गोष्ट म्हणून समुद्रबागेचा उल्लेख करतात.

कलंबो शहराची उभारणी पोर्तुगीज किल्ल्याचे आसमंतात आहे. जवळजवळ ४०० वर्षांपूर्वी या किल्ल्याची बाहेरील भित बांधली आहे. कलंबो शहराची बांधणी मोठी सुंदर असून, ती युरोपातील शहराप्रमाणे वाटते. डचांच्या वेळी समारंभासाठी सतरावे शतकात वापरण्यात येणाऱ्या एका मोठ्या दिवाणखान्यात आता चर्च आहे. तर १०० वर्षांपूर्वीच्या एका लाईट हाऊसचे जागी एक उंच खांब बांधला आहे. जुन्या किल्ल्याचे अवशेष आता येथे

सापडत नाहीत. कारण तेथे मोठी आधुनिक बाजारपेठ आता वसली असून येथील प्राणी संग्रहालय पाहण्यासारखे आहे. तेथे रोज सायंकाळी पाच वाजता शिकविलेल्या हत्तींचा नाच चालतो. हा न चुकविण्यासारखा प्रकार आहे. कलंबोची मुख्य बाजारपेठ चाथम्, यॉर्क, प्रिन्स व क्वीन स्ट्रीट या रस्त्यावर वसलेली असून येथील 'लकसर' या सरकारी दुकानात सिलोनचे सर्व वैशिष्ट्य असणाऱ्या वस्तू विकत मिळतात. जपानी, चिनी व ऑस्ट्रेलियन माल विक्रीस ठेवलेला अजूनही या दुकानातून मिळतो व तो हाती भरपूर पैसे असेल तर विकत घेणे सोईचे, पण सिलोनमधून बाहेर पडताना ५०० रुपयांचेवर किंमतीचा माल आणता येत नाही, ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. सिलोन-मध्ये हिंडणारी व कचेरीत जाणारी मुलगी आपल्याकडील शिक्षित मुलीपेक्षा फारशी निराळी वाटत नाही. ती नेहमी पाच किंवा सहावारी साडी नेसते. त्यावर विणकाम मात्र चांगले केलेले असते. सुती साड्या वापरणाऱ्या महिला येथे फारच थोड्या दिसतात. बहुतेक परदेशी डेक्रॉन, टेरलिन, रेयॉन कापडांना या मुलींची विशेष मागणी असते. यामुळेच कलंबोचे बाजारपेठेत हा माल विशेष दिसतो. काही हिंदी सुती कापडही या ठिकाणी दिसते. पण त्याला विशेष मागणी नाही असे दुकानदार सांगतात.

सिंहली राज्यात शेवटचा तळ म्हणजे कँडी! हे सिलोनमधील महत्त्वाचे शहर होय. कोलंबोपासून हे ७२ मैलांवर असून, रेल्वे व मोटार या दोन्ही रस्त्याने जाता येते. डोंगराच्या खबदाडीत १७०० फूट उंचीवर हे शहर वसले असून, आपल्याकडील एखाद्या थंड हवेच्या ठिकाणासारखे भासते. या शहराच्या मध्यभागी एक सुंदर तळे असून, त्यात होडीतून फिरण्याची सोय आहे. कँडीचे शेवटचे सिंहली राजे विक्रम राजसिंह यांनी हे बांधले व याच तळ्याचे काठी बुद्धाचे पवित्र मंदिर असून, दालद मालीगवं (Dalada Maligawa) असे म्हणतात. या ठिकाणी पंधरा दिवस मोठा महोत्सव चालतो. या महोत्सवाला 'इसाला पेरहरा' असे म्हणतात. तो पोया कॅलेंडर-नुसार कधीतरी जुलै किंवा ऑगस्टमध्ये येतो. या बुद्ध मंदिरात बुद्धाचा दात ठेवला असून, या उत्सवात त्याचे दर्शन होते असे म्हणतात. हे मंदिर म्हणजे सिलोनमधील सर्वांत मोठे बौद्ध मंदिर असून त्याचे दर्शनासाठी जगातील सर्व

बौद्ध येतात. एखाद्या किल्ल्यासारखे हे मंदिर भासते. कँडी व न्युरेल्या-विभागात सिंधी भाषेचे विशेष प्राबल्य दिसते. तेथे पाहण्यासारखी दुसरी दोन ठिकाणे म्हणजे परदीनिया हे सिलोनमधील मोठे विद्यापीठ व कटुगास्टोट तळ्यात आंघोळ करणारे हत्ती या गोष्टी होत. रेल्वेने येथे यावयास अडीच ते तीन तास लागतात.

सिलोनमधील सर्वांत उंच म्हणजे ६२०० फूट उंचीवरील थंड हवेचे ठिकाण म्हणजे सिलोन मधील एक वैशिष्टयपूर्ण शहर आहे. न्युरेल्या, कँडी ते न्युरेल्या रस्ता म्हणजे सिलोनचे सौंदर्य साठविलेला रस्ता आहे. दोन्ही बाजूला डोंगरावरील सुंदर कापलेले चहाचे मळे व त्यातून गेलेला नागमोडी रस्ता मोठा मजेशीर दिसतो. १९९८८ लोकसंख्येचे हे ठिकाण. ब्रिटिशांचे सिलोनमधील सर्वांत आवडते शहर म्हणून या शहराची रचना त्यांनी डोंगरावर मोठी मजेशीर केली व हे शहर पाहताना हिंदच्या सिमला शहराची आठवण होते. रामायणकालीन सीतेचे मंदिर व अशोकवन येथे होते, असे लोक सांगतात. सबंध सिलोनमध्ये रामायणकालीन पुरावा फक्त येथे सापडतो. हे सीता मंदिर एका ओढ्याकाठी असून तेथे सीता–राम–लक्ष्मणाच्या मूर्ती आहेत. येथून अशोकवन म्हणून दाखविण्यात येणारा भाग दोन मैलांवर आहे. १९०००लोकवस्तीचे या शहरात नगरपालिका आहे. न्युरेल्याची बाजारपेठ नेहमी परदेशी मालांनी भरलेली असते. या ठिकाणी फुलांची प्रदर्शने, हत्तींच्या शर्यती व कुत्र्यांची प्रदर्शने नेहमी भरविली जातात.

सिलोनचे प्राचीन वैभव दाखविणारे कोणते गाजलेले शहर असेल तर ते अनुराधपुर होय. कलंबोपासून हे १२८ मैलांवर आहे. या जुन्या राजधानीत १५ व्या शतकात जवळजवळ ९० राजांनी राज्य केले. इसवीसनापूर्वी ४३७ वर्षे शहराचे नाव सिलोनचे इतिहासात सापडते. आजचे शहर सिलोनचा चौथा राजा पांदुकावय यांनी बांधले असे म्हणतात. सिलोनमधील सर्वात मोठ्या अशा या शहरात २९ हजार लोक राहतात व समुद्रसपाटीपासून ते २६० फूट उंचीवर आहे. त्यामुळे हवामान सुंदर असते. सिलोनचे तीर्थस्नान म्हणून या शहराचा उल्लेख केला जातो. इसवी सनापूर्वीच्या बुद्ध कारागीरांच्या कित्येक इमारती येथे दाखवितात. त्यात थुपरम हे बुद्ध मंदिर, इसरूमुनिया मंदिर, हत्तीशाळा, जुन्या

राजांची स्नानमंदिरे वगैरे बरीच ठिकाणे पाहण्यासारखी आहेत. येथील मिहिन-ताला नावाच्या ठिकाणासाठी टेकडीवर १८४० पायऱ्या चढून जावे लागते. या जुन्या अवशेषांचे फोटो घेण्यास सर्वांना बंदी आहे. त्यासाठी कलंबोच्या पुराणवस्तु संशोधन खात्याची परवानगी घेऊन यावे लागते. येथून ३० मैलांवर असलेल्या कलेवेला येथील बुद्ध पुतळा ४० फूट उंचीचा असून तो बुद्धाचा जगातील सर्वांत उंच व उत्तम पुतळा समजण्यात येतो.

सिलोनच्या वैशिष्ट्याची कल्पना देणारी जाफना, त्रिकोमाली ही शहरे पाहण्यासारखी आहेत. याशिवाय बंदारवाला हे थंड हवेचे ठिकाण निगोम्बो हे पश्चिम किनाऱ्यावरील बंदर व दक्षिणेकडील मातारा सीगिरिया हे शहर वेळ असल्यास पहावे, पण वेळेनुसारच या शहराला प्रवाशी भेटी देतात. बुद्धाचे रम्य पुतळे, हे सिलोनचे वैशिष्ट्य आहे. सिलोनमध्ये कधीही हिंदप्रमाणे उघड्या अंगाचा बुद्ध आढळत नाही. त्यांचे अंग नेहमी झाकलेले असते. हे वैशिष्टय लक्षात ठेवण्यासारखे आहे. सिलोनमधील जाफनातील बोलके तामिळी नागरिक व इतर ठिकाणचे आतल्या गाठीचे मितभाषी सिलोनी हा फरक फार जाणवतो. या भाषाप्रभुत्वाचे प्रदेशात प्रवास करताना ही गोष्ट चटकन लक्षात येते.

जगातील पाच मोठ्या रत्ने मिळणाऱ्या देशात सिलोनची गणना होते. ज्याला आपण माणिक (GEM) या नावाने संबोधतो, त्याची पैदास सिलोन खाणीतून मोठ्या प्रमाणावर होते. जमिनीखाली साधारण ५० फुटापासून तीनशे फुटापर्यंत त्याचे थर आढळतात.सर्वांत महत्त्वाचे कोरंडम (Corundum) जातीचे माणिक या खाणीत आढळते व तांबडा, निळा, पिवळा व पांढरा एवढ्या रंगात ती असतात. त्यांना रुबी, ब्ल्यु-सफायर, यलो-सफायर, व्हाईट-सफायर, अशी नावे ब्रिटिशांनी दिली आहेत. ही माणके कोठून घ्यावी म्हणजे खात्रीशीर मिळतील याची यादी टुरिस्ट ब्यूरोकडून मिळू शकते. सिलोनमध्ये जगातील सर्व राष्ट्राप्रमाणे रविवार हा सुट्टीचा दिवस नसतो. पोया डे म्हणजे आठवड्यातील एका ठराविक दिवशी सिलोनी कॅलेंडरमध्ये येतो. त्या दिवशी बँका, कचेऱ्या, सर्व दुकाने व महत्त्वाच्या सर्व बँका, (हिंदी व परदेशी बँकाही) बंदच ठेवावा लागतात आणि बाजारासाठी बाहेर पडणारांचा हिरमोड होतो. तेव्हा सुट्टीचा दिवस कोणता हे नीट पाहूनच त्यानुसार वागणे चांगले. या शिवाय वर्षा-

वर्षांतून निरनिराळ्या सणाच्या १५ सुट्टया अधिकृतरीत्या देण्यात येतात. मुसलमानांचा रमझान, तामिळींची महाशिवरात्र, खिश्चनांचा गुडफ्रायडे, ईस्टरसन्डे, २५ डिसेंबर खिसमस डे, व हिंदूची दिवाळी यांचा समावेश आहे.

विशेषत: कलंबो, कॅन्डी, न्युरेल्या वगैरे शहरात आजही आधुनिक पद्धतीवर बांधलेली सिनेमा नाटकांचीं थिएटर आहेत. त्यात ब्रिटिश व अमेरिकन बोलपट व सिंहली व तामिळीं आणि हिंदी बोलपट प्रामुख्याने दाखविले जातात. कलंबो येथील लायोनेल वेन्डथ थिएटर हे मोठे आधुनिक थिएटर असून, तेथे शेक्सपियरचे नाटकापासून ॲगथा ख्रिस्टी यांच्या अलिकडील नाटकांपर्यंत सर्वप्रकारचीं इंग्रजीं नाटके पाहावयास मिळतात.

नृत्याचीं आवड सिलोनी नागरिकांना फार आहे. वजिरा व चित्रसेना या दोन गाजलेल्या नर्तिकांनी आपल्या नृत्याच्या कंपन्याच स्थापन केल्या असून, त्याचे नृत्य लिम्बुनीं थिएटरमध्ये कलंबोत पाहावयास मिळते. ऑर्केस्ट्रा संगीताचे कार्यक्रम होटेल्स व थिएटरमधून होतात व त्यांचे सिलोनी नागरिक बरेच षौकीन आहेत. याशिवाय वेन्डथ आर्ट गॅलरी व कलंबो म्युजियम हीही पाहण्यासारखी ठिकाणे आहेत. तसेच कलंबोचे प्राणिसंग्रहालय आपल्याकडील म्हैसूरचे प्राणि संग्रहालयाइतकेच व्यवस्थित आहे.

सुधारणांचे बाबतीत सिलोन आमचेपेक्षा फार झपाटयाने पुढे पावले टाकीत आहे. बऱ्याच परदेशीय राष्ट्रांची त्यांनी मैत्री संपादन केली असून, आंतरराष्ट्रीय क्षेत्रातही सिलोनच्या पुढाऱ्यांनी चांगले नाव कमावले आहे. साक्षर नागरिक, सुबुद्ध तरुण पिढी यामुळे जागृत जनता सिलोनची धुरा जेवढी आस्थेने पेलते, तेवढेच मतभेदांचे जाळे येथे एवढे पसरलेले आहे की कोणत्याही पक्षाचे प्राबल्य येथे केव्हा वाढेल, हे सांगता येत नाही. यामुळे राजकीय अस्थिरता हे सिलोनच्या जीवनाचे एक वैशिष्टच बनले आहे.

हे छोटे वाटणारे जागृत बेट आमचे मित्रराष्ट्र कसे बनेल व त्याच्या हातात हात घालून व वेळप्रसंगी तेथील स्थानिक प्रश्न सोडविण्याचे दृष्टीने आम्ही काही मदत करीत आहोत असे वाटत नाही. हिंद व सिलोनचे संबंध आजही मोठे प्रेमाचे

आहेत असे वाटत नाही. आणखी तेथील स्थानिक हिंदवासीयांना आफ्रिकेतील हिंदी नागरिकांप्रमाणेच आपणाला आपले देशाचा मोठा आधार आहे असे वाटत नाही. सिलोनशी प्रभावी राजनैतिक संबंध आम्ही ठेवलेले नाहीत, ते ठेवण्याइतके प्रभावी प्रतिनिधी आम्ही तेथे पाठवीत आहोत, अशी परिस्थिति नाही. यामुळे सिलोनच्या राजकारणाशी एक शेजारी म्हणून आम्ही एकरूप होऊ शकत नाही. हे आमचे परराष्ट्रीय संबंधातील मोठे न्यून आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

REFBK-0019003

REFBK-0019003

सिलोनमध्ये प्रवास करताना सिंहली भाषेशिवाय चालत नाही. इंग्रजी जरी बऱ्याच जणांना येत असले, तरी दक्षिण हिंदुस्थानप्रमाणे त्याचा वापर सरसहा होत नाही. त्यासाठी नेहमी लागणारे काही सिंहली शब्द ठाऊक असणे आवश्यक आहे.

## परिशिष्ट

| | मराठी | सिंहली | इंग्रजी |
|---|---|---|---|
| १) | कृपा करून | करुणा-करा | KAH-ROO NAH KA-RA |
| २) | आभारी आहो | इस–यु–थी | IS - THOO-THI |
| ३) | सावकाश | प्री–व्हे–सा–मिनू | PRE - VE - SA - MIN |
| ४) | घाई करा | इक्–मनीन | IK - MANIN |
| ५) | सावकाश चला | हेमीन | HEMIN |
| ६) | नमस्कार | अयु–बो–वान | AYU - BO - WAN |
| ७) | पाणी | वाथुरा | WATHURA |
| ८) | जेवण | केमा | KE - MA |
| ९) | चहा | थी | THE |
| १०) | पेय | बी-मा | BEE - MA |
| ११) | खोली | कमरे | KAA - MARE |
| १२) | पैसे | सल्ली अथवा कस्सी | SALLI OR KASSI |
| १३) | मोड | इथुरू कस्सी | ITHURU - KAASI |
| १४) | किती | की याथी | KEE - YA - THE |
| १५) | किती वाजले | वेलावी की याथी | WELAWE-KEE-YA-THE |
| १६) | तिकिटे | मुध्धारा | MUDDHARA |
| १७) | स्नानगृह | वसिकीलिया | VASIKILIYA |
| १८) | कागद | कडाधसी | KADA - DHASI |
| १९) | मी | मा–मा | MA - MA |
| २०) | तुम्ही | ओ–बा | O - BA |
| २१) | ते | ओ–वुन | O - VUN |
| २२) | आम्ही | अपी | API |
| २३) | सामान | बादु | BADU |
| २४) | आण | जेननी | GEN - NE |
| २५) | होय | ओवू | OVU |
| २६) | नाही | नीही | NEHE |